म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.



# समर्थ रामदास
## एक अभ्यास

य. दि. पेण्ढरकर



REFBK-0013768

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

# समर्थ रामदास : एक अभ्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३५६८
REFBK-0013768

रविकिरणमंडळाचे एकुणपन्नासावे पुस्तक

# समर्थ रामदास : एक अभ्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: निबंध
अनुक्रम ३७६९२
क्रमांक १५६५ नों दि २०।२।६५

यशवन्त दिनकर पेण्ढरकर

93696

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळकरस्ता, पुणे २

पहिली आवृत्ती : नोव्हेंबर १९६४

© यशवन्त दिनकर पेण्ढरकर

**किंमत रुपये १२·५०**

---

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळकरोड : पुणे २.

मु द्र क : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव : पुणे २.

# खुलासा आणि आभार

समर्थ रामदास यांच्या ग्रंथभाण्डाराचा यथामती केलेला अभ्यास हा प्रस्तुत ग्रंथाचा पूर्वभाग म्हणता येईल. गेल्या वर्ष-दीड-वर्षात जे लिखाण प्रकाशित झाले ते येणेप्रमाणे :

रामदासांचा वृत्तविलास : वसंत मासिक, जुलै १९६३.
समर्थांची शब्दसृष्टी : वाङ्मयशोभा, सप्टेंबर १९६३.
समर्थांच्या संगतीत : विवेक–विजयादशमी विशेषांक, १९६३.
सुखालागि आरण्य सेवीत जावें : जनवाणी, दिवाळी अंक, १९६३.
विद्यार्थ्यांना समर्थांचा संदेश : आनंद, दिवाळी अंक, १९६३.
एका अभंगाचे दत्तविधान : रविवारची लोकसत्ता, २९–१२–६३.
ज्या कारणें गुंडाळिती तेंचि वाचे उच्चारिती : रविवारचा तरुण भारत, पुणे, ५–१–१९६४.
समर्थांची दृष्टान्त-संपदा : वसंत, फेब्रुवारी, १९६४.
रामदासांचे कवित्व : मनोहर, फेब्रुवारी, १९६४.
रामदास : अवतारी संत : अमृत, सप्टेंबर, १९६४.

ह्या लिखाणाची प्रस्तुत ग्रंथासाठी जुळवाजुळव करताना, नंतर उपलब्ध झालेल्या साहित्याची ‘ वृत्तविलास ’ मध्ये बरीच भर घालण्यात आली आहे. इतर लिखाणांतही पुष्कळ सुधारणा केल्या असून, पूरक मजकुराची जोड देण्यात आली आहे. ‘ विद्यार्थ्यांना समर्थांचा संदेश ’ हा लेख आनंद मासिकासाठी लिहिला होता. ते मासिक बालवाचकांसाठी असल्यामुळे, त्या लेखाचे स्वरूप, त्या वाचकांच्या दृष्टीने काहीसे रंजनात्मक, ललित, स्वप्नरुचिर, असे ठेवले होते. त्यामुळे त्याला मर्यादाही पडल्या होत्या. पण ह्या ग्रंथासाठी त्याचे निबंधात रूपान्तर तर केलेच, पण ‘ दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें ’ ह्याचा अर्थ त्या वेळी जो दिला नव्हता, तो इथे प्रथमच विस्तृतपणे आणि एकाधिक दृष्टिकोनांतून देण्यात आला आहे.

“ रामदासांचे रामायण ” हा लेख ह्या ग्रंथात प्रथमच प्रकाशित होत आहे. मात्र ह्यातील काही भाग पुणे आकाशवाणी केंद्रावरून रामनवमीला ( २०-४-६४ रोजी ) ध्वनिक्षेपित करण्यात आला होता.

विवेचनात्मक मजकुराला पूर्तता यावी म्हणून देहबुद्धी, मत-मतान्तर आणि दोष-परामर्ष ही प्रकरणे, त्याचप्रमाणे ‘ समर्थांची जीवनसरिता ’ अशी एकूण चार नवीन लेखांची जोड देण्यात आली आहे. ‘ प्रेरणा ’ हा उपोद्घात या ग्रंथाच्या निमित्तानेच निर्माण झाला असल्यामुळे, तोही इथेच प्रथम प्रगट होत आहे.

"कौल हे प्रकरण काय आहे?" हा श्रीदीपलक्ष्मीच्या (डिसेंबर १९६३ च्या) अंकात आलेला लेख ज्यांना आठवत असेल त्यांना, त्याचा येथे अंतर्भाव का केला नाही, असा प्रश्न पडेल. त्याबाबत सांगायचे असे की, पांगारकर–संपादित श्रीसमर्थ-ग्रंथ-भाण्डाराचा अभ्यास करीत असताना, त्यात "कौल" हे प्रकरण आढळले;आणि मला ते फार हृद्य वाटले. त्याचे सौंदर्य, त्यातला प्रजाहितदक्षतेचा उदात्त दृष्टिकोन आणि त्या मागची प्रेरणा, कविमनाची प्रक्रिया, यासंबंधीचे माझे विचार "कौल हे प्रकरण काय आहे?" या लेखात मी मांडले. तो लेख वाचून धुळे येथील सत्कार्योत्तेजक सभेचे चिटणीस श्री. न. वा. शिदोरे यांनी माझ्या नजरेस आणले की, हे 'कौल' काव्य रामदासांचे नसून श्रीसमर्थ-शिष्या वेणाबाई यांचे आहे. पांगारकर-संपादित श्रीसमर्थग्रंथभाण्डारात "कौल" आढळल्यामुळे आणि शेवटच्या श्लोकातील "विणी स्वामिणी" ह्या उल्लेखाची चिकित्सा करण्याचे अनवधान झाल्यामुळे जी मजकडून चूक झाली होती ती श्री. शिदोरे यांनी माझ्या नजरेस आणली. [ह्या त्यांच्या जागरूक तत्परतेबद्दल आणि इतरही काही माहिती पुरविल्याबद्दल त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे.] अशा रीतीने "कौल" हे काव्य रामदासांच्या ऐवजी वेणाबाईचे ठरल्याने तो लेख बाजूला काढून ठेवावा लागला आहे.

'एका अभंगाचे दत्तविधान' हा लेख वाचून, श्री. स. कृ. जोशी यांनी तो अभंग तुकाराममहाराजांचाच आहे असे उत्तर प्रसिद्ध केले होते. पण मूळ शंकेच्या निरसनाला साह्य होईल असा भाग त्या उत्तरात नव्हता.

प्रस्तुत ग्रंथाचा उत्तर भाग म्हणजे समर्थांची निवडक कविता. विवेचनाला कवितांची जोड दिल्याने अभ्यासाला मदतच होईल. समर्थांची साहित्य-संपदा उदंड आणि गुणसमृद्ध असल्यामुळे, उतारे घेताना 'काय निवडावे निवडणारे' अशी स्थिती झाली असल्यास नवल नाही. मनाचे श्लोक, दासबोध, जुना दासबोध, करुणाष्टके, रामायण, प्रासंगिक कविता, स्तोत्रे, असे त्यांच्या कवितेचे स्थूल विभाग पडतात. शिवाय, ओव्या-शतके, पंचमहाभूतांवरील कवितापंचके, षड्रिपूंवरील प्रकरणे, अशी किती म्हणून रचना सांगावी ! जीवित सार्थकी लावण्यासाठी अभ्यास, प्रयत्न गुणावगुण, आचारविचार, इत्याद्यनेक विषयांवर त्यांनी विपुल कविता केली आहे. आरत्या हा पद्यप्रकारही समर्थांइतका सांक्षेपाने अन्य कोणी हाताळला नसेल. प्रत्येक वाराचे माहात्म्य ध्यानी घेऊन, त्यास अनुसरून, निरनिराळ्या दैवतांना अनुलक्षून त्यांनी भजनासाठी अभंग लिहिले आहेत. अशा ह्या उदंड संभारांतून निवड करताना केवळ वानगीदाखलच पद्यप्रकार वेचून घेऊन कार्यभाग साधण्याशिवाय मार्ग नव्हता. अध्यात्मविषय ज्यात प्राधान्य पावला आहे ते कवित्व तर अशा त्रोटक निवडीत सामावता येणेच कठीण. जे काही वेचे घेतले आहेत ते वाचून समर्थांच्या समग्र ग्रंथभाण्डाराचे अध्ययन करण्याची उत्सुकता उत्पन्न व्हावी हा हेतु आहे.

शेवटी टीपा दिल्या आहेत. प्रारंभीच्या विवेचनातील काही फटी बुजविण्याची तिथे संधी साधली असल्यामुळे वाचकांनी त्यांकडेही लक्ष देणे अगत्याचे आहे.

अशा स्वरूपात हा ग्रंथ उभा राहिला याला कारण श्री. अनंतराव कुलकर्णी ( कॉंटिनेंटल प्रकाशन ) यांचे सौहार्द होय. ज्या नियतकालिकांतून, वर म्हटल्याप्रमाणे, हे लिखाण प्रसिद्ध झाले त्यांचे संपादक आणि पुणे–आकाशवाणी–केंद्राधिकारी यांचाही मी फार आभारी आहे.

' रामदासांचा वृत्तविलास ' आणि ' समर्थांची शब्दसृष्टी ' हे लेख वाचून **डॉ. के. ना. वाटवे** यांनी कळविले की, " दोनीहि लेख फार आवडले. व्यासंगपूर्ण आहेत. समर्थहृदयात शिरून लिहिलेले आहेत. " ह्या त्यांच्या अगत्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

आज हे पुस्तक प्रकाशित होत असताना प्रा. डॉ. वा. दा. गोखले हयात नाहीत, याचे मला अत्यंत दुःख होत आहे. रामदासांची जीवनसरिता, रामदास : अवतारी संत, देहबुद्धी, दोष–परामर्ष आणि मत–मतान्तर हा त्यांच्या पश्चात लिहिलेला भाग सोडल्यास, बाकीच्या सर्व लिखाणाचे ते पहिले श्रोते होते. " नेटकें लिहितां ये ना । वाचतां चुकतां सदा । अर्थ तो सांगतां ये ना । " अशी माझी ज्ञानमर्यादा असल्यामुळे, आडल्या–सवरल्याला मी त्यांच्याकडे धाव घेत असे. माझ्या शंकांचे निरसन करून त्यांनी मला पावलोपावली उत्तेजन दिले आहे. " जितकें कांही आपणासि ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें । शाहाणे करून सोडावे । बहुत जन ॥ " ह्या वृत्तीची त्यांची तत्परता असे. आणि विशेष असे की ह्या तत्परतेत आढ्यतेची किंचितही छटा नसे. आपल्याला ठावे असलेले दुसऱ्याला सांगण्यात त्यांची भावना विनीत सेवेकऱ्याची होती. त्यामुळे लेख लिहून झाला की प्रथम त्यांना दाखवून त्यांच्या पसंतीचा कौल मिळवावासा वाटे. ह्या ग्रंथान्तरीच्या विवेचनातील भल्या-बुऱ्याचा माझा मीच धनी असलो तरी त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मी ही मजल गाठू शकलो आहे. आज ग्रंथप्रकाशनाच्या वेळी ते असते तर त्यांना किती तरी आनंद झाला असता. अर्थात, त्याचबरोबर माझाही आनंद द्विगुणित झाला असता. ईश्वरी इच्छा बलीयसी ! तरी पण त्यांचा आत्मा ह्या प्रसंगी संतोषाचा मूकसंदेश मजकडे पाठवीत असेल अशी माझी श्रद्धा आहे. ह्या श्रद्धेने कृतज्ञतेचा हा निवापाञ्जली मी आज त्यांना अर्पण करीत आहे.

१४९६ सदाशिव<br>पुणे २<br>११ नोव्हेंबर १९६४

यशवन्त दिनकर पेंढरकर

# समर्थ रामदास : एक अभ्यास

## पूर्वरंग :


खुलासा आणि आभार

| | |
|---|---|
| १. प्रेरणा ( उपोद्घात ) | ३ |
| २. समर्थांची जीवन-सरिता | १४ |
| ३. रामदास : अवतारी संत | २५ |
| ४. समर्थांच्या संगतीत | ३० |
| ५. देहबुद्धी | ४२ |
| ६. सुखालागिं आरण्य सेवीत जावें | ५० |
| ७. मत–मतान्तर | ५९ |
| ८. एका अभंगाचे दत्तविधान | ७१ |
| ९. शिष्यांना समर्थांचा संदेश | ७७ |
| १०. रामदासांचा वृत्तविलास | ८५ |
| ११. समर्थांची शब्दसृष्टी | ९६ |
| १२. समर्थांची दृष्टान्तसंपदा | १०८ |
| –इथे दृष्टान्तसौंदर्य ( कविता ) | ११७ |
| १३. रामदासांचे रामायण | ११८ |
| १४. रामदासांचे कवित्व | १३९ |
| १५. दोष-परामर्ष | १६२ |
| १६. ज्या कारणें गुंडाळिती०– | १६७ |


## उत्तररंग :


| | |
|---|---|
| समर्थांची कविता ( वेचे ) | १७७ ते २५८ |
| १. ते हे कवी | १७९ |
| २. तेंचि भूत गे माय ! | १८१ |
| ३. बुधी दे रघुनायका | १८२ |
| ४. स्फूर्ति दे देवराया | १८३ |
| ५. मार्तंड | १८४ |
| ६. धन्य ते गायनी कळा | १८५ |

| | |
|---|---|
| ७. धवधबा आणि घळ | १८६ |
| ८. पृथ्वी | १८७ |
| ९. मनाचे श्लोक | १८८ |
| १०. राघव नीरवीला | १९२ |
| ११. देव आहे जगदांतरे | १९३ |
| १२. सद्‌गुरुस्तवन | १९५ |
| १३. आपण रामचि व्हावें | १९७ |
| १४. उत्तम पुरुष | १९९ |
| १५. रामराज्य | २०१ |
| १६. राजकारण | २०२ |
| १७. राजधर्म | २०४ |
| १८. क्षात्रधर्म | २०६ |
| १९. शिव कल्याण राजा | २०८ |
| २०. सावधता | २०९ |
| २१. संभाजीस पत्र | २१० |
| २२. शुद्धाशुद्ध-विवेक | २१२ |
| २३. भेदाभेद | २१४ |
| २४. राजी राखावें सकळ | २१५ |
| २५. जन बुडाले बुडाले | २१६ |
| २६. तुळजा कुळदेवता | २१७ |
| २७. माता आणि तुळजामाता | २१९ |
| २८. वात्सल्य | २२० |
| २९. येथें उभा का श्रीरामा | २२० |
| ३०. आनंदवनभूवनीं | २२१ |
| ३१. समस्ते पावले धका | २२५ |
| ३२. घडेल तें सुखें घडो | २२६ |
| ३३. फुकट कां मरावे ? | २२६ |
| ३४. स्फुट श्लोक | २२७ |
| ३५. योग हा सुकृताचा | २२९ |
| ३६. मुलांना शिकवण | २३० |
| ३७. शिष्यवृंदास | २३२ |
| ३८. करावें तेंचि पावावें | २३४ |
| ३९. स्वयें जो परीक्षा नेणें | २३५ |
| ४०. क्रोध | २३७ |

४१. वार्धक्य २३८
४२. देह-संगें २३९
४३. देवालयांतला देव २४०
४४. देव-दैत्य-विवेक २४२
४५. जाणता भय तुटलें २४३
४६. भ्रान्तीची लक्षणे २४४
४७. उमजणें समजणें आधीं २४५
४८. धन्य संसार होतसे २४६
४९. अभंगगुंफा २४७
५०. अनुदिन अनुतापें २५२
५१. अंत पाहसी किती २५५
५२. काय उत्तीर्ण व्हावें ? २५५
५३. श्रीराम आम्हांला देतों २५६
५४. आमुचे कुळीं हनुमंत २५७
५५. प्रार्थना २५८
टीपा : २५९–२६७

* * *

म्हणोनि पाहिलेंचि पाहावें
आणि शोधिलेंचि शोधावें
अवघें कळतां स्वभावें
संदेह तुटती.
[ दा. २०।३।३० ]

* * *

केलेंचि करावें पुन्हा निरूपण
तेणें बाणे खूण कांहीं एक

* * *

१.

# प्रेरणा

दा. क्र. १३६८८

थांबा थांबा ऐका ऐका । आधींच ग्रंथ सोडूं नका ।
सांगितलें तें ऐका । सावधपणें ( दा. १७।३।१ )

आमचा गाव चाफळ. ' जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी. ' पण जन्मभूमीला काही लौकिक महत्त्व असले तर तिच्या प्रेमाला अभिमानाचे सिंहासन लाभते. शिवाय सभोवती निसर्गाचे सौंदर्य. असे हे जन्मगाव. त्याचे नाव निघताच किती तरी तरंग मनांत हेलावू लागतात. रामदासांची कर्मभूमी महाराष्ट्र; त्या महाराष्ट्रातील हे एक आडबाजूचे खेडे. सह्याद्रीच्या पायथ्याशी वसलेले. त्या विराट पुराण अचळाच्या चरणी वाहिलेली फुलपाकळीच जणू ! दोन पावलांच्या मध्येच पडलेली ! किंवा भीमकाय महापुरुषाच्या पायाशीच लडिवाळपणाने बसून राहिलेले सुकुमार बालकच जणू ! म्हणूनच की काय रामदासांना याचा मोह पडला. आपला मठ स्थापायला त्यांनी ह्या स्थळाची निवड केली. राममंदिरही उभे केले आणि त्याचा ' मोहोछाव ' सुरू केला. पणतीत तेल-वात करून ज्योत फुलवावी, तसे झाले. ' शुचिपण दिलें तीर्थागंगादिकांसहि साधुंनी ' यात्रेकरूंची ये-जा होऊं लागली.

सभोवती गिरिवर, नाना जाती तरुवर
पुष्पवाटिका अपार मन निवे पाहतां
स्थळ पाहतां सबळ, नाम साजिरें चाफळ
होती कामना सफळ, जिये ठायीं राहतां

अशी ख्याती पसरू लागली.

" दैवाधीनं कुले जन्म मदायत्तंतु पौरुषम् " हा कौंतेयाचा उद्गार. ह्या उद्गाराच्या उत्तरार्धाचा उच्चार करायला आपण सारेच पात्र नाही, समर्थ नाही, रथीमहारथी नाही. पण पूर्वार्ध मात्र यच्चयावत् मनुष्यमात्राच्या बाबतीत खरा आहे. आपला जन्म कोणत्या गावी व्हावा आणि कोणत्या कुलात व्हावा हे कोणीच ठरवूं शकत नाही. आशा-आकांक्षांचा फुलोरा जन्मानंतरचा असतो. जन्म होण्यापूर्वी आशा-आकांक्षा जन्मलेल्याच नसतात. तेव्हा, कोणालाही " दैवाधीनम् कुले जन्म " असे म्हणणे भागच आहे. चाफळ ही आपली कर्मभूमी आणि पेंढरकर हे आपले जन्मकुल, यांचा जेव्हा जेव्हा उच्चार करीत आलो तेव्हा तेव्हा ' हा लाभ पूर्व-सुकृताविण काय होतो ? ' असेच मी मनात म्हणत आलो. आणि एक वेळ दाटून आलेला गहिंवर—

समर्थ--गुरुची कर्मभूमि ही
पिढ्यांपिढ्यांची जन्मभूमि ही

असा मुखरितही झाला. ह्या गावामधूनच—

पूर्व-पश्चिमा खनाळांतुनी वाहे जलवाहिनी
मांडवी अमुची मंदाकिनी

आणि

दूर डोंगरासमीप अगदी तीच्या तीरावरी
आमुची जमीन वतनी वरी

असे अभिमानाने बोललो आहे. ह्या नदीकडे पाहताना, तिच्यातल्या गुडघाभर पाण्यात डुंबताना, कितीदा तरी मनात आले की—

अर्घ्य कितीदां समर्थहातीं
पडले असतिल तुझिया पात्रीं
समर्थदूती तूंच होउनी फिरवियला आदेश–

पण तो आदेश कोणता याचा शोध घेण्यासाठी समर्थांच्या वाङ्मयात डुंबलो मात्र नाही. मांडेच्या दक्षिण तीरालगतच्या टेकडीवर रामदासस्वामींचा मठ आणि राम-मंदिर आहे. ऐल तीरी आमचे घर आहे. घरबसल्या परसातून राममंदिराचे दर्शन घडते. बाळपणापासून ते पाहात आलो. त्या मंदिराच्या महाद्वारावर असलेल्या नगार-खान्यातून प्रहरा-प्रहराला चौघडा व्हायचा. सगळ्या गावाची दिनचर्या त्यावर आधारलेली असायची. ' डुम् पडलं ' हा आमचा त्या काळचा व्यवहारातला शब्द-प्रयोग. पहाटेच्या चौघड्याला सुरुवात व्हायची ती डुम् पडण्याने. कारण, चौघडा शेकोटीवर तापवावा लागे. त्याचे चामडे तापल्याशिवाय तो निनादणार नाही. तो पुरता तापला किंवा नाही, हे अजमावण्यासाठी नगारजी टिपरीने आधी वाजवून पाही. हे ते डुम् पडणे. पहाटे ज्याला उठायचे असेल त्याला ( गजराच्या घड्याळांचा सुकाळ नव्हता त्या काळी ) हे ' डुम् पडणे ' उपयोगी पडे. सारांश, तो चौघडा आम्हां गावकऱ्यांच्या जीविताशी असा एकजीव झालेला असे. त्या राममंदिरात जी भजने होत त्यात मी टाळावर नाचलो आहे. कीर्तनात दंग झालो आहे. उत्सवात सवाया म्हटल्या आहेत. छबीन्यासमवेत सकाळ–संध्याकाळ मिरवलो आहे. मोर्चेल, चवरी, पंखा, हे मान धारण करणारे मानकरी पालखीच्या पुढे दुतर्फा चालत. त्या मानासाठी उत्सवात पुढे पुढे केले आहे. प्रदक्षिणांचा सामुदायिक कार्यक्रम होई त्यात तावातावाने आरत्या म्हणत अनवाणी फेऱ्या घातल्या आहेत. शिंगणवाडी-लगतच्या टेकडीवरील मारुतीपुढे लोटांगण घातले आहे. शिवारातल्या साखरबावडीच्या पाण्याचे घोट घेतले आहेत. रामघळीला जाण्यासाठी डोंगर चढतांना नडगी फोडून

घेतली आहे. त्या घळीतल्या धुळीचे टिळे ललाटी लावले आहेत. कुबडीतीर्थावर आचमने घेतली आहेत. मठाधिपती श्री. बापूसाहेब स्वामी भिक्षेसाठी संचारार्थ निघाले असताना त्यांच्या स्वारीत खाली कर्नाटकात कुडची, हुकेरी, नेर्ली ह्या भागातून फिरून आलो आहे. तथापि, पोटापाण्याच्या व्यवसायाला लागल्यावर हे सारे दुरावले ! सटी–सहामासी जेव्हा गावी जायचा योग येई तेव्हा राममंदिरात जाऊन गाभाऱ्याच्या उंबऱ्यावर ललाट टेकवायचे आणि हळूहळू येत चाललेल्या वाढत्या अवकळेबद्दल मनात हळहळायचे, एव्हढेच घडू लागले ! मांडेच्या पात्रात उभे राहून, टेकडीवरचे राममंदिर पाहताना, त्याला ग्रासू पाहणाऱ्या दैन्य-मालिन्या-बद्दल ‘ उदास वाटते जीवीं ’ अशी ( रामदासी ) हळहळ उरात दाटून–

> हरपता अलौकिक अधिष्ठान मूळचे
> का स्मारक ते तळपावे ? भूइसपाट ते व्हायचे !

हा सुस्कारा सोडत विमनस्क स्थितीत, माघारा वळून, पतकरलेल्या व्यवसायात फिरून गुरफटून जायचे, एव्हढेच होत राहिले. आपण ‘ चाफळचे ’ म्हणवतो, रामदासस्वामींचा मोठेपणा मिरवतो, आम्ही चाफळचे इनामदार असे अभिमानाने सांगतो; पण हे सारे आपाततः घडलेले. मांड नदीच्या पात्रातले गोटे जसे प्रवाह-शरण, तसेच आपण ! ह्यात स्वकर्तृत्वाचा काय अंश ? ही बोच मनात सारखी सलतच राहिली. ती काढून टाकावी, एतदर्थ उद्योग मात्र होईना.

एकदा एक फारच विचित्र स्वप्न पडले. इतके की, जागा झालो अन् मनाला चरका बसला. पुण्याला होतो त्या वेळी. चाफळास जाण्याचा काही बेत नव्हता, काही विचारही नव्हता तिकडच्या परिस्थितीचा, किंवा गप्पागोष्टींत काही विषयही नव्हता निघालेला. सारांश, तेव्हाच्या जागृतीतील व्यवहाराचा पडसाद किंवा प्रतिबिंब, असे ते स्वप्न नव्हते.

स्वप्न असे : चाफळचे राममंदिर दृष्टीपुढे आहे. मात्र वास्तवातले बाकीचे सभोवारचे दृश्य राममंदिराभोवती दिसत नाही. दिसत होती फक्त सभोवार नांगरलेली भूमि – तृणहीन, झाडझुडपविहीन ! मंदिरासभोवतीच्या त्या भूमीत अंतरा-अंतरावर उंच खांब उभे आहेत; ताशीव घोटीव नव्हत, तर, साधे सागवानी सोट. असा देखावा पाहात आहे तोच, सभोवारची नांगरून अगदी भुसभुशीत झालेली जमीन, महापुराचे गढूळ पाणी जसे उकळत-उसळत असते त्याप्रमाणे, उकळू लागली. आणि एकामागून एक फ्यूज उडून दिवा विझावा त्याप्रमाणे, त्या उभ्या असलेल्या सरळ-सोट खांबांच्या टोकांवर एकामागोमाग एक, क्रमाने, काही तरी फुस्कन् विझून जाऊ लागले. हे काय मी पाहात आहे ! ह्या विस्मयाने धस्कन मला जाग आली. बेचैन झालो. भवितव्याची ही पूर्वछाया तर नव्हे ? अशुभ विचार मनात येऊन गेला.

कळा ज्या लागल्या जीवा मला कीं ईश्वरा ठाव्या
कुणाला काय हो त्याचें ? कुणाला हाय सांगाव्या ?

अशी व्याकुळ अवस्था झाली.

दिवसांमागून दिवस चालले. उपरोक्त स्वप्नाची सल बोथट होऊ लागली. मधूनमधून आठवण येई; आणि तेवढ्यापुरती अस्वस्थता दाटे. पण दिवस जातच होते. कालगतीला खंड कधी पडतो का ?

अजूनही चाफळास अधूनमधून जात असतो. देवदर्शनाला जाऊन कपाळी अंगारा लावल्याशिवाय बरे वाटत नाही. पण मठ आणि देवालय ह्या परिसरात सांप्रत बळावलेला भकासपणा पाहून पोटात कालवते. नगारखाना कधीच बंद पडला. नगारजी आणि घडशी यांना काहीच काम राहिले नाही. अंगात जरतारी अंगरखा, डोईला कंगणीदार पगडी, हातात चांदीची भली उंची-पुरी जाडजूड काठी, अशा थाटात ललकारणारे भालदार-चोपदार आता तिथे वावरत नाहीत. फरास, हुजरे, पाणक्ये, मशालजी, कोणी दिसत नाहीत. रामनामी अंगावर पेहरणारे सांप्रदायिक सेवेकरी आढळत नाहीत. गोशाळा ओस पडली आहे. ज्या तबेल्यात अबलख उमदे घोडे होते तिथे आता एक तट्टू देखील राहिले नाही. कारभारी, कारकून, पुराणिक परागंदा झाले आहेत. एके काळी दररोज आरतीच्या वेळी ताशा वाजायचा; पण आता त्याचा गजर कानावर येत नाही. भजन-पुराण ह्यांनाही संक्षेप बसत चालला आहे. तट ढासळू पाहात आहेत. इमारती खचत चालल्या आहेत. हे सारे पाहून भडभडून येते.

मुळात किती सुंदर आहे ही जागा. म्हणतात की, रामदासांनी राममंदिरासाठी व मठासाठी जेव्हा ग्रामस्थांकडे जागा मागितली, तेव्हा त्यांनी स्मशानाकडे बोट दाखवले. पण स्मशान गावापेक्षा इतक्या उंचावर, टेकडीवर का असते ? सोंगटी मांडावी त्याप्रमाणे ही टेकडी नदीच्या काठावर ठाण मांडून आहे. समर्थांची थोरवी त्या काळी न कळल्यामुळे ग्रामस्थांनी हेटाळणीच्या आविर्भावात बोट केले असेल स्मशानाकडे ! पण रामदासांनी निवडली ही टेकडी. गावठाणापेक्षा किती तरी उंचावर ! सगळा गाव जिथून नजरेच्या कटाक्षात व हाकेच्या टप्प्यात यावा, अशी टेकडी. त्या टेकडीला पूर्वाभिमुख भव्य महाद्वार आणि तिथून पायथ्यापर्यंत, टेकडीच्या रुंदीच्या, चिरेबंदी पायऱ्या बांधून काढून टेकडीच्या चारी कोपऱ्यांना तटबंदी केली आहे. त्या काळी गर्द झाडी असावी अवतीभवती. नदीला घाट बांधला आहे, टेकडीच्या लांबीइतका पण उंचीला पाच-सहा पायऱ्यांचा, छोटासाच ! पण तेव्हढ्याने इच्छित कार्यभाग झाला आहे. टेकडी ढासळू नये हाही घाट बांधण्याचा एक उद्देश दिसतो. अशा रीतीने मूळच्या निसर्गसौंदर्याला मठ, मंदिर आणि रामभक्तांचा गजबजाट व गजर, यांनी वैभव प्राप्त झाले होते. पण आता ते उडून गेले असून वास्तूला उजाडपण आले आहे. विटून जीर्ण झालेले महावस्त्रच जणू कांही !

रामदासांनी रामायणात अयोध्यानगरीच्या वैभवसंपन्नतेचे मोठे बहारदार वर्णन केले आहे. पण सांप्रत ती रत्नजडित सुर्वणमंदिरे, हिरेमाणकांचे कळस, पाचूची फरसबंदी असलेले राजमार्ग, मोत्यांच्या घोसांची तोरणे, अशी तळपणारी ऐश्वर्यशाली अयोध्या कुठे दिसत नाही, अशी श्रोत्यांना शंका येईल. म्हणून रामदास सांगून टाकतात—

अयोध्यापुरी स्वर्गलोकासि गेली
पुढें वोस होताचि ते भग्न जाली
असेना जना राहणें वस्ति जेथें
खडे माणकें कोण ठेवील तेथें
पुरें पट्टणें वोस होती कितेकें
पुढें पाहतां दीसती सर्व टेकें.

ह्या ओळींची आठवण होते, आजचें तें जीर्ण भकास टेक ( टेकाड ) पाहून!

समर्थांच्या पदरजाने पवित्र झालेल्या भूमीत जन्म झाल्याचा अभिमान वाहता वाहता हे कळाहीनत्व पाहणे आले. समर्थांच्या कार्याची जाणीव नाहीशी झाल्यावर संप्रदाय विरघळू लागावा, ह्यात काळाला काय बोल लावायचा ? ज्याने त्याने कर्तव्याची जाणीव ठेवून आचरण केले, व्याप–आटोप केला, तर 'सदैवपण' प्राप्त होते, आणि जोपर्यंत आन्तरिक चैतन्य लोपले जात नाही तोवर ते टिकून राहते. पंथ म्हणजे साठलेल्या पाण्याचे डबके होऊन राहता कामा नये. वाहत्या नदीप्रमाणे त्यात जिवंतपणा, गतिमानता, नवता कायम राहिली पाहिजे.

'भंगलीं देवालयें बांधावीं' ही ताकद सगळ्यांची नाही. पण आपल्या ताकदीत जे आहे ते तरी आपण कुठे करतो ? "दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें। प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें," हे जे रामदासांनी सांगितले आहे, त्यातला लिहिण्याचा भाग सोडला तरी वाचण्याचा भाग आपण करतो का ? पूर्वी असा परिपाठ असे की, सर्व दिनचर्या संपल्यावर, घरधंदा उरकल्यावर, निजायला जाण्यापूर्वी कुटुंबातील कोणी पुरुष, भागवत, गुरुचरित्र, शिवलीलामृत, असे काही वाचत असत आणि त्या वाचनाच्या वेळी कुटुंबातली मंडळी त्याच्याभोवती ऐकायला जमत असत. कुटुंबात तशी शिस्तच असे. सकाळी दिनचर्येची सुरुवात जशी भूपाळीने व्हायची तशी दिवसाची अखेर अशा प्रकारच्या ग्रंथपठणाने व्हायची. दररोज दासबोधातले एक दोन समास, काही मनाचे श्लोक, असे नेमाने वाचन झाल्याशिवाय निजायचे नाही. हा नेम आता कोण कितीसा पाळतो ? अंथरुणावर अंग टाकण्यापूर्वी धार्मिक, पारमार्थिक, भक्तिपर ग्रंथांचे वाचन केले असता दिवसभराच्या उद्योगाने भडकलेले मन ताळ्यावर आणता येते. पण हा शुद्ध सात्त्विक उपचार कोणी करतो का? संस्कृति-संवर्धनाचे अगत्य सभा–संमेलनांतून आणि व्यासपीठावरून थोडे का घोषित होत असते ? पण घडते मात्र भलतेच ! भूपाळीच्या सुरावर उठणे

नाही ! आणि दिनान्ती अंथरुणावर पडायचे ते विकारप्रक्षोभ होईल असे वाङ्मय वाचून किंवा चित्रपट पाहून ! ही झोप पुष्टिदायक कशी होईल ? सद्यःस्थिती आणि जीवन-कलह यांची उग्रता आणि त्यामुळे येणारी व्यग्रता मला कोणी सांगायला नको. अशा दिनचर्येचा अवलंब करण्याइतकी सुसूत्रता आहे कोणाच्या जिण्यात ? नाही; कबूल. पण तरीही काही आवर घालायला नको का ? का भडकलेले तारू आणखीनच भडकू द्यायचे ?

इतरांचे जाऊ द्या. पण " आमचा गाव चाफळ ! आम्ही चाफळचे इनामदार " हे भूषण मिरविण्यासारखे प्रत्यक्षात आपल्या हातून काय घडतें ? ह्या प्रश्नाच्या अणीवर मन टांगलेले असता, एकदा प्रसंग अंगावरच आला.

" आम्हांला सांगा की काही रामदासांबद्दल. तुम्ही त्या गावचे......! "

" हो, मी त्या गावचा ! मांड नदीतला एक गोटा ! " असे उत्तर देऊन तो प्रसंग वाटेला लावला. पण " मांड नदीत तरी कोठून आलो ? कसा आलो ? " हे प्रश्न मनात उसळलेच.

कधी तरी वडील म्हणाले होते, " माझे पणजोबा 'राघो शंकर' हे मूळ पुरुष. ते प्रथम चाफळास आले. रामदासस्वामींना देवस्थानासाठी काही जमिनी छत्रपतींनी इनाम दिल्या. स्वामी तर फटिंग आणि भिंगरीसारखे भ्रमणारे. तेव्हा, कुळे वसूल घालायला कदाचित टाळाटाळ करतील; तरी वेळच्या वेळी त्यांनी वसूल मठात भरणा करावा, यावर देखरेख करण्याच्या कामगिरीवर राघो शंकर यांची नेमणूक करण्यात आली होती. " वडील असेही आणखी म्हणाले होते की " मध्यंतरी आमच्या इनामात खंड पडला होता. पण राघो शंकर यांनी ते पुन्हा संपादन केले."

वडिलांनी सांगितलेल्या ह्या पूर्वजइतिहासाला कागदोपत्री काही पुरावा मिळाला तर काय बहार होईल, असे वारंवार मनात येई. इतिहास-संशोधकांनी प्रकाशित केलेल्यापैकी एखादा संग्रह चुकूनमाकून समोर आला तर मी तो चाळून पाहात असे. पण संशोधन हा माझा छंद नव्हे. त्यामुळे जिज्ञासेने पिच्छा पुरवला गेला नाही.

पण प्रेमळांच्या आग्रहामुळे, रामदासांसंबंधी काही सांगायची कामगिरी टाळता येईना. अखेर ' तुझा मी टोणपा झालो । बुद्धि दे रघुनायका ' अशी प्रार्थना करून समर्थांच्या वाङ्मयाची आणि त्यांच्या वाङ्मयाचा ऊहापोह करणाऱ्या ग्रंथांची पाने उलथी-पालथी करू लागलो. ' अभ्यासी मन घालता ' मनाला काही काही चिकट्ट लागले. आणि ' बिंबता स्फूर्ति होतसे ' ह्याचा प्रत्यय आला. आणि असे वाटू लागले की ' जें काही आपणासि आकळलें तें इतरांसि पाहिजे दाविलें. ' ह्या दृष्टीने आणखी उद्योग आरंभला असता अचानक पुढील परिच्छेद नजरेसमोर आला :—

" रामचंद्र नीळकंठ अमात्य यांची गुरुभक्ति अपूर्व होती; आणि राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत त्यांनीं केलेली राष्ट्रसेवा

इतिहासज्ञांना विदितच आहे. श्रीसमर्थांकडील वृत्त आपणास नेहमी कळत जावें म्हणून यांनीं "श्रीकडील लिहिणीयाचा हुद्दा वतनी" आपणाकडे सुद्दाम करून घेतला, व त्या कामासाठीं प्रथम राघो शंकर यांस व नंतर मामा हरि दादाजी यांना श्री-समर्थ संस्थानांत ठेवले."

[ श्रीसमर्थ चरित्र, प्रथम खंड, पृ. ३६६, ले.–शं. श्री. देव ]

वडिलांनी सांगितलेल्या पूर्वजांच्या नावाचा उल्लेख असा अवचित समोर आला. कागदोपत्री पुरावा हवा होता त्याचा धागादोरा हाती आला. तदनुरोधाने ती कागदपत्रेही वाचली. हरवले होते ते गवसल्याचा आनंद झाला. त्यातील संबंधित अवतरणे येणेप्रमाणे :—

रामचंद्र नीळकंठ अमात्य यांचे राजश्री भानजी गोसावी यास पत्र :—

चाफल ये स्थलीचें सर्व पारपत्य राजश्री दिवाकर गोसावी यांचे स्वाधीन श्रीने पूर्वीच केले आहे. तेणेप्रमाणे राजश्री कैलास-वासी छत्रपती स्वामीचेही पत्रे आहेत. असे म ।। रनीलेही आपले हाता कार्यभाग तुमचे सांभाली केला होता त्यास तुम्ही विपरीत बुधी धरून चापलीचा इनाम घेतला व महायात्रेमधे व्यासपूजा पहिलेपासून चालत होती ते राहविली श्री यात्रेचा प्रसाद दुसरियाचे हातें राजश्री छत्रपतीस्वामीकडे पाठविला ये रीतीची वर्तणुक करूं लागलेस म्हणउन हे वर्तमान तपसिले विदित केले तरी तुम्हास असी गोष्टी करावया प्रयोजन काये होते परंतु काये समजोन केली असेल ते सुखे असो परंतु तुमची स्थिती अशी जाली तेव्हां तुमचे स्वाधीन पारपत्याधिकार करावा हे राजश्री दिवाकर गोसावी याचे चित्तीं नाहीं. आपला अधिकार आपणच चालवावा असा हेत धरून तेथें आले आहेत हे श्री च्या तहनाम्याप्रमाणे कार्यभाग चालवितील तुम्ही श्री च्या कार्यभागांत येकंदर मन न घालणे व श्री जवलील लेखकवृत्ती आम्ही मागोन घेतली आहे मुतालकीस राघो शंकर ठेविला त्यास तुम्ही वेतन पावउन संतोशरूपे ठेविला नाहीं हे तुम्ही उचित न केलें बरें तें गोष्टीचें काये आहे हाली राघो शंकरास करार करून पाठविला आहे यापासून राजश्री दिवाकर गोसावी लेखकवृत्तीचा कार्यभाग घेऊन यांचे चालवितील तुम्ही यांसी कटकट कथला कोणेविसी न करणे जाणीजे लोभ असो दीजे हे विनती पर हुजूर "

ह्या पत्रातील एक दोन गोष्टींचा खुलासा असा की (१) "कैलासवासी छत्रपती" म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होत. (२) दिवाकर गोसावी हा सर्वाधिकारी. त्याने आपल्याबरोबर असलेला भानजी गोसावी याला आपल्यातर्फे कारभार पाहायला ठेवले. पण पुढे तोच शिरजोरीने दिवाकर गोसावी यांन

जुमानीना. तो तंटा खुद्द छत्रपती संभाजी महाराजांनी तोडून भानजीला 'कांहीं अधिकार नाहीं' असा निर्णय दिला. तेव्हा भानजीने कृतापराधाबद्दल पश्चात्तापपूर्वक क्षमा मागितली. म्हणून पुन्हा भानजीकडे कामकाज आलें. ( श. १६१४ चैत्र व ५ चें पत्र ) पण त्यानंतरही त्याला विपरीत बुद्धी झालेली दिसते. म्हणून हे पत्र— ही ताकीद. ( ३ ) हे पत्र शके १६१४ च्या उत्तरार्धामधील असावे, असा श्री. देव यांचा अंदाज आहे.

राघो शंकर यांचा उल्लेख असलेले आणखी एक पत्र :--

लेखांक १४९

शके १६२५ मार्गशीर्ष वद्य ४

राजश्री विठोजी बाबर देसाई त ॥ नाणेघोल यांसी

रामचंद्र नीलकन्ठ अमात्य आसीर्वाद--

कसबे चाफल हा गाउ श्री कडे इनाम आहे. तेथे गनीमाच्या तर्फेने मसू ( रकर याचा उपस )र्ग न व्हावा म्हणून गांवकरांनी आपले तर्फे दोन खंडी दिल्हें व गांवा पौ दाहा मण द्यावेसे करून उपसर्ग वारिला त्यास राघो शंकर याणी आपले गुजारतीनें चदनसीव लस्करी यापासून दहा मण घेऊन दिल्हे ते धान्य राघो शंकर यासि गावा पौ पावावे ते न पावले म्हणून कळो आले तरी ये गोष्टीचा रुजुमोझ्या तुम्ही मनास आणून दाहा मण धान्य राघो शंकर यास कसबे मजकूर पौ राजश्री गोसावी यासि सांगोन देवणें जाणीजे

छ १७ साबान निदेश समक्ष

लेखन
सीमा · स मु
ल्ल सती

[ 'चदनसीव' म्हणजे चंदनसिंह असे काही तरी नाम असावे. रुजूमोझा = रुजवात करून घेणें. ]

शके १६२८।१६२९ च्या सुमाराचे जे एक पत्र उपलब्ध आहे त्यातील कारणापुरता उतारा :—

लेखांक १६९/श. १६२८/१६२९ ( अंदाजे )

गंगाभागीर्थीसमान मातुश्री आकाबाई यांसि

पोस्य रामचंद्र नीलकंठ नमस्कार—

राजश्री दिवाकर गोसावी याच्या विद्यमाने श्रीकडील लिहिण्याचा हुद्दा वतनी आम्हास करून दिल्हा.........त्यास आम्ही मुतालिकीस राघो शंकर ठेवला होता संप्रत काली त्याचा काही वर्तमान कलत नाहीं अशास श्रीजवली आम्ही लेखनवृत्तीचा हुद्दा करून घेतला तो निमित्य कीं

श्रीपादुकासंनीध आमचें येक माणूस अहिर्णीसी असले पाहिजे म्हणून त्यास सांप्रत राघो शंकराचें काही वर्तमानच कलेना या करीता त्याला दूर करून हाली राजश्री हरी दादाजी लेखनाच्या मामलीयास पाठविले आहेत........हरीपंत हे आमचे मामा आहेत..........

बहुतांशी याच मजकुराचे आणि ह्याच वेळचे पत्र रामचंद्र नीलकंठ यांनी " वेदमूर्ति राजमान्य राजश्री दिवाकर गोसावी स्वामी गोसावी यांसि " लिहिलेले आहे.

या पत्रांवरून दिसून येते की राघो शंकराच्या जागी हरी दादाजी यांची नेमणूक करण्यात आली. राघो शंकराचे ह्या काळातील वर्तमान कळत नाही. तथापि, पुन्हा केव्हा तरी राघो शंकराचेकडे पूर्वीची कामगिरी आली असावी. कारण नारो शंकर ( सचिव ) यांचे एक पत्र उपलब्ध आहे ते येणेप्रमाणे :—

लेखांक २४९, श. १६५०

हरिभक्तपरायण राजमान्य राजश्री दिवाकर गोसावी स्वामी गोसावी यांसी पो नारो शंकर नमस्कार येथील कुशळ जाणून स्वकीये कुशळ लेखन करणे विशेष आपण पत्र पाठविले ते पावोन लेखनार्थ कळो आला श्री कडे इनाम गाव आहेत त्याच्या सावो-त्रियाविशई लिहिले त्यावरून सावोत्र्याच्या कमावीसदारांस पत्रें पाठविली आहेत त्यावरून गावास तोष्ट लावणार नाहीत **वरकड वर्तमान राघो शंकर सांगता कळो येईल.** बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनती हे विनतीसुद

हे पत्र–लेखक नारो शंकर म्हणजे नारो शंकर सचिव. यांचा जन्म इ.स. १७०८ सालचा. हे अज्ञान असताच वयाच्या दुसऱ्या वर्षी यांना सचिवपद मिळाले. हे १७३६ साली ( शके १६५८ ज्येष्ठ व. ११ स ) निवर्तले. ज्या दिवाकर गोसाव्यांना हे पत्र लिहिले आहे ते मूळपुरुष जे दिवाकर त्यांचे नातू होत. ह्या साऱ्या गोष्टींचा मेळ घालता हे पत्र शके १६५० च्या सुमाराचे असावे, असा श्री. देव यांचा अंदाज आहे.

ह्यानंतरची काही कागदपत्रे असतीलही. पण समग्र कुलवृत्तान्ताचा इथे प्रश्न नाही. ही जी कागदपत्रे आढळली तेवढ्यानेही निश्चित झाले की, वडील म्हणत होते ते खरे. " मध्यंतरीं आमच्या वतनात खंड पडला होता, तें वतन राघो शंकर यांनी परत संपादिलें " हें देखील उपरोक्त पत्रांच्या आधारे खरे ठरते. सारांश श्रीसमर्थ संस्थानची सेवाचाकरी करण्याची कामगिरी ज्यांच्याकडे होती त्यांचे आपण वंशज होत. अर्थातच जन्मग्राम आणि जन्मकुल यांचा अभिमान बाळगणे म्हणजे पर्यायाने ऋणभारच शिरी वाहणे असून, त्या ऋणातून मुक्त होण्याचा यथाशक्ती प्रयत्न करायला पाहिजे ही रुखरुख बळावली. आणि

अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा

ह्या रामदासांच्या आदेशाचा भोपळा पाठीशी बांधून त्यांच्या काव्यसरोवरात उतरायचा निश्चय केला. सागराच्या तळाचा ठाव घेणारा पाणबुड्या एकदम उडी घेऊ शकतो. पण त्या विद्येच्या अभावी, अंदाज घेत घेत, पायरी-पायरीने आत उतरावे हे विहित. पोहायला पडावे, दोन हात मारावेत, निभाव लागणे कठीण असे वाटताच काठ पकडावा, एव्हढीच माझी कुवत. त्या कुवतीच्या मानाने पोहता-पोहता, कमळे खुडता आली तितकी खुडून आणली आणि रसिकांपुढे मांडली. माया, ब्रह्म, परमार्थ, वेदान्त, इत्यादि मणि-मोत्याचे शिंपले माझ्या आटोक्यापलीकडचे. तेव्हा, त्यांची उकल ह्या उद्योगात कुठून असणार ?

एव्हढेच नव्हे तर, केल्या ह्या विवेचनातदेखील माझी भूमिका अधिकारी पुरुषाची नाही. माझ्या मतीचा थिटेपणा मला माहीत आहे. उलट माझ्या वाचकांच्या योग्यतेकडे पाहता—

ज्यांचे दृष्टिखालून गेलें । ऐसें कांहींच नाहीं उरलें ।
पदार्थमात्रांसि लक्षिलें । मनें जयांच्या ।।
जें जें कांहीं आठवावें । तें तें तयांस पूर्वीच ठावें ।
तेथें काय अनुवादावें ! ज्ञातेपणेंकरूनी ।।

असेच विचार माझ्या मनात येतात.

परंतु हे गुणग्राहिक । म्हणोनि बोलतो निःशंक ।
भाग्यपुरुष काय एक । सेवीत नाहीं ।।
सदा सेविती दिव्यान्नें । पालटाकारणें अवेट अन्नें ।
तैसीच माझी वचनें । पराकृतें ।।
आपले शक्तिनुसार । भावें पुजावा परमेश्वर ।
परंतु पुजूं नये हा विचार । कोठेंचि नाहीं ।।
तैसा मी एक वाग्दुर्बळ । श्रोते परमेश्वरचि केवळ ।
यांची पूजा वाचाबरळ । करूं पाहे ।।
व्युत्पत्ती नाहीं कळा नाहीं । चातुर्य नाहीं प्रबंद नाहीं ।
भक्ति ज्ञान वैराग्य नाहीं । गौल्यता नाहीं वचनाची ।।

[ दासबोध, द. १, स. ६ ]

या भावनेने हा सारा पसारा मांडण्याचे मी धारिष्ट केले आहे. पूर्वजांचे तर्पण आणि जन्मभूमीच्या ऋणातून यथामति विमोचन, यासाठी केलेला हा उद्योग आहे.

It is glorious to serve one's country by deeds; (पण ते सामर्थ्य अंगी नाही. अशा स्थितीत ) even to serve her by words is a thing not to be despised. -*Sallust*. इतके माफक श्रेय जरी मला मिळाले तरी पुरे आहे.

ह्याव्यतिरिक्त ज्या अपेक्षा आहेत त्यांची इथे यादी देण्याची आवश्यकता का आहे? वरील मनोगतात त्या येऊन गेल्या आहेत हे चाणाक्ष वाचकांच्या काय ध्यानात आले नसेल?

* * *

२.

# समर्थांची जीवन-सरिता

When Nature has work to be done, she creats a genius to do it. *–Emerson.*

रामदास स्वामींचे जन्मगाव जांब. मराठवाड्यातील एक छोटेसे खेडे. परतुड रेल्वे स्टेशनपासून दक्षिणेस सहा कोसांवर. गिरिधर स्वामी ह्या खेड्याचा उल्लेख 'जांबुवती' या नावाने करतात आणि 'जेवि जनस्थानीं पंचवटिका विराजे' तशीच इथेही आहे, अशी पुष्टी जोडतात. खेड्याच्या मूळच्या स्वरूपात आता बराच बदल झाला आहे. ह्या गावचे कुळकर्णपण सूर्याजीपंत ठोसर यांचेकडे होते. त्यांची पत्नी राणूबाई. त्यांचा हा दुसरा मुलगा. पाळण्यातले नाव नारायण. पहिला मुलगा गंगाधर. ह्या नावालाच वडिलकीच्या अर्थाचे 'श्रेष्ठ' हे उपपद लागून 'श्रेष्ठ गंगाधर' या नावाने ते ओळखले जाऊ लागले. घराण्यात सूर्योपासना आणि रामाची आराधना पिढ्यान् पिढ्या चालत आलेली. खुद्द सूर्याजीपंतही कर्मनिष्ठ आणि धर्मनिष्ठ. त्यांच्या ह्या नैष्ठिकतेचा जणू काही परिपाकच ह्या दोन पुत्रांच्या रूपानें त्यांच्या पदरी पडला. श्रेष्ठांची जन्मतिथी शके १५२७ विश्वावसूनाम संवत्सरी मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी आणि नारायणाची जन्मतिथी १५३० कीलकनाम संवत्सरी चैत्रशुद्ध नवमी. विशेष हे की ऐन रामजन्माच्या वेळीच हा नारायण जन्मास आला. इतका अपूर्व योगायोग क्वचित जुळतो. जन्मवेळेपासूनच रामदासांच्या अपूर्वतेस आरंभ होत आहे.

श्रेष्ठ गंगाधर प्रपंचात राहिले. तरी पण श्रीरामचंद्राची उपासना त्यांनी आमरण चालविली होती. त्यांची कविता बरीच आहे. त्यांना सूर्याजीपंतांनी अनुग्रह दिला होता. पुढे तेही इतरांना अनुग्रह देत असत. ते पाहून नारायणाने त्यांच्याजवळ अनुग्रहाची अपेक्षा केली. पण श्रेष्ठांनी ती मान्य केली नाही.

नारायणाच्या बालक्रीडा चमत्कारपूर्ण असत, असे सांप्रदायिकांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथांवरून दिसते. डोहात डुंबणे हा तर बाल-वयातला छंद सार्वत्रिकच होय. पण नारायणाला त्या छंदातून एक देणगी प्राप्त झाली होती. एकदा डोहात उडी (सूर) मारल्यामुळे त्यांचे कपाळ पाण्यातल्या खडकावर आपटले. त्याचे टेंगूळ (आवाळू) आले. ती त्यांची हयातभरची निशाणी वाङ्मयात नमूद आहे. हूडपणामुळे आदळ-आपट, रुसणे, फुगणे हे प्रकार होणे स्वाभाविक आहे. काही कारणावरून एकदा मातोश्री रागे भरल्या. त्यावरून नारायण घुस्स्यात आडगळीत लपून बसला. पुष्कळ वेळ होऊन गेला तरी पारा उतरला नाही. बरीच शोधाशोध झाली. शेवटी

राणूबाई आडगळीत काही प्रपंचवस्तू शोधायला गेल्या असताना त्यांना तिथे हा पोर दिसून आला.

आईने विचारले ‘ हे रे काय ?-- ’

‘ बापा काय हें करतोसी येकांतस्थळीं ’

नारायण उत्तरला--

‘ आई चिंता करतो विश्वाची ’

रामदासांचे सान्निध्य ज्यांना बराच काळ लाभले होते अशा एका शिष्याने करून ठेवलेली ही नोंद विश्वसनीय मानली तर “ मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ” ह्या म्हणीचा हा उत्कृष्ट दाखलाच नव्हे का ? अलौकिकत्वाचा हा उद्‌गार पुढे संपूर्णपणे सार्थ झाला आहे.

रीती-रिवाजानुरूप दोघा बंधूंच्या मुंजी झाल्या. पुढे लवकरच श्रेष्ठ गंगाधराचे लग्न झाले. त्यानंतर सूर्याजीपंत शके १५३७ मध्ये कालवश झाले. म्हणजे त्या वेळी गंगाधराच्या वयाला दहा वर्षे पुरी होत होती. आणि नारायणाला आठवे चालू होते.

नारायणाला जांबेच्या पंचवटीतील मारुतीच्या मंदिरात श्रीरामाने अनुग्रह केला आणि जीवित-कार्याचा उपदेश करून नारायणाला मारुतीच्या स्वाधीन केले, असा एक चमत्कार ‘ स्वानुभव दिनकर ’ ग्रंथात वर्णिलेला आहे. पण त्याच्याविषयी शंका बऱ्याच उद्भवतात. शके १५४१ हे जर ह्या अनुग्रहाचे संवत्सर स्वीकारले तर, ती घटना घडली तेव्हा सूर्याजीपंत हयात होते असे वर्णनावरून दिसते. पण वाकेनिसी टिपणात सूर्याजीपंत १५३७ त परंधामास गेले, असे म्हटले आहे. स्थळकाळाचा मेळ बसेनासा झाला की घटना दंतकथेप्रमाणे वाटू लागते. तथापि पूर्ववयात अशा प्रकारचा अनुग्रह केव्हा तरी झाला असावा.

तुजविण मज पाहे पाहता कोण आहे
म्हणउनि मन माझें रे तुझी वास पाहे
मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें
सकळिक निज दासांलागि सांभाळवीलें

मारुतीला उद्देशून गायिलेल्या करुणाष्टकातील ह्या श्लोकाच्या तिसऱ्या चरणाचा अर्थ त्याशिवाय चपखलपणे लागत नाही. “ उपदेश देवोनी दिधला मारुती। स्वयें रघुपती निरवीत ॥ निरवितां तेणें जालों रामदास। संसारीं उदास म्हणूनिया ॥” हाही उद्‌गार उपरोक्त चमत्काराचीच साक्ष देतो.

अशीच एक अनन्यसाधारण घटना म्हणजे विवाहप्रसंगाची. घरात कोणी लग्नाची गोष्ट काढली की नारायणाला ती रुचत नसे. मुली सांगून येत होत्या. पण तो मनावर घेत नसे. पण आईला राहवेना. तिने एकदा त्याला कळवळून सांगितले

की " बाळ, एकदा तुझे दोन हातांचे चार हात व्हावेत अशी फार फार इच्छा आहे. तू नाही म्हणू नकोस-अंतरपाट धरीपर्यंत तरी नाही म्हणू नकोस. "

आईच्या आर्जवाला नारायणाने होकार दिला. मामेबहिणीशी लग्न ठरले. वधुवरांमधे अंतर्पाट धरण्यात आला आणि 'शुभमंगल सावधान' असा ब्राह्मणांनी घोष केला. तो 'सावधान' शब्द सार्थ केला नारायणाने. आईला दिलेला शब्दही पुरा झाला. लग्नमंडपातून नारायण एकाएकी पसार झाला. वयाच्या बाराव्या वर्षी घडलेली ही गोष्ट. लग्ने लहानपणीच होत असत त्या काळी ! शब्दांचा अर्थ कळण्या-पूर्वीच ! पण नारायणाला त्याचा अर्थ कळला होता. संसाराची बेडी पायात पडायच्या वेळी त्याने आपली त्यातून सुटका करून घेतली. लग्नांत विघ्न उद्भवले. पण ते आप्तस्वकीयांच्या दृष्टीने ! महाराष्ट्राच्या दृष्टीने ही घटना उपकारक ठरली. ही अद्वितीय घटना शके १५४१ च्या फाल्गुन शुद्ध ८ ची. जांबजवळच्या आसन-गावाहून लग्नमंडपातून निघालेला नारायण नाशिकच्या पंचवटीस १५४२ च्या गुढीपाडव्यास श्रीराममंदिरात प्रविष्ट झाला. पहिल्या बारा वर्षांची कथा ही अशी आहे.

जनसंमर्दापासून दूर राहण्याची मूळचीच प्रकृती. म्हणून वर्दळीचे नाशिक सोडून लगतच्या टाकळीस नारायणाने वसती केली. हा बालब्रह्मचारी. तसा कोणी त्याला गुरु नाही. हृदयस्थ प्रभु रामचंद्र हाच गुरु.

मुळींचें नांव नारायण ।
असोनि रामचंद्रीं आवडी गहन ।
म्हणौनि रामदास हें नामाभिधान ।
स्वेच्छां धरिलें ॥

अशा ह्या स्वयंसिद्ध रामदासांनी टाकळीस बारा वर्षे पुरश्चरण केले. यात गायत्री मंत्र व श्रीराम मंत्र हे दोनीही मंत्र होते. नासर्डी ( ऊर्फ नंदिनी ) आणि गोदा यांच्या संगमावर सूर्योदयापासून मध्याह्न होईपर्यंत कमरेइतक्या पाण्यात उभे राहून ते पुरश्चरण मंत्राचा जप करीत.

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा
ॐ भवति भिक्षांदेहि ह्या पक्षा । स्वीकारिलें पाहिजे

असे जे त्यांनी पुढे प्रतिपादिले, त्याचा कित्ता पूर्ववयात स्वताच गिरविलेला होता. माधुकरी मागून त्यांनी आपली उपजीविका केली. माधुकरी देखील परिमित आणीत असत. आणि जीभ चटावली जाऊ नये म्हणून माधुकरीची झोळी गोदेत बुचकळूनच मग ते धूत-पूत अन्न ते सेवन करीत. दुपारपासून सायंकाळपर्यंत लेखन, वाचन, चिंतन यात ते मग्न असत. नाशिक-पंचवटीस जे कोणी शास्त्री-पंडित, पुराणिक, कीर्तनकार येत असतील त्यांच्या संगतींतही त्यांनी शक्य तितका

काळ घालवला असावा. सारांश, कोणीही शास्ता, पुस्ता, मार्गदर्शक, नसताना ह्या बाल-ब्रह्मचाऱ्याने अत्यंत कसोशीने हा काळ आत्मबल वाढविण्यात आणि ज्ञानसंपन्न होण्यात घालविलेला आहे असे दिसते. वडील मंडळींच्या अभावी मन वाटेल तसे बहकण्याची ज्या वयात शक्यता त्याच वयात एव्हढा मनोनिग्रह, हीसुद्धा आश्चर्य-चकित करणारी बाब होय. आणि दुसरी एक गोष्ट स्पष्ट होते ती त्यांच्या निर्भय वृत्तीची. कोणत्याही स्वरूपात कृतान्त पुढे ठाकला तरी ह्या पुरुषाला भय ठावे नसावे.

मरणहाक तो चुकेना। देह वाचविता वाचेना।
विवेक होऊनि समजाना। काय करावे ॥

हे त्यांनी क्षत्रियांना बजावले. पण भ्रमणकाळी त्यांनी रानीवनी जी पायपीट केली ती ह्या निर्भयवृत्तीच्या बळावरच. आपल्या उद्दिष्टावर दृष्टी ठेवून त्यांनी आपला मार्ग निर्धाराने क्रमिला.

ह्या पुरश्चरणाच्या काळातली त्यांच्या तपःसामर्थ्याची एक गोष्ट अशी सांगतात की दशपंचक गावच्या कुळकर्ण्यांची सून सती जायला निघाली. त्या समयी तिने नदी-तटाकी ब्रह्मकर्मात मग्न असलेल्या ह्या तपस्व्याला नमस्कार केला. त्यावर 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!' असा आशीर्वाद हे तपस्वी बोलून गेले. पण आशीर्वाद सफळ व्हायचा कोणच्या जन्मी? एकंदर प्रकार ध्यानी येताच रघुपतीची करुणा भाकून स्वामींनी शवावर गंगोदकाचे संमार्जन केले. त्याबरोबर मृताला जीवदान मिळाले. पुढे ह्या दंपतीने आपला प्रथम पुत्र स्वामींना समर्पण केला. तोच उद्धव गोसावी होय – समर्थांचा पहिला शिष्य ( पाळण्यातले नाव शिवराम ).

पुरश्चरणात बारा वर्षे घालवून, मग रामदास ( श्रीरामरायाने दिलेल्या दृष्टान्तानुरूप ) तीर्थाटणास निघाले. ह्या तीर्थयात्रेतही त्यांनी बारा वर्षे घालविली. रामदासांचे सर्वच चरित्र अघटित दिसते. धर्मभावनेने तीर्थयात्रा करणारी मंडळी त्या काळी होती. पण रामदासांनी तीर्थयात्रेत त्या दृष्टीनेच नुसती पायपीट केली नाही. उघड्या डोळ्यांनी ते हिंडले, परमेश्वराने निर्माण केलेले सृष्टिसौंदर्य त्यांनी पाहिले. त्याचप्रमाणे देशकालमानही त्यांनी निरखून घेतले. पुरश्चरणात एक प्रकारचे अध्ययन झाले; तर तीर्थाटणात दुसऱ्या प्रकारचे ज्ञान त्यांनी आत्मसात केले. ग्रंथपठणाने होणाऱ्या ज्ञानाला निरीक्षणाची जोड मिळाली. त्यांच्या वाङ्मयात संचारावर भर आहे. त्याचे मूळही ह्या प्रत्यक्षानुभूतीत आहे. आधी केले मग सांगितले. लोकांच्या रीतिभाती, धर्माचरण, कर्तव्याकर्तव्याविषयीचे औदासीन्य, जीवनाला आलेली अवकळा, त्यांना भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा, न्यायाची पायमल्ली, मानखंडना, स्त्रीत्वाची विटंबना, परसत्तेखाली होणारे अमानुष छळ, असहाय्यता, लाचारी, हे सारे त्यांनी ठायी ठायी पाहिले. पाहून त्यांच्या मनात कल्लोळ माजून राहिले आणि त्यातूनच लोकांचा उद्धार करण्यासाठी त्यांना

प्रेरणा झाली. सर्व तीर्थक्षेत्रे त्यांनी धुंडाळली. काही बोलायचे म्हटले तर ते बोलणे प्रमाण असले पाहिजे. त्याला अधिकार असावा लागतो. तो अधिकार रामदासांनी अशा रीतीने, दोन्ही मार्गांनी, प्राप्त करून घेतला होता. बारा वर्षे ज्ञान संपादन आणि बारा वर्षे तीर्थाटण. इतका योजनाबद्ध आयुःक्रम सर्वानुकूलतेतही पार पडणे कठीण ! इथे तर सारेच प्रतिकूल ! पण प्रतिकूलतेत प्रखर प्रतिकारशक्ती प्रज्वलित होते. बुद्धीला धार चढते. रक्त उसळ्या घेते. आणि वैराग्यसंपन्नाच्या दृष्टिक्षेपासरशी व्याघ्र-सिंहादि हिंस्र पशूंनीही पायी लोळण घ्यावे आणि पंचमहाभूतांनीही पाठराखणी करावी, असे आत्मिक सामर्थ्य रामदासांना प्राप्त झाले होते. गावोगाव हिंडून लक्षावधी लोकांची ज्यांनी मने पारखली त्यांचे व्यवहारचातुर्यही तसेच अतुल असल्यास नवल नाही.

हिमालयापर्यंत जाऊन, सारा उत्तर हिंदुस्थान धुंडून रामदास यात्रा करीत करीत पैठण–आंबेजोगाईकडे वळले. तिथून जांबेस जाऊन त्यांनी आईची भेट घेतली. लग्नातून फरारी झालेला मुलगा आपल्याला कधी भेटेल का तरी; अशी जिच्या चित्ताची निराशेने व्याकुळ अवस्था झाली होती, वृद्धावस्थेने शरीर क्षीण झाले होते आणि दृष्टीही गेली होती, त्या आईला पुत्रभेटीचा असा अचानक लाभ झाला. कळवळलेल्या अंतःकरणाने तिने त्याला जवळ घेऊन त्याचे सर्वांग चाचपून गोंजारून पाहिले. रूपदर्शनाची तहान स्पर्शसुखाने भागवून घेतली. 'नारायणा, काय रे हे तुझे ध्यान' असे ती म्हणाली असेल. आईची ती अवस्था पाहून रामदासांनी तिच्या डोळ्यावरून हात फिरवला आणि काय चमत्कार, खरोखरीच तिचे आंधळेपण लयाला गेले ! तिला फिरून दृष्टिलाभ घडला. पोरपणी परागंदा झालेला मुलगा आज दाढी-जटाधारी गोसाव्याच्या धिप्पाड रूपात पाहून तिला केव्हढा धक्का बसला असेल ! ती म्हणाली म्हणे, "नारायणा, तुला कोणतं रे हे भूत लागलं बाबा ?" तेव्हा, रामदासानी आईला उत्तर दिले की--

होतें वैकुंठींचे कोनीं । शिरलें अयोध्या भुवनीं<br>
लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे माये ॥

प्रस्तुत पद रामदासांचेच असल्यामुळे ह्या भेटीच्या प्रसंगात सत्यांश खासच दिसतो. ही भेट शके १५६२ च्या सुमारास झाली असावी.

ह्यानंतर आईचा व श्रेष्ठांचा निरोप घेऊन रामदास पुन्हा संचारार्थ निघाले. घरी राहणे हे त्यांना मानवणारेच नव्हते. सर्व देशस्थिती पाहून ज्याचे चित्त हेलावले होते तो केवळ घरी कुटुंबियात राहून देवपूजा करण्यात आयुष्य व्यतीत करील काय ? ही त्यांची प्रकृतीच नव्हे.

ते कृष्णातीरी आले. आणि इथून त्यांच्या आयुष्याचे खरे कर्तृत्वपर्व सुरू झाले. महाबळेश्वरापासून खाली दक्षिणेस कृष्णेच्या काठाकाठाने हिंडताना त्यांनी

अनेक स्थळे पाहिली आणि धर्मस्थापनेच्या उद्योगाला ही भूमी त्यांनी पसंत केली. श्री शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे जिथे तोरण बांधले तो हा मुलुख स्वधर्ममंदिर उभविण्यास त्यांना योग्य वाटला. लोकही त्यांच्याकडे आकृष्ट होऊ लागले.

शके १५३० च्या चैत्रात जन्म आणि शके १६०३ च्या माघ मासी देहावसान, ही रामदासांची आयुर्मर्यादा लक्षात घेतली असता, बारा वर्षांच्या तीर्थाटनानंतर शके १५६६ मधे ते महाबळेश्वरास प्रथम आले, याचा अर्थ, त्यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध संपून उत्तरार्धास इथून सुरुवात होते, असा होतो. कर्तृत्व-संपन्नतेचा फुलोरा इथून भरास येऊ लागला. त्यांच्या भोवती शिष्य–परिवार जमू लागला.

त्यांनी मसूर येथे मारुतीची स्थापना करून रामनवमीच्या उत्सवास आरंभ केला. आणि १५६९–७० ह्या अवधीत चाफळास ( अंगापूरच्या डोहांतून काढलेल्या ) राममूर्तीची स्थापना करून उत्सवाची सुरुवात केली. चाफळ हेच त्यांचे मुख्य केन्द्र झाले. लोकांच्या पाठिंब्यावर देवालय उभारता येईल इतका आत्मविश्वास त्यांना आला. लोकांना राजी राखावे, आपल्या उद्दिष्टाकडे त्यांना वळवून घ्यावे, त्यांना शहाणे करून सोडावे, हा चाणाक्षपणा त्यांचे ठायी पुरेपूर असावा, हे स्पष्टच होय. केवळ आपला भक्तगणच वाढावा, सगळा देश रामभजनी लागावा, हे त्यांना सर्वतोपरी मान्य नसावे. प्रभुरामचंद्रावर दृढ श्रद्धा ठेवून ' ज्याचा जो व्यवहार। तेथे त्याने असावे खबरदार ', हे त्यांना अधिक पसंत होते.

खाजगी संसार नसलेल्या ह्या साधूने प्रचंड प्रपंच उभा केला होता! पण त्यातही त्याची वृत्ती गुंतून पडण्याची नव्हती. चाफळचे राममंदिर उभे राहिल्यावर, त्यांनी चाफळचे अधिकारी नरसिंगराउ अंबरखानी, देशमुख प्राणजी, देशकुळकर्णी नागोजीपंत, नाईकवाडी नागोजी भावे व नाणेघोलकर अशा पाच प्रतिष्ठितांना पाचारून " या अधिष्ठानाची भक्तिपरंपरा करावी, सर्व साह्यता करावी, कानुकानुनाती (पद्दी) यात्रेंत होऊं न द्यावी, सर्वस्वेसी साहे असावे " म्हणून त्या पाचही जणांकडून श्रीरामाच्या पुष्पावर हात ठेवून घेतला होता.

मठ-मंडळ्या-देवालये यांची स्थापना करून त्यांची कार्यवाही ते ठरवून देत आणि आपण बाजूला होत. शिस्तीने काम पुढे चालत राहावे ह्या दृष्टीने ते नियमही घालून देत. केर कोणी काढायचा, बैठका कोणी घालायच्या, पालखी उचलायचा मान कोणाचा, गंधाक्षता कोणी लावाव्या, इत्यादी बारिकसारिक कामांचीही वाटणी त्यांनी करून ठेवलेली असे. आणि ही कामगिरी म्हणजे देवाच्या दरबारातला ' मान ' आहे असे सेवेकरी समजत. नवमीच्या उत्सवात दररोज रात्री कीर्तन झाल्यावर ह्या सर्व सेवेकऱ्यांचा क्रमवार पुकार होऊन मठाधिपतींनी त्यांना " मानाचे विडे " द्यायचे, ही प्रथा आजतागायतही चालू आहे. सारांश सर्वांचा जीव कामात लावून हा " दास डोंगरीं राहतो " । आणि तिथूनच " यात्रा देवाची पाहतो. "

" दास डोंगरीं राहतो " ह्या उद्गाराची अर्थगर्भता " सुखालागिं अरण्य सेवीत जावे " ह्या प्रकरणात विशद केलीच आहे. [रामदासांना एकान्ताची आणि सृष्टि-सौंदर्याची आवड किती होती,] ह्याचा त्यावरून बोध होईल. डोंगर-कपारी वसती करण्याची ही त्यांची प्रीती ध्यानी घेऊनच गिरिधरस्वामींनी समर्थ-स्तवनात ' गिरि-कंधरनिवासा ' हे संबोधन वापरले आहे. अर्थातच ते साभिप्राय आहे. चाफळची, हेळवाकजवळची, शिवथरची आणि चंद्रगिरीच्या डोंगरांतील, ह्या चार घळी त्यांची एकान्तवासाची मुख्य ठिकाणे होत. वाऱ्याचा उपद्रव शक्य तो होऊ नये अशा धोरणाने घळींची निवड करण्यात येत असावी. " एकान्त गुव्हा निर्वात जेथे " यातील निर्वात हा शब्द आणि—

तेथें अखंड नाहीं वात । म्हणउनि जागा तो निर्वात ।
शीतकाळीं घुमघुमीत । वस्त्र नलगे ।।

हा चंद्रगिरीच्या डोंगरातील घळीबद्दलचा अभिप्राय ध्यानी घेण्यासारखा आहे. डोंगरी राहून, यात्रा पाहता येण्यासारखी घळ चाफळची आहे.

अशा ह्या कर्तबगार, लोकसंघटनाकुशल, वैराग्यशील महापुरुषाची आणि त्याने आरंभिलेल्या धर्मोद्धाराच्या उद्योगाची वार्ता शिवाजीराजे यांच्या कानी गेली असणारच. आणि शिवरायाच्या रूपाने महाराष्ट्रात स्वातंत्र्यसूर्याचा उदय होत आहे हे रामदासांच्याही लक्षात यायला वेळ का लागला असेल ? अशा ह्या दोन पुरुषो-त्तमांची प्रत्यक्ष गाठभेट प्रथम केव्हा झाली ? शके १५७१ मध्ये, का १५९४ मध्ये ? हा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविता येत नसला तरी दोघेही परस्परांच्या प्रतापाने प्रभावित झाले होते ह्याबद्दल तिळमात्र शंका नाही. समर्थांच्या वाङ्मयात श्रीशिवाजी-राजांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष गुणगौरव सापडतो. तत्कालीन राजकीय आंदोलनाकडे ते मोठ्या उत्सुकतेने पाहत असल्याचे दिसते. शिवाजीराजांनी संपादिलेल्या यशाने ते सद्गदित झालेले दिसतात. आणि त्यांच्या यशोत्कर्षाबद्दल तुळजाभवानीची आळवणी करतात. त्यांच्या पहिल्या भेटीची शकमिती संशयित असली तरी

समर्थें अफजलखानासि मारविलें । मग चाफळ क्षेत्र उभें केलें ।
श्री तुळजामाउलिस संस्थापिलें । जाऊली पर्वतीं प्रतापगडीं ।।

अशाप्रकारचें श्रेय–कर्तृत्व रामदासांच्या पदरांत घालण्याइतका समज शिष्य-परिवारांत बळावला होता हेही ध्यानात घ्यायला पाहिजे. पुढे, ह्या दोन महा-पुरुषांच्या गाठीभेटी तर वारंवार झाल्याच आहेत. इतकेच नव्हे तर, स्वामींवरील प्रगाढ निष्ठेमुळे आणि त्यांचा वृद्धापकाळ पाहून, ते परळीस येऊन राहतील तर अधिक सोयीचे होईल असे शिवाजीराजांना वाटले. आणि तशी त्यांनी स्वामींना विनंतीही केली. पण स्वामींना चाफळ देवस्थानची काळजी होती. ती सर्व जबाबदारी

छत्रपतींनी स्वीकारली तेव्हा स्वामी सज्जनगडी वास्तव्य करण्यास तयार झाले (शके १५९८). श्री शिवाजीराजांची आस्था व दक्षता इतकी की, गडावरचा थंडीवाऱ्याचा उपद्रव ध्यानी घेऊन, श्रीसमर्थांच्या सन्निध शेगडी ठेवण्यात यावी याविषयी साताऱ्च्या देशाधिकाऱ्यांना राजांचे हुकूम असत. अशा रीतीने स्वामी सज्जनगडी राहू लागले. तथापि तिथून रामनवमीच्या उत्सवास ते चाफळास जात असत. ह्याला अपवाद फक्त १६०२ च्या उत्सवाचा.

शिवाजी महाराजांचे देहावसान शके १६०२ च्या चैत्र शुद्ध पौर्णिमेस झाले. तत्पूर्वी एक महिनाभर ते स्वामींच्या सहवासात सज्जनगडावर राहून गेले होते. शिवाजी राजे गेले आणि रामदासांना जबरदस्त धक्का बसला. महाराष्ट्राच्या ह्या दोन भाग्यविधात्यांचे जीव एकमेकात गुंतले गेलेले होते. एकाचा दुसऱ्याला आधार वाटत असला पाहिजे. दोघेही निश्चयाचे महामेरू आणि स्वयंप्रभ. पण शिवाजी महाराजांच्या निर्याणामुळे रामदासांच्या अंतरी उदासीनतेची अभ्रे दाटू लागली असावीत. शके १६०३ च्या रामनवमीच्या उत्सवास ते चाफळास गेले होते. उत्सवसमाप्तीनंतर नवमीच्या रात्री सर्वत्र सामसूम झाल्यावर ते एकटेच राममूर्तीपुढे बसून राहिले होते. जणू काही निरोप घेतेवेळचे ते आत्मनिवेदन करीत होते; शेवटची प्रार्थना करीत होते ! त्या वेळी, बखरकार म्हणतात, " देवालय अति तेजें करून सुंदर दिसू लागले. " नंतर रामदास स्वामी गडावर परतले.

आज्ञेप्रमाणें परमार्थ । केला जाण म्यां यथार्थ
आतां देहाचा कंटाळा । आला असे जी दयाळा

" सुखें सांडणें ह्या देह्याचें करावें " अशा तऱ्हेचे विचार ते बोलून दाखवू लागले. दासबोधाची वीस दशकात्मक मांडणी करून तो पुरा केला. पौष वद्य नवमीस श्री छत्रपती संभाजी महाराज दर्शनास आले असता, त्यांना काही गोष्टींची आठवण देऊन, काही तजवीजा सांगितल्या.

हळूहळू प्रकृती क्षीण होऊ लागली. अन्नपाणी वर्ज्य झाले आणि

माघ वद्य नवमी । दिवसा दोन प्रहर नेमी
शनिवारीं परंधामीं । योग केला.

शके १६०३ मध्ये महाराष्ट्र–धर्माचा हा उद्गाता निजधामास गेला.

रामदासांचा हा आरंभापासून अखेरपर्यंतचा जीवनपट मनश्चक्षूंपुढे धरला म्हणजे त्यांनीच एके ठिकाणी काढलेल्या उद्गारांची आठवण होते. मानवाने आपले जीवित कसे व्यक्तीत करावे यासंबंधी त्यांनी सांगितले आहे की—

नदीचें उदक वाहात गेले । तों निरर्थक चालिलें ।
जरी बांधोनि काढिलें । नाना तीरीं कालवे

उदक निगेनें वर्तविलें । नाना जिनसीं पीक काढिलें
पुढें उदकचि जालें । पीक सुवर्ण ॥
तैसें हें आपुलें वय । विवेकेंविण व्यर्थ जाय
विवेकी ते यथान्वय । स्वहित साधिती ॥
नाना ऊंच आम्रफळें । अंजीर ऊंस द्राक्षें केळें
नाना पिकें यत्नजळें । निर्माण जालीं ॥
तैसें आयुष्य आपुलें । विवेकें सार्थक केलें
काजें शोधूनि पाहिलें । सारासार ॥

ह्यात आपल्या आयुष्याचे सार्थक कसे करावे हे नदीच्या दृष्टान्ताने रामदासांनी जे प्रतिपादिले आहे त्यात 'आधी केलें । मग सांगितलें' याचीच साक्ष मिळते. त्यांचे सारेच जीवित निरर्थक आणि निरुद्देश वाहात जाणाऱ्या प्रवाहासारखे नव्हते. आणि आत्मोद्धारापुरते आत्मकेंद्रितही नव्हते. अधिकात अधिक भूभाग सुपीक व्हावा ह्या हेतूने ज्याप्रमाणे नदी वळवून, आडवून, कालवे काढून, तिचे पाणी कारणी लावतात, त्याप्रमाणे त्यांनी आपल्या आयुष्याचा कण न् कण हरतऱ्हेने वेचला, स्वतःच्या आयुष्याचे सोने केले आणि सभोवतालच्या सर्व संबंधी जनतेत सोन्याची पिके काढली.

रामदासांचे कवित्व आणि रामदासांचे चरित्र ह्यांच्यात अभेदपण आहे. त्यांनी जे अनुभविले आणि जे आचरिले तेच त्यांच्या मुखातून उमटले आहे. ते सारे जो मनःपूर्वक वाचील त्याला त्यांच्या अनुभवसमृद्धीची आणि ज्ञानसमृद्धीची अथांगता जाणवल्याशिवाय राहणार नाही. व्यवहार, समाजकारण, वेदान्त आणि राजकारण, या सर्वांविषयी त्यांची वचने रोखठोक आहेत. आत्मोद्धाराबरोबर जगदुद्धाराचीही पोटतिडीक त्यांना असल्यामुळे कोणत्या एका गोष्टीबद्दल त्यांचा उद्‌गार नाही, असे नाही. कोणत्याही पेशाचा मनुष्य असो, त्याला त्यांच्या वाङ्मयात 'हे आपल्यासाठी आहे' असे वाटण्यासारखे काही ना काही आढळेलच. इतकी त्याची विशालता आहे.

रामदासांच्या सद्‌गुणसंख्येबद्दल तर बोलायलाच नको. अमोघ वक्तृत्व, अखंड चाळणा, निरंतर कष्ट, प्रयत्नावर पराकाष्ठेची मदार, गायनाची आवड, एकांतप्रियता, निर्भयवृत्ती, कडकडीत वैराग्य, लोकांवर छाप पडण्यासारखी मुद्रा, त्यागवृत्ती, अशा अनेक उत्तम गुणांचा परिपाक त्यांच्या ठायी दिसून येतो. 'चिंता करतो विश्वाची' हे त्यांनी बालपणी आईला दिलेले उत्तर! ह्याचा पडताळा सर्व आयुष्यभर सापडतो. त्यांचे आचरण म्हणजे ह्या उत्तराचा अहर्निश अनुवादच! देवाजवळ मागणे मागताना सुद्धा त्यांना त्याचा विसर पडला नाही. "कल्याण मागणे रामा तुज"

असे आळवताना "तुझे देणे असे असो की भक्त सुखी असावेत आणि ऋषी सुखी असावेत" हीच त्यांची वांछा आहे.

सोडविले ब्रह्मादिक । तूं रे त्रैलोक्यनायक ।
दास म्हणे तुझे रंक । सांभाळी आपुले लोक ।।

कल्याण करी । रामराया । जनहित विवरी ।
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूंचि सांवरी ।।

असे किती म्हणून उद्‌गार उद्‌धृत करावेत ! त्या सगळ्यांतून लोककल्याणाची तळमळच प्राधान्य पावली असून, लोकांचे दैन्य-दुःख निवारण व्हावे, म्हणून करुणा भाकण्यात आली आहे.

असा हा अनन्यसाधारण संत 'समर्थ' ह्या बिरुदानेच आजतागायत ओळखला जात आहे. लोकमान्य म्हणजे बाळ गंगाधर टिळक. महात्मा म्हणजे मोहनदास करमचंद गांधी. त्याचप्रमाणें समर्थ म्हणजे रामदास स्वामी. अशी ही समीकरणे प्रसिद्ध आणि रूढ होऊन बसली आहेत. संतमालिकेत, मला नाही आठवत, अन्य कोणी आपल्या बिरुदानेच विख्यात झालेला !

रामदासांनी स्वतःला 'समर्थ' म्हणवून घेतले, का त्यांच्या भक्तांनी त्यांना हे बिरुद बहाल केले ?

रामदास हे त्यांचे नाव; पण ते सुद्धा पाळण्यातले नव्हे. पाळण्यातले नाव नारायण. पण त्यांनी स्वतःला रामदास म्हणवून घेतले त्याचा उगम शोधणारांना--

उपदेश देवोनी दिधला मारुती । स्वये रघुपती निरवीत
निरवितां तेणें जालों रामदास । संसारीं उदास म्हणूनिया

ह्यासारखी वचने आढळतील. रामदासी पंथात नामान्तर प्रचलित आहे. रामीरामदास असाही ते आपला उल्लेख करतात. भक्तिभावाची निदर्शक अशी ही पदे-उपपदे होत.

एका पंच-श्लोकी स्फुटाचे शेवटी तर 'लोकदास रामदास देवदास तो सही' अशीही त्यांनी आपली सही केली आहे. यातील 'लोकदास' हे उपपद ध्यानी घ्यायला हवे. हा रामदास केवळ देवदास नाही, तर तो 'लोकदास'ही आहे. लोककल्याणाची चिंता ज्याने आमरण वाहिली आणि लोकांचे गोमटे व्हावे म्हणून ज्याने यावज्जीव उद्योग केला त्याने स्वःतला लोकदास म्हणवून घेण्यात धन्यता मानावी हे सर्वस्वी समुचितच होय.

रामदासांनी 'समर्थ' हा शब्द आपल्या वाङ्मयात वारंवार वापरला आहे. अर्थात तो स्वतःबद्दल नव्हे. "सामर्थ्याचा गाभा । तो हा भीम भयानक उभा"

असे ते मारुतीचे ध्यान वर्णन करतात. सामर्थ्याची उपासना हा त्यांचा जीवितहेतू आहे.

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे।

अशी जी त्यांनी ग्वाही दिली आहे ती सामर्थ्याच्या प्रचीतीतूनच. अशा प्रकारे 'समर्थ' शब्द ज्या ज्या ठिकाणी आला आहे त्या त्या ठिकाणी तो प्रभू रामचंद्राला उद्देशून आला आहे. कोदंडधारी रामाचे अनन्य–साधारण सामर्थ्य त्यांना जाणवले आहे. आपल्या ग्रंथरचनेबद्दल – दासबोधनिर्मितीबद्दल––

भक्ताचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेचीं वचनें । तो हा दासबोध ॥

असा त्यांनी श्रद्धाळू अन्तःकरणाने अर्घ्य सोडला आहे. सारांश, त्यांच्या वाङ्मयात व चरित्रात सामर्थ्याचा जो अखंड गजर आहे त्याच्या जाणीवेमुळे त्यांच्या शिष्यांना––

समर्थें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणवावें ।
त्रैलोक्यासि पडलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥

ह्या न्यायाने रामदासांनाच 'समर्थ' म्हणून गौरविण्याची प्रेरणा झाली असावी. स्वामींनी दासबोधांत ( द. १८, स. १०, ओ. ४६ )—

बहुत जनांसी चालवी । नाना मंडळें हालवी ।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेकें होते ॥

असे 'समर्थ' पदवीचे लक्षण सांगितले आहे. खुद्द रामदासांचे कर्तृत्व लक्षात घेता हे लक्षण त्यांना तंतोतंत लागू पडते. तेव्हा, शिष्यांना जी प्रेरणा झाली तिला ह्या व्याख्येने पक्की बळकटी आली असावी. आणि तशातच स्वामींची वाङ्मयीन धन-दौलत धुंडाळताना तिच्यात "जिवींचें मनींचें पुर्विलें । गोमटें केलें" असा कृतज्ञतेचा भावपूर असलेले पद हाती आले असावे. ह्या पदात रामदासांनी म्हटले आहे—

देवा तूं त्रैलोक्यनाथ । मी रे अनाथ—!
मज करुनी सनाथ । **केलें समर्थ** ॥

ह्या त्यांच्या आत्मनिवेदनाचा आधार मिळाल्यावर मग सर्वांनाच स्फुरण चढून सर्वांच्याच अंतरी उचंबळून येऊन त्यांनी 'समर्थ' ह्या पदवीने त्यांचा जयजयकार केला असावा.

* * *

३.

# रामदास : अवतारी संत

रामदास स्वामी हे अवतारी संत होते. भगवद्भक्तीच्या सामर्थ्यावर जे संसारसागर तरून मोक्षपदी चढले असे थोर थोर संत महाराष्ट्रात होऊन गेले आहेत. त्यांची मालिका 'महाराष्ट्र' पुरुषाच्या कंठी शोभा पावली आहे. तथापि हा संत त्या 'हरिभक्तिपरायणा'-पेक्षा, त्या 'भक्तशिरोमणी-' पेक्षा वेगळा आहे – अचाट कर्तृत्वाचा आहे. श्रेष्ठ कर्तृत्व करून दाखविणारे महापुरुषही महाराष्ट्राला लाभले आहेत. तथापि सगळ्यांनाच 'अवतारी' असे बिरुद लागलेले आढळत नाही. 'अवतारी' हे बिरुद केव्हा लावले जाते, याचा थोडासा विचार केला म्हणजे रामदासांनाच अवतारी पुरुषोत्तमांच्या पंक्तीत बसवणे कसे उचित आहे ते दिसून येईल. भगवद्भक्त आणि कर्तृत्वसंपन्न ह्या स्थूल अभिधा होत. 'अवतारी' म्हणून आपण कोणाला ओळखतो? राम, कृष्ण हे अवतार होऊन गेले असे आपण म्हणतो. छत्रपती शिवाजी महाराज ह्यांनाही 'अवतारी' पुरुष म्हणून संबोधण्यात येते. ह्यांच्या चरित्राच्या अनुरोधाने, अवतारी पुरुषाची व्याख्या करण्याइतपत कल्पना मनात आकार घेऊ शकेल. पण कल्पना कशाला? खुद्द भगवंतांच्या तोंडून या संबंधात आपणाला ऐकायला मिळाले आहे की—

> यदा यदाहिं धर्मस्य ग्लानिर्भवति भारत
> अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ।।
>
> परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्
> धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

मुळात जन्मरहित व अव्ययस्वरूप ( निर्गुण निराकार ) असा जो मी तो सगुणरूपाच्या वेषाने केव्हा प्रगटतो ते श्रीकृष्णांनी ह्या शब्दांत स्वतः सांगितले आहे. ह्याचा सरळ अर्थ : हे " भरतकुलोत्पन्ना अर्जुना, जेव्हा जेव्हा धर्माची ग्लानी होते आणि अधर्माची वृद्धी होते तेव्हा मी स्वतःला जन्मास आणतो. सज्जनांच्या संरक्षणाकरिता आणि दुर्जनांच्या नाशाकरिता व धर्माची संस्थापना करण्याकरिता मी युगायुगाचे ठिकाणी अवतार घेतो. "

ह्यावरून हे स्पष्ट होत आहे की धर्माला आलेली ग्लानी घालवून पुन्हा त्याची प्रतिष्ठापना करणे, दुर्जनांचा विनाश करून साधु-सज्जनांना संरक्षण देणे, अशा प्रकारची कार्ये ज्याच्या हातून होतात तो ईश्वरी अवतार समजावा. रामदासही भगवंतांच्या त्या

उक्तीच्या आधारेच म्हणतात की, 'धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार'. ह्या कसोटीवर जो उतरणार नाही त्याला 'भगवंताची मूर्ती' म्हणून मानले जाणार नाही. व्यक्तिशः तो सज्जन असेल, न्यायनीतीने वर्तणारा असेल, ईश्वराची नितांत भक्तिभावाने अखंड आराधना करणाराही असेल; पण तो अवतारी नव्हे. कर्तृत्व करून जाणारेही काही काही महात्मे – त्यागी, निःस्पृह, रणशार्दूल, मुत्सद्दी – असतात. तरीही त्यांच्या कर्तृत्वाला ज्या आधिभौतिकाच्या मर्यादा असतात त्यामुळे त्यांना ईश्वरी अवतार असे मानण्यात येत नाही. धर्मसंरक्षणासाठी ठाण मांडून, चिरडल्या-भरडल्या जाणाऱ्यांचा कैवार घेऊन, दुर्जनांचा फडशा पाडून, सज्जनांना निःशंक व निर्भय जीवन जगता यावे अशी सार्वत्रिक परिस्थिती जो निर्माण करतो तो अवतारी पुरुष.

शिवाजी महाराज ह्या कसोटीवर अवतारी पुरुष ठरतात आणि रामदासही ह्या कसोटीवरच अवतारी संत ठरतात. त्याकाळी यावनी सत्तेमुळे मराठी माणसाला नाक मुठीत घेऊन कसेबसे दिवस कंठावे लागत होते. देवधर्म करायलासुद्धा मुळीच मोकळीक नव्हती. पूजास्थानांची पायमल्ली होत होती. स्त्रियांची विटंबना होत होती. "माझें माझें, तुझें माझें" अशी जुलम–जबरदस्ती बळावली होती. त्या काळी शिवाजी महाराजांनी प्रत्यक्षच हातात तरवार घेतली. आणि मराठा तितुका मेळवून गनीम निवटून काढला व स्वराज्याची स्थापना केली. त्या शिवाजीचा गौरव गाताना रामदासांनी—

तीर्थक्षेत्रें मोडिलीं। ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जालीं।
सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला ॥
देव–धर्म–गो–ब्राह्मण। करावया संरक्षण।
हृदयस्थ जाला नारायण। प्रेरणा केली ॥
या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं। तुम्हा करितां ॥
कित्येक दुष्ट संहारिले। कित्येकांस धाक सुटले।
कित्येकांस आश्रय जाले। शिवकल्याण राजा ॥

हे उद्गार काढले आहेत.

ऐतिहासिक कागदपत्रांत 'महाराष्ट्राचें राज्य म्हणजे देवा-ब्राह्मणांचें राज्य' असे उल्लेख आहेत. स्वराज्यात धर्माला अभय देणे हे एक मुख्य उद्दिष्ट होते. म्हणून शिवाजीच्या प्रतापाने :

बुडाले सर्वही पापी। हिंदुस्तान बळावले
अभक्तांचा क्षयो जाला। आनंदवनभूवनीं

बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला
मोडली मांडली क्षेत्रें । आनंदवनभूवनीं
उदंड जाहलें पाणी । स्नान संध्या करावया
जपतप अनुष्ठानें । आनंदवनभूवनीं

हे साध्य झाले असल्याचे संतोषाचे बोल रामदास भरल्या अंतःकरणाने बोलून गेले आहेत. ' स्नानसंध्या ' ह्याचा शब्दशः अर्थ घ्यायला नको. कधी कधी वाच्यार्थाने शब्द न घेता लक्षणेने घ्यायचा असतो. शब्दाचा प्रतीकात्मक उपयोग केल्याने विस्तार टळतो आणि सूचकतेची सौंदर्य–सघनता लाभते. वाच्यार्थाने शब्दाची व्याप्ती मर्यादित होते. प्रतीकात्मकतेने त्याला गरुडपंखाप्रमाणे प्रसरणशीलता प्राप्त होते. असा प्रतीकात्मक शब्द वापरला जाताना कवीच्या संस्कृतीचा छाप उमटणे स्वाभाविक आहे. पण तेव्हढ्याने तो त्याच्या संकुचित धर्मवृत्तीचा निदर्शक मानला जाऊ नये. ज्याला त्याला स्वधर्मानुसार क्रियाकर्म करायला संकोच उरला नाही, हाच आशय रामदासांना अभिप्रेत असावा. सारांश, भगवंताने जे अवतार–प्रयोजन सांगितले त्याची सर्वांगीण साक्ष शिवाजीच्या कर्तृत्वात रामदासांना आढळली. म्हणूनच शिवाजी महाराज हे अवतारी पुरुष होत. त्या काळीही सामान्य लोकांत हाच भाव बळावला होता.

आणि रामदास तरवारीच्या वाटेला गेले नाहीत तरीही त्यांनी अशाच प्रकारचा महान उद्योग केला. भंगली देवालये सांधली, नवीन देवालये स्थापली, आपापली धर्मकृत्ये व उत्सव करावयास लोकांना प्रेरणा दिली, अनेक मठ स्थापले, शिष्य–परिवार उदंड जमविला, रामभक्तीचे वारे जनमनात भरून दिले, मारुतीची उपासना शिकवून सामर्थ्याचा संजीवनमंत्र दिला. केवळ भक्तिज्ञानवैराग्याचा घोष केला नाही. सबळ आणि नेटका प्रपंच करावा असे लोकांना शिकविले आणि ते करताना न्यायनीती सांडो नये, अभ्यासापासून पराङ्मुख होऊ नये, धारिष्ट सोडू नये, दुश्चिळांनाही वळवून घ्यावे, दुसऱ्यांच्या दुःखाने दुःखी होऊन त्यांना सुखी करावे, लोकांची अंतःकरणे पारखून, त्यांच्या हृदयाला घरे पडतील असे न बोलता, ' मानत मानत ' ( म्हणजे घुलवत घुलवत ) त्यांना कार्याला लावावे, अशा प्रकारचा लोक-संग्रह करावा, असे त्यांनी पावलोपावली सांगितले आहे. ज्याने त्याने आपल्या व्यवसायात खबरदार असावे, ह्यावर त्यांचा केवढा कटाक्ष !

रायांनी करावे राजधर्म । क्षत्रीं करावे क्षात्रधर्म
ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नाना प्रकारें

हा त्यांचा आदेश. बोहोल्यावरून पळून गेलेल्या या संसारविमुक्ताचा हा विश्व-संसाराचा आटापिटा पाहिला म्हणजे हा संत, " कोसळोन पडू द्या आकाश ।

आणिकाची कास न धरूं " असा राम-मारुतीभक्तीबद्दलचा पराकोटीचा निर्धार व्यक्त करीत असला तरी,

—इहलोक आणि परलोक। बरा पाहावा ॥
—प्रपंच परमार्थ चालविणें.
—येहलोक आणि परलोक। दोनी साधिलें.
- इहलोक परत्र साधावे। दोहीकडे.
—प्रपंच सांडून परमार्थ केला
तरी अन्न मिळेना खायाला
मग तया करंट्याला। परमार्थ कैचा ॥

याप्रमाणे परलोकाच्या बरोबरीने इहलोकाचाही विचार त्याने अट्टाहासाने सांगितला आहे.

" विनाशाय च दुष्कृताम् " ह्या उद्दिष्टाबाबत रामदास काय करीत होते, असा प्रश्न इथे येईल. शिवाजी महाराजांनी हातात समशेरच घेतली होती. पण अभक्तांचा ( दुर्जनांचा ) क्षयो करण्यासाठी रामदासांच्याजवळ शस्त्र होते का ? अर्थातच नव्हते. पण निःशस्त्राचेही राजकारण असू शकते. भगवंतांच्या उपरोक्त उक्तीवर ज्ञानेश्वरांनी जे भाष्य केले आहे त्यात—

मी अविवेकाची काजळी। फेडून विवेकदीप उजळी।
तैं योगिया पाहे दिवाळी। निरंतर ॥

ही एक ओवी आहे. भगवंतांचे बोल सूत्ररूप आहेत. त्यांची उकल करायला पाहिजे. अवतार-हेतूमध्ये " विनाशाय च दुष्कृताम् " ह्याचा समावेश आहे. पण दुर्जनांचा विनाश करायचा म्हणजे केवळ हातात शस्त्र घेऊन त्यांची कत्तलच करायची, असे नव्हे. तो अगदी अखेरचा उपाय झाला. ह्या उपायाचा अवलंब न करता, दुर्जनांचा निरास करता आला तर बरे नव्हे का ? दुर्जनांच्या चित्ताचे परिवर्तन झाले, पश्चात्तापाने त्यांनी खलवृत्तीचा त्याग करून जनहितकर आचरणाचा अंगीकार केला, तरी कार्यभाग झाल्यासारखाच आहे. हे त्यांचे हृदय-परिवर्तन कशाने साधायचे ? हा सारा विचार मनात आणून ज्ञानेश्वरांनी उत्तर दिले आहे की, " मी अविवेकाची काजळी। फेडून विवेकदीप उजळी. "

रामदासांच्या कवितेत नेमका ह्या विवेकावरच भर आहे. ' एकान्त, अभ्यास आणि विवेक ' ह्या त्रिसूत्रीचा त्यांनी सर्वत्र जयघोष केला आहे. आत्मोद्धारासाठी त्यांनी हा मार्ग तर सांगितलाच आहे. पण जे जे कोणी भेटतील " तितुक्यांचीं अंतरें धरावीं। विवेकें विचारें भरावीं " असेही पण त्यांनी सांगितले आहे. मूढ,

भ्रांतिष्ट, अज्ञानी, दुःशील, असे जे असतील त्यांच्या मालिन्याचे क्षालन करायचे आणि त्यांना सन्मार्गाला लावायचे हे विवेक प्रज्वलित झाल्याशिवाय थोडेच होणार? 'वन्ही तो चेतवावा रे । चेतविताच चेततो.' हा दृष्टान्त देऊन रामदास सांगतात "विवेक जाणिजे तैसा । वाढवितांच वाढतो." त्यांनी स्वतः विवेकाच्या मशाली अहर्निश पेटवून खल–वृत्तीचा विनाश केला. इतर संतांच्याही वाणीने आणि शुद्ध आचरणाने हा परिणाम होत होता. पण सहजासहजी लाभणाऱ्या या श्रेयावर रामदास थांबले नाहीत. त्यांनी योजनापूर्वक, संघटनाचातुर्याने, बहु मुलखी संचार करून धर्माची ग्लानी नष्ट व्हावी म्हणून, विशेषप्रकारे उद्योग केला आणि "महाराष्ट्र धर्म" म्हणून काही कल्पना मांडून त्याची राजापासून रंकापर्यंत सर्वांना प्रेरणा दिली.

म्हणूनच ते अवतारी संत होते, असे म्हणावेसे वाटते. ते खुद्द अवतार आहेत असा त्या काळच्या लोकांचाही समज होता—

तो हा जगद्‌गुरू साचा । रामदास अवतार मारुतीचा ॥

असे जे महीपतीने संतविजयात म्हटले आहे आणि

साच सृष्टीचा करावया उद्धार । जाला समर्थाचा अवतार ॥

असे रामसोहाळ्यात मेरुस्वामी म्हणतात, ते केवळ त्यांच्या पदरचे नसून, त्या काळी प्रचलित असलेल्या लोकमताचे प्रतिबिंब होय. रामदासांनी जी सत्कीर्ती संपादिली तिचा साकल्याने आजही विचार करता,

जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥

(दा० १७-१-२९)

हे त्यांचेच उद्‌गार त्यांना यथार्थतेने लागू पडताहेतसे दिसेल. धर्मस्थापनेचा त्यांनी हव्यास घेतला होता, तसा आयुष्यभर उद्योग केला, म्हणून ते 'परमेश्वराचे अंश.'

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों दि ..................

४.

# समर्थांच्या संगतीत

रस्त्याने कोणी नामवंत व्यक्ती जात असली की लोक तिच्याकडे माना वाकवाकवून पाहत असतात. मुले तर आपापसात कुजबुजतात, खुणावतात, मुद्दाम परतून आडवी येऊन जातात. लोकांना नामवंताबद्दल आदर, कुतूहल, प्रेम, असे काही ना काही वाटत असते.

एका पाश्चात्त्य पुरुषश्रेष्ठाबद्दल एक गोष्ट माझ्या वाचनात आली होती. ती कुठे वाचली होती ते आता आठवत नाही. पण त्या पुरुषश्रेष्ठाचे नाव व्हॉल्टेअर असावे, असे आठवते. असुक रस्त्याने अमुक वाजता तो जाणार असल्याची बातमी आधीच पसरलेली असल्यामुळे, त्याला पाहण्यासाठी त्या रस्त्याच्या कडेने लोक थबकले होते. त्या रस्त्याने त्याची चौचाकी जाऊ लागली तेव्हा लोकांनी कान टवकारले आणि डोळे ताणले. चौचाकीच्या खिडक्यांवर पडदे सोडलेले असल्यामुळे आतल्या व्यक्तीचे दर्शन दुर्लभच झाले होते. तरी पण वाऱ्याने ते पडदे फडफडत तेव्हा त्यातून त्याचे अर्धेमुर्धे निसटते दर्शन जे शक्य होत होते तेवढ्यावरच लोकांची जिज्ञासातृप्ती काय होत असेल ती खरी !

रस्त्याने लोक दुतर्फा तुंबलेले आहेत हे व्हॉल्टेअरच्याही नजरेस आले. गाडीत त्याच्या समोरच त्याचा चिटणीस बसला होता. त्याला व्हॉल्टेअरने विचारले, " हे लोक असे ठायी ठायी तुंबून का राहिले आहेत ? "

" आपणाला पाहण्यासाठी. " चिटणिसाने उत्तर दिले.

" असं ? " असे म्हणून व्हॉल्टेअरने आपल्या अंगावरला झगा बाजूला केला व खिडकीवरचा पडदा बाजूला सारून उघड्या छातीने तो बाहेर डोकावला आणि ओरडून म्हणाला, " लोक हो, मला पाहायचं ना ? पाहा, हा पाहा मी. "

व्हॉल्टेअरची ही वागणूक विक्षिप्तपणाची, लोकांना खिजवणारी वाटली असेल. पण त्या विक्षिप्तपणात केवढा तरी अर्थ होता. नामवंताला पाहण्याची जिज्ञासा असणे हे स्वाभाविक असले तरी खरे पाहणे कोणते ? नामवंत झाला तरी देहदृष्ट्या तो दहा-जणांसारखाच नसतो का ? हात, पाय, कान, नाक, डोळे, वगैरे अवयवांच्या बाबतीत तो अगदीच अभूतपूर्व किंवा लोकविलक्षण असत नाही. तेव्हा व्यक्तीचा देह पाहण्याने व्यक्तीची खरी ओळख झाली असे थोडेच म्हणता येणार आहे ? व्यक्तीची ओळख तिचे कर्तृत्व जाणून घेतल्याने होणार. वाङ्मयनिर्मात्याची ओळख, त्याचा देह पाहण्या-पेक्षा, त्याचे वाङ्मय अभ्यासल्यानेच होते.

आणि व्यक्ती पाहण्याची लालसा हयातीने परिमित आहे. पण निर्मात्याच्या हयातीनंतरही त्याचे वाङ्मय उपलब्ध असल्याने, खऱ्या अर्थाने ती व्यक्ती सततच आपल्या सन्निध असते. थोरांची स्मारके करण्यात येत असतात. ती स्मारके त्या थोरांच्या साक्षात मूर्ती नव्हेत; पण वाङ्मयविधाता स्वतःच्या ग्रंथात प्रत्यक्ष आकारला गेलेला असतो. श्री शिवछत्रपतींचा पुतळा कितीही कुरवाळला तरी शिवाजी 'कळला' असे होणार नाही. पण ज्ञानेश्वरीचे पारायण केले म्हणजे ज्ञानेश्वरांजवळ गेलो, त्यांची संगत घडली, त्यांच्याशी हितगूज केले, असे वाटू लागते. थोर थोर वाङ्मयप्रभूंच्या संगतीला ( ते अंतर्धान पावून कितीही का वर्षे होऊन गेली असेनात ) आपण आंचवलो असे होत नाही. त्यांचा ग्रंथ उघडून आपण बसलो की त्यांच्या कुशीत आपण शिरलो, आपणाला पोटाशी घेऊन ते कुरवाळू लागले, असे वाटू लागते; त्यांच्या मनाचे पदर आपल्यापुढे उघडले जात आहेत अशी जाणीव होऊ लागते. व्हॉल्टेअरच्या त्या विक्षिप्तपणाचा अर्थ हाच आहे की, 'बाबांनो, ह्या हाडामांसाच्या देहाला काय पाहायचंय ? मला पाहायचं असेल तर तुम्ही माझं वाङ्मय वाचा; त्यात निमज्जन करा; म्हणजे तुम्हांला माझी खरी ओळख होईल."

ह्याच भावार्थाशी जुळणारा प्रसंग श्रीसमर्थ रामदासांच्या चरित्रात आढळतो. गिरिधर स्वामींनी तो नमूद करून ठेवला आहे. "तुमच्या मागे कसे होणार ?" अशा अर्थाची वेणाबाईच्या तोंडून काळजीची भाषा निघाली असता समर्थ म्हणाले—

श्रीराम देवार्चन सिद्धच आहे । ग्रंथराज दासबोध-सामर्थ्य सिद्धच आहे
जो जो महंत येथें निश्चयें राहे । तो तो लाहे साक्षात्कारू ।।

अर्थ स्पष्ट आहे. रामदासांनी वेणाबाईला धीर दिला असावा की, "काळजी कशाला हवी ? नुपेक्षी कदा रामदासाभिमानी. रामचरणी दृढ विश्वास ठेवा; त्याची कास सांडू नका. आणि माझ्याबद्दल म्हणाल, तर माझे सारसर्वस्व असलेला माझा दासबोध तुमच्या हाती निरवलाच आहे. अनन्य निष्ठेने जो इथे राहील त्याला, मी कुठे गेलोच नाही, हा साक्षात्कार झाल्याशिवाय राहणार नाही."

वेणाबाईला हा जो धीर दिला आहे त्याचाच अनुवाद आणखी एका ठिकाणी आला आहे. वयोमानाने समर्थांची प्रकृती ढासळत चालली. स्वामी आता फार दिवसांचे सोबती नाहीत, असे शिष्यपरिवाराच्या ध्यानी आले. अर्थातच, परिवारातल्या मंडळींच्या अंतर्यामी चिंता बळावू लागली. निर्याणाची वेळ जवळ आली तशा मुद्रा कष्टी दिसू लागल्या. सर्वांच्या चेहऱ्यावरील ती खिन्नता पाहून आणि तिचा अर्थ ध्यानी घेऊन, रामदासांनी आपल्या भक्तगणाला सांगितले—

माझी काया माझी वाणी । गेली म्हणाल अंतःकरणीं ।
परि मी आहें जगज्जीवनीं । निरंतर ।।

आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ।
असतां न करावा खेद । भक्तजनीं ॥

भीमस्वामींनी समर्थांच्या अंतकाळचे जे वर्णन केले आहे त्यात ह्या ओव्या आहेत. ह्या शब्दांनी रामदासस्वामींनी व्याकुलचित्त भक्तजनांची समजूत घातली असे भीमस्वामी म्हणतात. " ' देह्याचा भवंसा नाही ' ' देह आहे जाईजणें. ' पण तो कार्यक्षम होता त्या वेळी त्या देहदेवालयातल्या देवाने जे वदविले ते लिहून ठेवले आहे. उद्या एवढंच व्हायचं आहे की, माझी काया दिसणार नाही आणि वाणी कानी पडणार नाही. पण ' रामदास ' म्हणून जे जे काही आहे ते ' माझे स्वरूप दासबोधात स्वतःसिद्ध ' आहे. मग खेद कसला ? "

सारांश, व्हॉल्टेअरचा तो विक्षिप्तपणा आणि समर्थांचा हा दिलासा, यांतले अंतःसूत्र एकच आहे. वाङ्मयविधाते कालवश झाले तरी त्यांचे चैतन्य त्यांच्या वाङ्मयात चिरंतनत्व पावलेले असते. वाङ्मयरूपाने ते आपल्या उशापायथ्याशी राहून आपणाला सोबत करीत असतात, आपणाशी हितगूज करीत असतात, आपल्या वाटचालीत अंधाऱ्या रात्री आपल्यापुढे मशाली धरून चालत असतात.

● ●

आजन्म अकिंचन राहून संतश्रेष्ठांनी जी साहित्यसंपदा जोडली तिचे तेज अलौकिक आहे. प्रतिभाशाली साहित्यिकांचा वाङ्मयमहोदधी देखील तसाच मौल्यवान आहे. ह्या उभयविध साहित्यसागरात मीनमतीने संचार करणाराला अपरिमित आनंद होतो. ठेवणीतल्या सोन्यामोत्यांच्या अलंकारांप्रमाणेच साहित्याला भूषणभूत झालेल्या ह्या वाङ्मयाला मधूनमधून उजळा देणे जरूर असते. समर्थांची सांगी आहे की—

ल्याहावें शुद्ध वाचावें । जाणावें तदनंतरें
जाणतां कळतां बिंबे । बिंबतां स्फूर्ति होतसे ।

त्यास अनुसरून समर्थांचा काव्यसंभार न्याहाळताना त्यांच्या ह्या सांगीचा प्रत्यय येतो, मनात काही स्फुरते, अंतःकरणावर अनेक तरंग उठतात.

ह. भ. प. पांगारकर यांनी संपादिलेल्या श्रीसमर्थग्रंथभांडारात ' करुणास्तोत्रे ' हा एक स्वतंत्र विभाग असून, त्यात बत्तीस स्तोत्रे संग्रहीत करण्यात आली आहेत. वृत्तवैविध्याच्या दृष्टीने पाहू जाता, ( १ ) भुजंगप्रयात वृत्ताची १३, ( २ ) मालिनी वृत्ताची ९, ( ३ ) वसंततिलका वृत्ताची २, ( ४ ) कलिंदनंदिनी वृत्ताची २, ( ५ ) द्रुतविलंबित वृत्ताचे १, ( ६ ) इंद्रवज्रा ( उपेंद्रवज्रा, स्वानंदसम्राट, उपजाति यांचे मिश्रणाची ) ३, ( ७ ) द्रुतविलंबिताची मोडतोड असलेल्या वृत्ताचे १, आणि ( ८ ) अनुष्टुप छंदामध्ये १, अशी ह्या स्तोत्रांची विभागणी होते.

ह्या काव्यगुच्छाचे अंतरंग ' करुणास्तोत्रें ' ह्या नामाभिधानानेच स्पष्ट होत आहे. रामदासांनी ह्या स्तोत्रांत प्रामुख्याने आपल्या आराध्यदेवतेची करुणा भाकली आहे.

' उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ! ', ' उदासीन हा काळ कोठें न कंठे ! ', ' तुजवीण ू्रमा मज कंठवेना ! ', ' रघूनायका मागणें हेंचि आतां ! ', ' तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों ! ', ' रघूनायका काय कैसें करावें ? ', ' सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी ? ' ह्या पालुपदांच्या स्तोत्रांतून त्यांच्या अंतर्यामीची तळमळ, मळमळ, भक्तिभाव, ईप्सित, यांची उत्कट अभिव्यक्ती अनुभवास येते. त्यांनी कळवळून मारलेल्या ह्या हाका भाविकाच्या अंतःकरणात कल्लोळ माजविण्यास समर्थ आहेत.

पण ह्या गुच्छापैकी दोन स्तोत्रे अशी आहेत की, त्यांच्या आगळेपणामुळे त्यांच्याकडे विशेष लक्ष जाते. ' समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ' ह्या पालुपदाचे पाच श्लोकांचे जे स्तोत्र आहे ते इतर करुणास्तोत्रांसारखे नाही. ह्यात केवळ आर्तता, व्याकुळता, तळमळ, ध्यास नाही.

जनीं भक्ति नाही, मनीं भाव नाही । मला युक्ति ना बुद्धि कांहीच नाही ।  
कृपाळूपणे राज्य रंकासि द्यावें, । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥  
समर्थें दिलें सौख्य नाना परींचें, । सदा सर्वदा जाणसी अंतरीचें ।  
लळे पाळिले तूं कृपाळू स्वभावें, । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥

हे जे उद्गार आहेत ह्यात काही मागणे नसून, कृतकृत्यता आहे, तृप्तता आहे. ' जनीं भक्ति नाही, मनीं भाव नाही ' हे उद्गार आपणाकडे लघुत्व घेण्याच्या वृत्तीतले समजायचे; शब्दशः खरे समजायचे नाहीत. ईश्वराचा धावा करताना भक्त निरहंकारी असतो, विनम्र असतो. त्या विनयशीलतेतून आलेले हे बोल आहेत. रामदास म्हणतात, " रघूनायका, कृपाळूपणे रंकाला राज्य द्यावे अशा कोटीतला तुझा अनुग्रह झाला. तुझा मी कसा उतराई होऊ ? मी पतित; पण मला हाती धरून माझ्या मनातले जाणून घेऊन तू माझे लाड पुरविलेस; नाना प्रकारची सुखे मला मिळाली. केव्हढी ही तुझी कृपा ! तुझा मी कसा उतराई होऊ ? " हा ह्या स्तोत्राचा आशय आहे. आणि म्हणूनच ह्याची जात इतरांपेक्षा निराळी नव्हे का ? एखादा निराळा विभाग करून त्यात ह्या स्तोत्राचा समावेश करावा की काय, हा प्रश्न सोडविणे शक्य न वाटल्यामुळे, स्थूल स्वरूपाकडेच फक्त लक्ष देऊन, हे स्तोत्र करुणा-स्तोत्रांच्या गुच्छात गोवले गेले असावे. सिंहावलोकन करताना मनुष्य झाल्या–गेल्याचा आढावा घेत असतो. समर्थांसारख्या उदंड कर्तृत्वाच्या महापुरुषाने एखाद्या निवान्त वेळी असेच सिंहावलोकन केले असावे. आयुष्याची बरीच मजल गाठलेली आहे, बराचसा व्याप–आटोप यशस्वीपणे करून झालेला आहे, पुष्कळ श्रेय पदरात पडले आहे, अशा मनःस्थितीत ' ही सारी प्रभू रामचंद्राची कृपा ' अशी भावना

उचंबळून हे स्फुट स्फुरले असावे, असे वाटते. कृतकृत्यतेचा हा उद्‌गार अनन्य-साधारण होय.

आगळेपणामुळे उठून दिसणारे दुसरे स्तोत्र म्हणजे 'गणपती मति दे मज लाघवी' ह्या चरणाने सुरू होणारे. गणपतीची ही प्रार्थना आहे, असे ह्या आरंभीच्या चरणावरून स्पष्टच होत आहे. दुसऱ्या श्लोकात "विधिसुते स्वहिते करुणालये" असा उद्‌गार आहे. ह्या उद्‌गाराने ब्रह्मसुता शारदा हिला हाक मारली आहे. गणपती व सरस्वती यांचे संयुक्त स्तवन असलेले हेच एकमेव स्तोत्र आहे, असे नव्हे. ह्या करुणास्तोत्रांच्या गुच्छातली पहिली तीन स्तोत्रे गणपती व शारदा यांच्या स्तवनाची असून चौथ्या स्तोत्रात गणपतीसह अनेक देवदेवतांना 'नमन' आहे. पण 'गणपती मति दे मज लाघवी' ह्या स्तोत्रात केवळ भावभक्तीच्या उमाळ्याची हाक नाही. काय आहे नि काय नाही हे सांगत बसण्यापेक्षा मूळ स्तोत्रातले आरंभीचे व मुख्यार्थाचे तीन श्लोकच पाहणे बरे :

> गणपती मति दे मज लाघवी । जनकजा-पतिचा लघुसा कवी ।
> विनवितो करुणाळयकारणा । परम सुंदर दे मज धारणा ॥
>
> सबळ रामकथा वदतां न ये । म्हणुनि वांछितसें तुझिया दये ।
> विधिसुते स्वहिते करुणालये । हरिजना विजयो तुजला जये ॥
>
> बहुत वाड पवाड वदों कसे । कवित-जाडकळा हृदयीं नसे ।
> बहुत हीण कठीण कुलक्षणु । रघुविराकरितांचि सुलक्षणु ॥

हे वाचणाऱ्याच्या ध्यानात सहज येईल की, ह्यात केवळ धावा करणाऱ्या भक्ताची आर्त वाणी नाही. दुसऱ्या कोणत्याही स्तोत्रात न घेतलेली भूमिका रामदासांनी ह्या स्तोत्रात घेतली आहे. इथे ते आपणाला '**जनकजापतिचा लघुसा कवि**' असे म्हणवून घेत आहेत; आणि **सबळ रामकथा** वदावयाची त्यांना इच्छा आहे. पण 'कवितजाडकळा हृदयीं नसे' म्हणजे उत्तम कवित्वशक्ती आपल्याजवळ नाही ह्याची त्यांना खंत वाटते. तेव्हा विधिसुतेने आणि गणपतीने अशी मती आणि धारणाशक्ती द्यावी की रामकथा-वर्णनाची आपली मनीषा सफल होईल, असे मागणे ते मागत आहेत. 'तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों', 'उदासीन हा काळ कोठें न कंठे' इत्यादी धृपदांची वरती जी स्तोत्रे निर्देशिली आहेत त्यांसारखे हे सर्वसाधारण भाविकाच्या वृत्तीतून उगम पावलेले, केवळ शुद्ध स्तोत्र नव्हे.

रामदासांच्या काव्यरचनेत "रामायण : सुंदरकांड आणि युद्धकांड" ही प्रकरणे आहेत. अर्थात ह्या काव्यरचनेस प्रवृत्त होण्यापूर्वीची शंकाकुल, भ्रांत मनःस्थिती ह्या स्तोत्रात व्यक्त झालेली असावी; म्हणूनच एक पृथक स्तोत्र म्हणून ते करुणास्तोत्रात तितकेसे शोभत नाही, असे वाटते. ही प्रार्थना गणपतीची व शारदेची

आहे आणि ती विशिष्ट हेतूने केलेली आहे. रामकथा आपल्याकडून गायिली जावी ह्या आकांक्षेने स्फुरलेली आहे. तसे पाहिले तर [सुंदरकांडाची सुरुवात गणेशनमनपर श्लोकाने झाली आहे आणि युद्धकांडाच्या आरंभी विघ्नहर्ता आणि शारदा यांना वंदन आहे. तथापि तो परिपाठ झाला. पण कथाकाव्याला हात घालण्यापूर्वीची ( म्हणजेच हात घालण्याची इच्छा अंतरात घोळत असून सुरुवात मात्र झाली नाही अशा काळातील ) मनोव्याकुलता ह्या स्तोत्रात आहे] याचाच अर्थ असा की, हे सर्वसामान्य स्वरूपाचे करुणस्तोत्र नसून संकल्पित रामकथेचा प्रस्ताव ( Prelude ) आहे असे म्हणावेसे वाटते.

श्री. शंकर श्रीकृष्ण देव यांच्या "रामदास आणि रामदासी" ह्या मालेचा दहावा भाग "श्रीसमर्थकृत करुणाष्टके, धाट्या, सवाया, प्रास्ताविक श्लोक" वगैरेंचा आहे. त्यात 'करुणाष्टके' निराळी काढून दाखविलेली नाहीत. त्यामुळे 'करुणाष्टके' म्हणून नेमकी कोणती रचना त्यांना अभिप्रेत आहे ह्याचा स्पष्ट बोध होत नाही. तथापि, येथे चर्चाविषय झालेल्या ह्या दोन प्रकरणांना त्यांच्या संग्रहात क्रमांक २ व ३ मिळाले आहेत. आणि ह्यांची 'करुणाष्टकें' म्हणूनच प्रस्तावनेत त्यांनी गणना केलेली आहे. समर्थांच्या लेखनाचा कालानुक्रम नक्की माहीत नसल्यामुळे कोणते, केव्हा लिहिले, त्या वेळी त्यांचे वयोमान काय असावे, ह्याचा आशयानुसार मेळ घालण्याचा प्रयत्न करून त्यांच्या मनःस्थितीचा मागोवा घ्यावा लागतो.

● ●

पंढरपुरास विठ्ठलमंदिरात रामदास गेले असताना त्यांना जो अभंग स्फुरला तो हा :–

येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघःश्यामा
काय केली सीताबाई । इथें राही रखुमाई
काय केली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी
काय केली शरयूगंगा । येथें आणिली चंद्रभागा
धनुष्यबाण काय केले । कर कटावरि ठेवले
काय केलें वानर-दळ । येथें मिळविले गोपाळ
रामी रामदासीं भाव । तैसा होय पंढरि राव

वारकरी संप्रदायाचे ईश्वरभक्त रामदासाच्या ह्या अभंगावर राजी नाहीत. रामदासांना चातुर्वर्ण्य अभिमत आहे. ते ब्राह्मणांना मानतात. ह्याही गोष्टी नाराजीला कारण आहेत. पण ह्याविषयी ऊहापोह इथे अभिप्रेत नाही. आणि रामदासकालीन कोणी वारकरी संत-महंताने रामदासांना ह्याबद्दल निखंदिलेलेही नाही. त्या संप्रदायाचा

' कळस ' म्हणून ज्यांचा गौरव होतो ते संतश्रेष्ठ तुकाराम महाराज रामदासांच्या बद्दल नापसंतीचा उद्‌गार काढीत नाहीत. स्वामींच्याविषयी तात्त्विक विरोध दाखवायला ते कचरले नसते. ते स्वयंप्रभ होते, निर्भीड होते, तरी पण ते अनुदार नव्हते; आणि परमताबद्दल सहिष्णुता बाळगण्याइतका विवेक त्यांच्यापाशी होता. रामदासांच्या तत्त्वज्ञानातले तारतम्य आणि सर्वस्पर्शित्व त्यांना उमगले असावे. तरी पण अलीकडच्या वारकरी सांप्रदायिकांचा रामदासांवर एकंदरीत धुस्सा आहे. तशात विठ्ठल-ध्यानाऐवजी धनुर्धारी रामचंद्राच्या ध्यानाची रामदासांनी भलावण केलेली त्यांना रुचली नसावी. पण ह्या उद्‌गारामागची मनोवृत्ती निर्लेप मनाने ध्यानी घ्यावयास हवी. आराध्य दैवताच्या आत्यंतिक अभिमानातून, पंढरीच्या सगुण स्वरूपाचा– विठ्ठलाचा– हा केवळ अधिक्षेप आहे असे समजणे बरोबर नव्हे. विठ्ठलाने मांडलेले हे ठाण रामदासांना संमत नव्हते, इतका कडवेपणा त्यांच्या ठिकाणी होता, असे मानणे म्हणजे रामदास कोत्या मनोवृत्तीचे होते असे समजण्यासारखे आहे. जनमानसात झुंजारवृत्ती प्रज्वलित व्हावी अशी रामदासांच्या अंतर्यामी एका काळी उत्कट इच्छा होती. रामायणापैकी सुंदरकांड आणि युद्धकांड एवढीच कथा त्यांनी गायिली ती ह्या हेतूनेच. वानरदेखील राक्षसी शक्तीचा निःपात करू शकतात हा आत्मविश्वास परसत्तेखाली भरडल्या जाणाऱ्या नेभळ्या जनतेच्या मनात बळावला पाहिजे, हे त्यांचे उद्दिष्ट होते. अशा त्या काळी रामदास पंढरीस गेले असता समोर ईश्वराचे ' सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ' असलेले पाहून त्यांच्या चित्तात जी भावोर्मी उसळली तिला " येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघःश्यामा " हे शब्दरूप लाभले.

मनुष्यस्वभावाच्या आधारेही इथे काही युक्तिवाद करता येण्यासारखा आहे. व्यवहारातली एक गोष्ट सांगतो. आपला एखादा जिवाभावाचा मित्र आपणाला काही कारणाने दुरावतो. व्यवसायाच्या वारूवर स्वार होऊन परस्परांपासून दैवगतीने हजारो मैल अंतरावर आपण जाऊन पडतो. अनुल्लंघ्य परिस्थितीमुळे किंवा भेट घेण्याचा बुद्ध्या प्रयत्न न झाल्यामुळे, वर्षेच्या वर्षे निघून जातात. आणि एक दिवस असा उगवतो की, त्या दिवशी अचानक भेटीचा योग जुळून येतो. त्याच्या भेटीस जाताना, उत्सुकलेल्या आपल्या मनात त्याची प्रतिमा उभी राहते. अर्थात ती कितीक वर्षांपूर्वीची ! त्या प्रतिमेच्या चिंतनात त्या काळच्या जुन्या आठवणीत गुंगून आपण पावले उचलत असतो. आणि प्रत्यक्ष भेटीत आपणाला काय दिसते ? आपल्या चिंतनात असलेल्या ध्यानापेक्षा अनेक प्रकारे भिन्नत्व पावलेली समोर ठाकलेली मूर्ती ! रंगरूप, आरोग्य, जोष, वैभव, उभारी, उत्साह, तल्लखपणा, वगैरे संबंधीचे त्याचे जे चित्रण आपल्या हृत्पटलावर असते त्याच्याशी मेळ नसणारे ध्यान जर समोर दिसले तर आपण विस्मयचकित होतो आणि एकदम म्हणून जातो, " काय रे हे बंडा ! कुठे गेले ते तुझे गुबगुबीत गाल ? इतकं हळूहळू कधीपासून

बोलायला शिकलास ? वाघासारखा तुझा तो जबडा आणि मेघासारखा गडगडाट;– सारं सारं कसं पार मावळून गेलं रे ! तू म्हणजे खरोखरीचा बंड ! अन् आता बघतो तो सगळं काही थंड थंड ! " ह्यासारखा विस्मयाचा अनुभव पुष्कळांना असेल.

ह्याच न्यायाने रामदासांच्या प्रस्तुत अभंगाचे समर्थन करता येईल. "आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं " ( दासबोध, द० १, स० ४ ) असे रामदासांनी म्हटलेले आहे. सद्गुरुस्तवन कोणत्या शब्दांनी करावे, असा प्रश्न पडला असताना, 'आतां असाल तैसे असा ' मला जसे जमेल तसे मी स्तवन करणार, असे ते म्हणतात. आणि हे म्हणताना दाखला देतात की " नातुडे मुख्य परमात्मा । म्हणोनि करावी लागे प्रतिमा. " म्हणजे, भक्त स्वतःच्या कल्पनेनुसार देवाची प्रतिमा घडवून आपल्या भावभक्तीनुरूप त्याचे स्तवन करतो. [रामदास हे रामभक्त. त्यांच्या मनी रामाचे ध्यान त्यांच्या आवडीनुसार आहे ते कोदंडधारी रामाचे. त्या स्वरूपचिंतनात ते सदा रममाण आहेत. हिंडता-फिरताना त्यांच्या मनात तेच रूपचिंतन चालू आहे. देव म्हणजे राम, आणि राम म्हणजे कोदंडधारी राम, असे ठाम समीकरण त्यांच्या मनाने घेतलेले आहे.] अशा तल्लीनतेत ते पंढरीला आले आणि विठोबाच्या मंदिरात दाखल झाले. समोर पाहतात तो 'सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेऊनिया ' ! 'आपल्या भावासारिखा ' मनी देव आठवणाऱ्या भक्ताला हे काही वेगळेच रूप दिसले. त्यासरशी ते विस्मयचकित होऊन म्हणू लागले,–

"धनुष्यबाण काय केलें । कर कटावरी ठेविले ? "

रामदासांचे अवघे भावविश्वच राममय झालेले आहे. सांप्रदायिक पद्धतीत वार-माहात्म्यानुरूप रविवारी म्हणायचा त्यांचा एक अभंग म्हाळसावराबद्दल आहे. जेजुरीच्या खंडोबाची त्यात प्रशस्ती आहे. त्या अभंगाच्या शेवटी––

दास म्हणे रामराव । राम तोचि खंडेराव<br>
जेथें भाव तेथे देव । लक्ष पायी जडलिया

हे जे तत्त्व त्यांनी सांगितले आहे ते ध्यानी घेतले पाहिजे. ह्याच आशयाचा निर्वाळा मंगळवार आणि बुधवार या दिवशी म्हणावयाच्या सवायांत दिलेला आहे. मंगळवारची सवाई आहे तुळजापूरच्या भवानी मातेबद्दलची. तिच्या दर्शनास रामदास गेले असता त्यांना जे जाणवले ते हे—

तेथें येतां रामदास । श्रीरामचरणीं दृढ विश्वास<br>
अंतरीं धरोनी आस । रामध्यान करितसे ॥<br>
रामरूपी देवी जाली । शिवशक्ति आकारली<br>
नामें अंतरीं निवाली । लक्ष पायीं ठेविला ॥

बुधवारी म्हणावयाच्या विठ्ठलविषयीच्या सवाईमध्ये ह्याचीच पुनरावृत्ती झालेली दिसते. चंद्रभागेच्या रम्य तीरावर उभा आहे पांडुरंगच, पण—

तेथें येतां रामदास। दृढ श्रीरामीं विश्वास
रूप पालटोनी त्यास। रामरूपी भेटला ।।

ह्या सर्व उद्गारांवरून असे दिसेल की, वारकरी पंथ आणि रामदासी बाणा यांत भिन्नता असली तरी त्या भिन्नतेच्या वैशिष्ट्याने विठ्ठल-मूर्तीचाच अधिक्षेप करणे, हा रामदासांचा हेतू नाही. खंडेराय, तुळजाभवानी या मूर्तींच्या ठायीही त्यांना रामस्वरूपाचाच साक्षात्कार झालेला आहे. जे ध्यानी–मनी ते स्वप्नी असे म्हणतात. रामभक्तीचा ज्यांनी ध्यास घेतला त्याना सर्वांठायी रामाचेच दर्शन घडले, अवघे रामरूप भासले, तर नवल नाही. पंढरिरावानेही आपणाला रामस्वरूपातच दर्शन दिले असे जे ते निःसंदिग्धपणे सांगतात ते "कोसळोन पडूं द्या आकाश। आणिकाची कास न धरूं" ह्या अनन्य भक्तिभावाच्या सामर्थ्यावरच. अन्य पंथांचा किंवा अन्य देवभक्तांचा उपहास करण्याची त्यांची बुद्धी नसावी. कारण ते पूर्णपणे जाणतातच की 'राम विठ्ठल एकरूप' आहे.

राम कृपाकर विठ्ठल साकार। दोघे निराकार एकरूप ।।
आमुचिये घरीं वस्ती निरंतर। हृदयीं एकाकार राहियेले ।।
रामदास म्हणे धरा भक्तिभाव। कृपाळू राघव पांडुरंग ।।

'आमच्या देव्हाऱ्यात रामाची मूर्ती आहे आणि विठ्ठलाचीही आहे. खरे पाहू जाता दोघेही निराकार आहेत आणि हृदयात एकरूप होऊन राहिले आहेत. "जो कृपाळु राघव तोच पांडुरंग" ही ज्यांची श्रद्धा आणि तत्त्वज्ञान त्यांनी विठ्ठलाला हिणवले असे मानून त्यांच्यावर वारकरी सांप्रदायिकांचा घुस्सा होण्याचे कारण नाही. 'भाव तैसा देव' ही जशी त्या संप्रदायातल्या भक्तांची भावना तशीच रामदासी संप्रदायाचीही भावना आहे. द्वैतभाव मनात आणणे म्हणजे अपरिपक्वपणाचे लक्षण होय.

भक्त दामाजीसाठी विठ्ठल विठू महारही झाला. देवाने महाराचे रूप घेतले असे म्हणण्यात त्याला उणेपणा कसला ? तोच देव रामभक्तासाठी "कोदंडधारी" का होणार नाही ?

भक्ताचा देव लोभाळू। भक्ताचे मनिचे करी
सांपडे भक्त जो जैसा। तैसा तो होतसे तया

रामदासांना हा प्रत्यय आलेला आहे.

एका प्रसंगी तर रामदासांनी फारच बहार केली आहे. ' जगीं पाहतां देव कोट्यानुकोटी '. तो निर्गुण निराकार अनेक रूपांनी आणि म्हणूनच अनेक नावांनी जगात बडिवार पावला आहे. तेव्हा, कोणत्या नावाने त्याला हाक मारावी, त्याचा धावा करावा ? ' अशा संभ्रमात रामदास म्हणतात--

तुकाई यमाई नमूं चंडाबाई । जाखाई जोखाई सटवाई ते ॥
सटवाई जगदंबा आदिशक्ति अंबा । तुम्ही त्या स्वयंभा दाखवावें ॥
दाखवावें तुम्ही सर्वपैलीकडे । देखतांचि घडे मोक्षपद ॥
मोक्षपद घडे मोक्षासि पाहता । तद्रूपचि होतां दास म्हणे ॥
नमूं नारायणा आदिनारायणा । तुम्ही त्या निर्गुणा दाखवावें ॥
दाखवावें निजस्वरूप आपलें । दिसेनासें जालें काय करूं ॥
काय करूं आतां देवा नरहरी । पुढारी माझारी पांडुरंगा ॥
पांडुरंगा देवा अगा महादेवा । तुम्ही मज द्यावा ठाव ब्रह्मीं ॥
ब्रह्मीं ब्रह्मरूप तें मज करावें । रामदास भावें प्रार्थितसे ॥
सूर्यनारायणा देवा नमस्कार । तुवां निराकार दाखवावें ॥
दाखवून द्यावें निज जीववावें । चंद्रा तुज भावें प्रार्थितसे ॥
प्रार्थितसे मही आणि अंतरिक्षा । आम्हां त्या अलक्षा लक्षवावें ॥
लक्षवावें मज आपोनारायणें । ब्रह्मप्राप्ती जेणें तें करावें ॥
करावें सनाथ आणि प्रभंजनें । नक्षत्रें वरूणे दास म्हणे ॥
तुम्ही सर्व देवीं मिळोनी पावावें । मज वेगीं न्यावें परब्रह्मीं ॥
निरंजन माझा मज भेटवावा । तेणें होय जीवा समाधान ॥

ह्या अभंगांवर भाष्य करण्याची जरूरी नाही; सर्व कांही स्पष्ट आहे. तुकाई, यमाई, पांडुरंगापासून पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश ही पंचमहाभूतेही देवाचीच रूपे आहेत. तेव्हा, ह्या अनेक नावांनी मंडित असलेल्या देवांना साकल्याने रामदास कळवळून विनवतात की, " हे सर्व देवांनो, तुम्ही सर्वांनी मिळून मला परब्रह्मप्रत पावते करा हो ! " सारांश, परमेशाची सगुण स्वरूपे भक्तांनी अनेक नावांनी रूढ केली असली तरी, [ ईश्वर एक आहे ह्याची जाणीव रामदासांना पुरेपूर आहे. ] " जनांकारणें देव लीलावतारी । बहूतांपरी आदरें वेषधारी " हें रामदासच सांगत आहेत.

जया मानला देव तो पूजिताहे
परी देव शोधूनि कोणी न पाहे......
अनेकीं सदा एक देवासि पाहे

सगुणीं भजे, लेश नाहीं भ्रमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा......

हे त्यांचे देवाविषयीचे विचार इतके स्पष्ट आहेत की, कुणाच्याही मनात त्याबद्दल भ्रमाचा लेशदेखील उरू नये.

तरी पण, सगुण परमेश्वराची आराधना पुरस्कारताना रामदासस्वामी रामाचीच कास का धरतात, या प्रश्नाचे उत्तरही आपणास त्यांच्या वाङ्मयात मिळते. महाराष्ट्रात त्या वेळी यवनी सत्तेचा पगडा होता. लोक स्वत्वाला पारखे झाले होते. अर्थातच, ह्या परिस्थितीची ज्यांना मनस्वी चीड होती अशा विचारवंतांची काया, वाचा आणि मनें स्वराज्यस्थापनेच्या उद्योगाकडे ओढ घेत होती. रामभक्तीत नेमके ह्या उद्योगाला पोषक असे चैतन्य रामदासांना आढळले.

छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायबाप ॥

असे उचंबळून म्हणण्यात

पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा स्वामी माझा ॥

ह्यावर त्यांचा विशेष कटाक्ष आहे.

सोडवि जो देव तोचि देवराव । येर सर्व नांव नाथिलेंचि ॥

असे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे. ज्याने सर्व देवांना बांदोडी घातले, त्या रावणाची रणांगणी मुरकुंडी वळली ती कोदंडधारी रामाच्या प्रतापाने. अर्थात तोच खरा देवाधिदेव. रामरायाची महती गाताना ह्या महापराक्रमी घटनेवर रामदासांनी वारंवार भर दिला आहे. तेव्हा अशा बलशाली देवश्रेष्ठाला शरण गेल्याने महाराष्ट्राचा उद्धार होणार ही निष्ठा रामदासांच्या अंतरी आहे. ह्या निष्ठेने व्याप्त झालेल्या, या भावनेने भारलेल्या दृष्टीपुढे पंढरीच्या विठोबाचे ' कर कटावरी ठेवूनिया उभे ' असलेले ध्यान येताच, ' येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघःश्यामा ॥ धनुष्यबाण काय केलें । कर कटावरि ठेविले ॥ काय केलें वानरदळ । येथें मिळविले गोपाळ ॥ ' अशा प्रश्नांचा भडिमार त्यांनी केला तर नवल नव्हे. नवल नव्हे इतकेच नाही, तर असे त्यांनी खडसावणे ( किंवा ते रूप पाहून गोंधळून जाऊन प्रश्न करणे ) हीच त्यांच्या एकमेवाद्वितीय ध्येयधारणेची परमावधी होय.

तुलसीदासासंबंधीही अशीच गोष्ट सांगतात. तुलसीदास मथुरावृंदावनास असताना एकदा श्रीनाथजीच्या मंदिरात दर्शनासाठी गेला. तिथे गोपींना मोहित करणाऱ्या त्या बन्सीधारी नंदलालास पाहून त्याचे पित्त खवळले आणि त्याने देवास बजावले की, " हे तुझे रूप मला मुळीच मान्य नाही. जोपर्यंत तू हातात धनुष्यबाण घेणार नाहीस तोपर्यंत हे मस्तक तुझ्या पायी झुकणार नाही. " भक्ताच्या ह्या दरडावणीस

मान देऊन श्रीनाथजीने हातातील मुरली फेकून दिली व धनुष्यबाण धारण करून तुलसीदासाला दर्शन दिले.

सारांश, भक्ताच्या अनन्यतेचा धाक देवालाही बाळगावा लागतो.

राम आकाशीं पाताळीं । राम नांदे भूमंडळीं ।
राम योगियांचे मेळीं । सर्व काळीं तिष्ठत ॥
राम नित्य निरंतरीं । राम सबाह्य अंतरीं ।
राम विवेकाचे घरीं । भक्तीवरी सांपडे ॥

अशी ज्यांची गाढ श्रद्धा त्या भक्तांच्या आग्रहाखातर, समजुतीखातर, साक्षात प्रभु-रामचंद्र भक्तांना आवडणाऱ्या स्वरूपात का ठाकणार नाही? "दयाघन भक्ती आकळिला–"

* * *

५.

# देहबुद्धी

रामदासांचा काव्यसंभार म्हणजे ‘ विवेक ’ सिंधूच म्हणायला हरकत नाही. विवेकाचा मंत्र जिथे जपला नाही, असे एक पान सापडणार नाही त्यांच्या ग्रंथात ! त्या विवेकसिंधूवर देहासंबंधीच्या विचारलहरी पुष्कळ उठलेल्या आढळतात. त्यांतच :––

आज्ञेप्रमाणें परमार्थ । केला जाण म्यां यथार्थ
आतां देहाचा कंटाळा । आला असे जी दयाळा

अशी एक विचारलहरी येऊन गेली आहे. ह्या उद्गाराचा सूर पाहता आयुष्याच्या अखेरी-अखेरीला रामदासांना ‘ पुरे आता जगणे ’ असे वाटू लागले असावे असे दिसते. मनुष्य जोवर धडधाकट असतो तोवर टक्केटोणपे खायची त्याची तयारी असते; आयुष्याच्या वाटचालीतले चढ-उतार निभावून नेण्याची धमक त्याच्या अंगात असते. नको आता जगणे, असे वाटू लागते ते एक वैतागाने किंवा असह्य विकलांग अवस्थेमुळे. वैतागाने जगणे नकोसे व्हायला रामदास काही सामान्य गृहस्थ नव्हते.- पावलोपावली निराशा, सगळीकडून मनोभंग, प्रत्येक उद्योगात ठोकर, निरंतर दैन्य, अशाप्रकारच्या प्रतिकूलतेशी मुकाबला करून रंजीस आलेल्या प्रापंचिकाला कुठेच आशेचा किरण दिसेनासा झाला की जीव नकोसा होतो. रामदास अशा सामान्यजनाप्रमाणे प्रपंचात लिडबिडलेले गृहस्थ नव्हते. ते मुळातच विरक्त होते. तेव्हा, ‘ आला देहाचा कंटाळा ’ ही तसल्या वैतागाची भाषा नव्हती. कर्मेंद्रिये जायबंदी झाली, दैनंदिन व्यवहारात पदोपदी परावलंबन आले म्हणजे एक मनुष्याला “ पुरे झाल्या जगण्याच्या यातना ” असे होते. ह्या अवस्थेचे चित्रणही रामदासांनी अत्यंत यथातथ्य केले आहे :––

डोळे चिरीव चांगले । वृद्धपणीं सरक्या झाले
ओले मातीचा भरंवसा । काय मानिसी माणसा
मुख रसाळ चांगलें । पुढें अवघें सुर्कुतलें
रम्य नासिका सरळें । सर्वकाळ पाणी गळें
कर्ण भूषणें सुंदर । पुढें जाहली बधिर
बरवी दंतांची पंगती । परि ते उन्मळोनि पडती
बरवे कर आणि चरण । परि ते झाले निष्कारण

अंगकांती होती बरी। झाली चिरगुटाचे परि
केश होताती पांढरे। लाळ गळता नाधरे

मनुष्य आपल्या शरीराचे कोडकौतुक करतो; नट्टापट्टा करून त्याला सजवतो. तो जातीचाच सुंदर असला तर तो आपल्या सौंदर्याचा केव्हढा गर्व वाहतो! पण वृद्धापकाळी देहाची अवस्था अशी पोतेऱ्याप्रमाणे होणार आहे ह्याची जाणीव ठेवून "तारुण्य आहे तोंपर्यंत करा काय ते अतां करा," हा विवेक ध्यानी आणीत नाही. ह्याची जाणीव करून देण्यासाठी रामदासांनी वार्धक्याचे हे चित्र रंगविले. आणखीही अशी शब्दचित्रे त्यांच्या वाङ्मयात आढळतात. "देह्याचा भर्वसा नाहीं" ह्या शब्दांनी आरंभ झालेले स्फुट प्रस्तुत संकलनांतच आढळेल. त्यांत 'रूप विद्रूप होतसे' हे तपशीलवार सांगत असताना वरच्या उद्‌गारांपेक्षाही आणखी काही विदारक रंगछटा भरल्या आहेत.

केस ते रेसीमाऐसें। पुढें बुर्कूल होतसे
हाताच्या जाहाल्या कांबी। कोथळू पंजरू दिसे
वांसाड निघाले मागें। सर्वांगीं मास सुकलें
काटके पोटऱ्या मांड्या। पायांची बेगडी वळे

पाठीचा कणा वाशासारखा निघणे, केस केवळ पांढरेच नव्हे तर बुरकुलासारखे (भरभरीत सुतासारखे, पिंजारलेले) होणे, हे वर्णन इथे अधिक आहे. आणखी एक विशेष ह्या वर्णनात पुढे आढळतो तो--

उदंड पाहिली पृथ्वी। उंबरा उंच जाहला.

एकेकाळी ज्याने पायी लांबलांबच्या मजला मारल्या, डोंगर-दऱ्याखोरी तुडविली, पृथ्वी पालथी घातली, त्याला वार्धक्यात घरातला उंबरासुद्धा उंच वाटू लागतो, अनुल्लंघ्य होतो. 'ऐसे हे दुख वृधापी' नशिबी आले की आयुष्याचे ओझे वाटू लागते. तशात ज्या मुलां-माणसांचा आपण प्रतिपाळ केला तीं—

सर्व येकीकडे जाती। हांसती खेळती सुखें
पाहाता न येती कोणी। आपल्याला कामाकडे

अशी परिस्थिती आली की--

आक्रंदे तो कण्हे कुंथे। आयुष्य न सरे कदा!।

"आता देहाचा कंटाळा आला" असा उद्‌गार रामदासांनी काढला. तो ते ह्या अवस्थेप्रत आले होते म्हणूनही वाटत नाही. कारण वयाच्या त्र्याहात्तराव्या—म्हणजे

अखेरच्या वर्षी–ते सज्जनगडाहून चाफळास रामनवमीच्या उत्सवाला जाऊन आले होते. त्यांनी तो सारा प्रवास पायीच केला असेल असे नाही. पूर्ववयातले सडेफटिंग गोसावी ते आता नव्हते. त्यांना घोड्यावरही बसता येत होते. पण तसा का होईना, प्रवास करण्याइतकी त्यांची प्रकृती धड असावी असे दिसते. तेव्हा, ‘ देहाचा कंटाळा आला ’ ह्या उद्गारात केवळ विकलतेचा सूर नसून निरिच्छपणाचा सूर दिसतो. छत्रपती शिवाजी महाराज कालवश झाले होते. त्यामुळे, एक महान घडामोडीचा तेजस्वी कालखंड पाहिलेल्या पुरुषाला, ‘ आता पुरे झालं जगणं ’ असे वयपरत्वे वाटणे अशक्य नाही. ह्या उद्गाराचा पूर्वार्धही ध्यानात ध्यायला पाहिजे. आज्ञे-प्रमाणे यथार्थ परमार्थ केला अशीही भावना त्यांची होती. पूर्व वयात साक्षात्कार झाला होता तेव्हा प्रभुरामचंद्रांनी परमार्थ वाढवावा अशा जी आज्ञा केली होती तिचे यथासांग परिपालन त्यांनी केले होते. हयातभर तो उद्योग केल्याने त्याचा शीण आल्यासारखे वाटणेही स्वाभाविक आहे. आणि वार्धक्याच्या विकलतेच्या ज्या यातना त्यांनी सांगितल्या आहेत त्या स्वतांच्याच देही अनुभवण्याची पाळी येण्या-पूर्वी इहलोकची यात्रा संपलेली बरी, असाही ह्या उद्गारांचा आशय असणे शक्य आहे.

देहाची नश्वरता ही सर्वच संतांनी ठळकपणे लोकांच्या नजरेस आणण्यासाठी वाणी शिणवली आहे. तद्वतच, ‘देह आहे जाईजणे, देहकृमींचे कोठार, देह अस्थि मांसाचा मोघळा, असे रामदास देखील ठायीठायी म्हणतात. तथापि, नालस्ती करायची तेव्हा करूनही, रामदास ह्या देहाची महती पण गायला विसरले नाहीत. दासबोधाचा पहिला दशक स्तवनाचा आहे. त्यात गणेश, शारदा, सद्‌गुरू, संत, श्रोते कवीश्वर इत्यादिकांच्या स्तवनाचे नऊ समास लिहून झाल्यावर, दहावा–म्हणजे एक स्वतंत्र–समास त्यांनी ह्या नरदेहाच्या स्तवनासाठी खर्चला आहे. त्या समासाची—

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीते

ही सुरुवातीची ओवी. हा उद्‌गार उत्कट आहे. पण ही उत्कटता, ही धन्यता, ही अपूर्वता कोणत्या अनुसंधानात आहे ? तर परमार्थाच्या ! एकाच ओवीत सार-सर्वस्व आहे नरदेहस्तवनाचे.

या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनाचेनि द्वारें
मुख्य सारासार–विचारें । बहुत सुटले

ही अठरावी ओवी. हिच्यावरून मध्यंतरींच्या ओव्यांत काय तपशील असेल तो अंदाजता येतो. रामदास म्हणतात :—

म्हणोनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहामध्यें वरिष्ठ
जयाचेनि चुके अरिष्ट । यमयातनेचें

जन्म-मरणाचे फेरे चुकवायचे असतील तर ते ह्याच जन्मातल्या उद्योगाने चुकवता येतील. पण जो कोणी हा विवेक न धरील त्याची दशा कशी होईल, तेही ह्याच ओवात सांगण्यात आले आहे. जसे माणसाने बांधलेले घर हे केवळ त्याचे एकट्याचे नसते. आप्तेष्ट–मित्रांबरोबर पाली, मुंगळे, उंदीर, ढेकूण, मांजरे, आळ्या इत्यादि जीवदेखील ते घर आपलेच मानून तिथे वसतीला येतात, इतकेच नव्हे तर ' तस्कर म्हणती आमुचें घर । राजकी म्हणती आमुचें घर । अग्नी म्हणे आमुचे घर । भस्म करू ! ' त्याप्रमाणे—

देह म्हणावे आपुले । तरी हे बहुतांकारणे निर्मिले
प्राणियांच्या माथां घर केलें । उवा मस्तकीं भक्षती

अशी सुरुवात करून, त्या घराप्रमाणेच देहाचीही कशी दुरवस्था होते तें रामदासांनी सांगितले आहे. ' धन्य धन्य हा नरदेहो ' हे खरे; पण केव्हा ? तर—

देह परमार्थीं लाविलें । तरीच याचे सार्थक जालें
नाहीं तरी हें वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्युपंथें

पहिल्या ओवीतील परमार्थ हा अखेरच्या ओवींतील परमार्थाशी आणून रामदासांनी असा चातुर्याने सांधला आहे —वर्तुळ पूर्ण केले आहे.

देहामुळे काय काय होते–जातें, काय काय करता येते, ह्याचा असाच पुन्हा एकदा विचार दासबोध दशक १८, समास ४ मध्ये आला आहे. लेखन, वाचन, अध्ययन, उपासना, तीर्थाटण, परोपकार, भोग, त्याग, इत्यादी भले–बुरे कर्माकर्म, मनुष्य करू शकतो ते देहामुळे. ( हे इथे नमूद करताना नुसती यादी दिल्यासारखी दिसली तरी, मुळात ह्या यादीतही रामदासांचा शब्दसृष्टीचा विलास दिसून येईल. )

देहाकरितां नाना कळा । देहाकरितां उणा आगळा
देहाकरितां जिव्हाळा । भक्तिमार्गाचा

हे सांगता सांगता, पहिल्या दशकापेक्षा इथे अधिक सांगितले आहे तें हे की–

आत्म्याकरितां देह जाला । देहाकरिता आत्मा तगला
उभययोग उदंड चालिला । कार्यभाग
देहामध्यें आत्मा असतो । देह पूजितां आत्मा तोषतो ।।
देह पीडिता आत्मा क्षोभतो । प्रत्यक्ष आतां ।।

देहावेगळी पूजा पावेना । देहाविण पूजा फावेना ।।
जनीं जनार्दन म्हणोनी जनां । संतुष्ट करावें ।।

हे विशेष लक्षात घेण्यासारखे आहे. 'समस्तांसि भांडेल तोचि करंटा ।' असे एक रामदासांचे वचन आहे. ह्याचे स्पष्टीकरणही कोठे कोठे आढळते. 'राखावी बहुतांची अंतरें । भाग्य येतें तदनंतरें,' हे त्यांचे व्यवहारज्ञानविषयक सुभाषित सर्वविश्रुतच आहे. "जो जो लोक दृष्टीस पडला । तो तो नष्ट ऐसा कळला । अवघेचि नष्ट, येकला भला । कशावरोनी ।।" असे त्यांनी आणखी एक ठिकाणी स्पष्टच विचारले आहे. ह्या त्यांच्या एकूण विचारसरणीचा पडसाद "जनीं जनार्दन म्हणोनी जनां । संतुष्ट करावे ।।" ह्या सांगीमधे समाविष्ट झाला आहे. पण ह्याच्याच पाठोपाठ आणखी विवेक विचार ते सांगतात.

सगट भजन करूं येतें । तरी मूर्खपण अंगीं लागतें ।
गाढवासी पूजितां कळतें । काय त्याला ।।
पूज्य पूजेसी अधिकार । उगेचि तोषवावे इतर ।
दुखवूं नये कोणाचे अंतर । म्हणिजे बरे ।।
सकळ जगदंतरीचा देव । क्षोभतां राहावया कोठें ठाव ?
जनावेगळा जनास उपाव । आणीक नाहीं.

विषयप्रतिपादनात पुन्हा तारतम्य सुटायचे नाही हा रामदासांचा चातुर्यविशेष. 'देह विटाळाचा गोळा' असे जरी त्यांनी दाखवून दिले असले तरी 'नरदेह मोठें घबाड,' 'शेरीरासारखें यंत्र । आणीक नाहीं' अशी प्रशंसाही ते करू जाणतात.

आणि मग, ह्या देह म्हणजे 'देवालय' असून ह्या देवालयातला देव शोधून पाहावा, हा विचार मांडतात. कविजन रूपाचे गोडवे गातात. पण 'कवीला शिकवी कोण । देवची वदतां बरे.' तेव्हा तो जो देव सगुण–स्वरूपाच्या पलीकडे, अनंत–कोटी देवाल्यात, तो जो एकच एक प्रभु नांदतो त्याला ओळखले पाहिजे.

देवाल्यें वर्णिती ज्ञाते । ते ज्ञाते नव्हती कदा
देव वर्णील तो ज्ञाता । ज्ञाने मोक्षचि पावतो
कोण कोणासि सांगावे । सर्वेही भ्रांत जाहले
भ्रांत देवालयासाठीं । देवची सांडती जनीं
शरीरमात्र देवाल्यें । जीर्ण सांडूनि जातसे
भांडती देवळासाठीं । देव चुकोनि राहिला

ही मूलगामी झळझळीत विचारधारा रामदासांनी फार मार्मिकपणाने साधकांसमोर सोडली आहे. शरीराचे कोडकौतुक करणारेच सारे· ' कितेक ते भले भले ' म्हणणारे ' तयामधेच गुंतले ' असे पाहून ते विचारतात–

शरीरवेष पालटे । परोपरीं नटे नटे
परंतु काय साधिले । अगम्य कोण शोधिलें ?

शरीराला परोपरींनी सजवून काय साधणार ? जो कोण ' अगम्य ' आहे त्याला शोधायला नको काय, असा त्यांचा सवाल आहे. शरीर म्हणजे घर ही कल्पना मांडून, ते स्पष्ट करतात की—

गृहेंचि पाहता परी । परंतु कोण अंतरीं ?
बहु गृहांतरीं गृहें । शरीर नाम निग्रहें
परंतु कोण निग्रही । उदंड मत्त आग्रही
तया प्रभूसि नेणता । उगेचि वेर्थ शीणता
शरीर मात्र तें भलें । तयांत कोण शोभले
न जाणता नव्हे भलें । सिणोन काय उगले
समस्त देहधारकु । समस्त सौख्यकारकु
बहु तनूत येकला । परोपरीं विभागला

जो हे विचार-सार जागवील तो आपला आपल्याला उगवील—आपला उद्धार करून घेईल. येथपर्यंत, देहासंबंधीचा विवेक रामदासांनी विशद केला आहे. कल्पना स्पष्ट आहे, दृष्टी व्यापक आहे, तशीच मूलगामी आहे.

इतके सांगून झाल्यावर, शेवटी [साधकाने देहबुद्धी सांडली पाहिजे ह्याकडे रामदास वळले आहेत.] देह हे साधन आहे. देहाचा लोभ धरून त्याचे चोज पुरवीत राहणे हे बाधक आहे. शूराने ज्याप्रमाणे देह हा जाणारच आहे, लढाई जिंकायची ह्या निर्धाराने संगरात उडी घ्यावी, ' हतो वा प्राप्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्षसे महीम् ' हा बाणा बाळगावा, त्याचप्रमाणे साधकाने देह आहे जाईजणे, हे धरूनच, परमार्थ साधायचा कसा ह्याचाच विचार करायचा व त्याकरिता देह कारणी लावायचा, हा पाठ रामदास देतात.

हित आहे देहातीत । म्हणोनि निरोपित संत ।
देहबुद्धीनें अनहित । होंचि लागे ॥
म्हणोनि देहबुद्धि हे झडे । तरीच परमार्थ घडे ।
देह बुद्धीनें विघडे । ऐक्यता ब्रह्मींची ॥

विचक्षणें या कारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें ।
सत्य ब्रह्मीं साचारपणें । मिळोनि जावे ॥

ह्या देहबुद्धीची आणखी फोडही त्यांनी कुठे कुठे केली आहे. देहबुद्धीचा त्याग करण्यामध्ये स्तुति-निंदेचा समावेश त्यांनी केला असून, स्तुतीला भाळणारा आणि निंदेला चरफडणारा, त्याला ते विचारतात की ' कासया सांगता परमार्थ गोष्टी । व्यर्थ करतां कपाळकुटी ? ' क्रोधाच्या आवेगात जो सापडत नाही त्याने देहबुद्धी सोडली असे म्हणता येईल. अशा प्रकारे देहबुद्धीसंबंधीचे प्रवचन कितीक ठिकाणी आढळते :—

(१) बुडविले देहातीत समाधान ।
देह-अभिमान वाढविला ॥
(२) जंव आहे तुज हा देह-संबंधु ।
तंव नव्हे बोधु राघवाचा ॥
राघवाचा बोध ह्या देहावेगळा ।
देह कळवळा तेथें नाहीं ॥
(३) दुःखराशी जाल्या देहाचे संबंधें ।
सर्व ज्ञानबोधें तुटतील ॥
(४) स्वरूप सांडूनी देह मीच भावी ।
तो जीव रौरवीं बुडवीला ॥

इत्यादी वचनांवरून रामदासांना ' देहबुद्धि ' ह्या अभिधेत काय काय अभिप्रेत आहे त्याची कल्पना येईल आणि देहबुद्धीचा त्याग करायचा म्हणजे काय करायचे तेही कळून येईल.

सारांश, नरदेहाची महती व नालस्ती ह्यांचा साकल्याने त्यांनी विचार केला आहे. आणि नाही भरंवसा देहाचा, अकस्मात जावे लागे, वार्धक्यात काही नीट घडणार नाही, इतकेच नव्हे तर त्या वेळी देहाचाच मुळी कंटाळा येतो, ह्याची जाणीव ठेवून शरीर घडधाकट आहे तोपर्यंत परमार्थसाधना करावी असा हितबोध सांगितला आहे.

देहे आरोग्य चालते । भाग्य नाहीं यापरते ॥

हेही ठसठशीतपणे त्यांनी नमूद केले आहे. तेव्हा देहबुद्धी सोडायची म्हणजे देहाचे कोडकौतुक करायचे नाही, लाड करायचे नाहीत, असे त्यांनी म्हटले असले तरी आरोग्य सांभाळलेच पाहिजे हे स्पष्टच होय. अनेक आपत्तीच्या दिव्यातून पार पडायला, दगड-धोंडे पचवायला, विषाचे घुटके घ्यायला, उदंड सायास करायला,

आणि माथ्यावरच्या मोळ्या वाहून नेऊन इष्ट स्थळी पोचत्या करायला, आपल्याजवळ दुसऱ्याला देण्यासारखे जे जे कांहीं असेल ते मुक्त हस्ते देता यावे यासाठी आरोग्याची आवश्यकता आहे. अशक्ताच्या हातून काय होणार ? अशक्ताला कोण पुसतो ? म्हणून देहाच्या नश्वरतेबरोबरच रामदास आवर्जून सांगतात की—

देह आरोग्य चालते । भाग्य नाहीं यापरते

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों. दि. ....................

# सुखालागिं आरण्य सेवीत जावे

सर्व मनुष्यांची धडपड सुखासाठी चाललेली आहे. ती पाहून रामदासांनी सुखाची वाट दाखविली–पत्ता सांगितला आहे. ते म्हणतात, ' सुख हवं ना ? अरण्यात जा. '

रामदासांच्या काळी शासकी दृष्ट्या अरण्याची काय व्यवस्था होती, याची नीट कल्पना नाही. तथापि त्या काळी अरण्ये दाट होती आणि मनात आले तर त्याची वाट धरता येत असावी असे दिसते. रामदासांनी सुचविल्याप्रमाणे आज जर अरण्याची वाट धरली तर, मला वाटते, रखवालदार हद्दीवरूनच माघारी पिटाळून लावतील. आणि त्यांची नजर चुकवून जरी प्रवेश करून घेता आला तरी तिथे किती काळ मुक्काम ठोकता येईल कुणास ठाऊक! कधी ना कधी रखवालदारांशी ( रेंजर, कॉंझर्व्हेटर, यांच्याशी ) गाठ पडणारच ! तशी गाठ पडल्यावर, हा कोणी चोर किंवा भूमिगत असावा अशी आपल्याबद्दल बळकट शंका घेऊन, ते आपली गठडी वळवून, पोलिस–कोठडी दाखविल्याशिवाय राहाणार नाहीत. वनवासी मुमुक्षूची नेमकी निशाणी काय पटवायची ? दाढी वाढली तरी ती साधुत्वाची ग्वाही देईल असे नाही. आपली ओळख सहज पटू नये म्हणून बिलंदर भामटे वेषान्तर करतातच ! वाढलेल्या दाढीबद्दल असाच तर्क करायला राखणदार चुकणार नाहीत.

तथापि रामदासांनी वाट दाखविली ती त्यांच्या दृष्टीने योग्यच होती; पूर्वपरंपरेला धरून होती. पुरातन काळापासून योगी–ऋषि–मुनी रानीवनी राहून साधना करीत आले होते.

रामदासांनी हा मार्ग का सांगितला ह्याचा साकल्याने विचार केला पाहिजे. " सुखालागिं आरण्य सेवीत जावें " हा मनोबोधाच्या श्लोकातला एक चरण आहे. असल्या चरणांचा आगल्या–मागल्या चरणांशी अतुट संबंध असतोच असे नाही. सुट्या चरणात पृथक् हितबोध सामावू शकतो. तथापि, सबंध श्लोक असा :—

मना रे जनीं मौन्य मुद्रा धरावी
कथा आदरें राघवाची करावी
नसे राम तें धाम सोडून द्यावें
सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥

उगाच वायफळ बोलू नये; बोलायचे तर रामकथाकीर्तन करावे. ज्या घरात रामाची उपासना नाही ते घरही त्याज्य मानावे. आणि खरे म्हणजे, अरण्यवासासारखे

सुख नाही; तेव्हा सुखप्राप्तीसाठी अरण्याची वाट धरावी, असा सरळ उपदेश रामदासांनी केला आहे. पण याची अर्थगर्भता नीट ध्यानी येण्यासाठी त्यांच्या वाङ्मयसंभारात आणखी कुठे वनवासप्रशस्ती आढळते का, हे पाहणेही उद्बोधक ठरेल.

जगात वागताना कटकटी उद्भवण्याची शक्यता असते. पाठीमागे उपाधी लागतात. अवतीभवतीचे सारेच लोक काही आपल्या मनासारखे वागतील असे नाही. नको ते करावे, अप्रिय सोसावे लागते,

न जावेंचि तेथेंचि लागेल जावें
न खावेंचि जें तेंचि लागेल खावें
वदावेंचि ना तेंचि लागे वदावें

अशा कितीक बोखट्या गोष्टी घडत असतात की त्यांच्यामुळे उद्वेग वाटतो, वैताग येतो, तेव्हा, ह्या सर्व जंजाळातून सुटका करून घ्यायची असेल तर—

"मना चाल उठीं वना दुर्गमातें" उठावे आणि वनाची वाट धरावी असा रामदासांचा सल्ला आहे. हे सांगणे अर्थातच मुमुक्षूसाठी आहे. संसारात गुंतून पडण्याने जीविताचे सार्थक होत नाही, पारलौकिक सद्गतीची शक्यता नाही. हे सांसारिकांच्या चित्तावर त्यांना ठसवायचे आहे. ते सांगतात

बहू वीट आला भवाचा न सावें
अटव्यांत, देऊनिया हांक, जावें
मनातें दमावें श्रीरामीं रमावें
दिगंतीं फिरावें जनां न स्मरावें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १३५६८
शेख शाखा

(अटवी : अरण्य) संसाराचा त्याग करून अरण्याचा मार्ग स्वीकारावा, असा हा उपदेश आहे. मनाचे दमन करावे आणि इष्ट–मित्र–आप्त–स्वकीय यांची आठवणही काढू नये. (त्या आठवणीवर उपाय हाच की) उदार आणि उदासीन (म्हणजे निर्लेप, अनासक्त) असे थोर थोर तपस्वी असतील त्यांच्या संगतीत काळ कंठावा. "तरी वृक्षपक्षादिकीं* सौख्य केलें." अहो विजनवासात (वृक्षपक्षी यांशीं सख्य करावें किंवा) वृक्षपक्षी यांच्याकडूनही सौख्य लाभेल.

सुषुप्ती अवस्थेसि भूमीं निजावें
उसें रामपाद स्मरोनी धरावें

---

* सौख्य का सख्य, असा प्रश्न पडतो. पण कोणताही पाठ स्वीकारला तरी अर्थ जुळवून घेता येतो.

दिशांचा माहां पाट तो पांघरावा
सिताकारणें साह्य वन्ही करावा

" शय्या भूमितलं दिशोऽपि वसनम् " ह्याचा निनादच रामदासांच्या ह्या शब्दांत आहे. आणि संस्कृत सुभाषितात न सांगितलेले उसेही इथे सांगून टाकले आहे. रामचरणांचे स्मरण हे उसे. थंडीच्या निवारणाला धुमी सुचविली आहे.

'सुखालागिं आरण्य सेवीत जावें', हा मनोबोधात सांगितलेला उपाय उपरोक्त उपदेशाच्या अनुसंधानात घेतला म्हणजे अर्थ स्पष्ट होतो.

रामदास प्रत्ययावाचून बोलत नाहीत. आधी केले मग सांगितले, असे त्यांच्या शिकवणीचे अंतःसूत्र आहे. विजनवासावर त्यांचा भर होता. त्यांनी जनतेच्या उद्धारासाठी ठाण मांडले, शेकडो मठ स्थापून संघटना केली, 'महंतें महंत करावे' ह्या आपल्या उद्दिष्टानुरूप शिष्यसंप्रदाय निर्माण केला. तरी पण, ह्या सर्व व्यापतापात असूनही ते नसल्यागत होते, अलिप्त होते, असे दिसते.

दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो ।
देव भक्तासवें जातो । ध्यानरूपें ॥

हा त्यांचा आत्मवृत्तपर उद्‌गार फार महत्त्वाचा आहे. त्यांनी चाफळ निवडले तेच मुळी वर्दळीपासून दूर, डोंगराच्या पायथ्याशी, नदीतीरी वसलेले एक निवांत खेडे म्हणून निवडले असावे. आणि, त्यांतही उत्सवादि नित्य-नैमित्तिकाची तिथली व्यवस्था लावून देऊन ते मात्र त्याहिपेक्षा आणखी दूर, एकान्तात, गिरी-कपारीला राहून, लांबूनच यात्रा पाहात राहिले. दीक्षा देतानाहि त्यांचे सांगणे ह्याच धोरणाला धरून आहे. ते असे की —

पर्वतीं उदकापासी । सन्निधचि येकीकडे
फार येकांत सेवावा । अभ्यास नित्य-नूतनू

साधकाने ( नित्य नवा ) अधिकाधिक अभ्यास करत राहावे आणि त्यासाठी फार एकान्त हवा म्हणून, दूर, डोंगरकपारीला, जवळच निर्मळ पाणी सतत मिळेल अशा ठिकाणी जाऊन राहावे. ह्यासारखाच दुसऱ्याही एका ठिकाणी आदेश आढळतो—

येकांत गुव्हा निर्वात जेथे
चर्चा करावी अद्वैत तेथें
संसर्ग खोटा इतरां जनांचा......

फाल्तू लोकांचा संसर्ग खोटा, अपायकारक ! तो टाळावा. त्यासाठी, जिथे संपूर्ण

एकान्त आहे, भणभणाऱ्या वाऱ्याचासुद्धा जिथे त्रास नाही अशा गुहेत जाऊन निवांतपणाने अद्वैताची चर्चा करावी, असे ते सांगतात.

त्यांची प्रकृतीच मुळी सृष्टिप्रेमी दिसते. डोंगरी राहणाऱ्या ह्या दासाला सृष्टिसौंदर्याची भुरळ पडते आणि त्याची मती प्रस्फुरित होते, हे ध्यानी घेण्यासारखे आहे. वर्षाकालीन वनश्रीचे त्यानी वर्णन केले आहे --

झिरपती झरती झरती झरे
न धरितां धरितां निर वावरे
बहुत पाभळ वोघ महीतळीं
नभकटे धुकटें कटपाभळी
सरस रम्य रसाळ वनांतरा
हरित रंग सुरंग दिसे बरा
दिसतसे रमणीय वसुंधरा
नुतन पल्लव हा तरु साजिरा
द्रुम लता समता त्रुण मातलें
सुख मनीं सुमनीं मन रातलें
परम सुन्दर ते खग बोलती
गमतसे वसती कमळापती

ही रसना रामदासांची आहे असे सांगितले नाही तर, रघुनाथ पंडिताच्या काव्य-संपदेतील हे मौक्तिक-सर नसतील ना, असा भास झाल्यावाचून राहणार नाही. 'पर्वतीं उदकापाशीं सन्निधचि एकीकडे' राहणाऱ्याची मती गिरिगव्हरातून खळाळणाऱ्या झऱ्यांना पाहून कशी प्रफुल्लित आणि मुखरित झाली आहे पाहा :—

गिरीचे मस्तकी गंगा । तेथुनी चालली बळें
धबाबा लोटल्या धारा । धबाबा तोय आदळे
गर्जतो मेघ तो सिंधु । ध्वनी कल्लोळ उठीला
कड्यासी आदळे धारा । वात-आवर्त होतसे
तुशार उठती रेणु । सीतमिश्रित धुकटे
दराच तुटला मोठा । झाडखंडें परोपरीं

उसळलेल्या जलसीकरांनी वातावरण धुकट होते हे अचूक टिपून घेण्याइतकी त्यांची मती कवीसारखी सूक्ष्म आहे. सारांश, वनवासाची शिफारस रामदास करतात ती केवळ डोळे मिटून ध्यानधारणेत रमावे एव्हढ्याच हेतूने नाही. विजनवासातही

निरामय सौंदर्य कसे आहे ते त्यांनी अनुभविले आहे. त्यांना निसर्गसौंदर्याची ओढ आहे.

दरे दुर्कुटें झाडखंडें अनेकीं
कपाटे कडे वीवरें आणि टांकीं
वनीं पावनीं पांडवीं वास केला
गिरी देखिला दास संतुष्ट जाला

वनवासांत असताना पांडव जेथे राहिले होते अशा कोणत्या तरी विशिष्ट पर्वताच्या दर्शनाने रामदासांनी हे संतोषाचे उद्‌गार-काढले असावेत, असे वाटत नाही. असा काय एखादाच डोंगर पांडवांनी निवडला होता ? ठायी ठायी त्यांनी वसती केली असावी. म्हणजे, आसमंतातल्या अनेक गिरिदऱ्यांतून त्यांचा संचार झाला असावा. त्यांच्या वास्तव्याने अनेक ठिकाणी लेणी, गुहा, गुंफा, टाकी पावन झाली असतील. अशी ही सारीच पावन वनस्थली पाहून रामदास संतुष्ट झाले आहेत. त्यांना विजनवास प्रिय वाटतो, त्याच्या मुळाशी हा उदात्त संतोष आहे, असे म्हणणे अप्रस्तुत होणार नाही.

सारांश, ' सुखालागिं आरण्य सेवीत जावें, ' असे जे मनोबोधात सूत्रस्वरूपी वाणीने सांगितले आहे त्याची उकल ह्या रीतीने करून घ्यावी लागेल...

• •

लोलक एक असला तरी त्याला पैलू अनेक असतात. आणि पैलूतून पाहू जाता रंगछटांची रम्य आरास दिसून येते. रामदासांच्या उपरोक्त सांगीचा आणखी विचार करू जाता, अरण्याचा मार्ग केवळ साधुसंतांच्या दृष्टीनेच विहित आहे असे नाही, हेही दिसून येईल.

O solitude, where are thy charms
That sages have seen in thy face ?

असा विलाप कौपरच्या कवितेतल्या अलेक्झांडर सेल्कर्कने केला असल्याचे मी विद्यार्थिदशेत वाचलेले आठवते. मानवी परिवार, स्नेह, प्रीती, ही थोर ईश्वरी वरदाने असून, त्यांना कायमचा आंचवलेला तो हतभागी जीव हळहळतो की " हाय रे दैवा, मला जर कबुतरासारखे पंख असते तर भराऱ्या घेत घेत मी केव्हाच आप्तस्वकीयांत जाऊन त्या ईश्वरी वरदानांचा उपभोग घेऊ लागलो असतो.

ह्या विलापातील Sages हा शब्द महत्त्वाचा आहे. ज्याच्या नशिबी तो विजनवास आला होता त्यालाही ठाऊक होते की, ऋषिमुनींनी विजनवासाची प्रतिष्ठा गायिली आहे. पण त्याला तिचा कुठे थांगपत्ता लागला नव्हता म्हणून तो त्या एकान्तवासाला विटून आक्रोश करतो आहे. विजनवासाचे सौंदर्य त्याला उमगत

नाही. पण सौंदर्य काय दुसऱ्यांनी दाखवून दिले म्हणजे उपभोगण्याची वस्तू आहे ? नेणत्या अर्भकाला ज्याप्रमाणे बोंडल्याने दूध घालावे लागते त्याप्रमाणे माणसाला सौंदर्याचे घुटके का पाजायचे असतात ? सौंदर्याचा शोध घेण्याची, सौंदर्य हेरण्याची शक्ती ज्याच्या त्याच्या दृष्टीतच असावी लागते. कळ्या–फुलांनी मन प्रफुल्लित होणे आणि निर्झराच्या खळखळण्याने मन नाचू लागणे, ह्याचे पाठ थोडेच घ्यायचे असतात ? तसे 'स्वभावेंचि' घडावे लागते. एकान्तवास कोणाला अप्रिय होतो ? का होतो ? ठराविक धोपटमार्गी प्रकृतिधर्माला एकान्तवासाची काय रुची कळणार ? उलट मती जर नवनवोन्मेषशालिनी असेल तर तिला विजनवास, गहन काननही, आवडायला हरकत नाही. रानीवनीही त्याच्या मतीला गती मिळेल, नवीन स्फुरणे होतील. अशी स्फुरणशीलता हा ज्याच्या प्रकृतीचा धर्म आहे त्याला एकान्तवासही स्वागतार्ह होईल; नव्हे, एकान्तवासासाठी तो आसुसलेला असेल. ज्याला आभाळाकडे पाहून अनंताचा वेध लागत नाही, सुरम्य अस्तोदयाच्या रंगछटांनी मोहरलेल्या क्षितिजाकडे पाहून ज्याच्या वृत्ती मोरासारख्या नाचू लागत नाहीत, एकान्तात मतीला नव्या नव्या विचारांचे कोंभ फुटत नाहीत त्याच्यासाठी वनाचा मार्ग कोण सांगील ? सुखासाठी अरण्य सेवायचे खरे; पण सुख कोणचे ? अद्वैत–चर्चेचे सुख ! साधुसंतांच्या उद्दिष्टात अद्वैताची चर्चा बसते. पण हाच एक अर्थ न घेता, गहन विषयाचा अभ्यास (अभ्यास नित्य नूतनू) हा दुसराही अर्थ घेतला म्हणजे अरण्याची वाट का धरावी ह्यातले मर्म आणखीनच गवसते. केवळ विरक्तांनीच वनवास पतकरायचा असे नाही. हातून दिव्य–भव्य–उत्कट घडावे असा ज्याला ध्यास असेल त्या सर्जनशील बुद्धिवंताला आणि क्रियावंताला एकान्ताची अत्यंत आवश्यकता नाही का ?

एकान्तवास (एकाकीपणा) कोणाला खायला उठतो ? ज्याच्या मनाला चाकोरीबाहेरच्या जीविताची, प्रभावी कर्तृत्वाची ओढ नसेल त्याला. Solitude म्हणजे एकटेपणा, निर्जन वनातले वास्तव्य. तेथे सोबत काय ती आपली आपणाला ! स्वतःचीच सोबत स्वतःला नकोशी वाटावी ? हो, नकोशी वाटते ! का ? कारण, स्वतःचे रंजन, उद्‌बोधन, उन्नयन करायला स्वतःजवळ काही नसते म्हणून ! जेव्हा परावलंबित्व असते तेव्हा एकलेपणा असह्य होतो. जो 'स्वाधीन' आहे त्याला एकलेपणाचा बाऊ वाटणार नाही.

अगदी खोलात शिरून पाहू जाता, एकान्त रानावनातच गवसतो आणि वर्दळीत वा बाजारात गवसत नाही, असे नाही. जर आपल्या वृत्ती आपण अंतर्मुख करून घेऊ शकलो तर एकान्त चव्हाट्यातही अप्राप्य नाही. एकान्त स्वान्त आहे. आपणातच आहे. मन एकाग्र होणे ही मनाचीच शक्ती आहे. मनच जर 'हलके फूल' असेल, एव्हढ्यातेवढ्यानेही त्याची चलबिचल होत असेल तर प्रश्नच नाही. पण कशाचाही परिणाम होणार नाही अशी आत्मिक सामर्थ्याची तटबंदी मनाभोवती ज्याला उभारता येईल त्याला रणधुमाळीतही एकान्त मिळेल, तो कुठेही एकाग्र होऊ

शकेल. आपले हात, पाय, तोंड, मान आखडून घेऊन आपल्या टणक कवचाच्या आडोशाला राहणाऱ्या कासवासारखे मन असावे.

पण, ही अपवादात्मक किंवा पराकोटीतली अवस्था झाली. सर्वसाधारण पातळीवरून बोलायचे तर, गजबजाटाचा उपद्रव होतो आणि संकल्पित वा अंगीकृत कार्यात रममाण होताना त्यांचा व्यत्यय होतो. शिजत लावलेल्या डाळ-तांदळाच्या हंडीचे झाकण वरचेवर उचलल्याने वाफ जाते. कामात व्यत्यय येत गेल्याने तसाच अपाय होतो. व्यत्यय टाळण्यासाठी, कार्यमग्नतेचा अविच्छिन्न आनंद साधण्यासाठी, संकल्पपूर्तीचे सुख मिळविण्यासाठी विजनवास सेवावा, ही तोड रामदासांनी सुचविली आहे. थोर थोर विचारवंतांनी हेच मान्य केले आहे.

1. A creation of importance can be produced only when its author isolates himself; it is ever a child of solitude.

— *Goethe*.

2. Weighty things are done in solitude, that is, without society. The means of improvement consist not in projects, nor in any violent designs, for these cool, and cool very soon; but in patient practising for whole long days, by which I make the thing clear to my highest reason.

— *Jean Paul*

धुमधडाका उडवून देण्याने भरीव कार्ये होत नसतात. शांत चित्ताने, एकान्तात, दीर्घ काळ, दिवसच्या दिवस, अविश्रांत मनन-चिंतन करीत राहिल्यानेच संकल्पाचे स्वरूप सुस्पष्ट होत जाते, अत्युच्च धारणाशक्तीला त्याचे सर्वांगीण आकलन होते. लोकाग्रणींच्या नशिबी दीर्घ बंदिवास आला असता तोच कसा उपकारक ठरला हे लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आदि पुरुषश्रेष्ठांच्या चरित्रांवरून दिसून येते.

ऋषी-मुनींनाच एकान्तवासाचा मोह पडतो असे नाही. ज्याला दिव्य-भव्य-उत्कट निर्मितीचा वेध लागलेला असतो त्यालाही एकान्तवासाची भूक असते. सिंक्लेअर लुई या विख्यात अमेरिकन कादंबरीकाराच्या चरित्रात असे वाचायला मिळाले आहे की, तो वर्षातून पाच-सात महिने शहरात राहतो. जनसंमर्दात नांदण्याने त्याला नवे नवे अनुभव येतात, समस्या दिसतात, पुष्कळ टिपून घेता येते. असा संचय होता होता चित्तात काही घोळू लागते. मनोभूमीत बीजधारणा होते. मग तो आपल्या विस्तीर्ण आणि निवांत शेतवाडीवर राहायला जातो; आणि तेथे महिनानु महिने नवीन कलाकृतीच्या लेखनात गढून जातो. तेथे त्याची समाधी भंग पावण्यासारखी वर्दळ, गोंगाट, व्याप-ताप, काही नसते. ज्याने व्यग्रता येईल असे काहीही तेथपर्यंत पोहोचू नये अशी तजवीज करण्यात आलेली असते. तो तशी दक्षता घेऊ शकतो.

महत्त्वाचे लेखन हे एकान्ताचे अपत्य होय, असे जे गटे म्हणतो त्याचेच हे उदाहरण नव्हे का ?

ह्या दृष्टीने 'अरण्य' म्हणजे 'जनसंमर्दापासून दूर जाण्याने मिळणारा एकान्तवास' ( आणि तोही प्रासंगिक एकान्तवास ) असा अर्थ घ्यावा लागेल. कारण, कायमचा वनवास पत्करून कलावंताचे निभणार नाही. अभ्यास करायला अभ्यासाचे साहित्य आणि संदर्भग्रंथादि साधने जरुरीनुसार मिळायला पाहिजेत. ती गरज भागवायला त्याला लोकवस्तीत यायला पाहिजे. पण प्रतिभा प्रस्फुरित झाली म्हणजे तिची एकतानता भंग न पावेल असे जे वातावरण त्याला लागते ते जिथे असेल तेथे त्याला निर्वेधपणे धाव घेता आली पाहिजे.

आजच्या नागरी जीवनात ती प्रसन्नता, ती शांतता अप्राप्य झाली आहे. पाचपन्नास एकरांची निवांत शेतवाडी असलेले सिंक्लेअर लुईसारखे किंवा रवींद्रनाथ टागोरांसारखे साहित्यिक कलावंत किती असणार ? जगद्विख्यात शस्त्रक्रियाकुशल धन्वन्तरी मेयो बंधू यांच्या रुग्णालयाच्या परिसराच्या जवळपास ट्रामगाड्यांच्या वाहतुकीला मज्जाव आहे, बसगाड्यादेखील आवाज न करता चालविल्या जातात. आणि रस्त्याने येणारे–जाणारे देखील आपापसात मुळीच मोठ्याने बोलत नाहीत. ( No trams are allowed. The buses run silently and even the conversation in the streets is hushed. ) आपल्याकडेही No noise please-Silence Zone अशा पाट्या लावलेल्या आढळतात. ( त्याचे पालन कसोशीने होत नाही आणि कलकलाट करीत रस्त्याने जाणे हा तर नागरिक आपला अनियंत्रित हक्क मानतात, ही गोष्ट निराळी ! ) तथापि, रुग्णालयाबाबत दाखविण्यात येणारी ही जाणीव, ही खबरदारी कलावंतांबाबतही दाखविली जाईल काय ? ते शक्य नाही; त्यांनी अरण्याची वाट धरावी ! ऋषिमुनी अरण्यात आश्रम बांधून आपली योगसाधना व यज्ञयाग करीत होते. त्यांत विघ्ने येऊ लागली तर शास्त्याकडे दाद मागत असत आणि शास्तेही त्या यज्ञयागांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य समजत. राजा दशरथाने आपले पुत्र राम–लक्ष्मण यांची मखरक्षणार्थ योजना केली होती. असे आणखीही दाखले पुराणात सापडतील.

आज, गिरिपठारावरील निसर्गरम्य एकान्तस्थळे वांझोटे विलास करणाऱ्या खुशालचेंडूंनी व्यापून टाकलेली आढळतात. किंचाळणारे फोनो आणि घोंगावणारे रेडिओ यांनी सगळ्या पेठेच्या कानठळ्या बसल्या तरी किंचितही पर्वा न करणारे नागरिक थोडे का आहेत ? आणि शास्तेही त्यांना आवर घालण्याऐवजी सवलतीने वेळा वाढवून देऊन वेळप्रसंगी गोंगाटाचे भरण-पोषणच करतात ! समाधी लावून बसावे आणि ती भंग पावू नये, अशी तळमळ काय केवळ योगीजनांनाच असते ? अभ्यासकांना, कलावंतांना, तत्त्वचिंतकांना, महाकवींना देखील एकान्तवासाची भूक

आहे. पण भुकेलेल्यांना अन्न मिळू नये हा विद्यमान युगाचा धर्म आहे, ही शोकान्तिका आहे.

म्हणून, रामदासांनी सांगितलेला आणि गटे, ड्रायडन, जीन पॉल इत्यादी थोर विचारवंतांनाही पटलेला मार्ग चुकीचा थोडाच ठरतो ?

* * *

७.

# मत, मतान्तर ?

## प्रपंच

'देह हे असार। कृमींचे कोठार' हा एक उद्गार; तर 'धन्य धन्य हा नरदेहो' हा दुसरा उद्गार, अभिप्रायाच्या ह्या दोन टोकांत दोन ध्रुवांइतके अंतर आहे. ह्यावरून रामदासांचे एकदा एक मत होते, पण नंतर कधी तरी त्याने तोंड वळवून लंबकाप्रमाणे दुसरे टोक गाठले, असे समजावयाचे की काय? पण तसे नाही. मताचा आविष्कार विशिष्ट अनुसंधानात झालेला असतो. श्रोते कोण, प्रसंग कोणता आणि प्रतिपादनाचा रोख काय, यांकडे अवधान देऊन विवेचन होत असते. ह्या गोष्टी लक्षात घेऊन मतांची जुळणी करता येते आणि मध्यन्तरीच्या खाडीवर पूल बांधता येऊन दोनीही तीर सांधता येतात. 'देहबुद्धी' या प्रकरणात तसा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रपंचाविषयी समर्थांचे भिन्न भिन्न अभिप्राय आढळतात. उलट-सुलट वर्णनांनी त्याच्या दोनीही बाजू त्यांनी रंगविल्या आहेत. 'रडका संसार' कसा असतो? —

नसे आंथराया नसे पांघराया
नसे धाम ना दृढ छयाया निजाया
नसे अन्न खाया नसे रम्य जाया
वृथा सीण संसार कर्ती रडाया

नसे द्रव्य कांहीं घरीं धान्य नाहीं
बहू वेष्टिला कामक्रोधादि देहीं
पराधेनता वेळ नाहीं मराया
वृथा सीण संसार कर्ती रडाया

मनासारिखा मित्र तोही मिळेना
परत्रीक तें ज्ञान पोटीं वसेना
सदा कोप आरोप संतप्त काया
वृथा सीण संसार कर्ती रडाया

मनासारिखा सोइरा ही मिळेना
मनीं पाहतां चित्तशुद्धी असेना

उणें बोलती सर्व कांहीं छळाया
वृथा सीण संसार कर्ता रडाया

म्हणे दास हे आस कैसी पहा हो
सुखाची बहू होतसे श्लाघ्यता हो
पुढें जाहली सर्व काया पडाया
वृथा सीण संसार कर्ता रडाया

सर्व प्रकारच्या उणीवांनी गांजलेला, त्यांमुळेच चिडचिडलेला, सदा कामधंद्याखाली गाढलेला, जिवा-भावाच्या गोष्टी बोलून मनाला काही विरंगुळा मिळेल म्हटले तर कोणी जिवलग आतेष्ट नसलेला, अशा गृहस्थाचा संसार म्हणजे रडका संसार, केवळ शीण! हे एक चित्र त्यांनी दाखविले आहे. तसेच दुसरे चित्रही त्यांनी दाखविले आहे. त्यात परोपरीच्या अनुकूलतेमुळे संसाराला कसे भरवोस साजिरेपण येते ते दिसते. त्या आदर्श संसारात आई, बाप, भावंडे, लेकी, सुना, सगे–सोयरे यांचाच केवळ समावेश नसून " गुरें, वासरें, शिंगुरें, दासदासी। गुराखी, सुणीं, मर्जेरें, गुणरासी " यांचाही अंतर्भाव केला आहे, आरोग्य नसेल तर सर्व प्रकारचे उपभोग असून नसल्यागत होतात, 'देहे आरोग्य चालते! भाग्य नाहीं यापरतें' हे रामदास जाणून असल्यामुळे सर्व सुखसमृद्ध संसारात आरोग्याची गणना करायलाच हवी. म्हणून, धन-धान्य-अलंकार यांच्या समवेत आरोग्याचीही त्यांनी नोंद केली आहे. इतकेच नव्हे तर, राहण्याचे गाव, त्या गावचे अधिकारी आणि एकंदरीत ज्यांच्याशी संबंध येतो ते जन हे सारेच मनासारखे असणे म्हणजे तो भाग्यशाली संसार. असा एकंदर त्या चित्रातला उठाव आहे (पुढे संग्रहात ही समग्र कविता समाविष्ट करण्यात आली आहे.) प्रापंचिकाला हे सारे लाभणे म्हणजे " जनीं जाणिजे योग हा सुकृताचा " असे रामदास म्हणतात. हे पालूपदच आहे त्याचे आणि त्यांचे. कोठे तरी रडका संसार त्यांनी पाहिला; त्याचप्रमाणे त्याची चांगली बाजूही कोठे तरी पाहिली. त्या दोनीही संसारांचे त्यांनी चित्र रंगविले. चांगली बाजू रंगविण्यात, संसाराविषयी उबग यावा अशा प्रकारचे जे वेळोवेळी प्रवचन केले होते त्याला कमीपणा द्यावा, त्याला संक्षेप द्यावा, हा हेतू नव्हे, जगात भलें आहे तसे बुरेही आहे. कवीच्या दृष्टीला ज्या वेळी जे दिसले त्या वेळी ते त्याने गायिले. एकाने दुसऱ्यावर मात करायची, पहिले खोडून दुसरे प्रस्थापित करायचे, असा प्रकार समजण्याचे कारण दिसत नाही. एखाद्या वस्तूकडे नजर जाताना मनाची भावनिक बैठक जशी असेल तसा त्या वस्तूबद्दल उद्‌गार निघायचा. समोर सुंदर मंचक पाहिला. पण पाहणाराच्या मनात जर कडकडीत ब्रह्मचर्याचा किंवा वैराग्याचा गजर चालू असेल तर त्याला तो अडगळीसारखा वाटेल. उलट, आत्मौपम्याची नजर न लावता कोणी तो पाहील तर सुताराच्या कलाकुसरीचा, लाकडाच्या गुणावगुणांचा आणि तो

वापरणाराच्या रसिकतेचा कौतुकोद्‌गार मुखातून निघेल. ह्याचा अर्थ त्याच्या मानसी ब्रह्मचर्याची किंवा वैराग्याची किंमत मागाहून कमी झाली असा करण्याचे कारण नाही. कालमानानुसार भावनेचा सूर लागणे शक्य असते. काही विशिष्ट परिस्थितीत वैताग भडकला म्हणजे मनुष्याला मरण बरे वाटते. पण काही कारणाने भावनेचा लंबक दुसऱ्या टोकाला वळला तर मरणाला माघारा जायला तो सांगतो. ज्यांना झोपायला ' शेज धुळीची आणि उशी शिळेची ' यांविना काही मिळाले नाही अशा प्रजाजनांच्या दैन्यकथा कानी खरवत असतानाच ताजमहाल दृष्टीसमोर आला तर शहाजहानने प्रजेच्या पैशाची निर्घृण उधळपट्टी केली असा संतापाचा उद्‌गार निघणें शक्य आहे. उलट, मन पूर्वविकारग्रस्त नसताना, ताजमहालासारख्या कलाकृतीच्या दर्शनाने दैन्य–यातनांचाही विसर पडतो ही जाणीव प्रबळ झाली तर ' धन्य त्या निर्मात्याची ! ' अशी कौतुकवाणी तोंडातून प्रगटेल. अंधत्व हे दुर्दैव होय. तसे जो कळवळून बोलून दाखवील तो चूक नाही; पण विशिष्ट विचारसरणीने अंधत्व हे वरदान होय असा दृष्टिकोन कोणी प्रतिपादिला तर डोळसांनीही आपले डोळे फोडून घ्यावेत असे नव्हे. उद्‌गारांच्या पाठीमागची मनोभूमिका ध्यानी घ्यायला हवी.

भाग्यवंताचा सर्व प्रकारच्या अनुकूलतेने शोभणारा संसार पाहून रामदास ' जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ' असे म्हणत आहेत. ह्यात संसाराविषयी शिफारसच आहे, असे म्हणता येईल, असे वाटत नाही. रडक्या संसाराचे एक चित्र रंगविले; त्याला दुसरीही बाजू आहे ती रंगवावीशी वाटली. तिच्या द्वारा काहीं अभिप्राय प्रगट झालाच असेल तर तो एव्हढाच म्हणता येईल की, ती बाजू म्हणजे ' पूर्वसुकृताचा योग ' आहे असे रामदास सुचवीत आहेतसे दिसते.

> प्रीणाति यः सुचरितैः पितरं स पुत्रो
> यद्‌भर्तुरेव हितमिच्छति तत्कलत्रम्
> तन्मित्रमापदि सुखेच समक्रियं यः
> एतत्त्रयं जगति पुण्यकृतो लभन्ते

हे सुभाषित सुप्रसिद्धच आहे. ह्या सुभाषिताच्या सन्निध रामदासांचा हा भाग्यवंताचा संसार मांडून पाहिला तर काही तोंडावळ्यात किंचित साम्य असल्याचा भास होईल. आणि ' एतत्त्रयं जगति पुण्यकृतो लभन्ते ' ह्याची छाया ' जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ' यावर पडली आहे असे वाटेल. तळघरातली वस्तू दृष्टीपुढे तर नसते; पण तिचा दरवळ वरच्या वावरावयाच्या जागेत तरळत असतो. तसा प्रकार इथे झाला असण्याचा संभव आहे. संस्कृत सुभाषिताचा विस्तारपूर्वक अनुवाद करणे हा हेतू नसेलही. प्रत्यक्षात पाहिलेल्या भाग्यशाली संसाराचे वर्णन करणे हेच प्रयोजन. पण जाणिवेच्या पडद्यामागे ते संस्कृत सुभाषित असल्याने त्याचा सूर नकळत ह्यात

मिसळला असावा. सारांश, कविमनाची ओळख करून घेऊन, उद्‌गारामागची प्रेरणा समजून घेऊन अर्थ लावणे अधिक सयुक्तिक. संसार-माया-ममता नसावी, प्रपंचाची जडो नये । उपाधी अंगीं, हळूहळू सोडवावी । मिठी प्रपंचाचीं, मना चाल ऊठी वना दुर्गमातें । न गुंते भवागारदारादिकांतें, हे त्यांचे उद्‌गार त्या त्या अनुसंधानात खरे आहेत. हिंडता-फिरता कोठे काही रम्य-सुंदर-कौतुकास्पद दिसले तर त्याचे केलेले गायनही खरेच होय. रामदास संत आहेतच. परमार्थाचा ध्यास त्यांना आहेच. शिष्यांनीही तोच ध्यास घ्यायला पाहिजे अशी त्यांची अपेक्षा आहे. इतकेच नव्हे तर षड्रिपूंच्या विवेचनात काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ ह्या पाचांनंतर " प्रपंच साहावा वैरी । परत्र अंतरी दुरी " असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. ह्या प्रपंचामुळे परमार्थ दुरावतो हे विशद करताना प्रापंचिकाच्या बाळपणापासून मरणापर्यंतच्या रंगरेखा त्यांनी चितारल्या आहेत :

बाळत्वीं छेंद मायेचा । खेळ तो राहिला दुरी
लागतां छेंद पोरांचा । सांगते माय मानेना
हाणिती मारिती पोरें । रडतो पडतो बहु
सोसितो आपुल्या जीवें । खेळांसाठीं मुलांकडे

पुढे वयात आला, लग्न केले, तर " नोवरी आवडे जीवीं । वोढिला सासुऱ्याकडे ।। तारुण्य बाणतां आंगीं । कामलोभेंचि भुलला ।। उदंड जाहालीं पोरें । खर्च तो वाढला पुढें ।। उदंड करंटा जाला । गेला प्रपंच हातीचा ।। फिटेना रीण ते वाढे । हिंडे, फिरे चहूंकडे ।। कष्टला सेवटीं मेला । गेला प्रपंच हातीचा ।। " अशी सारी दैन्या-वस्था त्यांनी रंगवली आहेच. कोणते लिखाण केव्हाचे ? आधीचे कोणचे ? नंतरचे कोणचे ? हे कळावयाला मार्ग नाहीं. हे निश्चित करता येते तर, एकदा एक मत होते ते पुढे बदलले असे म्हणायला एक वेळ जागा होती. पण तसे निश्चयाने सांगता येत नसल्यामुळे, एकाने दुसऱ्याला बाध यायचे कारण दिसत नाही. मुमुक्षूला षड्रिपूंची ओळख करून द्यायची आहे. तो परमार्थाचा जर इच्छुक आहे तर त्याला ' प्रपंच घातकी पाहा ' हे पटविणेच आवश्यक. त्यासाठी—

घर गांव ठाव्र माझा । सेत वाडे मळे गुरें
कन्या पुत्र वधू माझी ।.........
माझे माझे म्हणे वेडा । .........
जाहाला खोत पापाचा । सर्वांचे पाप घेतलें
यातना भोगणे लागे ।.........
आधींच जाणिजे सर्वै । विवेकी त्यासी बोलिजे
प्रपंच लाथलावा रे । वैरी हा सोडिला कसा

असे ते विचारतात. वैऱ्याचा पुरता बंदोबस्त करायलाच हवा. त्याला मोकळा कसा सोडायचा ? त्याला लाथाडून दूर केला पाहिजे.

रवीकीर्णी भासला भास जैसा
जिवा भासतो जाण प्रपंच तैसा
तयातीत जो ब्रह्म आत्मा स्वभावें
पुसाया तया रे अरण्यासि जावें

सूर्याच्या किरणांत मृगजळ दिसते, तो भास होय. तसाच प्रपंचही. 'तयातीत' (म्हणजे त्याच्या पलीकडे) जो आत्मा, जे ब्रह्म, त्याचा शोध घेण्यासाठी (प्रपंचात गुतून पडण्याऐवजी) अरण्य-मार्ग पतकरावा, अशी त्यांची सांगी आहे. असे असले तरी ते अगदीच एकारलेले संत नाहीत. सर्वसंगपरित्याग करून परमार्थाची कास धरणे हे सर्वांनाच साधण्यासारखे नसल्यामुळे, धड हेही नाही अन् तेही नाही असे होण्यापेक्षा, संसार करायचा तो त्यांनी **समर्थपणे विवेके नेटका** करावा, असेही ते सांगतात; आणि मनाला संतोष देणारा आदर्श संसार त्यांना कोठे आढळला तेव्हा त्याचे चित्रण करण्याइतकी त्यांची मती कवीसारखी कुशळ आहे. ते संत आहेत आणि कवीही आहेत—डोळ्यांना झापड नसलेले कवी आहेत.

तथापि, 'पूर्वसुकृताचा योग' म्हणून जो संसार त्यांनी वर्णिला त्यातच इतिकर्तव्यता मानावी असे त्यांचे मत नसावे. 'धन्य संसार जाणिजे' ह्या पालुपदाचे त्यांचे जे एक स्फुट आहे (आणि जे पुढे समाविष्ट केले आहे) ते ह्या संदर्भात अवश्य ध्यानात घ्यायला पाहिजे. संसारात सर्व काही मनासारखे असले तरी तेवढ्याने भागत नाही. संसार 'धन्य' ह्या पदवीला तेव्हा पोहोचतो की जेव्हा त्यात शुद्ध आचार, क्रियाकर्म, देवधर्म, दानधर्म, लोकोपयोगी कामे, भूतदया, न्याय-नीतीच्या मर्यादांचे पालन, अध्यात्म ग्रंथांचे अध्ययन इत्यादी गोष्टींवर यथासांग अवधान ठेवून कालक्रमणा चाललेली असते. '**सत्संगें निसंग होता। धन्य संसार होतसे**' हे ह्यातच सांगितलेले लक्षण अत्यंत महत्त्वाचे असे वाटते. दासबोधात म्हटले आहे की—

संसार मुळींच नासका। विवेकें करावा नेटका।
नेटका करिता फिका। होत जातसे॥

संसार नेटका केल्याने फिका होतो, ह्यातील नेटकेपणाचा तपशील ह्या सबंध स्फुटातच आहे आणि 'फिका' ह्याचा खुलासा 'सत्संगें निसंग होणे' हा आहे. संसाराच्या धन्यतेची ह्यांत जी व्याप्ती सांगितली आहे तिच्यात आई-बाप, कांता-पुत्र, सगे-सोयरे, दास-दासी, गुरे-ढोरे, धन-धान्य, असल्या ऐहिक बाबींचा ओझरताही उल्लेख नाही, हे विशेषेकरून ध्यानात घ्यायला हवे. म्हणजे, 'पूर्वसुकृताचा योग'

असलेला कोणता संसार आणि संसार ‘ धन्य ’ व्हायला काय करायचे, ह्याबद्दल घोटाळा होणार नाही. पूर्वसुक्त म्हटले की त्यात कर्तृत्वाला अवसर कितीसा राहिला, हे सांगायला नको. पण संसार करताना जे उद्दिष्ट ठेवायचे ते ‘ सत्संगें निसंग ’ होणे ( संसाराविषयीची आसक्ती नाहीशी होणे...म्हणजे तो फिका होणे ) हे होय. म्हणजेच तो संसार ‘ धन्य ’ जाणिजे.

● ●

## मठ, संप्रदाय, समुदाय

जो प्रकार प्रपंच-विवेचनाचा तोच आणखीही निरनिराळ्या विषयांचा. मठ, संप्रदाय, समुदाय, यासंबंधातही रामदासांची वेगवेगळी मते दिसून येतात. त्यांचा शिष्यवर्ग फार मोठा होता आणि त्यांनी चहू-मुलखी मठस्थापना केली होती. त्यांची यादी देऊन येथे जागा आडवण्याची जरूरी नाही. “ समर्थें कितेक गुप्त शिष्य केले । ते ते समर्थांसी विदित भले । भरतखंडीं प्रगट जे जाले । ते ते निवेदन करूं ग्रंथार्थीं ॥ ” असे गिरीधरस्वामींनी म्हटले आहे. श्रीसमर्थांची भक्तमंडळी कोणास मोजतां आली नाही, असे कल्याणस्वामींनीही म्हटल्याचे आढळते. एकंदरीत, शिष्यपरिवार उदंड होता एव्हढे निश्चित. हे शिष्य सर्व भरतखंडभर विखुरलेले होते, किंबहुना तसे ते सगळीकडे मुद्दामच पेरून ठेवले होते आणि त्यांच्याकडे काही कामगिरीही पण नेमून दिली होती, असे त्यांच्या संप्रदायाचे वाङ्मय चाळणारांच्या ध्यानी येईल.

एव्हढा ज्यांचा उदंड व्याप त्यांनी “ ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । भूमंडळीं ॥ ” असे म्हणणे सुसंगत आहे, त्यांना शोभणारे आहे. पण हेच स्वामी महाराज असे कार्य करीत असतानाच शिष्यमंडळींना म्हणतात की—

कोठे मठ करूं नये। केला तरी धरूं नये।
मठपती होऊन बैसो नये। निःस्पृह पुरुषें ॥

त्यांनी असेही उद्गार काढले आहेत की “ नको शिष्यशाखा मठीं सूख नाहीं. ” त्यांनी स्वतः जो व्याप केला त्यातलाच हा अनुभव दिसतो. अर्थात, कोणताही उद्गार असा अलग करून उचलणे तितकेसे बरोबर नाही. वाङ्मयीन गुणामुळे, त्यातल्या वक्तृत्वगुणामुळे, तो सुटा तात्त्विक बोल कंठी धरावासा वाटतो खरा; पण त्याच्या आगेमागेही काही सूत्र असते तेही ध्यानात घेणे अगत्याचे असते. मठ आणि शिष्यशाखा यांचेबद्दल असा तिटकारा व्यक्त करताना, आधीचा उद्गार आहे “ नको सोंग छंदें करूं ढोंग कांहीं ” आणि नंतरचा उद्गार आहे “ महंतीमुळें नाश होतो तपा रे । ” मुख्य उद्गाराच्या ह्या दोन बगला ध्यानी घेता बुवाबाजीवर हा

रोख दिसतो. आपण ढोंगीपणाने 'बुवा' बनायचे आणि शिष्य मेळवून काही अवंडबर माजवायचे, हा छंद नको; असल्या महंतीमुळे तपाचा नाश होतो; हा ह्या उद्‌गारातून एकवट अर्थ निघतो. ढोंग म्हटले की ते अपायकारक व्हायचेच. आणि ढोंगात खऱ्या तपाचा प्रश्न येतो कुठे ? मठ आणि शिष्यशाखा ह्यात ढोंग नसले तर ? मग तपाचा नाश होईलच असे नाही. असा युक्तिवाद करता येईल. तरी पण, ढोंग नसले तरीही, मठ आणि शिष्यपरिवार म्हणजे व्याप आलाच. आणि व्यापाकारणी वेळ जाऊ लागला की तपामध्ये खोटी आलीच. शिवाय,

संप्रदाय समुदाव। तेणें जडे अहंभाव

हा रामदासांना धोका दिसतो. मठपती होऊन बसले की आपोआपच ताठा येण्याची शक्यता आहे. ह्या अंगभूत गोष्टी ध्यानी आल्यामुळे ते म्हणतात की, "मठ करुनी ताठा। धरूं नये." सारांश, स्वतः मठस्थापना केली आणि उदंड शिष्यपरिवार वाढविला; तरी पण, त्यातले धोके त्यांना दिसत असल्यामुळे त्यांनी हे इशारे दिले असावेत.

अहंभाव किंवा ताठा ह्याची बाधा होणार नाही अशी खात्री असेल तर मठपती होण्याला त्यांची हरकत नसावी. 'मठपती होऊन बैसो नये' हा अर्धवट धागा धरून चालता कामा नये. त्याच्या पुढचा शब्द फार महत्त्वाचा आहे. मठपती होऊन कोणी बसू नये ? तर, निःस्पृह पुरुषें ! ह्या निःस्पृहपणावर त्यांचा फार कटाक्ष आहे. ज्याला आपला बोज राहावा असे वाटत असेल त्याने निःस्पृहपणा सांभाळला पाहिजे. त्याला धक्का पोहोचेल असे काही करता कामा नये. त्याबाबत कडकडीत पथ्य त्यांनी ठिकठिकाणी सांगितले आहे. दासबोधात ह्याबद्दल केवळ अधूनमधून उद्गार नसून, समग्र समास त्याकारणी खर्ची घातले आहेत. आणि दासबोधाबाहेर 'संप्रदाय समुदाव। तेणें जडे अहंभाव' हा धोका त्यांनी जिथे नमूद केला आहे तिथे लगेच सांगून टाकले आहे की—

रामदास म्हणे नेम। भिक्षा मागणें उत्तम

भिक्षाव्रत पतकरले म्हणजे अहंभाव किंवा ताठा ह्याची बाधा होणार नाही आणि निःस्पृहपणाला धक्का लागणार नाही. सकृद्दर्शनी हा सिद्धान्त जरा शंकास्पद वाटतो. तेव्हा, त्याची उकल करणे क्रमप्राप्त आहे.

● ●

## भिक्षा

सूक्ष्म विचक्षणा हा रामदासांच्या प्रतिपादनाचा गुणविशेष असल्यामुळे, उलट-सुलट विचार प्रगट झालेले दिसले तरी वाचकाने बिचकून जाण्याचे कारण

नाही. भिक्षा हा एक साधा विषय; पण किती बारकाईने त्यांनी विवेचिला आहे तो पाहावा.

शिष्याला निःस्पृहपणा शिकविताना ' ॐ भवति भिक्षां देहि ह्या पक्षा। रक्षिले पाहिजे ' असे त्यांनी सांगितले आहे. भिक्षा मागून पोट भरणे हे खरोखरी लाजिरवाणे आहे. ' असुदें खोटें ' म्हणजे आयदीपणा खोटा होय, असे ते झडकून सांगतात. ' कांहीं मेळवी मग जेवी ' असेहीं त्यांनी निक्षून सांगितले आहे. ह्याचा अर्थ, त्यांची भिक्षेवरची श्रद्धा ढळली होती, असा मात्र नाही. तो झाला गृहस्थाश्रमी मनुष्यासाठी दंडक. पण परमार्थमार्गी शिष्याला सांगताना भिक्षेवर उदरनिर्वाह करण्यात लाजिरवाणेपणा नाही, हे त्यांनी विशद केले आहे. भिक्षा मागणे म्हणजे ओशाळे होणे नव्हे. ओशाळेपणा केव्हा चिकटतो ?

श्राद्ध पक्ष सटी सामासें। शांती फळशोभन बारसे।
भोग राहाणें बहुवसें। नवस व्रतें उद्यापनें॥
तेथें निस्पृहें जाऊं नये। त्यांचें अन्न खाऊं नये।
येळिलवाणें करूं नये। आपणासी॥

भिक्षेवरच उपजीविका करायची आहे तर मग अशा निमित्ताने आलेली आमंत्रणे का घेऊ नयेत ? असा कोणी शिष्य युक्तिवाद करील म्हणून हा स्पष्ट खुलासा करून टाकला आहे. ' पाहुण्यासरिसें घेऊं नये। आमंत्रणें सदा '. ' वारें अन्न खाऊं नये '. निःस्पृहपणा टिकविण्यासाठी हे पथ्य. जो निःस्पृह असेल त्याचा मान राहतो. मिंधेपणा हानिकारक आहे. " बार लावून बैसला। तरी तो पराधीन जाला। तैसीच नित्यावळीला। स्वतंत्रता कैची ? " भिक्षावृत्तीतही प्रतिग्रहावेगळे व्हायला हवे. भिक्षेच्या द्वारा एकदम आठवड्याचे धान्य जमविले तर रामदासांना ते मंजूर नाही. ' जड भिक्षा मागूं नये ' आणि ' अल्पसंतोषी असावे। बहुत आणतां घ्यावे। मुष्टि येक॥ ' अशी त्यांची आज्ञा आहे. अन्नधान्याची साठवण म्हणजे उपाधी ! ' उपाधीमध्ये पडो नये। भजनमार्ग मोडूं नये। निसंगपणें॥ ' उपाधीत गुंतून पडणारा स्वतंत्रतेला मुकतो, ईश्वरोपासनेस मोकळा राहात नाहीं. पराधीनतेचा रामदासांना तिटकारा आहे. " नित्यनूतन हिंडावें। उदंड देशाटण करावें। तरीच भिक्षा मागतां बरवे। श्लाघ्यवाणें॥ " असे त्यांचे भिक्षेविषयीचे तत्त्वज्ञान आहे. पोट भरण्याचा एक मार्ग म्हणून भिक्षेचा अवलंब करायचा नाहीं. भिक्षावृत्तीत एक हेतु आहे :—

प्रत्यहीं मागणें भिक्षा। मिळाली न मिळे तरी
नित्यनूतन हिंडावें। धुंडावे भक्त प्रेमळ
सर्वत्र लोक शोधावे। बोधावे भक्तिच्या गुणें
राहावे दुर्बळाचेथें। देवाल्यें कां नदीतिरीं

पर्वतीं उदकापासीं । संन्निधची येकीकडे
फार येकान्त सेवावा । अभ्यास नित्यनूतनू

हा उद्‌गार दासबोधामधील ओव्यांचाच जवळपास अनुवाद आहे. अभ्यास नित्य-नूतन करावा, संचार नित्यनूतन स्थळीं असावा, आणि आठवड्याचे धान्य साठविले 'तरी ते कंटाळवाणे जाले । प्राणी येकायेकीं चेवले । नित्यनूतनतेंपासुनी ' ! आणि विशेष ध्यानात घ्यायची गोष्ट अशी की, ज्याप्रमाणे लग्न-मुंज-श्राद्ध-पक्ष वगैरे भोजनावळींची आमंत्रणे घ्यायची नाहीत त्याचप्रमाणे मुक्काम करायचा झाला तर तो देखील धनवंताच्याकडे करायचा नाही. देऊळ, नदीकाठ, डोंगर-कपारी, अशी ठिकाणे राहायला योग्य. पण गावात कोणाकडे राहायचा प्रसंग आला तर 'राहावे दुर्बळाचेथे '–गरीबाचे घर बरे. निःस्पृहतेला तडा जाऊ नये यावर कटाक्ष असल्यामुळे हा खुलासा आहे. ' विवेक ' हा जसा रामदासांच्या वाङ्मयातला एक मोठा परवलीचा शब्द, तसाच निःस्पृहपणा.

भिक्षावृत्ती स्वीकारून केवळ चरितार्थ चालवायचा नाही. सर्वत्र लोक शोधावे । बोधावे भक्तिच्या गुणें, हें उद्दिष्ट आहे. म्हणजे स्वतः ईश्वरोपासना करताना लोकांनाही भक्तिमार्गाला लावायचे आहे. कथेचें घमंड भरून द्यावे; भगवत्कीर्तीने भरावे । भूमंडळ; भगवद्भजन वाढवावे; रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी; हे घोष रामदासांनी वारंवार केलेले आहेत. [ त्याकाळी फलक किंवा बोधचिन्हे सिरवायची पद्धत असती तर त्यांवर ही वाक्ये कोरली गेली असती. ] हे उद्दिष्ट साधायचे म्हणजे जनतेशी संबंध आलाच; आणि जनतेशी संबंध ठेवून लोकांना भजनी लावा-यचे, आपल्या सांगण्याप्रमाणे त्यांनी वागावे अशी अपेक्षा ठेवायची, तर तसे काही विशेष गुण आपल्याजवळ असले पाहिजेत. विशेष गुणांनी लोकांना आकर्षून घ्यायचे म्हणजे शिष्यमंडळ्या आल्या, समुदाव आला, संप्रदाय आला आणि पर्यवसानी मठही आला. एकीकडे असले काही करू नये म्हणता म्हणता हे सारे करण्याची पाळी येते. रामदासांना ही कल्पना नव्हती असे नाही आणि त्यांनी ते केलेही. पण तेच ते करू शकले, ते कोणत्या सामर्थ्याच्या जोरावर करू शकले ? याचा विचार त्यांच्याच विवेचनाच्या अनुरोधाने केला म्हणजे विसंगतीचा निरास होतो.

• •

## मठ, महंती

रामदासांनी एके ठिकाणी आपली एक प्रतिज्ञा बोलून दाखविली आहे. ते म्हणतात—

आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी ।
आपणामागे जगदीशासी । भजत जावे ॥

ह्या प्रतिज्ञेचा कणा निःस्पृहपणा आहे. आणि भगवद्भजन वाढवावे ह्या उद्दिष्टाची तरतूद आहे. शिष्यांच्या जवळ मागायचे असे काहीच नाही. मग ते हवेत कशा-साठी ? तर, [आपल्या पश्चातही जगदीशाला त्यांनी भजत राहावे. ] म्हणजे, मागणे काय ते एव्हढेच. आणि ह्याच अनुसंधानात लगेच पुढच्या ओवीत ते स्पष्टपणे म्हणतात—

या कारणें समुदाव । जाला पाहिजे महोत्साव

आणि

समुदायाकारणें । पाहिजे दोनी लक्षणें

ती लक्षणे कोणती ? तर, "प्रबोधशक्ती पाहिजे" आणि त्या प्रबोधाप्रमाणे स्वताचे आचरण चोख ठेवून "बहुतांचे मनोगत हाती । घेतले पाहिजे." बहुतांचे मनोगत सहजासहजी का हातीं येते ? त्याला केव्हढी तरी गुणसंपदा हवी. ज्ञान, वैराग्य, आर्जवी वृत्ती, परान्तर परीक्षा, वाङ्मोहन, परदुःखाविषयी गाढ सहानुभूती, क्षमाशीलता, हे गुण म्हणजे 'पुरुषार्थवैभव' होय. [ ही गुणमालिका रामदासांच्या शब्दरत्नांच्या पेटीत कशी झळकत आहे ते पाहण्यासाठी 'उत्तम पुरुष निरूपण' नामक समास मूळातून वाचावा. त्यातला निवडक भाग प्रस्तुत संग्रहात पुढे सादर केला असल्यामुळे अवतरणांचा पसारा येथे मांडणे नलगे. ] एवंगुणविशिष्ट 'महापुरुषाकारणें । लोक धुंडीत येतात' आणि रामदास म्हणतात

ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ॥

नको शिष्यशाखा मठीं सूख नाही, संप्रदाय समुदाव । तेणें जडे अहंभाव, ही त्यांची वचने खोटी नाहीत. पण असे करायचे असेल तर ते पेलायला तसाच गुणश्रेष्ठ महानुभाव पाहिजे, महापुरुष पाहिजे. रामदासांनी हे सारे केले, कारण त्यांची तशी ताकद होती. [त्यांच्याजवळ प्रबोधशक्ती होती, निःस्पृहता होती आणि लोकांची अंतःकरणे काबीज करून त्यांना संप्रदायाच्या उद्दिष्टात गुंतविण्याची त्यांच्याजवळ चातुर्यकळा होती. व्यापआटोप करण्याचा आवाका होता आणि हे सारे करून, लोकांना कामाला लावून, आपण वेगळे होण्याची चलाखी होती. ]

रामदासांनी सांगितलेली महंताची लक्षणे आणि केलेली व्याख्या पाहा! :—

वर्तायाचा विवेक । राजी राखणे सकळ लोक ।
हळु हळु पुण्यश्लोक । करीत जाणे ॥

मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसें जनासी सिकवावें । हळुहळु ॥

मुख्य मनोगत राखणें। हेंचि चातुर्याचीं लक्षणें।
चतुर तो चतुरांग जाणे। इतर तीं वेडीं ॥

वेडयास वेडें म्हणों नये। वर्म कदापि बोलों नये।
तरीच घडे दिग्विजय। निस्पृहासी ॥

उदंड स्थळीं उदंड प्रसंग। जाणोनि करणें यथासांग।
प्राणिमात्रांचा अंतरंग। होऊन जावें ॥

मनोगत राखोन जातां। परस्परें होय अवस्था।
मनोगत तोडितां व्यवस्था। बरी नाहीं ॥

याकारणें मनोगत। राखेल तो मोठा महंत।
मनोगत राखतां समस्त। वोढोन येती ॥

[ दासबोध, समास १३, दशक १० ]

ह्या कसोटीवर समर्थासारखाच जो असेल तो उतरणार. थिट्या–तोकड्यांनी मठाची उठाठेव केली तर त्यांचा निभाव लागायचा नाही. ते फजीती पावतील. त्यांना बिनधोकपणाचा मार्ग म्हणजे त्यांनी ह्या फंदात न पडणे! पण तसाच कोणी एकादा काही गुणविशेषयुक्त कर्तबगार आढळला तर त्याला मात्र रामदास सांगतात—

कांहीं समुदाव करणें। येविशीं आलस्य न करणें।
आलस्य करितां उदंड उणें। दिसेल परमार्थीं ॥

पोहोणारें बुडते तारावे। सामर्थ्यें बुडों नेंदावे।
मुर्ख ते शाहाणे करावे। विवेकी पुरुषें ॥

आपणाहून जो धिंग। त्यासीं करूं नये प्रसंग।
आपणाधीन जो प्रसंग। तो चि करावा ॥

सोईऱ्याधाईऱ्यांचीं मुलें। तिक्षण बुधीचीं सखोलें।
तयासी बोलणें मृदु बोलें। करीत जावें ॥

त्यांचा संसार समाचार। पुसत जावा विस्तार।
उदंड सांगतां तत्पर। होऊनि ऐकावें ॥

दुःख ऐकतां दुःख जातें। त्याचें दुःख हळु होतें।
मग तें सवें चि धरितें। मित्रभावें ॥

निकट मित्रि बरी होतां । मग त्यासी न्यावें येकांता ।
म्हणावें रे भगवंता । कांहीं तऱ्हीं भजावें ॥

मान्य होतां जप सांगावा । मग तो इकडे पाठवावा ।
मग तयाचा सकळ गोवा । उगऊं आम्हीं ॥

'नको शिष्यशाखा' म्हणणाराचा हा आदेश ! विसंगत नव्हे का ? नव्हे. कारण, तारतम्य हा रामदासांच्या प्रतिपादनांतला मुख्य गुण. जो जसा भेटेल तसा त्याला (पारखून) अधिकारपरत्वे कामी लावायचा, हे त्यांचे धोरण, "सावधपणें करीत जावा । संसार आपला." ह्या प्रतिपादनाप्रमाणे ते स्वतः सावधगिरीने वागत आले. लक्षात घ्यायचे तें हे की प्रस्तुत ठिकाणी 'संसार' हा शब्द मठ–संप्रदाय–महंती ह्या अर्थानेच वापरण्यात आला आहे. अशा तऱ्हेचा देव–धर्म–देशव्यापी विशाल संसार समर्थांना करायचा होता म्हणूनच त्यांनी वरील आदेश दिला आहे.

सारांश, मत–मतान्तर असा काही प्रकार नसून, सकृद्दर्शनी ज्यांत भिन्नता दिसते अशा उद्‌गारांचा आणि अभिप्रायांचा, प्रसंग व अनुसंधान यांकडे अवधान देऊन, सुसंगत अर्थ लावता येतो.

* * *

८.

## एका अभंगाचे दत्तविधान !

रामदास हे नुसतेच गोसावी नव्हते. ते प्रतिभाशाली कवी होते. कवी हे ‘ सामर्थ्यवंतांची सत्ता ’ होत, असे त्यांचे प्रचीतीचे बोल आहेत. “ हवाया, नळे, बाण, भांडीं, अनंतें । बळें सोडितां जाति आकाशंपथें । बती लागतां वेळ नाहीं उडाया । तयाचेपरी स्फूर्ति दे देव-राया ॥ ” असे त्यांचे मागणे असून, ह्यावरूनच स्फूर्ती म्हणजे काय ह्याची त्यांना किती थोर कल्पना होती, याचा प्रत्यय येतो. समाजाची दुरवस्था त्यांनी न्याहाळलीं होती. ती पाहून ते व्याकुळ होत्साते प्रचंड उद्योग करते झाले. समाजातील करंटेपणा नष्ट होण्यासाठी, आपल्या वक्तृत्वसंपन्न वाणीने त्यांनी शक्तियोग पढविला आणि समुदाय उठवून त्यांना चैतन्ययुक्त विवेकाची शिकवण दिली. अशा ज्ञानी, व्यवहार-चतुर, लोकसंग्राहकाचे काव्य किती विविध प्रकारांनी समृद्ध असेल हे जिज्ञासूपणे पाहणारालाच कळून येईल आणि पाहून तो थक्क होईल.

लोक दोहींकडून कसे बोलतात याचे रामदासांनी एका अभंगात वर्णन केले आहे. तो अभंग असा :—

संसार करीतां म्हणती हा दोषी ।
न करीतां आळशी पोटपोसा ॥
ऐसा हा लौकिक कदा राखवेना ।
पतीतपावना देवराया ॥
भक्ती करूं जाता म्हणती हा पसारा ।
न करीतां नरा निंदिताती ॥
आचारें आसता म्हणती नाक धरी ।
येर अनाचारी पापरूपी ॥
सत्संग धरीता म्हणती हा उपदेसी ।
येर अभाग्यासी ज्ञान कैचें ॥
अभाग्यासी म्हणती ठायींचा करंटा ।
समर्थासी ताठा लावीतसे ॥
बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ ।
न बोलता सकळ म्हणती गर्वी ॥

भेटीस नवजातां म्हणती हा निष्ठुर।
जातां म्हणती घर बुडवीलें ॥
धर्म न करीतां म्हणती हा सांचीतो।
करीतां काढितो दिवाळें कीं ॥
लग्न करूं जातां म्हणती हा मातला।
न करीतां जाला नपूंसक ॥
निपुत्रिका म्हणती पाहा हा चांडाळ।
पातकांचें फळ पोरवडा ॥
मुखें नाम घेतां करीती टवाळी।
न घेतां ढवाळी सर्व काळ ॥
दिसां मरो नये रात्रीं मरों नये।
कदां सरो नये मागां पुढां ॥
मर्यादा धरीतां लाजाळू चोखट।
न धरीतां धीट म्हणती लोक ॥
लोक जैसा वोक धरीतां धरेना।
अभक्ती सरेना अंतरीची ॥
दास म्हणे मज तुझाचि आधार।
दुस्तर संसार तरीजेल ॥

प्रस्तुत अभंगाचा अर्थ सरळ आहे. प्रपंचाचा गाडा हाकण्यासाठी उद्योगधंदा करावा, तर लोक म्हणतात पाहा हा बायकामुलांतच गुरफटला आहे. बरं, न करावा, तर म्हणतात पाहा हा ऐतखाऊ! पूजा-अर्चा, भजन-कीर्तन, अशा रीतीने भक्तिमार्ग चोखाळावा, तर म्हणतात, पाहा काय अवडंबर माजवितो आहे. तसे काही न करावे तर तिकडूनही लोक निंदा करायला तयार! कुणाकडे येणे नको की जाणे नको, आपण बरं की आपलं घर बरं, असे धोरण ठेवावे तर म्हणतात पाहा कसा अहंमन्य आहे; कुणाची पर्वा नाही; हृदयशून्य! बरं, ये-जा करीत राहावं, तर म्हणतात उगाच उंबरठे झिजवीत असतो; आयतं बाहेर चहापाणी भागतं ना! इत्यादी, इत्यादी. ओळी-ओळीचा सविस्तर आशय सांगण्याची जरूरी नाही. बहुतेकांना हा अनुभव असेलच. दारी आलेल्याला विन्मुख दवडू नये म्हणून पै-पैसा देत जा; की "हे मोठे दानशूर आले पाहा; भिक्षेकऱ्यांना मात्र सोकावून ठेवतात!" असा शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून शेरा मिळेल. बरं, अशा मागतकऱ्यांना काही न देता जो वेलाशक वाटेला लावील, त्याच्याबद्दल "मोठा कवडीचुंबक! उष्ट्या हातानं

कावळा सुद्धा हाकायचा नाही ! " अशी नालस्ती कानी येईल.

" बहु बोलो जातां० ......" आणि " मर्यादा धरीतां० ......" ह्या दोन चरणांत—

मौनान्मूकः प्रवचनपटुर्वातुलो जल्पको वा।
धृष्टः पार्श्वे वसति च सदादूरतस्त्वप्रगल्भः ।।

ह्या संस्कृत सुभाषिताचा प्रतिध्वनीच ऐकू येतो असे वाचक म्हणतील. अखेर, " लोक जैसा वोक धरीतां धरे ना " असा वैतागाचा उद्‌गार काढून शेवटी अनन्यतेने परमेश्वराचा आश्रय घेण्यात आलेला आहे. अडचणीत सापडलेल्या अगतिकांना दुसरा काय मार्ग ? कविता म्हणजे संसृतिटीका, ह्या व्याख्येनुसार, हा अभंग अनुभवाच्या कटुतेतून निर्माण झालेला, मोठा संस्मरणीय आहे.

एके दिवशी तुकारामबोवांच्या अभंगांची गाथा चाळत असताना अगदी हाच अभंग तंतोतंत नव्हे, पण किंचित फरकाने, पुढे आला. फरक कुठे कुठे आहे हे पाखडून-निवडून दाखविण्यापेक्षा समग्र अभंगच इथे देतो; म्हणजे वाचकांना तुलना सहज करता येईल :—

ऐसा हा लौकिक कदा राखवेना
पतीतपावना देवराया
संसार करितां म्हणती हा दोषी
टाकिता आळसी पोटपोसा
आचार करितां म्हणती हा पसारा
न करितां नरा निंदिताती
संतसंग करितां म्हणती हा उपदेशी
येरा अभाग्यासी ज्ञान नाहीं
धन नाहीं त्यासी ठायींचा करंटा
समर्थासी ताठा लाविताती
बहु बोलों जातां म्हणती हा वाचाळ
न बोलतां सकळ म्हणती गर्वी
भेटीसी न जाता म्हणती हा निष्ठुर
येतां जातां घर बुडविलें
लग्न करूं जाता म्हणती हा मातला
न करितां जाला नपुंसक

निपुत्रिका म्हणती पहा हो चांडाळ
पातकाचें मूळ पोरवडा
लोक जैसा ओक धरीता धरवेना
अभक्ता जिरे ना संतसंग
तुका म्हणे आतां ऐकावें वचन
त्यजुनिया जन भक्ती करा

तुलना करून पाहणाराला एक गोष्ट स्पष्ट कळून येईल की रामदास व तुकाराम यांच्या ह्या अभंगांत केवळ स्थूल कल्पनासादृश्य नसून, संपूर्ण साम्य आहे. फरक एव्हढाच की :–

( १ ) "ऐसा हा लौकिक..." हा रामदासाचा दुसरा चरण तुकारामाने आरंभी घेतला आहे.

( २ ) "आचार करितां...निंदिताती" ह्यांतील कल्पनेचा रामदासांच्या अभंगात दुप्पट विस्तार दिसतो.

( ३ ) संतसंग आणि सत्संग यांत विशेष फरक मानण्याचे कारण नाही. कवीने सांगितलेले लेखकाने लिहून काढताना जे ऐकले असेल ते खरे !

( ४ ) "धन नाहीं त्यासी" ह्याऐवजी रामदास 'अभाग्यासी' असा शब्द योजतात.

( ५ ) धर्म न करिता०..., मुखें नाम घेतां०..., दिसां मरो नये०..., मर्यादा धरीता०..., हे चार चरण तुकारामाच्या अभंगात नाहींतच.

( ६ ) शेवटच्या चरणात शब्ददृष्ट्या फरक बराच आहे. तुकारामबोवा स्पष्टच सांगतात की, लोकांच्या बोलण्याकडे लक्ष न देता, जन हो, तुम्ही माझे ऐका, ईश्वराची भक्ती करा. रामदास लोकांना उद्देशून न सांगता दुस्तर भवसागर तरून जाण्याच्या इच्छेने परमेश्वराला शरण जातात.

हे दोन्ही बहुतांशी एकसारखे असलेले अभंग पाहिल्यावर प्रश्न पडतो की, मुळात ह्या अभंगाचा उद्गाता कोण ? रामदास की तुकाराम ? एका मांडवांतले वऱ्हाडी चुकून दुसऱ्या मांडवात जावेत, असा प्रकार तर इथे झालेला नसेल ? पण मांडव चुकलेला वऱ्हाडी आपले नाव विसरत नाही. इथे चूक सावरून घेण्यासाठी नामांतरही केले गेले की काय ? असे प्रश्न उद्भवतात. रामदास–तुकाराम कीर्तन–भजन करीत. त्या वेळी त्यांनी गायिलेला हा अभंग श्रोत्यांच्या चित्तावर ठसलेला असणार. प्रभावित झालेले आस्थेवाईक श्रोते, अनुयायी वा सांगाती यांनी कधी तरी सवडीने तो आपल्या वाडात आठवला तितका लिहून ठेवला असणार. शेवटच्या चरणांतील कर्त्याचा नामनिर्देश ध्यानी न राहिल्याने, आपल्या संप्रदायाच्या कर्त्याचाच तो असावा ह्या समजुतीने किंवा ममत्वाने 'तुका म्हणे' किंवा 'दास म्हणे'

असे नाव गोवून तो चरण जुळता–मिळता करून घेतला गेला असावा.

अशा रीतीने, एकाच्या अभंगाचे दुसऱ्याच्या मांडीवर दत्तविधान झाले असावे. असे होणे अगदीच अशक्य नाही. ह्या तऱ्हेच्या गैरसमजाचा अनुभव माझा स्वतःचा आहे. लहानपणी मराठी शाळेत असताना " वाजे पाऊल आपुलें । म्हणे मागें कोण आलें " हा अभंग मी घोकला होता. कालांतराने, त्यातील शेवटचा चरण, ज्यात कर्त्याचा नामोल्लेख असतो तो, विसरलो. पण समजूत मात्र पक्का अशी की हा अभंग तुकारामबोवांचा आहे. पण, अलीकडेच, रामदासांचे ग्रंथ–भांडार समग्र वाचून काढायचे हा संकल्प पुरा करायच्या उद्योगात असताना ' भ्रमपंचक ' या प्रकरणात हा अभंग आढळला आणि ध्यानी आलें की हा तुकारामाचा अभंग म्हणून आपण केव्हढा भ्रम उराशी बाळगून होतो !

छापलेले ग्रंथ आता उपलब्ध असल्यामुळे अशा प्रकारे भ्रमनिरास होऊ शकतो. पण जेव्हा एकाच्या हस्तलिखितावरून दुसऱ्याने नक्कल करून घेण्याशिवाय अन्य मार्ग नव्हता तेव्हा, एकाची चूक दुसऱ्याच्या प्रतीमध्ये, दुसऱ्याची तिसऱ्याच्या बाडांत, ह्याप्रमाणे तिला पाय फुटणार.

कै. पुं. म. लाड यांनी संपादिलेल्या ( सरकारी ) प्रकाशनात तुकारामबोवांच्या अभंगांसमवेत इतरांचेही काही अभंग समाविष्ट झाले आहेत. पण प्रस्तुत अभंगाबद्दल संशय घेण्यात आलेला दिसला नाही. लाड यांचे हे संपादन म्हणजे पूर्वीच्या विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांच्या प्रकाशनाचे पुनर्मुद्रण. पंडितांच्या ग्रंथात ह्या अभंगाचा क्रमांक ९५९ आहे आणि लाड यांच्या संपादनात क्रमांक ८३ आहे. आणखी खात्री करून घेण्यासाठी नारो आप्पाजी गोडबोले, त्र्यंबक हरि आपटे, नानामहाराज साखरे, विष्णुबोवा जोग, देशमुख–दांडेकर, देवडीकर, पणशीकर, सतऋषी–मोतीवाले, यांनी संपादिलेले संग्रहही तपासले. त्याचप्रमाणे देहूकर, बेलापुरकरबुवा, वासकर बुवा इत्यादिकांच्या फडावरील सांप्रदायिक ओळीची गाथा ( प्रकाशक-केमकर आणि मंडळी ) देखील पाहिली ह्या सर्वांनी प्रस्तुत अभंग छापला आहे. फरक आढळतो तो अगदीच किरकोळ. उदा :—नवजातां ऐवजी न वजता, ऐका बद्दल आइका, न करिता बद्दल न करि त्या, इत्यादी.

रामदासांच्या बाबतीत ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांनी संपादिलेल्या ग्रंथ-भांडारात हा अभंग दुसऱ्या भागात पृ. ४८८ वर ( क्रमांक १५ ) असून श्री. शंकर श्रीकृष्ण देव ( धुळे ) यांच्या प्रतीमध्ये पृ. २१७ वर ( क्र. १९ ) आहे. डोमगाव मठातील कल्याणस्वामींचे बाड हा देव यांचा आधार.

एकच आशय, मथितार्थ, सत्य-प्रतीती दोघा अलौकिकांना स्वतंत्रपणे सुचणे शक्य असते. पण त्यांच्या अभिव्यक्तीत वेगळेपणा असतो. आशय एक असला तरी प्रत्येकाची वैशिष्ट्यपूर्ण धाटणी असते आणि त्या वैशिष्ट्याची छाप मिळालेली अभिव्यक्तीही अर्थात भिन्नता पावते. तेव्हा अंतर्गत पुराव्याच्या आधाराने काही अनुमान

काढता येईल का, हा प्रश्न ओघानेच पुढे येतो.

( १ ) ‘ नवजाता ’ हा शब्द न वजाता किंवा न वजता असा असून रामदासी भाषा–धाटणीला जवळचा वाटतो. ( वजणें–जाणें )

( २ ) ‘ अभाग्यासी म्हणती ’ हीही रामदासी शब्दयोजना. तिचा अनुवाद ‘ धन नाहीं त्यासी ’ असा तुकारामाच्या अभंगात झाला असावा.

( ३ ) बहु बोलो जातां०...ह्या उद्‌गाराच्या पाठीशी जर ‘ मौनान्मूकः ० ’ ह्या संस्कृत सुभाषिताची छाया असेल “तर मर्यादा धरीतां लाजाळू चोखट ”०...हा उद्‌गारही तीतूनच स्फुरणे क्रमप्राप्त आहे. तुकारामबोवांच्या अभंगात हा का नसावा ?

( ४ ) रामदासांच्या लेखनात सर्वसाधारणपणे वक्तृत्वविलास अधिक असतो. तसा तो त्यांच्या ह्या अभंगातही आहे. आणि त्यांचा ‘ लेखकु ’ जो कल्याण त्याला तो उतरून घेता आला. तो गळला जाऊन तुकारामबोवांचा अभंग तयार झाला असावा.

( ५ ) तुका म्हणे०...हा अंत्य चरण लोकांना उद्देशून आहे. “ऐसा हा लौकिक कदा राखवेना। पतीतपावना नारायणा ” हा जो ध्रुपदाचा चरण तो देवाला उद्देशून आहे. तेव्हा, समारोपातही देवालाच संबोधले जावे हे सुसंगत असल्यामुळे, “ दास म्हणे मज तुझाचि आधार ” ह्या चरणाने होणारा शेवट समुचित वाटतो. हा समुचितपणा सावधानतेचा भाग होय. आणि सावधानता राखली जाण्याचे श्रेय मूळ उद्‌गात्याकडे जाणे स्वाभाविकच होईल, न्याय्य होईल, असे वाटते.

सारांश, कल्पनासाम्य किंवा उसनवारी, अशातला हा प्रकार नसून, एका घरच्या अभंगाचे दुसऱ्या घरी दत्तविधान झालेले असावे–नक्कलकारांच्या किंवा सांप्रदायिकांच्या अजाणतेने ! कोणीकडून कोणीकडे, हा प्रश्न कोणी खात्रीशीररीत्या सोडविल्यास ठीकच. मला करता आले तेव्हढे अनुमान वर दिलेच आहे. हे कोणी अमान्यही करू शकेल. उलट अनुमान काढण्याला ह्यापेक्षा सबळ युक्तिवाद कोणी करू शकल्यास, शंकानिरसनाला साह्यच होईल.

* *

# शिष्यांना समर्थांचा संदेश

यः पठति लिखति पश्यति
परिपृच्छति पण्डितानुपाश्रयति ।
तस्य दिवाकरकिरणैर्नलिनी-
दलमिव विकास्यते बुद्धिः ॥

'संदेश व स्वाक्षरी' यांचा संग्रह करण्याची अलीकडे पुष्कळ विद्यार्थ्यांना हौस असल्याचे दिसून येते. जीविताच्या विविध क्षेत्रांत नावारूपास आलेली मंडळी प्रसंगाप्रसंगाने किंवा संमेलनात समोर आली की त्यांना स्वाक्षरीसाठी वेढून संदेशाचाही गळ घालणारा घोळका पुष्कळदा अनावर होतो–त्या नामवंताला गुदमरून टाकण्याइतकी गर्दी करतो. 'संदेश व स्वाक्षरी' यांचे हे संग्रह चाळून पाहणाराला जी सुभाषितें वारंवार आढळतील त्यांपैकीच–

दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें
प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें

हें एक होय.

हा संदेश रामदासस्वामींचा आहे हे पुष्कळांना माहीत आहे. त्यांच्या काळी आजच्या पद्धतीने संदेश देण्या–मागण्याचा छंद बोकाळलेला नव्हता. तथापि, अशाप्रकारचे उपदेशाचे, व्यवहारज्ञानाचे घोट अधिकारी व्यक्ती अनादि-काळापासून पाजत आल्या आहेत. रामदासस्वामी तर 'जें कांही आपणासि ठावे । तें इतरासि शिकवावें' ह्या मताचे आणि "रामी रामदास कवि । न्यायनीतीनें शिकवी" ह्या तत्त्वाचे. तेव्हा, त्यांच्या वाणीने असल्या उपदेशामृताची संतत धारच धरली असेल, हे सांगायला नको.

"दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें" हा जो त्यांनी कित्ता घालून दिला आहे त्याचा अर्थ मात्र नीट ध्यानी घेतला जातो की नाही याची शंका आहे. सुटा उद्‌गार हा सुटेपणीही सार्थ असला तरी त्याचा सामग्र्याने अर्थ कळण्यासाठी आणखी काही उद्‌गारांची प्रभावळ त्याच्यासभोवती उभी करणे अगत्याचे असते. फूल हे फूल म्हणून शोभिवंत आहेच; पण त्याच्या देठासमावेत एक–दोन पानांच्या संगतीत ते अधिक शोभायमान होते. मूर्ती स्वयंसिद्धपणे सुंदर असली तरी तिला प्रभावळीत प्रस्थापिता आली तर तिचे सौंदर्य अधिक वृद्धी पावण्याची शक्यता आहे. काठावरून सरोवराची शोभा पाहता पाहता, त्यात मनसोक्त जलविहारही

केल्याने जसा अधिक आनंद मिळतो, तसाच विशेष आनंद झाल्याचा उद्गार त्याच्या एकंदर दृष्टिकोनाच्या संदर्भात पाहिला तर लाभण्याची शक्यता असते.

" दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें. " कविता, निबंध, कथा, नाट्यछटा, असे काही-ना-काही लिहिण्याची हौस असलेल्या किंवा मनीषा असलेल्या होतकरू लेखकाला रामदासांनी हा धडा दिला आहे काय ?–नाही. त्यांचे थोरले बंधु 'श्रेष्ठ गंगाधरस्वामी दिवंगत झाल्याची वार्ता आल्यानंतर, त्यांच्या दोघा मुलांना ( म्हणजे आपल्या पुतण्यांना ) त्यांनी धीर–दिलासा देण्यासाठी जे श्लोकमय पत्र पाठविले त्यातला हा श्लोकार्ध आहे. हे आपले पुतणे कधीकाळी साहित्यिक किंवा कवी होतील अशी रामदासांची कल्पना नसावी. अजाण आहेत ही मुले; त्यांना वडीलकीने दोन शब्द सांगणे युक्त होईल. काय त्यांचे वय असेल ? नक्की शोध लागत नाही. पण " सदा दांत घासून तोंडा धुवावें । कळाहीन घाणेरडे बा नसावें " हे सुद्धा त्यांना सांगायला हवे, ह्या सुमाराचेच त्यांचे वयोमान दिसते. तेव्हा, अशा बालकांना जे काही सांगावयाचे त्यात " दिवसाकाठी काही तरी लिहीत जावे, प्रसंगी अखंडित वाचीतही जावे " ह्या उपदेशाचा अंतर्भाव झालेला आहे.

त्या काळचा विचार करू गेल्यास, हे ध्यानात येईल की अभ्यासकाला–विद्यार्थ्याला–वाचकाला छापील पुस्तके मिळत नव्हती. हस्तलिखितावरच गुजराण करावी लागे. पण दुसऱ्याच्या हस्तलिखितावर अशी गुजराण किती काळ करता येईल ? आपल्या मागीलदारी जशी दोन फुलझाडे हवीत, तुळशीचे रोप हवे, त्याचप्रमाणे आपल्याला नेहमी लागणारी पोथीही आपल्याजवळ हवी. अर्थात ती दुसऱ्याच्या पोथीवरून नकलून घ्यायला हवी. ज्याला ज्याची गोडी, तो त्याची नक्कल करून जवळ बाळगीत असे. वेद, पुराणे, संस्कृत काव्ये, साधु-संतांची ओवी–अभंगादि ग्रंथरचना, ह्यांच्या नकला अशा रीतीने पिढ्यान् पिढ्या होत राहिल्या. सारस्वताची गंगा वाहात राहिली ती ह्या हस्तलिखितांच्या नकलांतून. यात्रेकरूने आणलेले गंगोदक ज्याप्रमाणे देव्हाऱ्यात पूजिले जात असे त्याचप्रमाणे हे सारस्वतरूपी गंगोदकही पूजिले जात असे. देवपूजेच्या वेळी नित्यनियमाने त्यातले काही पठण-वाचन होई आणि मग देवमूर्तिसन्निध तेही ठेवले जाई व त्यावर गंधाक्षतफुले वाहिली जात. तेव्हा ' दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें ' याचा अर्थ ह्या अनुरोधाने घ्यायला पाहिजे. जे काही वाचायला हवे, जे काही अभ्यासायला हवे, ते नकलून घ्यावे लागत असल्यामुळे, रामदासांनी हा नित्याचा परिपाठ म्हणून हितबोध केलेला असावा. ग्रंथ लिहून काढायचा म्हणजे कोण चेंगट काम ! गरजेच्या वेळी ते एकदम थोडेच होणार ? तेव्हा, रोज नेमाने लिहीत जाणे, हाच कामाचे ओझे न वाटता ते उरकण्याचा मार्ग होय. अशा रीतीने आपला ग्रंथसंग्रह वाढवीत जाण्याची त्याकाळची गरज होती. खुद्द रामदासांनी हाच मार्ग अनुसरलेला असावा. वाल्मीकी रामायण त्यांनी लिहून काढलेले होते, असे दिसते. आदिकांड, अयोध्या-

कांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड व उत्तरकांड, या प्रत्येकाच्या नकलेच्या शेवटी लेखनसमाप्तीची मिति, मास, शक यांची नोंद असून ' रामेण रामदासेन लिखितमिदं पुस्तकं ' असा शेरा मारलेला आहे. अरण्यकांड लिहून काढण्यात कोणा गोपिनाथाचे साह्य घेतल्याचाही निर्देश आहे; तर अयोध्याकांडाच्या लेखकाचा " रावबनामा " असा उल्लेख आहे. पण सारांशाने, एवढे स्पष्ट दिसते की रामदासस्वामींनी ही प्रत तयार केली करविली आहे. त्यांच्या ठिकठिकाणच्या मठात शिष्यांनी आपल्या उपयोगासाठीही असाच ग्रंथसंग्रह तयार केला असला पाहिजे. ही त्या काळची गरजच होती.

जागरूक वाचकाला हेही माहीत असेल की, अशा रीतीने हस्तलिखित प्रती तयार करणे हा एक द्रव्यार्जनाचा व्यवसायही त्या काळी होत असे. सर्वच गरजवंतांना स्वतःच प्रत लिहून काढण्याइतकी फुरसत असेल असे नाही. तेव्हा, मेहेनताना देऊन दुसऱ्याकडून हस्तलिखित मिळविणे भाग पडे. अर्थातच ह्यात व्यावसायिक दृष्टीही आलीच. ऐतिहासिक कागदपत्रे, जमाखर्चाची टिपणे, ही ज्यांनी नजरेखालून घातली असतील त्यांना त्यात असे उल्लेख आढळले असतील. रामदासांनी उपजीविकेचा एक मार्ग म्हणून आपल्या पुतण्यांना हा हितोपदेश केला असेल असे मात्र मानण्याचे कारण नाही. त्यांच्या उपदेशाला उपयुक्ततेचा हा मासुली कस लावणे फारच क्षुद्रपणाचे दिसेल. पुतणे बालवयी आहेत. विद्याव्यासंगाचे त्यांचे वय आहे. त्या दृष्टीने त्यांनी दररोज काही तरी नकलून काढावे, हेच रामदासांना अभिप्रेत असावे.

पुस्तक लागले की, वाचनालयाकडे धाव घेण्याची सोय सांप्रत उपलब्ध असल्यामुळे " दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें " याचा उपरोक्त अर्थ घेण्याची आवश्यकता वाटत नाही. म्हणून हा उपदेश सर्वतोपरींनी त्याज्य आहे, असे मात्र समजण्याचे कारण नाही. कारण, मान्यता पावलेल्या ग्रंथातील भाग लिहून काढण्याने आपल्या विचारांना बांधेसूदपणा येत असतो. अशा अर्थाची—

Reading makes a full man
Writing makes a perfect man

ही इंग्रजी उक्ती पुष्कळांना माहीत असेल. प्रस्तुत लेखाच्या शिरोभागी दिलेल्या सुभाषितात, विशेषतः त्यांतील ' लिखति ' ह्या शब्दप्रयोगाने हेच सांगितले नाही काय? ' प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें, ' हे सांगण्याचा रोख चित्तकोशाच्या समृद्धीकडे आहे. अर्थात भाराभर ग्रंथ वाचताना मनाची कवाडे मात्र बंद असून उपयोग नाही. डोळ्यांनी अक्षरवाचन होत असताना, मन मात्र भलतीकडे भटकत राहिले तर ते अखंडित वाचन निरर्थकच होय. बंद मनाने भाराभर ग्रंथ वाचण्यात आणि उशाखाली ग्रंथांचा ढीग घेऊन निजण्यात काही फरक नाही. लिहून काढायला काही नाही, तेव्हा उदंड वाचन ( अर्थात जागृत मनाने ) करावे. पुस्तके ग्रंथालयातून

वाटेल तेव्हा हस्तगत होण्याची शक्यता असली तरी, लिहून काढण्यातला एक फायदा असतो. विद्यार्थिदशेत आमचे प्राथमिक शाळेतले गुरुजी रोज पाच ओळी उतारा काढून आणायला सांगत असत, त्याची आठवण येते. छापील पाठ्य पुस्तकातील कोणत्या तरी त्या पाच ओळी असत. हाताशी छापील पुस्तक असताना हा खटाटोप कशाला? पण नाही! सांगितल्याप्रमाणे आम्ही रोज उतारा काढून नेत असू. वर्षानुवर्षे हा परिपाठ चाले. अक्षर वळणदार होण्याच्या दृष्टीने हा उद्योग फायद्याचा होई, हे कोणालाही सहज कळण्यासारखे आहे. दुसरा फायदा असा होई की, त्या ओळी उतरून घेताना त्यातला जो विचार असे तो मनात शिरत असे– नुसत्या वाचनाने मनात त्याचा शिरकाव ज्या प्रमाणात होणे शक्य असे त्यापेक्षा अधिक दृढ संस्कार तो लिहिण्याच्या निमित्ताने होई. भराभरा वाचन म्हणजे नुसते गिळणे; तर, पाहून लिहून काढणे म्हणजे संथपणे चर्वण होय. आणि तिसराही एक फायदा आपाततः पदरात पडत असे तो असा की, पुस्तकातील मजकुराची नक्कल करताना ऱ्हस्व, दीर्घ, व्याकरणसिद्ध रूपे, अनुस्वार, वगैरेंची नक्कल यथातथ्य होत राही. आवर्जून नियम पाठ न करताही शुद्धलेखनाचे हाताला आणि मतीला वळण लागे. रामदासांच्या त्या उपदेशापोटी याही उद्दिष्टाचा अंतर्भाव करता येईल. ह्या उपदेशाला पूरक अशी त्यांची आणखीही काही वचने आढळतात. लिहिण्या–वाचण्यावर भर देताना ते दुसऱ्या एका ठिकाणी म्हणतात—

ल्याहावें शुद्ध वाचावें। जाणावें तदनंतरें
जाणतां कळतां बिंबे। बिंबता स्फूर्ति होतसे

ह्या उद्‌गारातील प्रत्येक शब्द महत्त्वाचा आहे. लिहिण्या-वाचण्यात शुद्धपणावर त्यांचा कटाक्ष आहे. त्याचबरोबर त्यातले मर्म जाणून घ्यावे असेही त्यांनी सांगितले. आणि असे होता होता, म्हणजे जे लिखाण किंवा पठण करायचे त्यात सामावलेले ज्ञान चांगले जाणून घेत गेल्याने, त्याचे नीट आकलन झाल्याने, मनात ते पुरते बिंबते आणि त्यातूनच मग स्फूर्तीही होण्याची शक्यता असते. सुरुवातीला म्हटले आहे की आपले पुतणे होतकरू साहित्यिक किंवा कवी आहेत हे ध्यानी घेऊन रामदासांनी तो उपदेश केलेला नसावा. पण त्या उपदेशाप्रमाणे सातत्याने वर्तन करीत राहणाराला काही स्फुरणार नाही असे नाही. लेखन–वाचन–मनन ह्यांच्या योगे चित्तकोश जर समृद्ध झाला असेल तरच लेखनाची स्फूर्ती होण्याची शक्यता आहे.

‘अभ्यासीं लाविता बुद्धि। अकस्मातचि संभवे’

असाही त्यांचा एक अनुभवाचा उद्‌गार आहे. विषय अवघड असतो. सहजासहजी काही समजत नाही, कोडे पडते. कोडे चटकन उलगडेल तर ते कोडे कसले? पण अभ्यासाने

त्याचाही उलगडा होतो. 'अकस्मातचि संभवे'. संभवणें म्हणजे स्फुरणे, प्रगटणे, अवतरणे. 'अकस्मातचि संभवे' हा उद्‌गार अर्थसघन आहे. 'बिंबता स्फूर्ति होतसे' ह्या उद्‌गाराशी त्याचे आंतरिक नाते आहे. आणि ही स्फूर्ती म्हणजे 'लेखनाची किंवा कवित्वाची' स्फूर्ती, असाच केवळ मर्यादित अर्थ घेण्याची आवश्यकता नाही. अध्ययनाने जे काही मनात बिंबेल तसे आचरण करण्याची, त्या अनुरोधाने उद्योगास प्रवृत्त होण्याची, कार्याला हात घालण्याची, स्फूर्ती होईल असाही अर्थ घ्यायला हरकत नाही. किंबहुना जो विचार चित्तात ठसला असेल त्याच्यातूनच 'संभवणारा' त्याच्या पुढचा नवीन विचारही स्फुरण्याची शक्यता आहे, असाही अर्थ रामदासांना अभिप्रेत असावा.

"दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें" असे रामदासांनी पुतण्यांना का सांगितले असावे ह्याबद्दल जरी येणेप्रमाणे ऊहापोह करता आला तरी, साहित्य-निर्मितीची आशा–आकांक्षा मनात बाळगणाऱ्या उमेदवार व्यक्तीला हा संदेश नसेलच असे नाही. आपल्या हातून काही वाङ्मयनिर्मिती व्हावी अशी इच्छा असेल तर काही ना काही लिहिण्याचा सराव ठेवावा, असे तर रामदासांना सुचवायचे नसेल ? अशी शंका घेण्याला आधार त्यांच्या स्वतःच्या लिखाणाचाच घेता येईल. त्यांची काही काही पद्यरचना अशी दिसते की उत्कट स्फूर्ती तिच्यामागे असेलच असे वाटत नाही. शब्दांशी खेळण्याची, सुचलेल्या चमत्कृती नमूद करून ठेवण्याची प्रवृत्ती मात्र तिथे दिसून येते.

उठविलीं कितिकें गजरानें । वसविली नगरें गजरानें
समजती गणिती गजरानें । घडविती जन मर्गजरानें

हत्तींची राने गजर करून उठविली, द्वाही फिरवून नगरे वसविली, तास किंवा घंटा यांवर टोले देऊन काळगणना करतात आणि लोक ( अर्थात धनाढ्य ) पाच–मरकत यांची फरसबंदी घडवितात, हे सांगणारा श्लोक 'गजरानें' हा यमक जुळविण्याच्या हौसेतून निर्माण झाला असावा, असा तर्क केला तर विशेष अन्याय केल्यासारखा होणार नाही. याच्या नंतर आलेल्या श्लोकांशी ह्याचा संबंध नाही आणि अशा शब्दचमत्कृतीवर दृष्टी ठेवून केलेली श्लोकरचना अगदीच अवगणनीय नाही.

वडिलास सांगे माळी उभा जी । घरांत व्हावी बहुसाल भाजी
उदंड दारीं बसली सभा जी । माध्यान जाले पाहाणे नभा जी

काही व्यावहारिक धडे ह्यात आढळतील. पण वाटते मात्र असे की जप–तप, श्रवण, मनन, अध्ययन, वगैरे नित्यकर्म करूनही जेव्हा वेळ उरत असेल तेव्हा ह्या विरागी पुरुषाने रिकाम्या मनाला शुद्ध सात्त्विक क्रीडेत गुंतवून ठेवण्यासाठी ही शब्दलीला छंदोबद्ध केली असावी. आणि ह्या स्वानुभवाने कदाचित ते पुतण्यांना ( आणि त्यांच्या

द्वारा होतकरूंना ) सुचवीत असतील की, उगाच तिकाटण्यात बसून चकाट्या पिटण्यात किंवा कोणाची टवाळी करण्यात फावला वेळ दवडण्यापेक्षा अशा प्रकारे " दिसामाजिं कांहीं तरी तें लिहावें. "

● ●

पाठांतरावर भर तर अनादि–काळापासून आहे. वाङ्मय जिवंत ठेवण्याचा तो उपाय होता. नकला करून करून मनुष्य किती करणार ? आणि लिहिलेले सारेच काही सदाकदा कटिखांदी मिरविता येत नाही,–डोक्यावरून वाहून नेता येत नाही.

अखंड येकांत सेवावा । ग्रंथ मात्र धांडोळावा ॥

पण एकान्तातून बाहेर फडावर (सभेत) आल्यावर पांडित्याचा प्रभाव पडायला पाठान्तर असेल तेच उपयोगी येईल. भजन–कीर्तनाला भांडवल म्हणजे पाठांतर. रणांगणावर उभा टाकणारा शस्त्रसज्ज असावा लागतो आणि शस्त्रे वरचेवर उजळावी लागतात. त्याप्रमाणे अभ्यासकाला ' पाठ उदंडचि असावें ' आणि त्याने ते ' सर्वकाळ उजळीत जावें, ' असे त्यांचे सांगणे आहे. पण ह्यालाच आणखी पुरवणी जोडण्यात आलेली आढळते की––

अर्थावीण पाठ कासया करावें
व्यर्थचि मरावें घोकूनिया
घोकूनिया वेगीं काय अर्थ पाहे
अर्थरूप राहे देखोनिया
देखोनिया अर्थ सार्थक करावें
रामदास भावें सांगतसे

अशा प्रकारे रामदासांनी लेखन, वाचन, मनन आणि पाठान्तर यांच्याबद्दल परोपरीने शिष्यांना धडे दिले आहेत.

गुरू आणि शिष्य यांच्या अन्योन्य संबंधाबद्दलही मोठा मार्मिक विचार एके ठिकाणी त्यांनी ग्रथित केला आहे. पुष्कळदा असे घडते की, शिष्य गुरुजीबद्दल भय बाळगून आपल्या मनातील शंका तशीच दडपून टाकतो. पुष्कळ शाळांतून ही गोष्ट नेहमी अनुभवाला येते. गुरुजीही शिष्याच्या शंकेचे निरसन करण्याइतके पारंगत नसले म्हणजे शिष्याला दटावून गप्प करतात, किंवा " ते काही कोणी परीक्षेत विचारणार नाहीं; मी सांगतो हे टिपून घ्या म्हणजे झालं " असे म्हणून आपल्या अज्ञानावर पांघरूण घालतात व वेळ मारून नेतात. पण अशी टाळाटाळ करणारा तो ' गुरू ' नव्हे आणि शंकेचे निरसन करून न घेता, गप्प बसणारा तो ' शिष्य ' नव्हे. रामदासांनी स्पष्टच सांगितले आहे :

अरे शिष्या, आशंका उद्भवली। ते अगत्य पाहिजे पुसली।
हे आज्ञा आम्ही दिधली। पहिलीचि तुज॥
जरी माझी मर्यादा धरिसी। तरी तूं स्वहिता अंतरिसी।
याकारणें मानसीं। शंका धरूं नको॥
आधींच कायसी मर्यादा। सदीस बैसलो संवादा।
निरसिलें नाहीं तुझिया भेदा। तोचि मी स्वामी कैसा रे॥
तुज समाधान नव्हेल। तुज बरें न वाटेल।
कीं जेथें समाधान होईल। तोचि स्वामी तुझा॥

गुरुजींची मर्यादा सांभाळण्याच्या हेतूने, त्यांना प्रश्न न विचारणारा विद्यार्थी आत्मघात करतो. आपल्या शिष्याच्या शंकांचे निरसन करीत नाही तो स्वामी कसला ? शिष्याचे समाधान झाले नाही तर त्याच्या मनात मळमळ राहील. जो समाधान करील तोच आपला खरा गुरू असे शिष्याने समजावे आणि—

हें बोलणें एतन्निमित्त घडलें। जें तुज शिष्यपण आलें।
जेधवा तुज समाधान जालें। तेव्हाचि शिष्य आपुला॥

[ जु. दा. स. १२/२,३,४,५, व ७ ]

हे एवढ्यासाठी सांगायचे की शिष्याने गुरुजींचे शिष्यपण केव्हा मानायचे ? तर, जेव्हा त्याचे गुरुजीकडून समाधान होईल तेव्हा ! आणि गुरुजीने तरी 'हा माझा शिष्य' म्हणून केव्हा अभिमान बाळगायचा ? तर, त्याचे समाधान करण्याचे सामर्थ्य असेल तेव्हा !

शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षक मनापासून शिकवत नाहीत, त्यांच्या शंकांचे निरसन करीत नाहीत, काही तरी उडवाउडवी करून किंवा अंगावर खेकसून किंवा धाकदपटशाने त्यांची तोंडे बंद करतात. पर्यवसान असे होते की विद्यार्थी 'खाजगी' वर्गांची ( Coaching Classes ची ) वाट धरून अभ्यास करतात. आणि परीक्षेत उत्कृष्ट यशही संपादतात. असे झगझगीत यश संपादणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल "हा आमच्या शाळेतला विद्यार्थी ! हा माझ्या वर्गातला विद्यार्थी" म्हणून अभिमानाने घोष करायला शाळा व शिक्षक पुढे सरसावतात व श्रेय घेतात. पण विद्यार्थ्यांच्या सुयशाबद्दल श्रेय घ्यायला अधिकार कोणाला व केव्हा ? याचा स्पष्ट निवाडा रामदासांनी वरती सांगून टाकला आहे.

अनेकांना अनेक प्रकारे हितोपदेश करणारे रामदास शिष्यांच्या बाबतीत असे जागरूक आहेत, लिहिण्या-वाचण्याबद्दल त्यांचा असा साक्षेप आहे आणि पाठान्तराबद्दल त्यांचा असा कटाक्ष आहे.

महा दर्पण खतलें । तेणें मुख आच्छादलें
तैसी वृत्ती हे मळिन । होतां बुडे समाधान
धातुवरी आला मळ । तेणें लोपलें निर्मळ
शेतीं न जातां आडत । तेणें आच्छादलें शेत
मुखें न होतां उच्चार । तेणें बुडें पाठांतर
नाहीं दीपाचा विचार । दास म्हणे अंधकार

* * *

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्र... ...... वि: ..........
क्रमांक ...................... नों दि: ..........

१०.

# रामदासांचा वृत्तविलास

वामन, मोरोपंत, रघुनाथ आदि पंडितकवींच्या काव्यरचनेत जसा वृत्तविलास आढळतो तसा साधुसंतांच्या काव्यरचनेत आढळत नाही. साधुसंतांची वाणी प्रगटली ती मुख्यत्वे ओवी आणि अभंग ह्या छंदांवाटे. क्वचित पदेही ह्या संतांनी गाइली आहेत. पण संतमालिकेत रामदास हा असा ' समर्थ ' संत होऊन गेला, की त्याने ओवी आणि अभंग यांच्या बरोबरीने अनेक वृत्तांचाही अवलंब केला. अनुष्टुभ छंदातली त्यांची रचना विपुल आहे. पण गणवृत्ततही त्यांनी काही थोडीथोडकी रचना केली नाही. त्यांच्या रसनेला भुजंगप्रयाताची तर फारच ओढ दिसते. त्यांचा ' मनोबोध ' ऊर्फ मनाचे श्लोक हे प्रकरण ह्या वृत्तात आहे, हे बहुतेकजण जाणतातच. इतरही अनेक प्रकरणे लिहिताना ह्या वृत्ताला त्यांनी सहजसुलभतेने राबवले आहे. ' सहजसुलभतेने ' म्हणण्याचे कारण आहे. ' सदा सर्वदा योग तूझा घडावा ' अशा अनेक पंक्ती आपणाला बाळपणापासून ठाऊक आहेत. आणि ह्या प्रदीर्घ परिचयामुळे दिसायला हे वृत्त साधे वाटते. पण जरा लक्षपूर्वक गणांकडे नजर टाकली की त्याचा अवघडपणा जाणवेल. ' यमाचा ' हा गण चारदा आला की भुजंगप्रयाताचा चरण होतो. म्हणजेच ह्या रचनेत दोन लघू अक्षरे सलग येऊ शकत नाहीत. दोन लघू अक्षरांना एका पाठोपाठ येण्याला ज्यात वाव नाही त्याचा अवघडपणा रचनाकाराला सांगायला नको. सुम, कमला, बालक अशा घडणावळीचे भाषेतले सर्व शब्द ह्या वृत्ताला वर्ज्य होतात. मग कमल, नयन, यांसारख्या लघू त्र्यक्षरी शब्दांबद्दल बोलायलाच नको. असा अवघडपणा असूनही हे वृत्त रामदासांनी लीलया वापरले आहे. [ अर्थात एक गोष्ट मात्र आहे आणि ती त्यांच्या सर्वच रचनेबाबत आहे;–ती ही की वृत्ताच्या बांधणीचा काटेकोरपणा रामदास तितकासा जुमानीत नाहीत. ]

' भुजंगप्रयात 'सारखेच अवघड वृत्त म्हणजे ' तोटक ' होय. एका चरणात चार ' स ' गण ( स = समरा ) हे त्या वृत्ताचे लक्षण होय. म्हणजे, दोन गुरु अक्षरे त्या वृत्तात सलग येऊच शकत नाहीत. रामदासांनी त्यातही रचना केली आहे :

मन मान तुफान चळोन बळें
मग प्रीतिजहाज बुडे सगळें

जरि अंतरहेत चुकेल जनीं
तरि नेमक भाव धरा वचनीं

◠ ◠ ◠

जड चंचळ निश्चळ तीन खरीं
परि सार विचार बरा विवरी
जळ थावर जंगम चंचळ रे
परब्रह्म निरंजन निश्चळ रे

रामदासांना ऱ्हस्वदीर्घाचा विधिनिषेध नाही. ऱ्हस्वाचा दीर्घ वा दीर्घाचा ऱ्हस्व उच्चार वृत्तलक्षणानुसार करून वाचकाला वाट काढावी लागते. 'तोटक'शी थोडेसे साम्य असलेले 'दोधक' वृत्त रामदास डावलणार नाहीत असे अनुमान करून, त्यांचे काव्य धुंडाळणाराला, आपला कयास बरोबर असल्याचा आनंद लाभेल. दोधक वृत्तातही त्यांनी आपली लेखणी फिरविली आहे.

चंचळ वैभव हें बहुतांचें
देखत देखत जात जनाचें
येक चढे दुसरा पडताहे
येक पडे दुसरा रडताहे

◠ ◠ ◠

सार असोन असारचि घेणें
चिद्रप सांडुनि विद्रप होणें
सुंदर सांडुनि बांदर घेती
साकर सांडुनि घर्डित माती

◠ ◠ ◠

काकविलोकन हंस करीना
सज्जन दुर्जनसंग धरीना
अमृत जाउनि वीष भरीना
सूर्य कदा रजनीस वरीना

अशी कितीक अवतरणे देता येतील. ही रचना पाहून, रामदासांची लेखणी लीलाविहरिणी आहे, असे म्हणावेसे वाटते. तोटक आणि दोधक ह्या वृत्तांत ज्याची

रचना त्याची ' मोदक ' वृत्तातही रचना असावी, हे ओघानेच येते. मोदक वृत्त नेमके तोटकच्या उलट आहे. म्हणजे, तोटकमध्ये चार स गण ( ⏑ ⏑ – ) असतात तर मोदकमध्ये चार भ गण ( – ⏑ ⏑ ) असतात. ( रूपदेवकृत स्तवमाला मोदक वृत्तात आहे असे छंदोरचनाकारांनी नमूद केले आहे. ) मोदकमधील चरणान्तीच्या दोन लघूंबद्दल एका गुरूची योजना केली की दोधक होते, हे दिसून येईल. मोदक वृत्तात रामदासांनी संपूर्ण श्लोक रचलेला आढळत नाही. पण मोदक + दोधक असा एक सलग चरण केला की तो ' हेमकला ' वृत्ताचा म्हणावा लागतो. आणि ह्या हेमकला वृत्तात रामदासांचे काही श्लोक आढळतात :

योग सदा श्रम आश्रम ही श्रम जन्म बहुश्रम हा निरसावा
सार विचार बरा विवरा जन हो मननासि तुम्ही सरसावा
सज्जन-संग खरा चि धरा परि प्रत्ययमेघ बरा वरसावा
भाव धरूनि स्वभाव तजा॰मग हासिल लाभ परात्पर सावा

ह्या वृत्ताला कोणी ' उमा ' म्हटले आहे तर कोणी ' सवाई ' म्हटले आहे. पण ते बरोबर नसून, सात भ गण ( – ⏑ ⏑ ) आणि शेवटी दोन गुरू अशी रचना ' हेमकला ' वृत्ताची होय असा निरंजन माधवाचा स्पष्ट अभिप्राय आहे.

' हेमकला 'च्या चरणारंभी दोन लघूंची जोड दिल्यास त्या वृत्ताला ' कामकला ' म्हणावे असे छंदोरचनाकारांनी सांगितले आहे. त्यांना उदाहरणादाखल रामदासांचा श्लोक देता आला असता—

जनसंग जनीं मनभंग मनीं सुखसार वनीं वनवास करावा
जनसंग नको मनभंग नको वरपंग नको हरिसंग धरावा

' हेमकला ' वृत्ताच्या चरणान्तीचा एक गुरू कमी झाला तर ते वृत्त ' मदिरा ' बनते आणि ' कामकला ' वृत्तातील शेवटचा एक गुरू कमी केला तर ते ' दुर्मिल ' ठरते. रामदासांनी ह्यांचीही उदाहरणे पुरविली आहेत.

**मदिरा :—**

प्रीतिकळहो करितां बरवें परि सख्य कुळाचें पातक रें
सज्जनसंग दुरूनि बरा परि निंदक दुर्जन घातक रे
सन्निध काक कलालितसे परि ते सुखदायक चातक रे
दास म्हणे रघुनाथ करी तरि बोलतसे हें जातक रे

**दुर्मिल :—**

नर सुंदर फार विकार करी परि बोलतसे मनिंचा कपटी
परि अंतरचोर निशाचर हा वर वेश धरूनि बळें दपंटी

जगतीतळ मंडळ धुंडितसे जन पावन भूवन पंचवटी
भिक्ष मागत रावण हिंडतसे खट चावट चाट कुटील जटी

रामदासांनी ह्याबाबतीत आणखीही प्रकार केले आहेत; ते म्हणजे 'दुर्मिल'मधला आरंभीचा एक लघु कमी करून श्लोक लिहिले आहेत, त्याचप्रमाणे 'कामकला'-मधीलही सुरुवातीच्या एका लघूला संक्षेप देऊन श्लोक रचले आहेत. उदाहरणे देऊन पसारा वाढविण्याची आवश्यकता नाहीं. जिज्ञासूंना मूळ ग्रंथ वाचून आनंद घेता येईल आणि त्यांच्या लक्षात येईल की पिठी, रवा, मैदा, गूळ, साखर, खोबरे, तूप, एवढ्या साहित्याने तऱ्हतऱ्हेचे खाद्यप्रकार करणाऱ्या गृहिणींचा सुगरणपणा वृत्तविलासाबाबत रामदासांनीही दाखवला आहे. [ माधवराव पटवर्धन ह्यांच्या नजरेस हे वृत्तविलसित आले असते तर त्यांनी नोंद घेऊन नामाभिधानही केले असते. ]

'मालिनी' आणि 'वसंततिलका' ह्या वृत्तातही त्यांनी काही करुणाष्टके, स्तोत्रे आणि स्फुट प्रकरणे लिहिली आहेत. 'सवाया' हा रचनाप्रकारही काहीसा वृत्तस्वरूपीच आहे. 'काहीसा' आणि 'स्वरूपी' हे मोघमपणा दर्शविणारे शब्द-प्रयोग करण्याचे कारण रामदासांची ही रचना तालबद्ध पण अक्षरसंख्येच्या दृष्टीने बरीच शिथिल दिसते. तरी पण मध्येच त्यात एकादी सवाई शुद्ध जातिस्वरूपात आढळते. उदाहरणार्थ :

जय रघुनंदन पूर्ण कृपाघन वामांकीं सति शोभतसे
सन्मुख लक्षुमण भरत शत्रुघन सन्मुख मारुति तो विलसे
अंगद सुग्रिव भक्त बिभीषण जांबुवंत गुज गर्जतसे
नाम विशेष पट्टाधीश रामदास गुण गाजतसे

ह्यातील चवथ्या चरणातील ओढाताण ( किंवा मुद्रणदोष ? ) सोडल्यास, ही रचना 'हरिभगिनी' जातीत आहे हे दिसून येईल. सवायातील आणखी एक उदाहरण :

रामदूत वायुसूत भीमगर्भ जुत्पती
जो नरांत वानरांत भक्ति प्रेम वित्पती
दासदक्ष स्वामिपक्ष नीज काज सारथी
वीरजोर शीरजोर धक्कधिंग मारुती

ह्या श्लोकाकडे अवधानपूर्वक पाहिल्यास गुरु–लघू अशा क्रमाने १५ अक्षरांचा एक एक चरण इथे बनला आहे. रचना गणवृत्ताची आहे. ह्या वृत्ताला 'देवराज' असे संबोधण्यात आले आहे. ( ह्या वृत्ताबद्दल अधिक ऊहापोह पुढे येणार आहे. ) रामदासांच्या पदसंग्रहात :

ज्या ज्या वेळीं जें जें होइल तें तें भोगावें
विवेकाला विसरुन आपण कष्टी का व्हावें

हें चंद्रकान्त जातीचे पद आढळते. 'विवेकाला' ह्यातील 'वि' मात्रादृष्ट्या दीर्घ उच्चारावा लागतो. किंवा 'वे' चा उच्चार विलंबित (म्हणजे तीन मात्रांचा) करावा लागतो. पण अशी ओढाताण रामदासी रचनेत ठायी ठायी आढळेल.

भूतकाळीं कर्म केलें वर्तमानीं आलें
त्याचें सुख मानूनिया भोगितों आपुलें

ह्या पदातील प्रत्येक लघू अक्षर दोन दोन मात्रांचे समजून म्हटल्यास 'शुक्रकला' छंदाचे हे उदाहरण होईल. पण उच्चाराची ही शिस्त सबंध पदभर न राहिल्याने, लघूचा उच्चार ऱ्हस्वच करणे भाग पडल्याने छंदात्मक रूप अखेरपर्यंत टिकून राहात नाही; आणि मग 'चंद्रकांत' जातीशी नाते जुळते.

**'ग्रंथिचा अर्थ काढावा'** ह्या स्फुटाचा आरंभ 'इंद्रवज्रा' वृत्ताने झाला आहे. तर 'प्रपंचाचें वेड' शालिनी वृत्तात प्रगटले आहे. पांगारकर-संपादित श्रीसमर्थ ग्रंथ-भांडारात 'शार्दूलविक्रीडित' कुठे दिसेल की नाही, ह्या जिज्ञासेने पाने चाळता चाळता "सीतानाथ समर्थ" ह्याकडे नजर गेली आणि अपेक्षापूर्तीचे समाधान लाभले. हे पंचश्लोकी लघुरामचरित्र शार्दूलविक्रीडितात आहे. धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेने प्रकाशित केलेल्या "करुणाष्टकें-धाट्या-सवाया" या संग्रहात ह्या प्रकरणाला 'रामगुण' असे नाव आढळते. हा संग्रह पाहणाराला समर्थांची शार्दूलविक्रीडिता-मधील आणखी बरीच रचना पाहावयास मिळेल. त्यांतील हा एक नमुना पाहावा :

रामेंवीण विराम भासत सभा कोण्ही न राहे उभा
सीता सुंदर कुंजरावरि करीं माळा विराजे शुभा
सर्वै राजकुळें उगींच विकळे निर्वीर जाली धरा
ऐसा शब्द न साहवे चि सहसा रामानुजा दुर्धरा

रामदास 'स्रग्धरा' वृत्तही किती सहजपणे लिहितात पाहा :

कानाडी रामा वोढी गगन गडगडी वीज जैसी कडाडी
वज्राची शक्ति थोडी रघुविर-शर तो मेरुमांदार फोडी
रामाज्ञा तो न मोडी शरण म्हणविता बाण त्यातेंचि झोडी
नेमाचा बाण काढी दशमुख नृप तो मोक्षपंथासि धाडी

अशा प्रकारची गुणमंडित श्लोकरचना पाहिली म्हणजे रामदासांना पंडित कवींच्या कळाही चांगल्याच आकळल्या होत्या, असे स्पष्ट दिसते.

पांगारकर-संपादित ग्रंथभांडारातील "**परमसुंदर तें पद पावसी**" हे प्रकरण द्रुतविलंबित वृत्तात आहे. ह्या वृत्तात पदोपदी ठेचकळायला होत असल्यामुळे संतकवी ह्या वाटेने गेलेला बहुशा आढळणार नाही. ह्या वृत्तांतले उपान्त्य ऱ्हस्व अक्षर वगळूनही रामदासांनी रचना केली आहे. 'जन्मसफलता' ह्या प्रकरणातील नमुन्यादाखल हा श्लोक पाहावा :

निरुपणीं बरवें मन घाला । विवरता अभिमान निघाला
षडरिपूवरता वर घाला । उरि पहा न दिसेचि अघाला

भीमरूपी स्तोत्रांपैकी "नमन गा तुज हें भिमराया" आणि "भिम भयानक तो शिक लावी" ही दोन स्तोत्रे ह्याच वृत्तांतली आहेत. हे वृत्त संस्कृतात आढळले नाही, सबब याचे 'लंका' हे नाव 'जळतसे त्रिकुटाचळ लंका' ह्या रामदासांच्या चरणातूनच डॉ. मा. त्रिं. पटवर्धन ( छंदोरचनाकार ) यांनी नमूद करून घेतलें आहे.

"**तुजवीण रामा मज कंठवेना**" ह्या पालुपदाचे जे सुपरिचित करुणास्तोत्र आहे त्याची रचना वृत्तदृष्ट्या संमिश्रच आहे :—

परतंत्र जीणें कंठू किती हे
उच्चाट माझे मनिं वाटताहे
ललाटरेखा तरि पालटेना
तुजवीण रामा मज कंठवेना

आम्हां अनाथा तूं एक दाता
संसारचिंता चुकवी समर्था
दासामनीं आठव वीसरेना
तुजवीण रामा मज कंठवेना

ह्यांतील दुसरा, सहावा आणि सातवा हे चरण इंद्रवज्रेचे आहेत. तिसरा चरण **उपेंद्रवज्रेचा** आहे. इंद्रवज्रा आणि उपेंद्रवज्रा यांचे मिश्रण असलेली रचना फार पूर्वीपासून होत आली असून ह्या संमिश्र वृत्ताला '**उपजाति**' असे संबोधण्यातही आले आहे. पण इंद्रवज्रेत जिथे दोन लघू अक्षरे सलग येतात तिथे एकच गुरू अक्षर योजून 'आम्हां अनाथा०' हा पाचवा चरण बनविला आहे. अर्थात हा एक नवीनच प्रकार होय. संस्कृतात हे वृत्त नाही. शिवाय, इंद्रवज्रेतल्या पहिल्या गुरूबद्दल दोन लघू अक्षरांचा उपयोग करून आणखी एक प्रकार करण्यात आला आहे. "तुजवीण रामा मज कंठवेना" हे पालुपद ह्या प्रकाराचे आहे. त्याला '**केकिरव**' असें नामाभिधान मिळते. अशा रीतीने, ह्या करुणास्तोत्रात अधिकात अधिक संमिश्रण सांपडते असे ओघानेच म्हणावे लागते.

'प्रमाणिका' आणि 'चामर' ह्या वृत्तांचा निर्देश असलेली काही काव्य-रचना रामदासांच्या लेखनसंभारात आढळते. हे वृत्त-नाम-निर्देश खुद्द स्वामीनीच केलेले असावेत किंवा त्यांच्या काळापासून त्यांच्या संप्रदायात प्रमाण मानले गेले असावेत. पण ह्या वृत्तांचा निर्देश करून सादर करण्यात आलेली काव्यरचना विचक्षणेने पारखून घेऊ जाता, हिच्यात दोन लगावलीचे मिश्रण दिसते.

**रुद्र हा समुद्र देखता क्षणीं उठावला**
**—ᴗ — ᴗ|—ᴗ—ᴗ|— ᴗ — ᴗ|—ᴗ—**

ही एक रचना; तर, कधीकधी ह्या चरणाच्या सुरुवातीलाच एका लघु अक्षराची भर घालून रचना केलेली दिसते. उदाहरणार्थ :

**समर्थ दास हा भला कपीकुळांत शोभला**
**ᴗ—ᴗ —|ᴗ — ᴗ—|ᴗ—ᴗ—|ᴗ —ᴗ—**

पहिल्या प्रकारात पंधरा आणि दुसऱ्यात सोळा अशी अक्षरसंख्या भरते. एकात गुरू–लघू असा क्रम आहे, तर दुसऱ्यात लघू–गुरू असा क्रम आहे. स्वाभाविकच, छंदःशास्त्राच्या दृष्टीने, लक्षण बदलते.

"समर्थदास हा भला" हा एवढाच अष्टाक्षरी चरण **'प्रमाणिका'** वृत्ताचा होतो. पण ह्या लघू–गुरू क्रमाने सोळा अक्षरांचा एक चरण केल्यास ते वृत्त **'कलिंदनंदिनी'** होते. कलिंदनंदिनीचे सुरुवातीचे लघू अक्षर गाळण्यात आल्यास उरलेला पंधरा अक्षरी चरण **'देवराज'** वृत्ताचा होतो. असे मिश्रण असलेली काव्यरचना रामदासांनी एका ठिकाणी 'प्रमाणिका' म्हणून तर दुसऱ्या ठिकाणी 'चामर' म्हणून सादर केली आहे. एकवाक्यतेचा हा अभाव आणि ही गल्लत आढळल्यामुळे काही शिस्त लावण्यासाठी, आद्य शंकराचार्यांच्या (म्हणजे प्राचीनतम) उदाहरणांवरून, भिन्नत्व स्पष्ट करणारी, देवराज आणि कलिंदनंदिनी ही नामाभिधाने (प्रमाणिकेच्या पंगतीस) बसविण्यात आली आहेत. रामदासांना छंदःशास्त्राचा अभ्यास करण्याची गरज वाटली नसावी. शंकराचार्यांच्या त्या स्तोत्रांच्या चालीवर आपलीही स्तोत्ररचना होत आहे, एवढेच त्यांनी स्थूलमानाने पाहिले असावे.

ह्या 'प्रमाणिका'–वृत्तोक्त स्तोत्रात सुरुवातीलाच एक श्लोक आहे तो म्हणजे :—

अन्जनीसुत प्रचण्ड वज्रपुच्छ कालदण्ड
शक्ति पाहता वितण्ड दैत्य मारिले उदण्ड

हा होय. ह्याचा गुरू–लघूक्रम पाहू जाता, 'देवराज'च्या चरणाच्या शेवटी एक एक लघू अक्षर जादा घातले असल्याचे दिसून येते. तेव्हा हा आणखी एक वृत्त-

प्रकार आहे की काय, असे वाटण्याचा संभव आहे. पण ध्यानात घ्यायचे ते हे की ह्यातील शेवटचे अक्षर अर्धोच्चारित असल्यामुळे, गणमात्रांच्या हिशेबात त्याची गणना होत नाही. तेव्हा, हा श्लोकही ' देवराज 'चाच आहे. " असारास भुलूं नको, सार पहा " ह्या प्रकारणाच्या सुरवातीच्या ( ह्याच बांधणीच्या ) श्लोकाबद्दल हीच विचार-सरणी प्रतिपादता येते.

रामदासांच्या पदसंग्रहात :

मांबुजाननं मांबुजाननं मांबुजाननं मांबुदेहि मे ॥ धृ० ॥
योगिरंजनं चापभंजनं जनकजापतिं विश्वमोहनं
विबुधकारणं शोकहारणं अरिकुळांतकं भयनिवारणं
जय कृपालयं दासपालयं चरणपंकजं देहि मे लयं

असे एक संस्कृत पद आढळते. यातील पहिला चरण ( धृपद ) गणवृतात मोडेल. पण ही गणस्वरूप बांधणी सर्व चरणांत राहिली नाही; तिने मधूनमधून मात्रारूप धारण केले आहे. हे मात्रारूप ' **कामदा** ' जातीचे म्हणावे. आणि गणस्वरूपी रचना '**पंक्तिका**' किंवा '**भरालिका**' होईल. स्थूलपणे बोलायचे म्हणजे, रामदासांनी ' कामदा ' चालीवर हे पद लिहिले असावे.

आता आणखी एका वृत्ताचा विशेष विचार करावयाचा आहे

" तुजवीण रामा मज कंठवेना " ह्या करुणास्तोत्राबाबत लिहिताना वर म्हटले आहे की, " **आम्हां अनाथा तूं एक दाता** " ह्या लगावलीचे वृत्त संस्कृतात नाही. मग, रामदासांच्या रचनेत हे कुठून आले, असा प्रश्न पडतो आणि मोरोपंतांच्या दोन स्फुट कवितांची आठवण येते. संस्कृतात नसलेल्या एका वृत्तावर ( किंवा जातीवर ) त्यांनी ती दोन स्फुटे लिहिली आहेत :

( १ ) हृदया बरें विचारी । नामस्मरें न तापे ॥ धृ० ॥
भगवान अजामिळाला । नामें गजा मिळाला
गणनातिगें गिळाला । नाम प्रताप पापें ॥ १ ॥
ज्यांचे मनांत थारें । गिळिले अराति सारे
प्रभुच्या असें न वा रें । केलें रणांत चापें ॥ २ ॥
नामींच भाव राहो । दुष्कर्मपंक वाहो
सौख्या मयूर लाहो । जें मोजवे न मापे ॥ ३ ॥

( २ ) रसने न राघवाच्या । थोडी यशांत गोडी ॥ धृ० ॥

निंदा स्तुती जनाच्या । वार्ता वधूजनाच्या
खोट्या व्यथा मनाच्या । कांहीं न यांत जोडी ॥ १ ॥
साधूच्चिया सदातें । सुख देतसे सदा ते
श्रवणीं सुधा मदातें । सोडून हात जोडी ॥ २ ॥
विनवी मयूर भावें । सखि, हेंचि नित्य गावें
मजला द्रवोनि पावें । दुसरें न बन्ध तोडी ॥ ३ ॥

आपल्याकडील छंदःशास्त्रकारांना पत्ता नसलेली ही चाल मोरोपंतांनी कुठून घेतली असेल? असे वाटतें की अन्य भाषिकांच्या वाङ्मयातला पद्यप्रकार संसर्गाने अनुकारला जाणे अशक्य नाही. 'रसने न राघवाच्या–' ही रचना फारसीतून मराठीत आली असावी, असे डॉ. पटवर्धन (माधव ज्यूलियन) सूचित करतात आणि तीमधील गणमात्रांच्या बांधणीचे जे वेगवेगळे प्रकार आढळतात त्यांच्या अनुरोधाने आनंदकंद, अनुराग, कंदर्प, रसना, अशी निरनिराळी नावे निश्चित करतात. तोच प्रकार रामदासांच्या

"आम्हां अनाथा तूं एक दाता"

ह्या रचनेबाबत नसेल ना? "आम्हां अनाथा तूं एक दाता" किंवा––

येकांत गुव्हा निर्वात जेथें । चर्चा करावी अद्वैत तेथें

अशा पद्यपंक्ती रामदास लिहून जातात त्या फकीरांच्या तोंडून ऐकलेल्या चालीवरून तर नसतील ना? छंदोरचनाकारांनी ह्या गणांच्या पद्यप्रकाराला "**स्वानंदसम्राट**" हें नांव स्वतःच्या रचनेवरून दिले आहे आणि 'हारीत द्विरावृत्ता' असे लक्षण सांगितले आहे. म्हणजे 'हारीत'चा चरण दोनदा घेतला की 'स्वानंदसम्राट'चा चरण होतो. हारीत 'प्राकृत पैङ्गलम्' असून त्यांनी त्याची लगावली – – ᵕ – – अशी दिली आहे. ह्यावरून असे दिसते की, 'स्वानंदसम्राट'ची रचना त्यांना आढळली नाही; आढळली असती तर रामदासांच्या ह्या पद्यरचनेचा त्यांनी उल्लेख केला असता. सारांश, मोरोपंतांच्या 'रसने'प्रमाणे रामदासांची ही 'स्वानंदसम्राट' रचना अवतरली असावी.

पण ह्यासंबंधात दुसराही एक विचार संभवतो. "आम्हां अनाथा तूं एक दाता" ह्या लगावलीचे वृत्त संस्कृतात नसेल. पण ह्यातील 'तूं'च्या जागीं 'प्रभु' अशी दोन लघू अक्षरे घातली तर सबंध चरण इंद्रवज्रेचा होतो. ह्याचाच अर्थ असा की, रामदास स्वभावधर्माप्रमाणे वृत्ताचा शास्त्रशुद्ध काटेकोरपणा ध्यानी न घेता काही फेरफार करतात. बुद्ध्याच होत असेल, असे नाही. इंद्रवज्रा मनात घुमत असताना तिच्यात रचना सुरू झाली असावी; आणि अक्षरांचा अधिक–उणेपणा पेलण्याइतकी, सामावून घेण्याइतकी त्या वृत्ताची प्रकृती असल्यामुळे तसेही चरण रचले गेले

असावेत. प्रकृतीत बिघाड झाला तर पथ्यापथ्याचा विचार करणे भाग येते. पण इंद्रवज्रा तशी नाजूक नाही. किंचित फरकाने ती उपेंद्रवज्रा म्हणून टाकते आणि अन्य किंचित वेषान्तराने तिला 'केकिरव'ही होता येते. त्याच न्यायाने सहावे व सातवे ही जी (इंद्रवज्रेतली) दोन लघू अक्षरे त्यांच्याऐवजीं एक गुरु अक्षर वापरले तरीही चाल अडखळत नाही. ती अडखळली असती तर लक्ष गेले असते. पण तसे लक्ष जाण्याचे कारण न पडल्यामुळे 'आम्हां अनाथा तूं एक दाता' ह्या जडण-घडणीच्या कितीक ओळी इंद्रवज्रेच्या संगतीत नांदत असताना दिसतात, असे म्हणायला काय हरकत आहे ? सारांश, फार्शी वृत्ताचा अनुकार किंवा इंद्रवज्रेचे किंचित वेषान्तर हे दोन्हीही तर्क संभवतात.

रामदास मनस्वी पुरुष होत. त्या व्यक्तिमत्त्वाचाच एक आविष्कार म्हणजे हा संमिश्र वृत्तविलास !—इतर थोर संतांच्या वाणींत न आढळणारा !

संमिश्र वृत्तरचनेची आणखीही एक दोन उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. 'प्रत्यावृत्ति' हा मथळा ज्याला देण्यात आला आहे तो श्लोक असा :

प्रत्यावृत्ति मनासि कृत्य करणें भृत्य ऐसें कथावें
नाना नृत्य विवेक धृत्य चुकवी मृत्य ऐसें मथावें
सर्वां मान्य नव्हे जघन्य रुप तें धन्य चित्तीं धरावें
अन्या अन्य त्यजून पुण्य प्रबळे तें स्वभावें करावें

वरील प्रत्येक चरणात एकोणीस अक्षरे असून, बारा व सात अशा अक्षरसंख्येत प्रत्येक चरण विभागला जात आहे. तथापि समग्र चरण शार्दूलविक्रीडिताचा नाही. पहिली बारा अक्षरे शार्दूलविक्रीडिताप्रमाणे आहेत; पण उरलेली सात अक्षरे स्रग्धरा (किंवा मंदाक्रान्ता म्हणा) ह्या वृत्ताच्या चरणातल्या शेवटच्या सात अक्षरांच्या लगावलीची आहेत.

संमिश्र रचनेचा आणखी एक प्रकार आढळतो तो येणेप्रमाणे :

लक्षालक्ष दिजेल नरतनु न मिळे हीत याचें करावें
संसारीं असिजेल तंवरि स्वहिता दृढ चित्तीं धरावें
निंदा वादविवाद हरिजन सकळै न्यून्य त्यांचें नसावें
अंतीं भ्रांति पडेल म्हणुनि हरिचे नाम साचे वसावें

या श्लोकाच्या प्रत्येक चरणाच्या आरंभींची सात अक्षरे शार्दूलविक्रीडिताची आहेत. ह्या सात अक्षरांनंतरचा उरलेला पहिला व तिसरा चरण स्रग्धरेच्या लगावलीने आणि दुसरा व चौथा चरण मंदाक्रान्तेच्या लगावलीने पुरा करण्यात आला आहे. ह्यामुळे पहिला व तिसरा चरण २१।२१ अक्षरांचा आणि दुसरा व चौथा चरण २०।२०

अक्षरांचा झाला आहे. दुसऱ्या व चौथ्या चरणांतील ही एका लघ्वक्षराची उणीव नजरचुकीने झाली असेल, असे म्हणायलाही अवसर नाही. कारण, बाकीचे जे स्रग्धरेचे श्लोक रामदासांनी लिहिले आहेत त्यात अशी एका लघ्वक्षराची कमतरता कुठेही दिसून येत नाही. तेव्हा, प्रस्तुत श्लोकातील दुसऱ्या व चौथ्या चरणात ( संमिश्रणाबाबत अधिकस्याधिकं फलम् हे श्रेय साधण्यासाठी ) ह्या प्रयोगप्रवण संतकवीने मन्दाक्रान्ता बुद्ध्याच अंगीकारलेली दिसते, असे म्हणणे न्याय्य होईल. प्रयोगप्रवृत्ती ही त्यांच्या स्वभावातच दिसते. धाट्या म्हणून जे एक त्यांचे प्रकरण आहे त्याची संख्या पंचवीस आहे. ह्यामध्ये विषय किंवा विचार यांची एकसूत्रता नाही. केवळ अक्षरसंख्येच्या चढत्या क्रमाच्या निरनिराळ्या पंचवीस वृत्तांमध्ये रचना करून पाहावयाची एव्हढ्याच उद्देशाने त्यांनी तो उद्योग केलेला असावा.

वृत्तविलासाचे वैचित्र्य प्रस्थापित करण्यासाठी येथवर जी उदाहरणे दिली आहेत ती निवडताना अशी एक दृष्टी ठेवली होती की, त्यांच्यावरून रामदासांचा आणखीही एक गुणविशेष लक्षात यावा. तो म्हणजे यमकानुप्रासाचा हव्यास. ते अनेक वृत्तांचा वापर जसा लीलया करतात तसाच त्यावर यमकानुप्रासांचा साजही सहजतेने चढवितात. ह्या बाबतीत ते सिद्धहस्त दिसतात. त्यांनी वाङ्मयाराधनाच त्या दृष्टीने हेतुपुरस्सर केलेली दिसते. विशेषतः आयुष्याच्या पूर्वार्धात पुरश्चरणाच्या काळात. ‘ कशावरून ? ’ असा कोणी प्रश्न केल्यास त्यांचेच कितीक श्लोक पुराव्या-दाखल सादर करता येतील. पण ते इथे देण्याच्या भरीस न पडता, त्यांपैकी एकच उद्धृत करतो. त्याच्यामुळे, येथवरच्या विवेचनात न आलेल्या वृत्ताचा - शिखरिणीचा - जिला ‘ महिम्नधाटी ’ असे बाडात उल्लेखिलेले आहे तिचा नमुना मिळून रामदासांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नाची साक्ष मिळेल.

प्रबंदाचीं कामें परम कठिणें जाणत कवि
बहू धाटी मुद्रा सकळिक जना मानत नवी
महां गद्यें पद्यें विवरत सदा बोलत खवी
परीक्षेचे साधू बहुविध जनीं जाणत कवी

* * *

११.

# समर्थांची शब्दसृष्टी

संतश्रेष्ठांच्या मालिकेत रामदासांचे स्थान आगळे आहे. संसाराविषयी उदास राहून, सर्वसंगपरित्याग करून, केवळ ईश्वरभक्तीत तल्लीन व्हावे आणि मोक्षप्राप्ती करून घ्यावी असा इतर भाविक संतांप्रमाणे केवळ भक्तिमार्गाचा बडिवार त्यांनी गाइला नाही. संसारातही राहावयाला हरकत नाही, पण तो नेटका करावा; आणि तो करत असताना गाढ परमार्थविवेकही अंतरी बळावला पाहिजे, असे ते आवर्जून सांगतात. खायला आहे तर आहे, नाही तर नाही, असला नेभळा भक्तिपंथ त्यांना मान्य नाही.

ज्याचा ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार ।
दुश्चितपणें तरी पोर । वेढा लावी ॥ (दा. बो. ११-३-१९)

कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ॥
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ (दा. बो. ११-३-२५)

अशी त्यांची शिकवण असून तिचा अर्थ स्पष्ट आहे. आपापल्या व्यवसायात खबरदार असा, गाफिलपणा कराल तर एखादा पोरदेखील टांग मारून जाईल, असे ते बजावतात; आणि ऐतखाऊपणाचा धिक्कार करतात. भोजनासाठी पाटावर बसायचा अधिकार त्यालाच आहे की ज्याने काही रोजगार कमावला आहे. ‘ गुंतल्या लोकांस उगवी ’ हेदेखील त्यांनी त्याच उच्छ्वासात सांगितले आहे. फक्त आपल्या पोटापाण्याचा प्रश्न सोडवला म्हणजे झाले असे नाही. जे कोणी घोटाळ्यात पडले असतील त्यांचा गुंता सोडवणे आणि यथाशक्ती आपले शरीर दुसऱ्यांच्या कारणी लावणे हे त्यांनी मानवी इतिकर्तव्यतेच्या कक्षेत समाविष्ट केले आहे. पोटातले पाणी न डहुलता केवळ ऐषआरामात सुखासीनपणे लोळत राहणे त्यांना मंजूर नाही. असा हा प्रपंचवादी संत इतर वारकरी संतमहंतांपेक्षा निश्चित वेगळा नाही का ?

त्यांचा आगळेपणा अनेक प्रकारचा आहे. “ इतर संतकवी ज्ञानेश्वरापासून आलेले वळण गिरवीत होते तर रामदासांनी ( ते वळण गिरवूनही ) निराळ्या प्रकारचा उपक्रम केला होता. थोडक्या वेळात त्यांनी इतके मठ उत्पन्न केले होते की, आजच्या अत्यंत कर्तृत्ववान अशा माणसासदेखील आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाही. शिवाजीने आपल्या राज्याची स्थापना केली त्याच्यापूर्वी त्याला अगोदर लहानसे राज्य बापाकडून मिळाले होते आणि कर्ती माणसे मिळाली होती. पण रामदासांस सर्व नवीन सृष्टी करावयाची होती...रामदासांनी बंगाल-पंजाबखेरीज

सर्व हिंदुस्थानभर प्रवास केल्याचा पुरावा भरपूर आहेच. भिक्षेवर किंवा स्वखर्चानेच हा प्रवास केला असावा. तुकोबांनी फारसा प्रवास केला नाही. देहूपासून पंढरपूरपर्यंत ज्या वाऱ्या केल्या असतील तेवढ्याच! तीर्थाटने करण्याबद्दल रामदासांचा उपदेश आहे." हा अभिप्राय कोणा पंथाभिमानी भाविकाचा नसून डॉ. श्री. व्यं. केतकर यांच्यासारख्या अत्यंत विचक्षण अशा बुद्धिवंताचा आहे.

रामदासांच्या काव्यनिर्मितीकडे पाहिले म्हणजेही आगळेपणा जाणवतो. बहुतेक संतांच्या वाङ्मयात ओवी, अभंग, अनुष्टुप, हे छंद आणि चालीवरची काही पदे हे रचनाप्रकार आढळतात; पण रामदासांनी पंडितकवींच्याप्रमाणे अनेक वृत्तांचा अंगीकार करून आपली कविता सजविली आहे. रामदासांचे आगळेपण त्याही बाबतीत नजरेत भरणारे आहे. विषयवैचित्र्याकडे पाहून तर कोणीही थक्कच व्हावे. संसाराभिमुखता हा त्यांचा प्रवचन-विशेष असल्यामुळे, संसाराच्या नेटकेपणासाठी अनेक विषयांवर भर देणे, जीविताच्या विविध अंगांकडे चित्त वेधणे, हे त्यांच्या कवित्वाचे स्वाभाविक वैशिष्ट्य ठरायलाच पाहिजे होते आणि ते तसे ठरले आहे. मनस्वी व्यक्तिमत्वाचे असे अनेक पैलू त्यांच्या कीर्तिदेहाकडे दृष्टिक्षेप करणाराच्या नजरेत भारतात.

रामदासांच्या काव्यातील शब्दसृष्टीही त्यांच्या मनस्वी व्यक्तिमत्त्वाची निदर्शक आहे. त्यांच्या भाषेचा रांगडेपणा स्पष्ट करण्यासाठी आधी घरचाच दाखला घेणे बरे. समर्थ रामदासांचे वडील बंधू श्रेष्ठ गंगाधर. 'रामीरामदास' ह्या नांवाने ते कविता करीत. आणि त्यांची कविता काही थोडीथोडकी नाही. पण त्यांची भाषा रामदासांच्या भाषेपेक्षा उजवी वाटते.

> कल्पायुषी जे सुरगण। तेहि कल्पान्तीं पावती मरण
> ब्रह्मादि प्रकृति पावती निर्वाण। तेथे मनुष्य ते किती॥

रामीरामदासांची (श्रेष्ठ गंगाधर यांची) ही भाषा भारदस्त आहे, शुद्ध आहे. तथापि, एकंदर भाषेची मोडणी ध्यानी यायला असली एखादीच ओवी निवडणे बरे नव्हे, असे कोणी म्हणेल. तरी, हा आणखी एक नमुना पाहावा :

> तो राजपुत्र देखोनि सपत्नि। चरफडूं लागली पडली प्रेत्नी।
> गरळ बालका घातली यत्नीं। संकीर्ण जालें रडतसे॥

ह्या ओवीत 'प्रयत्न' ह्याऐवजी प्रेत्न' आणि 'झालें' बद्दल 'जालें', हा वापर रामदासांच्या धर्तीवर दिसतो. पण 'यत्न' शब्द शुद्ध स्वरूपात आहे. रामदास 'येत्न' असा शब्द वापरतात.

पण रामदासांच्या भाषेचा आगळेपणा स्पष्ट ध्यानी यायला समकालीन तुल्यबलाकडे दृष्टिक्षेप टाकणे उद्बोधक होईल. तुकारामबोवा हे रामदासांचे समकालीन.

ह्या समकालीनांच्यामधील एक प्रकारचा वेगळेपणा डॉ. केतकरांनी दाखविला तो वर येऊन गेलाच आहे. पण भाषेच्या बाबतीतही हे दोघे भिन्न प्रकृतीचे आहेत. तुकारामबोवांच्या अभंगांतील वाणी मधुर आहे; तर रामदासी गिरा अधिक रूक्ष किंवा खडबडीत आहे, हे कोणाही सर्वसामान्य वाचकाला जाणवते. सारखा भावार्थ असलेले ह्या दोघां संतांचे उद्‌गार तुलनेला घेतले असता, तफावत चटकन जाणवेल. तुकारामबोवांचा अभंग :

जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुलें ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनाचें चित्त ॥
ज्यासी अपंगिता नाहीं । त्यासी धरी जो हृदयीं ॥

रामदासांची ओवी :

आडलें जाकसलें जाणावें । यथानशक्ति कामासि यावें ।
मृद वचनें बोलत जावें । कोणी येकासी ॥
दुसऱ्याचे दुःखें दुःखी व्हावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणीमात्रांस मेळऊन घ्यावें । बऱ्या शब्दें ।

साधू कसा ओळखावा आणि देवाचे लक्षण कोणते, असा मुमुक्षूने प्रश्न केल्यावरून तुकारामबोवांनी उत्तरादाखल वरील अभंग रचला असेल असे वाटत नाही. रंजल्यागांजल्याची कणव येऊन त्यांच्या क्लेश–चिंता–निवारणासाठी जे कनवाळूपणाने झटतात त्यांचे चरित्र अवलोकताना अंतःकरण उचंबळून येऊन तुकारामबोवांच्या मुखातून उद्‌गार उमटला आहे की ‘ देव किंवा साधू म्हणतात ते ह्या सज्जनांव्यतिरिक्त दुसरे का कोणी आहेत ? ’ तोच चारित्र्यविशेष रामदासांनाही जाणवला तेव्हा ते तसे बोलून गेले आहेत. दोघांच्याही उक्तींचा मथितार्थ एकच आहे हे दिसून येईल. पण भाषा मात्र निराळी आहे. आणि ही भाषा व्यक्तिमत्त्वाची निशाणी होय.

तुकाराम जातीने कुणबी; तर रामदास जातीने ब्राह्मण. सद्यःकाली विद्यामंदिराची द्वारे सर्वांना सारखीच उघडी असल्यामुळे अभिव्यक्तीच्या भाषेच्या बाबतीत जातिभेदपरत्वे फारसा फरक पडायला नको. तरीसुद्धा सूक्ष्म अभ्यासकांना तो जाणवणे शक्य आहे. पण तीनशे वर्षांपूर्वी शिक्षणसंपादनाची संधी व साधने सर्व जमातींना सारखीच उपलब्ध नव्हती. उच्चवर्णीयांना जी दारे सुलभपणे उघडी होती ती कनिष्ठवर्णीयांना तशी नव्हती. परिणामी उच्चवर्णीयांची भाषा कनिष्ठवर्णीयांच्यापेक्षा अधिक प्रौढ, सरस असायची आणि म्हणूनच रामदासांची भाषा तुकारामबोवापेक्षा अधिक सोज्ज्वळ, अधिक प्रसन्न, अधिक भावमधुर असावयाला पाहिजे होती. पण

देखावा दिसतो तो नेमका उलटा ! रामदासांची भाषा खडबडीत आहे, राठ आहे नि तुकोबांची मधुर आहे.

रामदासांच्या शब्दसृष्टीतले काही वेचक शब्द आधी ध्यानी घ्यायला पाहिजेत.

( १ ) **प्रयत्न** आणि **यत्न** यांच्याऐवजी **प्रेत्न** आणि **येत्न** ह्या शब्दांचा वापर सर्रास आढळतो.

( २ ) **देह**ऐवजी **देहे** :--

देहे–देवालयामध्यें । पाहणें देव तो बरा ।
देहे त्यागितां कीर्ती । मागें उरावी ।।

याच पद्धतीने ' महा 'बद्दल ' **माहां** ' :–
देहे खोचले थोर **माहां** विरांचे

( ३ ) देवालय असा शुद्ध शब्द काहीं ठिकाणी योजिला असला तरी **देवाल्यें** असे अनेकवचनी रूप कितीकदा आले आहे. त्याचप्रमाणे ' जननी 'बद्दल वारंवार ' जन्ननी ' असे रूप आलें आहे. जणू काही, मूळ शब्दात नसलेला वजनदारपणाच ते अशा रीतीने आणीत आहेत. ' सुंदरकांड ' बद्दल ' कांड सुंदर्य ' म्हणायला ते बुजत नाहीत.

( ४ ) देह आहे **जाईजणें** ( नाश पावणारा ), आळस उदास **नागवणा** ( नागवणूक करणारा ), आळस **प्रेत्नबुडवणा** ( प्रयत्न बुडवून टाकणारा ), ह्या प्रकारचे क्रियापदावरून बनवलेले शब्द ठायी ठायी सापडतात. **नाचणीं** ( नर्तकी, कलावंतीण ) हाही शब्द ध्यानी घ्यावा.

( ५ ) **चळेना जनीं तोचि आश्रो धरावा** [ अर्थान्तरन्यासाचे हे उदाहरण सुंदर आहे. ] ह्यात ' **आश्रय** ' चा मारूनमुटकून **आश्रो** केला आहे. असेच केवळ नव्हे. जुन्या भाषेत असली रूपे सापडतात.

( ६ ) रामीरामदासांची एक ओवी आरंभी नमुन्यादाखल दिली आहे. तिच्यात ' प्रकृति ' हा शब्द शुद्ध स्वरूपात आहे. अशी, शक्यतो शुद्ध भाषा लिहिणारांचे हे ' समर्थ ' बंधू लिहून जातात :--

प्रकुर्तिचा कळ्हो उठे । जनीं प्रकुर्ति वोहटे ।
प्रकुर्ति मूळ भांडणे । कळ्हो उदंड मीपणें ।।

[ **कळ्हो** = कलह. ( आश्रो = आश्रय, या धर्तीवर ) ]

( ७ ) वृत्ताचीही सोय बघावी लागतेः—**नुधरिता** ( उद्धरले नाही तर ), **चक्कीत** ( चकित ), **परस्तावलों** ( पस्तावलों ) ही वृत्ताच्या सोयीसाठी घडविलेली रूपे असावीत. आणखी उदाहरणे :–**उदीत** ( उद्युक्त ), **उदेग** ( उद्वेग ).

( ८ ) **उच्चाट, डिंगर, वायचाळा, उलंडी,** असले शब्द इतर संतांच्या कवितेंतही आढळतात. मग रामदास ते का स्वीकारणार नाहीत ? त्यांच्या भाषेच्या जडणघडणीला ते फारच अनुकूल.

( ९ ) **वायहुली** आणि **वायबोंब** हे शब्द कोशात नसले तरी सहज समजण्यासारखे आहेत.

ऐकली वोखटी वार्ता । **वायहुली** लुटालुटी ।
**वायबोंब** उठली मोठी । जाणतां भय तूटलें ॥

याच धर्तीचा वायकोळ :

सांडी माझी गोष्टी । वायकोळ ॥

वायफळ व वायकोळ हे एकार्थीच आहेत.

( १० ) **निच** = नित्य ( निच नवा सकळां मनिं भाविसी )

( ११ ) स्तंभावली ह्या अर्थी **स्तंभवोळी** असा समास करायला रामदास कचरले नाहीत.

( १२ ) **अर्हनिश** आणि **व्यर्थ** ह्या शुद्ध शब्दांची रामदासांनी केलेली परवड पाहा :

शोकचिंता आहिर्णेसी । वेर्थ संसार जातसे ॥

ह्याच रीतीने ' व्यंग ' ऐवजी ' वेंग ' चा वापर केलेला आढळेल.

ह्या यादीवरून ध्यानी येईल की, रामदासांची भाषा ओबडधोबड शब्दांनी भरलेली आहे. तुकारामांची भाषा अशी नाही, हे सिद्ध करण्याला अवतरणांचा पसारा मांडायला नको. पुष्कळ वाचकांना तुकारामांचे अभंग तोंडपाठ आहेत, निदान त्यांची चांगली तोंडओळख आहे.

इथेच एक खुलासा करणे जरूर वाटते. तुकारामांची वाणी अधिक सफाईदार आहे, असा ग्रह आज कानांवर येणाऱ्या अभंगवाणीने होतो; कारण पिढीपिढीगणिक तिचे मूळ रूप बदलत जाऊन ती गुळगुळीत झाली असावी, असा युक्तिवाद कुणी केला तर तो सर्वस्वी त्याज्य मानता यायचा नाही. पण तोच न्याय रामदासांच्या वैखरीलाही लावता येईल. तथापि, प्रत्येकाच्या वाणीच्या मूळस्वरूपाचा शोध घेऊन त्यांची तुलना केली तरी स्थूलपणाने डावे-उजवेपणाचे तेच प्रमाण ( Ratio ) आढळून येईल.

रामदासांच्या भाषेचा हा जो ( वर दाखवल्याप्रमाणे ) थाट आहे त्याची कारणे कांही सांगता येतील का ?

एक तर असे दिसते की काळांतराने ' रामदास ' नाम पावलेला हा नारायण किशोरावस्थेत घरातून पळून गेला आहे. बारा वर्षे त्याने जपतपध्यानधारणा ह्यात

९३६८९



घालविली आणि नंतर बारा वर्षे तीर्थयात्रा करीत करीत तो भटकत राहिला. ह्या भ्रमंतीमधून त्याच्या भावी कर्तृत्वाचा आकार ठरला. पण ह्यांतून एक ध्वनित होते की, एक पुरश्चरणाचा काळ सोडला तर, कोठे मुक्काम ठोकून अध्ययनांत त्याने काळ घालविला नसावा. अभ्यासाने होणारे संस्कार त्याच्या वाणीला लाभलेले नसावेत. 'ल्याहावें शुद्ध वाचावें', 'अभ्यास नित्य नूतनू' करावा, असे शिष्यांना त्यांनी आवर्जून सांगितलेले आहे. स्वतःही एकान्तात बारंवार दडी मारलेली आहे. पण त्याचबरोबर, भिक्षेवर चरितार्थ चालवायचा, पण अधिक दिवस कुठे मुक्काम करायचा नाही, आणि देशभर व्याप-आटोप करायचा, हे ज्याचे धोरण त्याला सावचितपणा कचितच मिळाला असणार.

दुसरे कारण असे दिसते की, तुकाराम हा महाराष्ट्रातला तर रामदास हा मराठवाड्यातला. व्यवहारातल्या भाषेचे रूप परगण्यापरगण्याला बदलत जाते. घाट-माथ्यावरच्या मराठी माणसाची भाषा मराठवाड्यातल्या माणसाच्या भाषेपेक्षा वेगळी असणार. तो वेगळेपणाही जमेस धरला पाहिजे.

शिवाय रामदासांची वाणी उमटली आहे ती सर्वसामान्य लोकांच्या परिस्थिती-मधील दैन्य, दुःख, दुरवस्था यांच्या कळवळ्यातून आणि लोकांना सावध करण्यासाठी. अर्थातच ती बऱ्याच अंशी बोली स्वरूपाचीच असणार. ह्यातही दोन प्रकार :– एक ग्रांथिक किंवा सुसंस्कृत भाषेहून वेगळेपणा, आणि दुसरा उच्चारानु-सारीपणा.

विघ्नांच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरि लोटला ।
घर्डिलीं चिर्डिलीं रागें । रडविलीं बडविलीं बळें ॥

ह्यातील घर्डिलीं चिर्डिलीं ही रूपे उच्चारानुसारी आहेत. ह्या रूपांमुळे अष्टाक्षरी छंदात ह्या शब्दांना बसवता आले. पण उच्चारातले लघुत्व जिथे लिपीला सामावून घेता आले नाही, तिथे अक्षरबाहुल्यही पत्करले गेले. उदा.:–रडविलीं, बडविलीं. ( हा चरणार्ध दशाक्षरी झाला. )

बळे गाल सर्वांग तो वर्बडीतो ।

'ओरबडतो' असे येथे म्हणायचे आहे. पण तेवढा शब्द वृत्तात चपखल बसवायचा कसा ? आणि तितकी सवड आहे कुठे ? चला "वर्बडीतो" हे गांवढळ बोलीतलेच रूप घेऊ या. ह्याच वृत्तीनुसार, **प्रणीयलें** ( परिणले, वरिले ), **पराकृतें** ( प्राकृत ), अशी रूपे ठिकठिकाणी आढळतात. तोच प्रकार 'किती येक ते चिर्डचिर्डोंचि मेलीं' ह्यांतील 'चिर्डचिर्डों' या शब्दाचा. 'चिरडून चिरडून' अशी द्विरुक्ती हवी आहे. पण वृत्त तितका वाव देत नाही. ठीक आहे. आपण शब्दालाच तसे रूप देऊ या– ग्रांथिकाऐवजी गांवढळ ! प्रभुरामचंद्राने शिळा होऊन पडलेल्या पतित अहिल्येला

पावन करून घेतले. त्याच्या दासाने शब्द पावन करून का न घ्यावेत ? शिवाय, श्रोत्याने ' अर्थान्तर ' पाहावे, म्हणजे अंतराचा अर्थ पाहावा, ही अपेक्षा आहे; आणि तो पाहणे ह्यातच श्रोत्याचे श्रोतेपण आहे, असे रामदास मानतात आणि प्रतिपादतात.

आणखी एक कारण लक्षात येते ते असे की, रामदास एका ठायी मुक्काम ठोकून बराच काळ राहिले नसावेत. आज इथे तर उद्या तिथे. लोकसंघटनेचा प्रचंड उद्योग हे ज्याच्या कर्तृत्वाचे अंतःसूत्र, त्याला बैठी दिनचर्या अप्राप्यच नव्हे का ? अशा भटक्येपणात निर्माण होणारे कवित्व हे मांडी ठोकून बसणाराच्या कवित्वापेक्षा भाषेच्या बाबतीत भिन्नच असणार. सुचला शब्द वापरला. जो अर्थ लोकांच्या ध्यानी यावा अशी अपेक्षा तो त्यातून निघतो आहे ना, एवढेच त्यांनी पाहिले असावे. शुद्धाशुद्ध विचार आणि भाषागौरव यांकडे अवधान देण्याइतकी फुरसत त्यांना कुठली ? जे सुचले, जे मुखातून आले ते शिष्याने उतरून ठेवले असावे. खुद्द रामदासांनीच हाती नेहमी लेखणी धरली असावी, असे दिसत नाही. त्यामुळे उद्गात्याची भाषा ' लेखकू 'च्या लेखणीतून उतरताना काही फेरफार पावणारच. सांगणाराने ' कुत्रा ' शब्द सांगितला; पण ऐकणाराने तो ' कुत्ता ' ऐकून लिहून घेतला, असे होणे अनेक कारणांनी शक्य आहे. जे ऐकू येते त्याच्या बुडाशी केवळ श्रवणदोषच नसतो. संस्कार, पूर्वग्रह, समज, ज्ञान किंवा अज्ञान, अशी अनेक कारणे संभवतात. संसृति शब्द ठाऊक नसल्यामुळे मुद्रक संस्कृति शब्द छापतो, हा अनुभव आजही पुष्कळ लेखकांना येत नाही का ?

कै. गो. कृ. मोडक यांनी ' श्री रामदासी वाग्विशेष ' ह्या लेखात रामदासांच्या भाषेचा विचार केला आहे. पण ते वैय्याकरणी. त्यामुळे व्याकरणाच्या निकषावर त्यांनी ती भाषा पारखली आहे. अव्यय, विभक्तिप्रत्यय, धातुसाधिते, समासरूपे, या दृष्टीने ऊहापोह करून, कोणते रूप असणे जरूर आणि जे आहे ते कोणत्या नियमाने संभवनीय किंवा ग्राह्य, हे त्यांनी आपल्या लेखात दाखविले आहे. ' अमृत 'च्या ऐवजी अम्बृत, ' विस्मरती ' च्या ऐवजी विशंषती, अशी रूपे उपाधान न्यायाने कशी संभवतात ह्यासंबंधाची विचक्षणा ते करतात. त्यांच्या भूमिकेवरून ती रास्तच आहे. पण कवीच्या भाषेची पारख करताना तीच एक दृष्टी उपयोगाची नाही. कवी स्वतःला शब्दसृष्टीचा ईश्वर म्हणवून घेतो. तेव्हा भाषापंडितांच्या नियमांनी तो स्वतःला जखडून घेणार नाही.

इथे एक प्रश्न असा येईल की, रामदासांना कवी म्हणायचे का ? मला वाटते, ह्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थीच द्यावे लागेल. कवित्वाची व्याख्या त्यांनी केली आहे, कवींचे प्रकार त्यांनी विवेचिले आहेत आणि हा ऊहापोह उगीच ओझरता आला नसून त्यांनी साक्षेपाने चर्चिला आहे. ' क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे, ' ' आधी केलें मग सांगितलें ', असा त्यांचा बाणा आहे. तेव्हा त्यांच्या दृष्टीने त्यांनी

कवित्व केले आहे; त्यांच्या अंतर्यामी हा आत्मविश्वास असावा. शिवाय, कविहृदयाची साक्ष, त्यांच्या वाणीतून उमटत आहेच. ' परदुःखेनापि दुःखिता विरला ' ह्य विरल कोटीतले त्यांचे अंतःकरण असून, उत्कट आणि भव्य याचा वेध त्यांच्या मनाला आहे. विश्वचिंता वाहणाराच्या वाणीला परतत्त्वाचा नुसता स्पर्शच नव्हे तर परतत्त्वाला कडकडून मिठी मारण्याइतका प्रेमा आहे. तेव्हा रामदासांना कवी म्हणून मान्यता द्यायला प्रत्यवाय नसावा.

दुसरा प्रश्न असा की, त्यांनी स्वतःच्या नावाला 'कवि' पद चिकटवून घेतले आहे का ? हे खरे संतमहंत. कवी म्हणून आपले नाव व्हावे हा मुळी त्यांचा जीवितहेतू नव्हे. जन्ममरणाच्या फेऱ्यातून आपण मुक्त व्हावे हाच त्यांचा ध्यास. एकीकडे त्यात मग्न असताना लोकजागृतीही करावी ही त्यांची तळमळ. तेव्हा, त्यांनी आपल्या नावाला कवी ही पदवी सर्रास लावलेली आढळणार नाही. तरी पण, तसे ते स्वतःला म्हणवितात हे शोधून पाहणाराला दिसेल. वैराग्यपंचकातला हा उद्‌गार पाहा :

बाह्य बोलें शब्दज्ञान । अंतर्यामीं समाधान ।
रामी रामदास कवि । न्यायनीतीनें शिकवी ॥

पदसंग्रह ह्या नावाचा जो विभाग आहे त्यातील एका पदात म्हटले आहे :

ऐसा हरि लाघवी । मुनिजना वेधूं लावी ।
रामी रामदास कवि । साबडा म्हणे ॥

कवि म्हणून घेतल्याचे हे दोन उल्लेख सापडतात. ( पण रामी-रामदास हे अभिधान श्रेष्ठ गंगाधरांचे ही असल्यामुळे, असल्या उदाहरणांबद्दल मन शंकित होणे शक्य आहे. रामदासांच्या कवितेत रामी–रामदासांची कविता किती मिसळली आहे, का मिसळलीच नाही, ह्याचे संशोधन जर कोणी केले असेल तरच शंकेचा निर्णय लागायचा ! ) पण शंकेला जागा सापडणार नाही असा महत्त्वाचा उल्लेख म्हणजे करुणास्तोत्रातला. त्या गुच्छात एका स्तोत्राची सुरुवात आहे ती अशी :

गणपती मति दे मज लाघवी ।
जनकजा–पतिचा लघुसा कवी ॥
विनवितो करुणाळयकारणा ।
परम सुंदर दे मज धारणा ॥

इथे विनयशीलतेने स्वतःकडे लघुत्व घेतले असले तरी, स्वतःला कवी म्हणून घेतले आहे. आणखीही एक पुरावा पाहा. रामायणापैकी ' सुंदरकांड ' लिहून झाल्यावर रामदासांनी ' युद्धकांड ' लिहायला घेतले. त्यातील अकरावा श्लोक :

कथा संपली कांड सुंदर्य मागें
प्रवाहो पुढें चालिला लागवेगें
स्वयें श्रोतयातें कवी प्रार्थिताहे।
पुढें युद्धकांडीं कथा रम्य आहे ॥

हे पुरावे नि:संदेह स्वीकारावयास हवेत. आणि कवींचा मोठेपणा, कवींचा अधिकार रामदास पूर्ण जाणतात.

आतां वंदूं कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर ।
नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥
कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळांचें जीवन ।
नाना शब्दांचें भुवन । यथार्थ होय ॥
कीं हे शब्दरत्नांचे सागर । कीं हे मुक्तांचे मुक्त सरोवर ॥
नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण झाले ॥

ही जी कविप्रशंसा दासबोधात आली आहे तिच्यामधील शब्दसृष्टीचे ईश्वर, नाना शब्दांचे भुवन, शब्दरत्नांचे सागर, ही बिरुदे प्रस्तुत प्रबंधाच्या अनुसंधानात विशेषकरून ध्यानी घ्यायला हवीत. शब्दसृष्टीचा ईश्वर असे कवीला म्हणायचे, यातील अर्थ, परमेश्वराने प्रत्यक्ष सृष्टी उत्पन्न केली, तर कवी शब्दस्वरूप सृष्टी उत्पन्न करतो–परमेश्वराच्या सृष्टीला शब्दस्वरूपात उभी करतो. दुसराही एक अर्थ असा संभवतो की कवीची सृष्टी म्हणजेच शब्द. प्रत्यक्ष सृष्टी डोंगर, नद्या, वृक्ष, वाळवंट, समुद्र, इत्यादींनी युक्त; तर कवीची सृष्टी केवळ शब्दमय !–कवी शब्द निर्माण करतो. शब्दांचे भुवन, शब्दरत्नांचा सागर, ह्या बिरुदांनी, कवीला अवगत असलेल्या व कवीच्या वाणीतून प्रगट होणाऱ्या शब्दवैभवाचा बोध होतो. ह्या सामर्थ्याचे स्पष्टीकरण हे की, कवी प्रचलित शब्दांवरच गुजराण करणारा नव्हे. आपल्या अनुभूतीचा प्रतिनिधी असा शब्द तो स्वतः निर्माण करू शकतो; आणि ह्या स्वनिर्मित शब्दांचा वापर असा करतो की त्यातून परावर्तन पावणाऱ्या किरणशलाकांनी वाचकाला आपली मती उजळून निघत आहे असे वाटावे. हा शब्द तू कुठला घातलास ? ह्याचा अर्थ रे काय ? अशा प्रश्नांनी वाचक किंवा श्रोते त्या शब्दनिर्मात्याला अडवू शकणार नाहीत, आणि कवीला अभिप्रेत असलेला अर्थ मात्र त्यांना जाणवेल, असे त्या शब्दाचे रूप असेल. व्युत्पत्ती, रूढ अर्थ, प्रचलित शुद्ध रूप, यांच्या कचाटयात तो सापडणार नाही; तरी पण–

वदती वक्ते अनुभवाचें । मस्तक डोलतीं श्रोत्यांचें ।
तल्लीन सादर सर्वांगाचें । श्रोत्र केलें ॥

ह्या प्रभावाचा त्याचा वाग्विलास असेल. प्रचलिताच्या कक्षा उल्लंघून उद्भवलेला शब्द—

चंद्रज्योतीचे उमाळे। तेणें दिशाचक्र ढवळें।
पूर्णचंद्र तये वेळे। राहाटले जैसे॥

अशा योग्यतेचा, अशा तेजस्वितेचा असेल; आणि कोषकारांना तो त्या अर्थाने नमूद करून घ्यावा लागेल.

रामदासांनी कवीला 'शब्दसृष्टीचा ईश्वर' हे बिरुद बहाल करताना, हे सामर्थ्य, हे ऐश्वर्य कवीच्या ठायी अपेक्षिले असावे. स्वतःला 'कवीश्वर' म्हणवून घेण्याइतके ते अहंकारी नाहीत. 'जनकजा-पतिचा लघुसा कवी' असेच विनम्र-वृत्तीचे त्यांचे म्हणणे आहे. तथापि, शब्दसृष्टिनिर्मात्या कवीच्या कळा त्यांना ठाव्या आहेत. त्या कळांतून त्यांची वैखरी उद्रेक पावली आहे. तेव्हा, रूढ शब्दांच्या आहारी न जाता, आपल्या चालीने पायंडा पाडण्याइतके ते प्रौढप्रतापी असल्यास नवल काय ?

येथवर जे विवेचन केले आहे ते समग्रपणे आणि सावधानपणे ध्यानी घेतले म्हणजे :

(१) **हटाटे पटाटे** मोटे। थोर संसार-साकडीं
(२) **धबाबा** लोटल्या धारा। **धबाबा** तोय आदळे
(३) **जगज्जाळजंजाळ** हे सर्व तूटे
(४) पुढें सर्वही **पाणजंजाळ** पाहे
(५) महां पुछ तें **ज्वाळभंबाळ** जाला
(६) **गर्जिन्नल्या** घणघणाट प्रचंड घंटा
(७) **कवित-जाड-कळा** हृदयीं नसे
(८) बहू **बाणजुंबाड** बांधोन पृष्टीं
(९) जाली अत्यंत दाटणी। तेणें होतसे **मंडपघसणीं**
उभे वारिती वेत्रपाणी। सभा **घनवटली**
(१०) **धीर्धरा धीर्धरा** तकवा। **हडबडूं गडबडूं** नका
[ घर्डिलीं चिर्डिलीं रागें। रडविलीं बडविली बळें॥ याप्रमाणें. ]
(११) वीरजोर शीरजोर **धक्कधिग** मारुती

रामदासांच्या भावमंथनातून असली शब्दरत्ने बाहेर येणे हेच त्यांच्या प्रकृतिधर्माला धरून असल्याचे पटेल. प्रतिभाशाली कवीच्या आविष्कारातील शब्दसृष्टी अशी स्वयंभूच असणार.

धीर्धरा याचे शुद्ध रूप धीर धरा, हे काय रामदासांना माहीत नाही ? पण त्यांनी लिहिण्यासाठी आसनमांडी ठोकलेली नाही. ते वक्ते म्हणून उभे आहेत;

आणि गडबडून गेलेल्यांना थोपवून धरीत आहेत. 'धीर धरा, धीर धरा' म्हणून म्हणताना 'र' चा उच्चार संपूर्ण कोण करतो ? तो अर्धोच्चारित असतो. आणि 'धीर् धरा' ही आरोळी लिखाणात 'धीर्धरा' अशी उमटली आणि उमटली तशीच ती छंदातही बसली. श्रोत्यांत असलेल्या शिष्याने ऐकली तशी ती लेखननिविष्ट करूनही टाकली. 'हडबडूं गडबडूं नका' ह्यातील गडबडूं हे रूप गडबडणे ह्या धातूचे आहे. पण हडबडूं शब्द कुठला ? हा शब्द रामदासांचा – शब्दसृष्टीच्या ईश्वराचा. जो भाव व्यक्त करावयाचा आहे त्यासाठी 'गडबडूं'शी जुळता–मिळता शब्द 'हडबडूं' हा त्यांच्या मनाच्या मुशीतून उत्स्फूर्तपणे प्रगटला आहे. तसेच ते मारुतीचे गुणविशेषण धक्कधिंग. रामदासांच्या शब्दखनीतील हे रत्न. अर्थ काय ? अर्थ कसला विचारता ? रत्नाची प्रभा पाहायची. धक्कधिंग मारुती असे म्हणताना श्रोत्यांच्या मनात मारुतीच्या अनन्यसाधारण व्यक्तिमत्त्वाचा व शक्तिमत्त्वाचा उजेड पडतो आहे ना ? बुचबंगोळी म्हणजे तरी काय ? पण हाच न्याय.

अशी आहे रामदासी वैखरी. ती उत्कट आहे. 'कवित्व नसावें खटपट' असे रामदासच सांगतात. अर्थात त्यांचे कवित्व खटपटीचे नसल्यामुळे, उत्कट–उत्स्फूर्त असल्यामुळे, शब्दांच्या जडणघडणीचा असा स्वयंभू विलास प्रगटला आहे. 'करंटे मिळाले सर्वे' अशी उपदेशात्मक प्रकरणे 'तुळजा, कुळदेवता' स्तोत्रे, ही सारी उचंबळलेल्या भावनेतून जन्मलेली आहेत.

कां गृहासि आग लागली । देखोन कां बोंब केली ।
लोकांची मांदी मेळविली । आगी विझवायाकारणें ॥
तैसी परमार्थी बोंब मारावी । कांहीं काढाकाढी करावी ।
हळहळू सोडवावी । मिठी प्रपंचाची ॥

अशा प्रकारचे ठायी ठायी आढळणारे उद्गार किती तळमळीतून आले आहेत याची वाचकाला सहज जाणीव होते. तळमळ आणि उत्कटता आहे म्हणूनच रामदासांची भाषा जरी खडबडीत असली तरी ओजस्वी आहे. त्यांच्या भाषेवरून मला गृहिणीने शिजवलेल्या भाताची आठवण होते. तांदूळ शिजवून भात करायचा असतो. तो कधी गिच्चगोळा होतो तर कधी फडफडीत होतो. ह्यात तांदळाचा काही गुण असतो, पण शिजविताना घातलेले कमीअधिक पाणी हेही भाताला जे रूप येते त्याचे कारण असते. रामदासांची भाषा म्हणजे पाणी कमी झाल्यामुळे होणारा फडफडीत भात. आवेश आहे, कणव आहे, तळमळ आहे. पण पाणी बेतास–बात आहे. भाताची मूद बनण्यासाठी जितकी आर्द्रता हवी, जितके मार्दव हवे तितकेसुद्धा नसले तर तो भात शीत न् शीत मोजून घ्यावे इतका मोकळा, इतका फडफडीत होतो. तशी आहे रामदासांची भाषा.

आणि रामदासांना याची जाणीव नसेल की काय ?

नाना बंद प्रबंद छेंदरचना साहित्यसंपादना
नाना लाघव गद्यगौरव जना सद्भाव लागे मना
नाना नाटक सौम्य त्राटक गुणी सप्रेम सद्दढता
नाना काव्य रसाळ भव्य करणें भक्तीन सायोज्यता

हा ज्यांचा दृष्टिकोन, ही ज्यांची धारणा, 'नाना काव्य रसाळ भव्य करणें' हे ज्यांचे उद्दिष्ट त्यांना आपल्या वाग्विलासात शुद्धाशुद्धतेकडे काणा डोळा झाला आहे, व्युत्पत्ती-कडे अवधान राहिले नाही, किंबहुना "धाकेंचि चळचळा कांपे। भेणेंचि फळफळा मुते" असा गांवढळाला शोभणारा ग्राम्यपणाही आपल्याकडून झाला आहे, ह्याची कल्पना खासच असावी पण ह्या 'मनस्वी' पुरुषाचा त्याबाबत अभिप्रायही स्पष्ट आहे. त्यांनी स्वच्छ सांगून टाकले आहे की--

व्युत्पत्ती असली तरी आपणास काय ।
आपण धरावी अर्थाची सोय
अर्थ टाकून येर न्याय । करू नये सर्वथा ॥
लाधल्या त्वचाचि खावी । किंवा वस्तुचि टाकून द्यावी ।
कीं तयाची शोधावी । अंतर कळा ॥
तरी बाह्य त्वचा व्युत्पत्ती......

असे ते ठासून सांगतात. हे दुर्बळाचे मतलबी समर्थन नसून, हे समर्थाचे धारिष्टपूर्ण प्रतिपादन आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................

१२.

# समर्थांची दृष्टान्त-संपदा

दृष्टान्तांची दौलत ज्ञानेश्वरीत जितकी उधळलेली दिसते तितकी दुसरीकडे दिसत नाही. मोहरलेला आम्रतरू किंवा घोसांनी लगडलेली द्राक्षलताच जणू काही ! माउली जशी आपल्या लेकरांना काजळ—तिटीने, अंगड्या--टोपड्यांनी आणि बिंदल्या–ताइतांनी सजविते तसा साजशृंगार ज्ञानदेवांनी ओवी–ओवीगणिक केलेला आढळतो. केलेल्या विधानाचे दृष्टान्ताने समर्थन केले नाही, असे व्हायचेच नाही. देवमूर्तीला जशी प्रभावळ किंवा सिंहासन, तसा विधानाला दृष्टान्त.

दृष्टान्त हा अलंकार आहे. अलंकार म्हटला की, ऐपतीचा प्रश्न आलाच. माउलीच्या पोटी माया उदंड असली किंवा भक्ताच्या अंतरी भाव गाढ असला तरी अंगडी–टोपडी आणि प्रभावळ–सिंहासन यांचा थाट ऐपतीप्रमाणे असणार. ऐपत ही ऐहिक बाब आणि माया वा भावभक्ती ही आंतरिक बाब. एकीच्या आधाराने दुसरीचा कस ठरविण्यात चूक होईल. ऐपत कमी तर माया किंवा भक्तिभाव कमी, असे नव्हे. पण आम्रतरूचा मोहर किंवा द्राक्षवेलीचे घोस, ह्या बाह्य दृश्याचा आंतरिक सघनतेशी अतुट संबंध आहे. तेव्हा, दृष्टन्तांनी फुललेले काव्य म्हणजे मोहरलेले आम्रतरू किंवा घोसांनी भारावलेल्या द्राक्षलता, हे म्हणणेच जास्त समर्पक होईल. कवीच्या काव्यात भरास आलेले दृष्टान्तवैभव त्याच्या आंतरिक श्रीमंतीचीच साक्ष देते. काव्य-निर्माता कंगाल असेल, भिक्षा मागणारा असेल किंवा संन्यासी असेल. ह्या त्याच्या बाह्य परिस्थितीशी आंतरिक ऐश्वर्याचा काडीमात्र संबंध नाही. तो लंगोटी लावत असेल किंवा कफनी घालत असेल. पण त्याची कविता मोत्यांच्या झालरींची भरजरी पैठणी नेसलेली महाराणी असेल. ज्ञानेश्वरीतील दृष्टान्तसंपदेचा सोहळा असा डोळे दिपवणारा आहे, मनाला भूल घालणारा आहे.

ज्ञानेश्वरांनंतर, नजरा खिळून राहतील असे दृष्टान्तवैभव आहे गोसावी रामदासांचे. हिमालय सर्वांत मोठा. त्या नगाधिराजाच्या धवलकीर्तीपुढे इतर गिरिवरांचे पवाड अवलक्षिले जातात. तसे काहीसे घडले आहे रामदासांच्या बाबतीत. पण एकंदर संतवाङ्मयाचे साक्षेपी अभ्यासक सह्यगिरिकुहरातील ह्या शार्दूलाचा उग्र दिमाख मान्य करतील; आणि म्हणतील हे पाहा ह्याचे दृष्टान्त :––

**संगतीचा महिमा** सांगताना ‘पुष्पसंगें मातीस वास लागे’ असे म्हणण्याचा प्रघात आहे. रामदासांनाही एके ठिकाणी सांगायचे हेच की “**प्राणी असती जयें संगती । तैसेचि गुण अंगीं बाणती**” पण हे सांगताना त्यांनी

उदाहरण दिले आहे मात्र निराळे. ते म्हणतात—

जैसा कागद एकचि आहे । परि जे वस्तूचा संग लाहे ।
ते वस्तूसारिखा पाहे । परिमळ तया कागदासी ।।

दृष्टान्तासाठी कागद आठवावा हे नावीन्य आहे. ह्यातला उणेपणाही त्यांना चटकन जाणवतो आणि ते म्हणतात की कागदाचा परिमळ उडून गेला तरी त्याच्या ‘ कागदपणाला तोटा न ये. ’ मग, लोहाचे सोने करणाऱ्या परिसाचा दाखला त्यांना सुचतो. पण त्यातही वैगुण्य दिसते. परिसाच्या संगाने लोखंड परिसरूप पावत नाही. याचे मागोमाग चंदन, भिंगोरी यांचेही दृष्टान्त त्यांना सुचतात. अशी आहे त्यांची समृद्धी.

लोखंड–परिस–सोने हा दृष्टान्त नेहमीच आढळतो. मग ते काव्यकर्ते संत असोत किंवा पंत असोत. निरनिराळ्या अनुसंधानात तो येतो. सद्‌गुरूचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करताना जी अनेक उपमाने पडताळून पाहण्यात आली आहेत ( दासबोध, दशक १, समास ४ ) त्यात परिस–लोहाचा विचार केला आहे.

ईश्वरभक्तीची महती वर्णन करताना हाच दृष्टान्त रामदासांनी पुन्हा वापरला आहे—

जो रामरूपीं मिळाला । तो परतोनि नाहीं आला ।
जैसा लोह परिसें पालटला । तो लोहखंड न होय ।।

लोखंडाचे सोने होणे ही परिसाची किमया सांगितली जाते. प्रस्तुत स्थळी पुढची एक पायरी गाठली आहे. ते सोने परत मूळ लोखंडरूप पावत नाही, ह्यावर इथे भर आहे, हे ध्यानी घ्यावे.

**नदीचा दृष्टान्त** रामदासी वाङ्मयात निरनिराळ्या निमित्ताने आलेला आढळतो. वय व्यर्थ जाते ते जाऊ देऊ नये, ते कारणी लावावे हे सांगताना नदीचा दाखला देण्यात आला आहे :––

सकळ जीवां चैतन्य । सकळिकां समान ।
त्रैलोक्याचें महिमान । उदकापाशीं ।।
नदीचें उदक वाहात गेलें । तो निरर्थक चालिलें ।
जरी बांधोनि काढले । नाना तीरीं कालवे ।।
उदक निगेनें वर्तविलें । नाना जिनसीं पीक काढिलें ।
पुढें उदकचि जालें । पीक सुवर्ण ।।
तैसे हें आपुलें वय । विवेकेंविण व्यर्थ जाय ।
विवेकी ते यथान्वय । स्वहित साधिती ।।

नाना उंच आम्रफळें । अंजीर ऊस द्राक्षें केळें ।
नाना पिकें यत्नजळें । निर्माण जालीं ॥
तैसें आयुष्य आपुलें । विवेकें सार्थक केलें ।
कां जें शोधूनि पाहिलें । सारासार ॥

दाखला अगदी व्यावहारिक आहे. दृष्टान्तासाठी लोह–परिस, चकोर-चंद्रिका, सूर्य–कमलिनी, ह्यासारखे संकेत वापरल्याने पढिकांची समजूत पटते. पण ज्यांना ते संकेत माहीत नसतात त्यांना त्यांचे आकलन नीट, यथार्थपणे होत नाही. त्यापेक्षा प्रत्यक्षातला दाखला एकदम जाऊन चित्ताला भिडतो, अंतःकरणात खोल रुजतो. नद्यांच्या प्रवाहाला बंधारे घालून कालवे काढणे व त्यावर पिके काढणे हे खेडुतांच्याही पाहण्यातले आणि म्हणून चटकन समजण्यासारखे आहे. शिवाय 'उदकचि जाले पीक सुवर्ण' = पाण्याने पिके आली, सोने पिकले = पाण्याचेच ( म्हणजे जीवनाचे ) सोने झाले, हे म्हणण्यात कल्पकताही आणि उदात्तताही आहे. त्यातच पुढे आणखीन एक छटा रामदासांनी वाढविली आहे ती '**यत्न जळें**' ह्या शब्दप्रयोगाने. पुटे दिल्याने औषधी जशी अधिक प्रभावी होते तसाच हा प्रकार.

नदीचा आणखी एक दृष्टान्त :

नदी मर्यादा सांडती । उष्ण काळीं वोस होती
तैसा तारुण्याचा भर । सवेंचि होतसे उतार

पावसाळ्यात नदीला पूर असा येतो की ती पात्राची मर्यादा ओलांडून उन्मत्तपणे वाहू लागते. तारुण्यातला उन्मादही तसाच असतो. उन्हाळ्यात नदीचे पात्र रिकामे पडते, तारुण्यालाही आपोआप उतरती कळा प्राप्त होते. अमर्यादपणा आणि अपायकारकता ही एक बाजू आणि अशाश्वतता ही दुसरी बाजू. ह्या दोन्ही दृष्टींनी, नदीच्या दृष्टान्तात मार्मिकता आणि चपखलपणा यांचा संगम झालेला दिसून येईल. हाच दृष्टान्त आणखी एका ठिकाणी आढळतो. तिथे जोडीला तळेही घेतले आहे.—

नदी भरोन वोहरे । तळें भरोन तें फुटे
तयापरीच संपदा । जनीं न निश्चळे कदा

अर्थात इथे प्रकट भर आहे संपदेचे चंचळपण सांगण्यावर.

वैभवाची अशाश्वती, चढ–उतार नमूद करताना बहारीचा दाखला दिला आहे तो असा :—

पुरें पट्टणें वसती । एके वेळे वोस होती
तैसें वैभव सकळ । येतां जातां नाहीं वेळ

ह्यात जरा आगळेपणा आहे. एखादी कारकीर्द भरभराटीची असते. त्या आमदानीत नवे नवे महान उद्योग, मोठमोठे कारखाने सुरू होतात. त्या वेळी नवी शहरे वसली जातात, राजधान्या स्थापल्या जातात. पण अवचित कालचक्र फिरले की ती पुरे–पट्टणे उजाड होतात, मोडकळीला येतात. इतिहासाच्या वाचकाला हे चांगले ठाऊक असते. वैभवाच्या भरती–ओहोटीकडे त्या गरुडभरारी काळदृष्टीने पाहण्यात आले आहे. अर्थात इथे कल्पनेची भव्यता आहे. दृष्टान्ताच्या द्वारा लेखकाच्या निरीक्षण शक्तीचा प्रत्यय येतो, टिपून घेण्याची त्याची जागरूकता कळून येते, त्याचबरोबर त्याच्या मतीची झेप घेण्याची ताकदही दिसून येते. सहसा न सुचणारा हा दृष्टान्त आहे.

**शिकवण**–रामदासांच्या वाङ्मयात शिकवणीचा भाग उदंड आहे. सामान्य जनांपासून राज्यकर्त्यांपर्यंत सर्वांना त्यांनी व्यवहारज्ञान सांगितले आहे. लोकांच्या बुद्धीने चालू नये; आत्मबुद्धिहितार्थाय, असा त्यांचा सिद्धान्त आहे. त्यात ते एक विधान असे करतात की—

स्वयें जो परीक्षा नेणे । लोकांचे ऐकिले करी ॥
श्वानासी लाविता लागे । तैसा तो जाणिजे नरू ॥

लोकांच्या बुद्धीने जो वागतो त्याचे ते वर्तन, कुत्र्याला छूः केले की ते जसे दाखवाल त्याच्या मागे लागते, त्या प्रकारचे होय. तसे होता कामा नये. अर्थात राज्यकर्त्याला एकूण एक गोष्ट स्वतः अंग मोडून करता येणे अशक्य कोटीतले असते; निरनिराळ्या कामासाठी कारभारी नेमावेच लागतात. पण तरीसुद्धा त्याने खबर्दार असलेच पाहिजे. नाही तर, धणी राहतो बाजूला आणि कारभारी सारा मामला नासून टाकतात. प्रजेचे पाप उभे राहते ! – पण तितके ते थोर शास्त्याचे – कारभारी नेमणाराचेही पाप होय. पापाला धनी ते होतात. ह्या ओघात—

पोरांना माय जाणेना । तीं पोरें वाचतीं कशीं
गुराखी राखतो गुरें । धणी दोहींस पाळितो

हा जो दाखला आला आहे तो अतिशय हृद्य आहे. गुरे राखणीला द्यावी लागतात. पण गुराखी नीट तऱ्हेने गुरे सांभाळतो ना, हे धन्याला पाहणे आलेच. सारांश, गुरे आणि गुराखी ह्या दोघांचाही सांभाळ धन्याला करणे आले. प्रजेचा प्रतिपाळ वात्सल्याने करायचा. नेमलेल्या दाया बालकांची आबाळ किंवा दृष्टिआड गुप्तपणे छळणूक करीत नाहीत ना, हेही पाहणे जरूर असते. सूक्ष्मता आणि खोलपणा ह्यांचा ह्या दृष्टान्तात मनोहर मेळ बसला आहे.

काही काही ठिकाणी तर विशेष शोभा दिसते. रामदासांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे 'चंद्रज्योतींचे उमाळे' आढळतात. अहिताचाच व्यवहार मानवप्राणी कसा करतो पाहा––

रामीं विसरला प्राणी । कामलोभें केली हाणी
कामधेनु मोकलिली । घरीं गाढवी बांधिली
उपडूनी कल्पतरू । केला शेराचा आदरू
सांडुनिया चिंतामणी । वेंची दहिंवराचें पाणी
गेलें हातीचें निधान । केलें कवडीचें साधन
परिस रागें झुंडारिला । हातीं पाषाण घेतला
सार अमृत सांडिलें । दैन्यवाणें कांजी प्याले
सोनें सांडुनी, आदरें । वेचूं लागला खापरें
रत्न सांडूनिया, खडे । गेले म्हणून दुःखें रडे
केली साखर परती । सुखें तोंडीं घाली माती

पारलौकिक, चिरंतन कल्याणाचा मार्ग टाकून, लोक संसारमोहपाशात गुंतून, खोट्या गोष्टींबद्दलच कसे झटे घेतात हे सांगणारा हा सबंध अभंग म्हणजे दृष्टान्तरूपी फटाकड्यांचा सरच होय. ह्याच 'उन्मत्तपंचक' प्रकरणातील दुसरा अभंग देखील अशीच दहा–बारा मण्यांची रंगीत माळ आहे. कुठे कुठे तर, कढत ठेवलेले लोणी उकळू लागले म्हणजे जसा फेस उसळतो तसा देखावा दिसतो.

भ्रम–पंचकात माणसाची कशी फसगत होते ती सांगितली आहे.

**वाजें पाऊल आपुले । म्हणे मागें कोण आलें ॥**
**शब्द पडसाद उठला । म्हणे कोणी रे बोलला ॥**

असे भ्रमाचे प्रकार सांगितले आहेत. ते नित्याच्या व्यवहारातले आहेत आणि ते वारंवार कानी येत गेल्यामुळे बहुश्रुतास त्यात नावीन्य वाटणार नाही, पण त्यातच–

डोळां घालितां आंगोळी । एकाची तीं दोन जालीं

हा जो भ्रामक दृक्चमत्काराचा दाखला त्यांनी दिला आहे तो सर्वांच्या परिचयातला, म्हणूनच सर्वांना एकदम पटणारा, पण त्याचबरोबर रामदासाच्या प्रत्युत्पन्न मतीचे कौतुक वाटावे असा आहे.

माया आणि निर्गुण ब्रह्म यांचे विवरण करताना माया म्हणजे भास आहे हे सिद्ध करण्यासाठी रामदासांनी—

रथ धावतां पृथ्वी चंचल । वाटे परि ते असे निश्चळ ।

असा दृष्टान्त दिला आहे. यंत्रयुगातल्या प्रवाश्याला आगगाडीतून जाताना हा भास जाणवतो. धावत असते आगगाडी; पण रस्त्याच्या कडेची झाडे धावत आहेत. आणि

दूरवरच्या सृष्टीने फेर धरला आहे असे वाटते. रामदासांच्या काळी वेगवान यांत्रिक वाहने नव्हती. तथापि भरधाव जाणाऱ्या रथामुळे हा भास त्या काळी रथात बसलेल्या प्रवाशांना जाणवलेला दिसतो. अशाच स्वरूपाचा दृष्टान्त ज्ञानेश्वरीतही आलेला आढळतो. "कर्मांचे ठिकाणी जो अकर्म पाहतो, आणि अकर्मांचे ठिकाणी कर्म पाहतो, तो मनुष्यामध्ये बुद्धिमान जाणावा, व सर्वकर्मकर्ता जाणावा" अशा अर्थाचे गीतेत जे वचन आहे त्यावर भाष्य करताना ज्ञानेश्वरांनी दृष्टान्त दिला आहे—

अथवा नावे हन जो रिगे। तो थडियेचे रुख जाता देखे वेगें।
तेचि साचोकारे जों पाहों लागे। तंव रुख म्हणे अचल॥

रामदासांना रथातून झालेला भास ज्ञानेश्वरांना नावेतून जाताना झालेला आहे, इतकाच काय तो फरक.

निर्गुण ब्रह्माचा निश्चळपणा प्रस्थापित करताना रामदास आणखी एक दृष्टान्त देतात की :—

झळे अथवा अग्निज्वाळ। तेणें कंपित दिसे अंतराळ।
वाटे, परि ते निश्चळ। जैसें तैसें॥

जागरूक नजरेने जो सभोवतीचे सृष्टिविलास पाहात असतो आणि सावधानतेने अंतर्यामी टिपून घेत असतो तोच आपल्या वाङ्मयाला अशा दृष्टान्तांनी सजविण्यास समर्थ असतो.

दृष्टान्तसाम्याचा वर जो एक नमुना दिला आहे तसाच आणखीही एक पाहण्यासारखा आहे. कल्पनाचेष्टिते, भूतभास आणि शुद्धस्वरूप, यांचा ऊहापोह करताना ज्ञानेश्वरांनी दृष्टान्त दिला की :—

हे असो आंगीं भरलिया भवंडी।
जैशा भोंवत दिसती अरडी–दरडी।
तैशी आपुलिया कल्पना अखंडी। गमती भूतें॥

आपल्याभोवती गरगर फिरले असता, अंगात भोवळ आल्यामुळे सभोवतालच्या भिंती, दरडी (नदीचे काठ) फिरल्यासारख्या दिसतात. रामदासांनी मायेचे स्वरूप विशद करताना—

भोवंडीनें पृथ्वी कलथली। कामीणीनें पिवळी जाली।
सन्निपातस्थां अनुभवली। तैसी माया॥

हे जे दृष्टान्त दिले आहेत त्यातला पहिला ज्ञानेश्वरासारखाच आहे. ह्याच अनुसंधानात आणखी एक विशेष मनोहर असा दृष्टान्त रामदासांनी दिला आहे :—

श्रवण बोटें संधी करतळ । रविरश्में दिसती इंगळ ।
रम्य आरक्त रंगकल्होळ । तैसी माया ॥

सूर्यप्रकाशाआड आपल्या हाताचा पंजा धरल्यास बोटांच्या सांध्यांतून आरक्त रंगाचा कल्लोळ दिसून येतो, हे कोणी पाहिले नसेल ? कानांची पाळीही, त्यांच्या आड सूर्यांचे किरण आल्यास लालेलाल दिसतात. रामदासांच्या सूक्ष्म दृष्टीतून हे दृक्भास निसटले नाहीत.

कुठे कुठे तर दृष्टान्तांचा नुसता पाऊस पडतो आहे असे वाटते. जो मायापाशी गुंतला, जो देहबुद्धीच्या अंकित झाला त्याला भय असते; जो त्यातून वेगळा झाला, कल्पनातीत झाला, आत्मस्वरूपाची ज्याला ओळख पटली त्याला कसलेही भय नाही हे सांगताना रामदास म्हणतातः––

संग न साहे जेथे । मन बापुडें कैचें तेथें ।
तुज पहावया काळातें । शक्ती कैची रे ॥
तूं सिंहाचें पिलूं । काळ काय रे बापुडें भालू ।
मशक मेरूसी पाहे तोलूं । थडका हाणोनी ?
थिल्लर बालकासि बुडवी खेळता । आकाशमार्गें उडो जाता ।
तें केंवि बांधूं शके रामदूता । तया हनुमंतासी ? ॥
पिपीलिकेचिये पक्षपातें । कैसें पडे ब्रह्माण्ड पालथें ।
कां दर्दुर उडेल गगनपंथें । सूर्य ग्रासावया केंवि ? ॥
कां बलाढ्य म्हणे मी तरवार ओढीन ।
धावोनि जातांचि आकाश तोडीन ।
झोंबी घेऊनि ओढून पाडीन । पृथ्वीवरी ?
तंववरी नडव्यानें डवरावें । जंववरी त्या पंचाननें नवथावें ।
कां पतंगे जाऊनि भक्षावें । अनलासि जैसें ॥
कां जैसा नवनीताचा गोळा । युद्धालागी उतावेळा ।
म्हणे मी वडवानळा । ग्रासीन सकळ ॥
कीं जैसा उदुंबरांतील पक्षी । म्हणे मी गिळीन ब्रह्मांडासी ।
तैसे तुज स्वरूपासी । काळाचा आवांका ॥
अरे तू निःसंग आणि निर्मळ । तेथें काय रे बापुडें काळ ।
प्रलयातलासि मृगजळ । केंवि बांधूं शके ? ॥

उंबरातल्या किड्यांचा दाखला कुठे कुठे आढळतो. पण, उंबर फोडताच त्यांतले किडे चिल्टांप्रमाणे भुरूभुरू उडू लागतात हे कोणी ध्यानात घेतलेले दिसले नाही. रामदासांच्या ते ध्यानी आले आहे. म्हणून ते इथे 'उदुंबरांतील पक्षी' असे म्हणतात आणि त्या अर्थाने दाखला देतात. यात चातुर्य आणि सूक्ष्मता आहे. आणि काळाला 'बापुडा' न म्हणता 'बापुडें' म्हटले आहे! ह्या समग्र प्रतिपादनात वळवाची सर कोसळावी तसा झडझडाट आहे. कमलावराने कोठार खोलले आहे आणि हजार हातांनी खैरात चालविली आहे; तिथे घेणाराने किती म्हणून घ्यावे! वाचकाला तसला चमत्कार इथे पाहायला मिळतो.

**मापटे व धान्य मोजणे.** हे दृष्टान्तही असेच मोठे वेधक आहेत.

धान्य उदंड मोजिलें । परि त्या मापें नाहीं भक्षिलें ।
विवरल्याविण तैसें जालें । प्राणिमात्रासी ॥

भाराभर ग्रंथ वाचले; पण त्यांचे मनन केले नाही, सार शोधले नाही, चित्तावर बोध ठसला नाही, तर धान्याची रास मोजणाऱ्या मापासारखी अवस्था होते. ह्याच मथितार्थासाठी पुन्हा एका ठिकाणी रामदास म्हणतात---

मापटे मोजिते दाणे । तैसे सीकोन गातसे
अंत्यजें वाहती द्रव्यें । अर्थ-समंध नाडळे

मोजलेल्या धान्याचा मापट्याला लाभ नाही. त्याच्याच जोडीला आणखी एक दाखला देण्यात आला आहे. पाठीवरल्या गोणीतील गुळाची चव गोणी वाहणाऱ्या गाढवाला काय? ह्याच अर्थाने, द्रव्याच्या थैल्या वाहून नेणाऱ्या महारांचा उल्लेख केला आहे. गावचा वसूल खजिन्यात भरणा करण्यासाठी नेण्याचे कामी पाटील-तलाठी महारांना वेठीला धरत, हे ज्यांना माहीत आहे त्यांना "अंत्यजें वाहती द्रव्यें । अर्थ-समंध नाडळे" ह्यातील स्वारस्य ध्यानी येईल. [ समंध = संबंध ]

**शिसारी** यावी असा दाखला देण्यासही रामदास मागे-पुढे पाहात नाहीत. एकाने पात्रता नसणाऱ्या दुसऱ्याची स्तुती करायची; हेतू हा की तो परत आपली स्तुती करील. ही जी परस्परप्रशंसेची मतलबी जनरीती तिचा धिक्कार करताना—

येरयेरांची स्तुती करावी । आणि अंगावरी बळेंचि ओढून घ्यावी ।
जैशी विष्ठेसि लावावी । उटी चंदनाची ॥

हा स्पष्टवक्तेपणा, बेगुमानपणा, निःसंग अधिकारी पुरुषाशिवाय कोण करू धजणार?

असो. आणखी किती म्हणून निर्देश करावेत? प्रस्तुत लेख वानगीदाखल आहे. पण प्रत्यक्ष भांडार पाहायला ज्याचे त्यानेच प्रवृत्त झाले पाहिजे. साहित्यातला

अलंकार वेगळा काढून दाखवताना त्याची शोभा कमी होते. मूळच्या प्रतिपादनाच्या कोंदणात तो अधिक खुलतो. कारण, तिथे तो ओघात आलेला असतो तो प्रतिपादनाचे बळ वाढविण्यासाठी. बळ असे बाजूला वेगळे काढायला, तो काय औषधींचा अर्कयुक्त काढा आहे थोडाच ? बळाचे स्फुरण मल्लाच्या देहातच पाहण्यात मजा असते. दुसऱ्या दाखल्याने बोलायचे तर, हा लेख म्हणजे वाचकांवर केलेले मार्जन होय. पण, यात्रिकाने मानस सरोवरातले जे उदक आणले त्याचे मार्जन घडविल्याने भागते असे नाही. ते सरोवर प्रत्यक्ष पाहण्याचा आल्हाद, त्यात पोहण्याचे सुख, कृतार्थतेचा संतोष आणि शेवटी पुण्य, हा अनेकविध लाभ ज्याचा त्यानेच ती यात्रा करून मिळवायला पाहिजे.

मार्ग सांगता यात्रा घडे । हें तों सर्वथा न घडे ।
तेणें प्रयाणें जातां जोडे । फळ यात्रेचें ॥

असे रामदासांनीही सांगितले आहे. साहित्यातील रस-सौंदर्याच्या आस्वादाबाबतही हाच न्याय लागू आहे.

* * *

# इथे दृष्टान्त-सौंदर्य

ज्ञानेश्वरी दृष्टान्तांनी लवथवलेली आहे. त्यानंतर, तसेच उदंड वैभव रामदासांच्या वाङ्मयात कसे आढळते तेही येथवर पाहिले. या उभयता संतश्रेष्ठांच्या वैखरीचा हा घनगर्द मोहर पाहून असे म्हणावेसे वाटते—

( अभंग : छंद देवीवर )

इथे दृष्टान्तसौंदर्य रत्ने, माणके, वैडुर्य
यांच्या कांतीचे झळाळ फाकतात सर्व काळ
किंवा मंडपी तेवती हंड्या-झुंबरांच्या पंक्ती
किंवा पक्षी नाना जाती संचरती व्योमप्रान्ती
किंवा दाटल्या कुरणी दवबिंदूंची शिंपणी
जणू करी चमचम शोभा तैशी मनोरम

एकामागोमाग एक उमटती हे दृष्टान्त
जणू वाहती पुढून दीप रात्री नदीतून
किंवा पर्जन्याच्या नृत्यी जैशा गारा फडकती
तैशी येथ वाङ्‌मयांत दृष्टान्तांची ही सोडत

दिंडी शोभे पताकांनी रस्ता गर्द तोरणांनी
अंगण वा रांगोळ्यांनी शेत लोंब्या-कणसांनी
गायी उधळल्या रानी उभारल्या शेपट्यांनी
तैसे येथ वाङ्‌मयात उफाळती हे दृष्टान्त

नव्हे दृष्टान्त, पिकले चिंतामणीचे हे मळे
चंद्रज्योतींचे उमाळे ज्यांनी दीपतात डोळे
उभारल्या की वितानी इंद्रधनूच्या कमानी
किंवा करीतसे कोणी नक्षत्रांची कडसणी

कंगालांनो, मुंगसांनो, इथे लोळा यज्ञात या
समाराधना ही चाले जीविताचे सोने व्हाया

—यशवन्त

१३.

# रामदासांचे रामायण

ईश्वराची भक्तिभावाने आळवणी करण्यात संतांच्या वाणीने सार्थक मानले. 'ने घे हरिचें नाम ऐशी जिव्हा काशाला ?' अशी त्यांची भावना होती. पंत पंडितकवी भारत-रामायणातील कथांच्या आधारे आख्याने रचण्यात रममाण झाले. विविध रसांचा आविष्कार करण्याची त्यांना गोडी होती, स्पृहा होती. संतकवींची वाणी त्या वाटेला कधी वळली नाही. अपवाद एकच दिसतो. तो म्हणजे रामदासांचा. त्यांनी रामायणाला हात घातला. राम हे त्यांचे आराध्यदैवत. तेव्हा, त्याची कथा गाण्यात त्यांना प्रेम वाटावे हे स्वाभाविकच होय. पण तुलसीदासाप्रमाणे समग्र रामचरित्र त्यांनी गायिले नाही. मग मोरोपंताप्रमाणे अनेक प्रकारची रामायणे लिहायला प्रवृत्त होण्याची गोष्ट दूरच राहिली. मोरोपंतांचे आराध्यदैवतही रामच. आणि आख्यानके लिहिण्याची त्यांची प्रवृत्ती. तेव्हा, आराध्यदैवताची अनेक वाक्सुमनांनीं वेगवेगळ्या आराशीत पूजा बांधण्याचा हव्यास त्यांनी बाळगला हे रास्तच झाले. काव्यरचनेला विषयाचा तुटवडा जाणवला म्हणून त्यांनी चर्वितचर्वण केले असेच काही नव्हे. पुजाऱ्याने ज्याप्रमाणे रोज नवीन प्रकाराने नवीन थाटाची पूजा बांधावी तशीच ही निरनिराळी रामायणे लिहिण्याची हौस होय. लघ्वक्षर रामायण, निरोष्ठ रामायण, मंत्र-रामायण इत्यादि एकशेआठ रामायणे म्हणजे कवीचे क्रीडाकौशल. एखादे व्रत पतकरायचे आणि ते यशस्वीपणे पार पाडायचे, यांत जी एक स्वत्वपरीक्षा असते आणि ती उत्तीर्ण झाल्याचे जे एक समाधान असते, तशाच प्रकारे मोरोपंतांनी स्वतःवर स्वतःच निरनिराळे निर्बंध लादून घेऊन तदनुसार, रामायण-कथा लिहिण्याची ईर्षा बाळगली आणि ती पार पाडल्याचे समाधान मिळवले.

रामदास संतकवी होत. तेव्हा, त्यांना तसल्या क्रीडाकौशलाची कल्पना सुचणे शक्य नव्हते; आणि कल्पना सुचली असती तरी मानवली नसती. त्यांची भूमिकाच वेगळी होती. वयाच्या बाराव्या वर्षी ते लग्नमंडपातून पळून गेले. नंतरची बारा वर्षे टाकळीस पुरश्चरणात घालविली. ह्या काळात त्यांनी कोणती आणि किती काव्यरचना केली हे निश्चित करता येणे कठीणच. पुरश्चरणानंतरची बारा वर्षे त्यांनी तीर्थयात्रा करण्यात घालवली. आणि नंतरचा काळ त्यांनी महाराष्ट्रात लोकजागृती आणि धर्मस्थापना या कामी वेचला. म्हणजे काव्यात्मक क्रीडाकौशल दाखविण्यास जी बैठी आणि निर्वेध, स्वास्थ्यपूर्ण दिनचर्या हवी ती त्यांना कधी लाभली असेल असे वाटत नाही. कर्तेपणाच्या काळात ते आज इथे तर उद्या तिथे असे भ्रम

राहिले. तेव्हा, वृत्तरचनेचा त्रुटित विलास ते दाखवू शकले असले तरी, प्रदीर्घ काव्य-रचनेतले निरनिराळे चमत्कृतिविलास त्यांना मानवले असते की नाही, याची शंका वाटते. आहे हीच सलग कथा लिहिण्यास त्यांना फुरसत सापडली हेच विशेष. अर्थात , आन्तरहेतू काही वेगळा असला पाहिजे.

रामदासांनी रामायण म्हणून जी रचना केली ती फक्त सुंदरकांड आणि युद्धकांड यापुरतीच आहे. त्यातही सुंदरकांडाची श्लोकसंख्या १०१ आहे, तर युद्धकांडाची तेरा प्रकरणे आणि एकंदर श्लोकसंख्या १३०० हून अधिक आहे. या प्रकरणांना रामदास ' शती ' असे म्हणतात. मात्र प्रत्येक शतीत नेमके शंभरच श्लोक नसून तें १०० ते १११ पर्यंत कमीजास्त आढळतात.

हा विस्तार सांगण्यातला हेतू असा की, सुंदरकांड आणि युद्धकांड ही नावे जरी वाल्मीकीरामायणावरून घेतलेली दिसतात, तरी वाल्मीकीच्या सुंदरकांडाचे सर्ग ६८ असून श्लोक २८५४ आहेत आणि युद्धकांडाचे सर्ग १२८ व श्लोक ५७९५ आहेत. ह्यावरून असे दिसते की, रामदासांना समग्र वाल्मीकी रामायणाचा अनुवाद करायचा नव्हता. ' ऋषी बोलिला तेंचि हें सार घ्यावें ' असे त्यांनी एका ठिकाणी म्हटलेही आहे. सुंदरकांडावरही त्यांचा विशेष भर नव्हता, म्हणून ते इतके संक्षिप्त रचले असावे. आणि युद्धकांडच त्यांना मुख्यत्वे गायचे होते. या युद्धकांडाचा ' उपोद्घात ' एवढेच काय ते सुंदरकांडाचे त्यांच्या दृष्टीने प्रयोजन असावे.

समग्र रामायण सांगायचे उद्दिष्ट नसावे हे त्यांच्या एतद्विषयक स्फुट प्रकरणांवरूनही स्पष्ट होईल.

( १ ) जुना दासबोध १५ वा समास. ह्याला ' रघुनाथ चरित्र ' असें नाव ( पांगारकर-संपादित प्रतीत ) आहे. पण यात कथा नाही. प्रथम स्वरूप-वर्णन, मग राममहिमा आणि शेवटी रामाचे ठायी स्वतःची वैयक्तिक निष्ठा असल्याचे प्रत्ययपूर्ण निवेदन, असा एकूण आशय आहे.

( २ ) ' सांप्रदायिक पद्धति ' म्हणून जो काव्यविभाग आहे त्यात ' सगुण-ध्यान ' ह्या मथळ्याचे एक प्रकरण आहे. ह्यातही ध्यानस्वरूप प्रामुख्याने गाऊन पंचायतन, राजसभा, राजसभेला आलेले योगी-मुनी-तापसी, अशा वर्णनाचा सारा थाट असून शेवटी रामदासांनी आपला भक्तिभाव प्रकट केला आहे.

( ३ ) स्फुट ओव्या ऊर्फ अभंग म्हणून जो एक विभाग आहे, त्यातले पहिले प्रकरण रामचरित्रपर आहे. ह्याची सुरुवात श्रावणाची हत्या घडल्यामुळे दशरथाला मिळालेल्या शापापासून असून, सीतास्वयंवराअखेरचा कथाभाग त्यात आहे. आरंभीच्या ९।१० ओळींतले त्रोटक कथासूत्र सोडल्यास सारा भर स्वयंवराचा सोहळा वर्णन करण्यावरच दिसतो.

( ४ ) अभंग–चरणसंख्या १०५ असलेले एक ' रामचरित्र ' म्हणजे युद्धकांडाचा आराखडाच शोभेल आणि—

( ५ ) अडीचशे ओळींचे ' लघुरामचरित्र ' म्हणून जे प्रकरण आहे त्यातील कथाभागाची सुरुवात, शंकराच्या वराने मस्तवाल झालेल्या रावणापासून केलेली असून एकंदरीत स्वरूपावरून " सुंदरकांड व युद्धकांड यांची त्रोटक रूपरेखा " एवढेच त्याला म्हणता येईल.

( ६ ) रामकृष्ण–चरित्र म्हणून एक गमतीदार प्रकरण आहे. ह्याचे वैशिष्ट्य असे की, एक श्लोक रामगौरवाचा तर दुसरा कृष्णप्रशस्तीचा, अशी दुपेडी वेणी यात गुंफली आहे.

म्हणे दास द्वैतास हो नातळावे
जळाचे परी सर्व भूतीं मिळावे

ह्या शेवटच्या श्लोकार्धावरून स्पष्टच होते की, राम व कृष्ण ह्यात द्वैत नाही हे सांगण्यासाठीच रचना–प्रयोगही असा केला असावा.

ह्या साऱ्या रामचरित्रपर लहानमोठ्या काव्यरचनेवरून एक निष्कर्ष निघतो की, रामदासांना तुलसीदासाप्रमाणे समग्र रामायण अभिप्रेत नाही. त्यांचे सारे कवित्व सहेतुक आहे. रामभक्ती वाढावी हा त्यांचा जीवितहेतू आहे. पण ती भक्तीसुद्धा केवळ परमार्थसाधन म्हणून ते प्रतिपादीत नाहीत. रामचरित्र ह्या स्फुटात ते म्हणतात—

जानकीसी रामे केला वनवास ।
पितयाची भाष मुक्त केली ॥
मुक्त करावया त्रिदश देवासी ।
रामें वैभवासी सोडियलें ॥

रामाने जानकीसमवेत वनवास पतकरून दशरथाला वचनातून सोडविले हे सांगून लगेच त्याच उच्छ्वासात रामदास सांगतात की, देवांच्या बंधमोचनासाठी रामाने राज्यवैभवाचा त्याग केला. लघुरामचरित्रात त्यांनी पुन्हा उल्लेख केला आहे की, " राम बहू बळें उठावला "; पण कशासाठी ? तर–

निमित्त मात्र ते सिता । विबूधपक्ष पूरता ॥
समर्थ तो भला भला । कुढावयासि पावला ॥

रावणावर चालून जाण्यात सीतेला सोडविणे हे निमित्त. खरे म्हणजे देवांचा कैवार घेऊन त्यांच्या संरक्षणासाठी राम धावून गेला.

ह्या अवांतर स्फुट प्रकरणानंतर खुद्द सुंदरकांड व युद्धकांड यांचे सूक्ष्म वाचन करणारालाही अशाच साक्षी मिळतील. लंकेत जाऊन मारुतीने धुमाकूळ घातला, राक्षसांना सळो का पळो करून सोडले, सीतेचा शोध केला आणि तिची भेट घेऊन

तो परत रामचंद्राकडे आला, इतका कथाभाग सुंदरकांडांत आहे. ह्यांत सीतेचा निरोप घेऊन निघताना मारुती म्हणतो—

प्रभू वाट पाहेल तो रामराजा
निरोपेंचि मी सीघ्र जाईन काजा
म्हणे जन्ननी लोभ आतां असावा
सुरांचा बळें राम येतो कुडावा

सीतेला धीराचे दोन शब्द सांगावयाचे तर " माउली, आता काही काळजी करू नका; दळभार घेऊन लवकरच नाथ येतील आणि तुमची मुक्तता करतील " असे मारुतीने म्हणणे युक्त दिसले असते. पण मारुती म्हणत आहे, " देवांचा रक्षणकर्ता राम आता येतोच आहे ! "

युद्धकांडाच्या नमनाच्या श्लोकापाठोपाठच अनेक देवादिकांच्या कथांचा उल्लेख करून समस्तामध्ये राघवाची कथाच तेव्हढी श्रेष्ठ का आहे, याचा खुलासा रामदास करतात—

जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा
बळें तोडीला बंद त्या त्रिदशांचा
म्हणोनी कथा थोर या राघवाची
जनीं ऐकता शांत होते भवाची

रावणाला चार विवेकाच्या गोष्टी बिभीषण ऐकवतो तेव्हाचे त्याचे उद्‌गारही असेच आहेत–

तुम्ही राक्षसे निर्बळें बुद्धिहीणें
मती मंदली पातकाचेनि गूणें
सुराकारणें राम आला कळे ना ?
मदें मातला रावणू ओळखेना

यांत ' देवांसाठी राम धावून आला आहे एवढेही तुम्हांला कळू नये का ? ' असा स्पष्ट उल्लेख आहे. आणि शेवटी रावणाचा निःपात केल्यावर देवादिकांनी प्रभू रामचंद्राचे जे गौरवगान केले आहे त्यातही भर ह्याच गोष्टीवर आहे. ' विधी शक्र हे सर्व ध्याती जयाला । महादेव तो वर्णितो राघवाला '. तो कोणत्या शब्दांनी वर्णिता झाला ?

म्हणे धन्य रामा विरा पूर्णकामा
असंभाव्य सीमा कळेना महीमा

महा थोर अद्‌भूत सामर्थ्य केलें
प्रतापेंचि ब्रह्मादिकां सोडवीलें

तया रावणालागि प्रसन्न आम्ही
वरें मातला जाहला पापकर्मी
ऋषी देव माझे बहू कष्टवीले
समर्था तुवां सर्वही सोडवीले

आणि ' सुरांकारणें संकटीं पावलासीं ' अशी कृतज्ञता व्यक्त केली आहे. सारांश, रामदासांच्या दृष्टीने रामाचे अवतारकार्य देवादिकांचे दास्यविमोचन एवढेच होते. आणि दास्यविमोचनाचे उद्दिष्ट उरीपोटी बाळगूनच त्यांनी तेवढ्यापुरती रामकथा गायिली. तेव्हा, ती ' अपूर्ण ' नसून ' परिपूर्ण ' च आहे, असे म्हणायला हवे.

' रामप्रताप ' या नावाने नमूद असलेले अवघे नऊ अनुष्टुभांचे त्यांचे एक अगदी छोटे स्फुट आहे. त्याची सुरुवातच —

राम हा देव देवांचा । देव प्रत्यक्ष सोडिले
गर्जली गोष्टि वैकुंठीं । माजली सचराचरीं
बंदीचे सोडिले देव । आनंदी घातले सदा
कष्टले लोक देवाचे । त्यावरी फिरला दिसे

अशी करून, त्यांनी थोडक्यात राम-व्याघ्रपंचाननाचा पराक्रम दिला. आणि एकदम शेवटच्या चार ओळींत —

प्रस्तुत कोपला देवो । देवद्रोही पुरेपुरें
सर्वही चालिल्या फौजा । सेनाभार परोपरी
देव तो चेतला आहे । भडस पुरवीतसे
काय होईल पाहावे । राहावे सुखसुवनीं

असा, भोवतालच्या परिस्थितीसंबंधीचा उद्‌गार त्यांच्या मुखातून आला आहे. रामदासांना महाराष्ट्राच्या पारतंत्र्यविनाशाचा ध्यास लागला होता, आणि ' प्रस्तुत कोपला देवो ' व ' देव तो चेतला आहे ' ह्या उद्‌गारांतला देव म्हणजे अवतारी पुरुष शिवाजी महाराज होत, हे सहज ध्यानात यावे इतकी पारदर्शकता आहे त्या उद्‌गारांत.

रामायण लिहिण्यामागची रामदासांची ही प्रेरणा ध्यानी घेतल्यानंतर, खुद्द त्या काव्यरचनेतली गुणसंपदा पाहावयाची. भाषा, अभिव्यक्ती, रसपरिपोष, व्यक्तिरेखा, विचार, अशा अनेक दृष्टींनी काव्याचे मूल्यमापन करता येते. रामदास

पंडितकवी नव्हत. तथापि, आपण कवित्व करीत आहोत ह्याची त्यांना जाणीव आहे–

कथा संपली कांड सुंदर्य मागें
प्रवाहो पुढें चालिला लागवेगें
स्वयें श्रोतयातें कवि प्रार्थिताहे
पुढें युद्धकांडीं कथा रम्य आहे

युद्धकांडाच्या प्रास्ताविकातला हा उद्‌गार. यात त्यांनी स्वतःकडे कविपद घेतले आहे. 'कथेचा प्रवाह पुढें लागवेगें चालला आहे' असे ते म्हणतात, तेही अन्वर्थक असल्याचे वाचकांच्या प्रत्ययास येईल. सर्व रचना 'भुजंगप्रयात' मधे आहे. एकेका कवीचे एक एक वृत्त विशेष लाडके असते. रामदासांची वैखरी भुजंगप्रयातामध्ये सहजतेने रमते. मात्र वृत्ताचे गणलक्षण काटेकोरपणे ते पाळतीलच असे नाही. ऱ्हस्वदीर्घाच्या ओढाताणीबद्दल त्यांना फिकीर नाही. येथवरच्या अवतरणांवरून हे ध्यानी येईल. शिवाय नमुन्यादाखल आणखी हे चार–पाच चरण पाहा –

–असंभाव्य राक्षस कीती निमाला
– रणमंडळी मृत्यु जैसा उदेला
– महावीर मकराक्ष तो वाणघातें
– समरांगणामाजि ऐसे न होता
– देहे खोचले थोर माहा विरांचे

थोडक्यात, वृत्ताच्या साच्यात शब्द दडपून, दुमडून, मुडपून बसवताना त्यांना संकोच वाटत नाही. तरी पण रचना ओघवती असल्याचा वाचकांना प्रत्यय येतो.

प्रत्यक्ष कथेचा तपशील किती म्हणून सांगावा ? त्यांनी वाल्मीकी रामायणाचा आधार साररूपाने घेतला असला तरीही घटनांचा संक्षेप वा विस्तार स्वतःच्या प्रकृतीनुसार आणि उद्दिष्टानुरूप त्यांनी केला असला पाहिजे. रिसां-वानरांकरवी महाप्रचंड, बलाढ्य, मदोन्मत्त अशा राक्षसांचा संहार झाला आहे हे श्रोत्यांच्या चित्तावर ठसावे, ह्यावर एकसारखा भर देण्यात आला आहे. अर्थातच शूर वीरांची झुंजे मुख्यत्वे वर्णिली असल्यामुळे वीररसच सर्वत्र प्राधान्य पावला आहे. पण वानरांशी प्रसंग आल्यामुळे कुठे कुठे विनोदालाही अवसर सापडला आहे.

मारुतीच्या शेपटीने लंकेत उडविलेला हलकल्लोळ सुंदरकांडात वर्णिला आहे तो विनोदाचा प्रकार म्हणता येईल.

—गृहांतूनि अंतर्गृहीं पुछ्य घाली
बहू पाडितां फोडिता हाक झाली

बळें लांगुळें रूधिल्या सर्व वाटा
बहू तुंबला लोक तो दाट खेटा
तयाभोंवतें पुछ्य बांधोनि भारे
नभीं पोकळीमाजि नेटे उभारे

—चुली पेटल्या वन्हि तेथे विदारी

—गळे हात बांधे किती पाय बांधे

—पशू राक्षसें सर्वही येक केली
किती येक ते चिर्डचिर्डोंचि मेली

—मुलां-लेकरांमाजि ते खेळताहे
निजेल्यामधे पुछ्य ते लोळताहे
कुमारी-कुमारांगळां हार घाली
भयाभीत अंतःपुरीं हांक गेली

—सभेमाजि रायापुढें हांक गेली
अहो पाहतां काय लंका बुडाली !

—चिरें सुंदरें फाडिली रावणाची
करी भूषणें चूर मुक्ताफळांची

—सभामंडपामाजि धावोनि आले
तेणें नागिवे लोक लज्जीत जाले
महावीर मागेपुढे हात देती
कपीनें बहूसाल केली फजीति

वर्णनात रामदासांनी मजल कोठवर मारली आहे ते यावरून दिसेल. चलच्चित्रपट-निर्मात्याला हवा असलेला यथासांग मालमसाला इथे पुरविला आहे. तो ध्यानी घेतला तर वाचकांच्याही चित्तचक्षूंपुढे चित्रपट सरकू लागेल आणि दृश्यात्मक विनोद कळून येईल. आपण हास्यरस निर्मिला आहे याची रामदासांनाही कल्पना आहे. कारण, मारुतीच्या ह्या लीला-प्रतापाची बातमी ( मारुती परतण्यापूर्वीच ) ब्रह्मदेवाने पत्र पाठवून रामाला कळविली होती. तेव्हा—

तया वाचितां वाचितां राम हासे
क्रिडा कौतुकें अंतरामाजि तोषे

असे रामदासांनी नमूद केले आहे. अशाच स्वरूपाचा विनोद निजलेल्या कुंभकर्णाला जाग आणण्याच्या खटाटोपाचे वर्णन करताना निर्माण झाला आहे.

मारुतीने हा जो धुमाकूळ घातला आहे त्यासंबंधी एक प्रश्न इथे उद्भवणे शक्य आहे. सीतेचा शोध घेऊन येतो म्हणून जो निवाला त्याने तेवढीच कामगिरी गुपचुपपणे पार पाडून परतायचे, ते सोडून लंकेत हा खोडसाळपणा का करावा? नसते उपद्व्याप करून, कुरापती काढून, आपण नाहक संकट ओढवून घेतो, हे मारुतीला कळत नव्हते का? असे कोणी विचारल्यास त्याचे समर्पक उत्तरही शोधणाराला सापडण्यासारखे आहे. त्रिकुटाचळावर दाखल झाल्यावर गुप्तरूपाने मारुती सर्वत्र संचार करून पाहात असताना त्याच्या जे जे दृष्टीस पडले त्यात "**अकस्मात त्या देखिल्या बंदिशाळा!**" राज्यकारभार कसा काय चालला आहे याचा पुरावा हवा असेल तर प्रासाद, मंदिरे, कारखाने, इत्यादी पाहण्यापेक्षा राज्यातले तुरुंग पाहावेत! (रामदासांना हेच सुचवायचे असेल का?) त्या तुरुंगात कोण खितपत पडले आहे याची माहिती घेतली की राज्यकारभाराच्या न्यायीपणाची कल्पना येते. मारुतीला लंकेतल्या बंदीशाळेत कोण आढळले?—

हिणासारखे देव ते दीन झाले
नसे शक्ति ना युक्ति पोटीं गळाले
भयाभीत ते कापती दैन्यवाणें
बहू गांजिले दुःख तें कोण जाणे

सुरांकारणें कोप भीमासि आला
मनामाजि आवेश तो थर्थरीला
मनामाजि आवाकिले सर्व कांहीं
सिमा सांडिली तूळणा त्यांसि नाहीं

बहू मातले गर्व मोठया बळाचा
तयां झोडितो दास मी राघवाचा

तुरुंगात देवांची दैन्यवाणी अवस्था पाहून मारुतीच्या अंगाचा भडका उडाला आहे. तो मनात म्हणतो, "हे राक्षस फार माजलेत! गर्व झालाय त्यांना आपल्या शक्तीचा! दाखवतोच मी तडाखा!" आणि हे म्हणताना मात्र त्याला स्वतःला गर्वबाधा झाली नाही हे रामदासांनी मार्मिकपणे सुचविले आहे. आपल्या बळाचे अधिष्ठान "दास मी राघवाचा" हे तो जाणून आहे.

याच संदर्भात आणखी एक विचार नमूद करून ठेवावासा वाटतो. सुंदरकांड आणि युद्धकांड एवढीच कथा निवडण्यात रामाबरोबरीने भीमरूपी मारुतीचे

पवाडेही रामदासांना गायचे असावेतसे दिसतें. रामायणाच्या बाकीच्या कथेत मारुतीच्या वीरचरिताला वाव नाही; तो फक्त इथे आहे. कोणालाही वानरश्रेष्ठ आटोपेना तेव्हा रावणाने ब्रह्मदेवाला पुढे करून मारुतीला सभेस आणवले. तेव्हा रावण त्याला टाकून बोलतो—

अरे मर्कटा, थोर अन्याय केला
म्हणे रावणू मारितो सीघ्र तूला
तुझा मृत्यु कोठें खरें सांग आतां
मुढा करमळा मारितो जातजातां

म्हणे मारुती काळ मारू शकेना
कृपाळूपणें तोषला रामराणा

ह्या उत्तरात देखील मारुती रामभक्तीचे सामर्थ्यच सांगतो. ज्याच्यावर रामकृपा झाली आहे त्याला काळ बाधू शकेना.

पुढे रणकंदन माजले असता, इंद्रजिताने रामाच्या सेनेची भयंकर कत्तल केली. तेव्हा जांबुवंताने बिभीषणाला सुचविले की दिव्यौषधी असलेला द्रोणागिरी आणला तरच मृतांना परत जीवदान मिळेल. कोण आणणार द्रोणागिरी ? ‘ कपी मारुतीवीण दूजा दिसेना. ’ पण बिभीषणाला मारुतीच्या सामर्थ्याबद्दल शंका आली. तेव्हा, जांबुवंत म्हणतो–

म्हणे गा विरा काय तूं बोलिलासी ?
कपीसरखे मारुता भावितोसी ?
परी जाण हा ईश्वरू साक्षरूपी
कळेना जना, रुद्र पूर्णप्रतापी

इतर सामान्य वानरांसारखा मारुती नव्हे हीं ग्वाही जांबुवंताने दिली. तेव्हा मारुती त्या कामगिरीवर निघाला; तो कसा ?– मनीं चिंतुनी रामपादांबुजाला ! मारुती द्रोणागिरी घेऊन येताना कसा वाटला––

बहू पंथ चाले रवी भार नेना
बहू भार वाहे फणी तो उडेना
गरूडासि तो आचाळू हालवेना
दुजी साम्यता ब्रह्मगोळीं दिसेना

सूर्य समग्र आकाश चालून जातो, पण ओझे वाहू शकत नाही. शेषाने मस्तकावर

भूगोल सावरून धरला आहे, पण त्याला उडता येत नाही. गरुड उडू शकतो पण त्याला पर्वत उचलता येत नाही. सारांश, ब्रह्माण्डात मारुतीच्या तोडीचा कोणी नाही. असा तो अचाट सामर्थ्याचा भक्त आणि त्याचा देव राम यांच्यातील अन्योन्य भावही रामदासांनी फार हृद्य शब्दांत वर्णिला आहे.—

सखा जीविंचा तो असे दूर देसीं
सदा लागलें चित्त हें त्याजपासीं
पुढें पाहता तो अकस्मात आला
तयासारिखें वाटलें राघवाला

कपीनें कसें पाहिलें राघवासी
पुढें देखिलें लोभियानें धनासी
तथा बाळकें लक्षिलें जन्ननीला
तयासारिखें वाटलें मारुतीला

नमस्कारिलें त्या रघूनायकासी
उभा राहिला हात जोडूनि पासीं
म्हणे राम तों धन्य गा धन्य वीरा
कपी काय द्यावें तुझ्या ऊपकारा

अगा मारुती तूझिया ऊपकारें
जिवा रीण जाले बहूसाल भारें
सदा सर्वदा आमुची तूज चिंता
समस्तांसि तू येकला प्राणदाता

म्हणे मारुती सर्व स्वामिप्रतापें
प्रभू काय कीजेल म्या दीनरूपें
समर्था तुझीये कृपेवीण कांहीं
स्वता अल्पही कार्य होणार नाहीं

जेव्हा जेव्हा वानरसेना मृतप्राय होते, इतकेच नव्हे तर, रामलक्ष्मणही हतबल होतात, तेव्हा तेव्हा अभेद्य कोण उरतात, तेही रामदास आवर्जून सांगतात--

तयामाजि कल्याण दोघाजणाला
कपी मारुती आणि बीभीषणाला

आणखीही एक ठिकाणी असाच उल्लेख आहे–

कपी सर्वही पावले मृत्युपंथू
जिता मारुती आणि नैऋत्यनाथू

नैर्ऋत्यनाथ म्हणजे बिभीषण. प्रभूपेक्षाही त्याचे हे अनन्यभक्त अजिंक्य दाखविले आहेत.

एकंदर कथाभागात औचित्य आणि स्वभावोक्ती यांच्याबाबतही सावधानता आढळते. रामलक्ष्मणादि योद्धे आणि वानरसेना, सीताशोधार्थ गेलेला मारुती लंकेहून केव्हा परततो म्हणून वाट पाहत होते. आणि त्याप्रमाणे तो समुद्र ओलांडून परतला. तो सगळा प्रसंग किती बारकाईनें सांगितला आहे —

स्फुरद्रूप ऊभारिला सव्य बाहो
रघुनायके देखिला भीमदेहो
कपीं लागवेगे मुखीं बोलताहे
अशोकीं जगन्मात कल्याण आहे
पुढें मारुती तो नमस्कार घाली
चितोवृत्ति ते राघवाची निघाली

ह्यातील क्रम लक्षात घेतला म्हणजे रामदासांची बारीकसारीक गोष्टीतीलही सावधानता प्रत्ययास येते. महत्त्वाची बातमी ‘ अशोकवनांत सीतामाई सुखरूप आहेत ’ ही आधी ओरडून सांगून, मग जवळ येऊन मारुतीने रामास नमस्कार केला.

नंदीग्रामला पुष्पक विमानातून रामलक्ष्मणादि मंडळी आली. भरतभेट झाली. भरताने रामलक्ष्मणांना दृढालिंगन दिले. जानकीला नमस्कार केला. एवढ्यावरच प्रसंग आवरता घेतला नाही.

खुणा दाविता रामराजाधिराजें
कपीनाथ आलिंगिला योगिराजें

योगिराज म्हणजे भरत. आपल्या सहकाऱ्यांचाही योग्य आदर–सत्कार व्हावा ही रामाची भावना ( आणि रामदासांची सावधगिरी ) म्हणून रामाने भरताला खूण केली आणि मग भरताने सुग्रीवालाही आलिंगन दिले. तिथून पुन्हा पुष्पक विमानात बसून सर्वजण अयोध्येला निघाले. अयोध्या समोर दिसू लागताच सैन्यातले वानर –

खुणा दाविती येकमेकासि तेथें
मुखें बोलले ‘ राहिले राम येथें ’

‘ इथं राम राहिले होते बरं का ’ ही वानरांतली आपापसांतली कौतुकाची भाषा टिपायला रामदास विसरले नाहीत आणि—

सुमंतू समर्था म्हणे पैल पाहे
ऋषी जन्ननी मंडळी येत आहे
तया सांगतां राम तो सिद्ध झाला
पदें चालतां तो पुढें सीघ्र आला

ऋषी, मुनी, माता, अशी तीर्थरूप मंडळी समोरून येत आहेत असे सुमंताने ध्यानी आणून देताच राम स्वतःच पुढे चालून गेला. आचार, विचार, उपचार, वगैरे सर्व काही बारीकसारीक रंगछटा रामदासांनी साक्षेपाने भरल्या आहेत.

प्रसंग असो किंवा स्थलवर्णन असो, तपशिलाची रेलचेल असायची हा तर रामदासी काव्यविशेष ! वानरांच्या वनक्रीडा त्यांनी सूक्ष्मपणे न्याहाळल्या असल्यामुळे

स्वईछा फळें भक्षिती आदरेंसी
बहूं वाटिती येकमेकां त्वरेंसी
फळें टाकिती तोडिती ते अपारें
वनामाजिं ते क्रीडती भूभुकारें
कितीयेक हेलावती वृक्ष आंगें
कितीयेक ऊफाळती लागवेगें
कितीयेक ते झोंबती आंग वेस्तें
कितीयेक ते लोंबती येक हस्तें

अशा तऱ्हेच्या यथातथ्य शब्दचित्राचे पांच पन्नास श्लोक ते भराभरा लिहून जातात.

अनेकांबरोबरचे युद्धप्रसंग म्हणजेच युद्धकांड. त्यामुळे एकेका वीरासमवेत घडलेले समरप्रसंग आणि द्वंद्वयुद्धे सर्गासर्गांतून विस्ताराने वर्णिलेली आहेत. एकमेकांना उणेदुणे बोलून युद्धाचे आव्हान द्यायचे आणि एकमेकांनी एकमेकांवर शस्त्रास्त्रांचा भडिमार करायचा, जयापजयाचे पारडे इकडून तिकडे झुकायचे, अचानक शत्रूचे वर्म सापडून त्याचा नाश व्हायचा, ही वर्णने पानोपान आली आहेत. लक्ष्मणाला ‘ शक्ति ’ लागणे, मारुतीने द्रोणगिरी उपटून आणणे, हे तर ठळक प्रसंगच आहेत. तपशिलाला रामदास कोणाला हार जातील असे वाटत नाही. रणांगणावर सर्वत्र छिन्नविच्छिन्न प्रेतें पसरल्यामुळे ते कसे भेसूर दिसत होते त्याचे वर्णन इतके परकोटीचे रौद्र-बीभत्स केले आहे की वाचकाला शिसारीच यावी ! उलट, महोत्सवाचा सोहळा, सुखोपचारभोग यांचेही चित्रण इतके यथासांग आहे की, रात्रंदिवस राजा–महाराजांच्या तैनातीत असलेल्या महोत्सवमंत्र्याने ( Master of Ceremonies ) आश्चर्य–चकित व्हावे आणि गिरिकंदरी राहाणाऱ्या या सड्या–फटिंग गोसाव्याकडून धडे घ्यावेत. मंडपशोभा, रोषणाई, मेजवानीचा थाट, हत्ती–घोडे–पालख्या इत्यादिकांचा साजशृंगार, सारे काही अपरंपार वर्णिले आहे.

पुढें सीघ्र पाल्हाणिले दिव्य घोडे
महीमंडळी त्यासि नाहींत जोडे
असंभाव्य ते हिंसती लक्षकोडी
उफाळे तयां धावतां भूमि थोडी
मोहोळी, झुली, पांखरा, मुक्तमाळा
बहूरत्नमंडीत भासे उमाळा
अलंकार – भांगार – मंडीत केले
बहू भार शृंगारिले सिद्ध जाले
गिरिसारखीं चंड बंडें अपारें
बहू मातली कुंजरें थोरथोरें
पताका झुली रम्य दिव्यांबरांच्या
बहूरंग लावण्य नानापरींच्या
महामस्त ते हस्तभारें निघाले
त्वरें चालती भव्य सर्वांग डोले
भुमि हाणतां अंदु वाजे दणाणा
बळें वाजती चंड घंटा घणाणा

लवाजम्यातल्या शृंगारलेल्या हत्ती–घोड्यांचे हे शब्दचित्र. रणधुमाळीतील रथ आणि घोडे यांची ही तऱ्हा पहा—

उफाळे बळें धांवती दिव्य घोडे
रथामाजिं संघटणी घोष गाढे
धुरा ऊलथो पाहती सीघ्र मार्गें
विरीं वोढिले वाग ते लागवेगें

[ वाग = दोऱ्या, काढण्या ]
पुष्पक विमान कसे दिसत होते ते रामदास सांगतात–

विमानावरी वाजती घंटमाळा
खडे घोष हेलावती मुक्तमाळा
समुद्रोदकीं पूर्ण तारूच जैसें
नभामाजिं तें चालतें भव्य तैसें

रामदासांना शब्दांचा तोटा पडत नाही. त्यांची लेखणी म्हणजे टांकसाळ आहे आणि

मती म्हणजे विश्वकोश आहे. त्यामुळे ते कोठेही कुंठित होत नाहीत. सुभाषितेही ठायी ठायी आढळतात :

–मुखें व्यर्थ बोलो नये अप्रतिष्ठा
–समर्थापुढें मिथ्य कैसें वदावें
–बळें हीण झुंजासि त्याच्या न जावें
कदा कृपणाचे वऱ्हाडी न व्हावें
महामूर्ख रे सख्य त्याचे नसावें
स्वयें हीत ते ज्ञान पोटीं वसावें

अशा ओळी म्हणजे जागजागी तेवणाऱ्या चंद्रज्योतीच होत.

राम वनवासांत असताना तो व्रतस्थ होता; नागर उपचारांना तो पारखा होता. पण वनवास संपून स्वकीयांत परतल्यावर जे जे उपचार करण्यांत आले त्यांचा तपशील दिला आहे–

–समश्रू क्रमें जाहली त्या प्रसंगें
नखें काढिली नीळरंगें तरंगें
जटाजूट ते मोकळे सर्व केले
स्नेह घालिता रम्य चक्षू निवाले

–पुढें दर्पणीं पाहिलें रूप रामें
प्रसंगीं तये कोटिकंदर्पधामें
कळा बाणली भव्य लावण्य गात्रीं
असंभाव्य सौंदर्य राजीव नेत्रीं

–सुगंधें फुलेलें चबाडीत माथां
महामस्तकी मर्दितीं लोकनाथा

–जळें निर्मळें घालिती उष्ण धारा
मुखें बोलती तोय आणीक सारा

–शिरीं घालिती तोय नेटें घळाळा
नद्या वाहती उष्ण वोघें खळाळा
सुगंधेंचि दोहीं तिरीं पंक जाला
असंभाव्य ते भृंग तेथें मिळाला

किती म्हणून अवतरणे द्यावीत ! वाचकांनी ओळीओळीतून वाहत जावे असा महापूर आला आहे वर्णनाला ! रामासमवेत जो उदंड परिवार आला आहे त्यांच्या सोयीही परोपरीने पाहिल्या आहेत. त्यांच्या निवासासाठी पुरेशी गृहे मंदिरे नव्हती म्हणून **' गृहें निर्मिली अंबराचीं अपारें '** किंवा **' गृहें दीधली रम्य दिव्यांबरांचीं '** ( म्हणजे तंबू ठोकले ) हे सांगण्यासही रामदास विसरले नाहीत आणि सगळीकडे निजानीज झाली असता गस्त घातली जात होती हेहीं नमूद करण्याची त्यांनी चालढकल केली नाही.

राम हा कथानायक. त्याच्या चारित्र्याचें अनेक विलोभनीय पैलू रावण-बधानंतरच्या कथाभागांत आले आहेत. रावणाच्या दुर्वर्तनाला विटून बिभीषण रामपक्षाला मिळाला होता. तरी पण मृत्यू ओढवल्यावर वैर संपते. त्या वेळी बंधूचे गुण आठवून शोक बळावणे स्वाभाविक आहे —

मुखें श्वास सांडूनि पाणी चुरी तो
भुमी मस्तकू आपटीतो पिटीतो
म्हणे, वीर तो !– वोखटा काळ आला !
त्रिकूटाचळाचा अलंकार गेला !

नव्हे रावणासारिखा संपतीचा
नव्हे रावणासारिखा व्युत्पत्तीचा
बहू सांगता वैभवालागि कांहीं
प्रतापी तयासारिखा वीर नाहीं

मनाचा उदारू धनाचा कुबेरू
बहूसा विचारू जनीं दानशूरू
गळाला बहू धीर त्या राक्षसांचा
मही मंडळी धाक गेला सुरांचा

बहुतां जणांचें बहू भाग्य गेलें
गमे सर्व ब्रह्मांड हे वोस जाले
जया कारणें देव लीळावतारी
तयाच्या गुणा तूळणा कोण सारी !

उदासीन वाटे जनीं पाहवेना
मनीं स्वस्थ नाहीं कदा राहवेना

गताच्या गुणें वीर तो मग्न जाला
तयालागिं वारावया राम आला

आणि बिभीषणाचे सांत्वन करताना रामही खेद करतो की, "मोहोसागरीं ज्ञान तारू बुडाले!" ह्यावरून रामाच्या मनाचा मोठेपणा दिसतो व रावण ज्ञानसंपन्न होता हेही त्यास मान्य होतें, हे दिसते.

रावणाच्या ज्ञानसंपन्नतेच्या संदर्भात सांगायचें म्हणजे असे की, युद्धाला आलेला इंद्रजित विजयप्राप्तासाठी यज्ञयाग करायला बसला होता. बिभीषणाला ही बातमी लागली तेव्हा तो "म्हणे हो प्रभू जुंझता पूरवेना। पुरा होम होता रिपू आवरेना." म्हणून, प्रथम त्याच्या यज्ञाचा विध्वंस करण्यात आला. तोच प्रकार रावण युद्धास उद्युक्त झाला त्या दिवशीही घडला होता. त्याच्या यज्ञात विघ्न आणण्यासाठी तर मंदोदरीला अंतःपुरातून ओढून आणून त्याच्या समोर तिची विटंबना करण्याचा डाव रचण्यात आला. तेव्हा, यज्ञ अर्धवट टाकून रावण उठला आणि ती संधी साधून रिसांवानरांनी त्याचा यज्ञ उधळून लावला. सारांश, रावणाचे कुळ यज्ञयागादि क्रियाकर्मांचे पाळण करणारे होते.

युद्धात रावण पडल्याने बिभीषणही जर शोकविकल झाला तर रावणाच्या अंतःपुरात केवढा आकान्त झाला असेल!—

–प्रसंगीं तये थोर कल्लोळ झाला
रणामाजिं तो सौख्यसिंधू बुडला
–मुखें बोलिती थोर आघात झाला
समस्ता सुखाचा अलंकार गेला
--रणीं कांत देखोनि आकांत केला
बहू पाप हो वोखटा काळ आला
–अकस्मात ते सर्व सौभाग्य गेले
समर्था प्रभू कां उदासीन केले
समस्तासि शोकार्णवीं मोकलीलें
असंभाव्य हें दुःख टाकूनि आलें

रामाने त्या शोकविकल राजांगनांचे विभीषणाकडून सांत्वन करविले. त्यातले सूत्र "निमाल्यावरी वैर कां हो करावें" हे आहे. मग सुग्रीवाकरवी बिभीषणाची लंकेच्या सिंहासनावर स्थापना केली. सीतेला हा समाचार मारुतीने सांगितला पण पहा, तोच तिला रामाकडे घेऊन गेला नाही आणि रामानेही पण परस्पर व्यवस्था केली नाही. कोणता मार्ग पत्करणे उचित होतें?

म्हणे गा विरा सांग बीभीषणातें
वनीं जाउनी आणिजे जानकीतें

बिभीषणाला लंकेचे राज्य दिल्यावर त्याच्याकरवीच तो कार्यभाग व्हायला हवा होता. पुढे सर्व देव रामाच्या भेटीस आले. त्या प्रसंगावर "सुखें चालले राम पाहावयाला" अशा पालुपदाचे १०।१२ श्लोक आहेत. मोठी रम्य रचना आहे. त्यात सदाशिव भेटीस आला तेव्हा प्रभू रामचंद्र जातीने पाच पावले सामोरे आले असे नमूद केले आहे. याप्रमाणे औचित्य-विवेकाची केव्हढी तरी मालिका गुंफता येईल. रामाच्या उदात्ततेचीही साक्ष यातून मिळते.

जानकीला रामाच्या भेटीस घेऊन जाण्यासाठी बिभीषणादि सान-थोरांचा मेळावा आला. जानकी निघायला सिद्ध झाली. त्या वेळी :—

जिवाच्या सख्या राक्षसी जानकीच्या
बहू दीस होत्या वनीं संगतीच्या
दिलीं पंचकें दोनि दोघीजणीला
महाशर्भ नामें तये त्रीजटेला

म्हणे जानकी लोभ आतां असावा
उदासीन वाटे बहू कष्ट जीवा
समस्तां जणातें फळें पाठविलीं
सुखें जानकीनें बहू स्तूति केली

हाही उपचार ध्यानी घेण्याजोगा आहे. मोठ्या लव्याजम्यानिशी शिबिकेत बसून सीता रामाकडे येत असताना, तिचें दर्शन घडावे म्हणून रिसां-वानरांची कोण धडपड नि यातायात!

पहाया सिता वीरमांदी मिळाली
प्रसंगीं तये दाटणी थोर जाली
बळें टाकिती येकमेकासि मागें
कपीवीर ते धांवती लागवेगें

झडा घालिती येकमेकां पुढारे
दिसेना, पदीं सर्व सेना उभारें
पहाया पुढें घालिती मस्तकातें
महावीर ते हाणिती वेत्रघातें

इतकी गर्दी उसळली, रेटारेटी सुरू झाली की गर्दी हाटवायला छडीमार करावा लागला.

महां मार देखोनि माहांविरांचे !
भ्रमो लागले भार गोलांगुळांचे
दिसेना सिता आर्त पोटीं पुरेना
उतावेळ त्या धीर नैनीं धरेना

कपी धांवती सीघ्र पाहावयाला
परी रीग नाहीं पुढें जावयाला
प्रसंगीं महा मार देखोनि दृष्टी
रघूराज तो बोलला येक गोष्टी

सितेकारणें वानरीं कष्ट केले
किती वेळ हे युद्ध होता निमाले
उतावेळ पोटीं पहाया सितेला
दिसे पष्ट ऐसें करावें तियेला

मोहोछाव यात्रा तथा पर्वकाळीं
विवाहीं, युधान्तीं तथा अंतकाळीं
गृहीं सासुऱ्याचे तथा जन्नकाचें
नव्हे निंद्य ते संगतीनें वराचे

पुढें धाडिले सीघ्र त्या अंगदाला
म्हणे रे कपी सांग बीभीषणाला
म्हणावें बळें आपले लोक वारा
पुढें सीघ्र येऊनियां दूरि सारा

त्वरे धांवला राव त्रीकूटवासी
बहू वारिलें मारिलें राक्षसांसी
पुढें काढिलें पटकूळां दुकूळां
दिसों लागली जानकी दिव्य बाळा

समस्तीं सिता देखिली आदरेंसी
असंभाव्य सुंदर्य लावण्यरासी

तये देखतां सर्व सूखें निवाले
कपी बोलती आजि निःपाप जालें

ह्या चित्रणात जनस्वभावाचे किती छान दर्शन घडते. त्याचबरोबर, पडदानशीनपणा बाजूला केव्हा सारायचा याबाबतचा शास्त्राधारही ओघात सांगितला गेला आहे. चालीरीती, आचार-विचार, हितोपदेश, नीतिन्याय इत्यादीचे असले उल्लेख काव्य-विषयाची शोभा वाढवितात, आशय समृद्ध करतात.

शेवटी अयोध्येत श्रीरामचंद्र भद्रासनी विराजमान झाल्यावर आणि तो सोहळा समाप्त झाल्यावर सर्व अभ्यागतांना निरोप देण्यात आले. त्यात कपीदल-भारालाही निरोप दिला आहे. त्या वेळी कपींची अंतःकरणे किती भारावून गेली आहेत—

कपी बोलती सर्व कारुण्यवाचा
स्तुती ऐकतो राम सिंधू सुखाचा

गिरीकंदरामाजि आम्ही असावें
नरीं देखतां वानरीं सीघ्र जावें
समर्थें सवे लागली मर्कटांला
महां सुकृता पार नाहीं सुखाला

प्रभू बोलणें चालणें काय जाणों
बरें वोखटें सर्व कांहींच नेणो
बहूतां परी चालवीलें दयाळें
तुम्हां योग्य; हें आमुचें तोंड काळें

कृपाळूपणें राघवें थोर केलें
बरें वोखटें सर्व साहोनि नेलें
बहु देखिलें सौख्य नानापरींचें
प्रभू श्वापदालागि हें प्राप्त कैचें

सभाग्याचिये संगतीनें असावें
बहूतापरीचें बहु सौख्य घ्यावें
तयासारिखे सर्व आम्हांसि जालें
महां वैभवें चीत सूखें निवालें

नव्हे भेटि नानापरी योग-यागें
नव्हे भेटि नानापरी भोग-त्यागें
नव्हे भेटि ब्रह्मादिकां सीघ्र काळें
त्रिकूटाचळीं दाखवीलें भुपाळें

कपी रीस ते बोलती दैन्यवाणें
कृपासागरू जीविंचा भाव जाणें
तयाच्या सिणें देव तो सीणताहे
बहूतांपरी राम संमोखिताहे

सवे लागली राघवाची सुटेना
प्रिती गुंतली तोडितांही तुटेना
बहू दीस गेले सुखाचेनि योगें
अकस्मात तें दुःख जालें वियोगें

तया बोलता जाहला रावणारी
तुम्हा भेटि देईन कृष्णावतारीं

ह्यांतील रसोद्रेक रसिकाला स्पष्ट करून सांगायला नकोच. ह्यानंतर, रामाचे (म्ह० देवांचे) भक्तजनाबात काय ब्रीद आहे ते सविस्तर सांगून रामदासांनी समग्र युद्ध-कांडाचा प्रकरणवार आढावा घेतला आहे. श्रोत्यांच्या चित्तावर त्यांना हेही ठसवायचे आहे की–

मनीं भावना भक्तलोकांसि जैसी
तयासारिखी देवरायासि तैसी
जनीं सेवकांकारणें जन्म घेणें
महद्भाग्य सांडूनिया नीच होणें

पडे सांकडें सर्वदा सेवकांचें
दिनानाथ हें ब्रीद विख्यात साचें
मनामाजि ते जैसजैसी अपेक्षा
करीना कदा राम त्यांची उपेक्षा

जया अंतरीं भाव होईल जैसा *
तयालागिं तो देव पावेल तैसा
यदर्थीं कदा संशयोही असेना
अभावें तरी देव तो पालटेना

असो हे कथा बोलिली राघवाची
जनीं सर्वदा ऐकती धन्य त्यांची
कथा ऐकतां ते महां दोष जाती
दुखें नासती लोक ते धन्य होती

तो काळ ध्यानात आणला म्हणजे महाराष्ट्राचे त्या वेळचे दुःख पारतंत्र्याचे होते हे उघड आहे. त्या दुःखाच्या परिहारार्थ लोकांनी उद्योगास प्रवृत्त व्हावे ह्या हेतूने रामदासांनी ही कथा लोकांना ऐकविली, असे मानण्यात काही वावगे होईल असे वाटत नाही. ह्या दुःखाच्या संदर्भातच " रामप्रताप " ह्या स्फुटाची आठवण होते.

* * *

* 'मनाचे' श्लोकांत " असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा " असे समानार्थी चरण आहेत. " ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् " हा ह्या रामदासी उद्गारांचा उगम दिसतो.

१४.

# रामदासांचें कवित्व

गुणासि गुणग्राहिकें
न मीळतां दिसे फिके

**—रामदास**

"रामदास काय कवी आहे?" गोफणीतून रान-पाखरावर दगड भिरकावला जावा त्याप्रमाणे माझ्या अंगावर हा सवाल आला! बरं, हा सवाल करणारी व्यक्ती 'अगदीच कोणी तरी' होती, असेही नाही. बराच अभ्यास केलेली, पुष्कळ वाङ्मय पाहिलेली, रसिक, जात्या कलावंत अशी ती माननीय व्यक्ती होती. मग, हा सवाल का? आणि नुसता सवाल नव्हे, त्यातच निश्चित मताचा ध्वनी आहे.

कधीकधी दुसऱ्याच्या मताचा अनुवाद आपण करीत असतो. 'बाबा-वाक्यं प्रमाणं' असे घडत असते. त्यामुळे तर हे मत बनले नसेल? रामदासांच्या काव्य-रचनेचा साक्षेपाने अभ्यास केला गेला नसणेही शक्य आहे. जुजबी वाचनाने मोघम ग्रह बनतो, आणि त्याची तपासणी करावयाची राहून जाते. तसे न घडल्याने प्रतिकूल मतांच्या पाखडीत आपले मत सांपडते. त्या प्रतिकूल मताचीच पुटे चढतात. आपल्या मोघम विचारांना तदनुसार उपरी आकार येतो आणि स्वरूप पक्के होते. कदाचित, कवी कोणाला म्हणावे आणि काव्य म्हणजे काय, याबाबत सवाल-कर्त्यांच्या विशिष्ट कल्पना असाव्यात आणि त्या कल्पनांच्या कसावर त्याच्या मताने रामदास उतरत नसावा. आपले वर्तमानकालीन निकष लावून गतकालीन व्यक्तीच्या काव्यगुणांचे मूल्यमापन करणे कितपत न्याय्य होय, हा विचार सुचला नसावा. अंगावर आलेल्या ह्या सवालाने असे कांही विचार माझ्या मनात शहारले आणि मी रामदासांची कविता पुन्हा उघडून बसलो; आणि जाणवले की—

संतश्रेष्ठांच्या मालिकेत रामदासांचे व्यक्तित्व आगळे आहे. केवळ भक्तिभावाने रघुनंदनाचे गुणसंकीर्तन करणे हे त्यांच्या 'संत' पदवीस साजेसे असले तरी तेवढेच करण्यात त्यांनी इतिकर्तव्यता मानली नाही. अनेक विषयांचे आवाहन त्यांच्या मतीला पोचले आणि मनोदधीवर विचारांचे भोवरे उठले. त्यांतून त्यांची जी कविता उफाळली ती केवळ भक्तिपर नसून त्यांच्या कविप्रकृतीची साक्ष देणारी आहे. ईश्वरभजन हा त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रमुख पैलू असला तरी इतर अनेक पैलू असे आहेत की, भक्तिप्रवणतेशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध नाही. त्यांचा संबंध त्यांच्या रसिक वृत्तीशी आणि जीवनवादी विचारसरणीशी आहे.

हे अर्थातच दाखवून द्यायला हवे. पण तत्पूर्वी त्यांच्या कवित्वाविषयी जो गैरसमज आहे त्याचे कारण काय व त्याचे निराकरण कसे करायचे, ते पाहणे जरूर आहे. मळणी झाली, रास घातली गेली, पण ती वाढवून घेतली म्हणजे डोळ्यांत भरते. नदीच्या पात्रातले किंवा पायऱ्या उतरून विहिरीतले पाणी भरून घेताना पृष्ठभागावरचा केरकचरा वारून घागर भरून घ्यावी लागते.

पुष्कळ वेळां समोर असलेल्या श्रोत्यांचे आणि प्राप्त झालेल्या प्रसंगाचे तानमान पाहून रामदास बोलत आहेत असे दिसेल. त्या वेळी ते केवळ हरिभक्ति-परायणतेची माळ ओढीत नाहीत. बाग-प्रकरणाची सुरुवातीची ओळ पाहा—

‘ प्रसंग निघाला स्वभावें । बागेमध्ये काय लावावें ।
म्हणून घेतलीं नांवें । कांहीं एक ॥ ’

ह्या ओवीतील आरंभीच्याच चरणांवरून दिसेल की प्रसंगानुरूप ते बोलत आहेत. ह्या बाग-प्रकरणी शे–दीडशे वृक्षवेलींची, फुलवेलींची आणि फळवेलींची नावे आली आहेत. अर्थात ‘ रसात्मकम् काव्यम् ’ ह्या व्याख्येच्या कसोटीवर हे प्रकरण ‘ काव्य ’ म्हणून गणले जाणार नाही हे सांगायला कोणीही व्युत्पन्न टीकाकार नको. आजच्याही एखाद्या कवीच्या घरी निघालेल्या मंगल कार्याप्रीत्यर्थ त्याने केलेल्या जिनसांची यादी त्याच्या कवितांच्या वहीत सापडेल. ती त्या बाडात सापडली म्हणून काही ते त्याचे काव्य नव्हे. ती त्याच्या व्यावहारिक गरजेची व जागरूकतेची निदर्शक ठरेल. त्याच न्यायाने रामदासांच्या ग्रंथात अशा प्रकारची जी प्रकरणे आढळतात ती काव्य पदवी पावणारी नाहीत, हे उघड नाही का ? ‘ मानसपूजा ’ ह्या मथळ्याखाली दहाबारा स्फुटे आहेत. त्यांत सभामंडपाची सजावट, वाद्यप्रकार, बैठका, स्वयंपाकाचीं भांडीकुंडी, स्वयंपाकिणी, वाढपी, चटण्या-कोशिंबिरी, भाज्या, पक्वान्ने, पंगतीतले आग्रहप्रकार, यांची उदंड माहिती सांगितली आहे. ही सारी स्फुटे काव्य म्हणून गणता येणार नाहीत. आणि रामदासांचाही तसा समज असणार नाही, ते तसा आग्रह धरणार नाहीत. ‘ कारखाने ’ प्रकरणाचे दोन समास असेच आहेत. त्यांचा तपशील कसा अ-काव्यरूप आहे हे पाहण्याची जिज्ञासा पुरी करण्यासाठी वानगी-दाखल ह्या ओव्या पाहा––

ऐका विटांचा प्रसंग । लांबी रुंदी यथासांग
चौक नेमस्त व्यंग । असोचि नये ॥
वीट लांबी नऊ तसू । आणि रुंदी सात तसू
उंची जाणिजे तीन तसू । पाठपोट नेमस्त ॥
खिळे कुऱ्हाडी पायळ्या । पाहरा संबळ कुदळ्या
घन फावडे लेरसळ्या । तरफा असाव्या

मांदणें, डेरे, घागरी । रांजण, गाडगी, भारी
पाळीं बहुता परोपरी । दांडे असावे ॥
तिकट्या सूत्रें ओळंबे । काम पाहूनिया मनुष्य झोंबे
तरी मग इमारती खेबडंगे । उभे राहती ॥

ब्रिटनचे एक वेळचे जगद्‌विख्यात पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल यांनी ' विटा कशा रचाव्यात यावर एखाद्या धंदेवाईक गवंड्याच्या सफाईने भाषणे दिली ' असल्याचे त्यांच्या परिचय-लेखात वाचले असल्याचे इथे आठवते. पण ते कौतुक आम्ही आमच्या संत–श्रेष्ठाबद्दल करणार नाही ! उलट, काव्यविचारच इथे प्रस्तुत असल्यामुळे, न्यायनिष्ठुरपणे कोणीही विचारणार की हे काय काव्य आहे ? नाही, नाही, त्रिवार नाही ! मग ओवीत ही रचना कशाला ? कारण असे दिसते, की छंद-धाटीचा सराव मनाला झालेला. मनाची मूसच तशी ओवी-अभंगाकार झालेली. त्यामुळे सहज सांगणे तेही ओवीत ओवले गेले. ' पडिलें वळण इंद्रियां सकळां ' ह्या उक्तीत म्हटल्याप्रमाणे वाणीला वळण पडले ओवीबद्ध बोलण्याचे. तेव्हा, शब्द सहजच तसे जुळले गेले. काव्य म्हणून ह्यांना पदवी लाभणार नाही. ह्यांत भावसघनता नाही. भाव तो निराळा ! हे रामदासही जाणत नसतील काय ?

थोरले बंधु श्रेष्ठ गंगाधर स्वामी परंधामास गेले त्या प्रसंगी आपल्या पुतण्यांना चार धीराच्या, समजुतीच्या आणि व्यवहारदक्षतेच्या गोष्टी सांगण्यासाठी पत्र लिहिण्याचा प्रसंग आला. रामदासांची लेखणी भुजंगप्रयात वृत्ताशी इतकी एकरूप झालेली की ते पत्र त्याच वृत्तात सुरू झाले. त्यात " सदा दात घासोनि तोंडा धुवावें । कळाहीण वाणेरडे बा नसावे ॥ " इतका मामुली उपदेश आला आहे. उघडच आहे की हा गद्यप्राय आहे. हें रामदासांच्या लक्षात आणून द्यायला दुसरा कोणी पंडित नको. ' बुद्धि दे रघुनायका ' असे जरी त्यांचे मागणे असले तरी, हे आपण वृत्तबद्ध पण गद्यच लिहितो आहो हे न उमगण्याइतके ते निर्बुद्ध खास नव्हते. ' पडिलें वळण इंद्रियां सकळां ' हेच इथे ध्यानी घ्यायला हवे. पण, लिहितालिहिता

' भला रे भला ' बोलती तें करावें
बहूतां जनांचें मुखे येश घ्यावें
परी शेवटीं सर्व सोडोनि द्यावें
मरावें परी कीर्तिरूपें उरावें

असा एक श्लोक ते लिहून गेले आहेत. विमानतळावरील मार्गावरून चाकांनी चालता-चालता विमानाने जशी उंच भरारी घ्यावी तशी इथे रामदासांच्या मतीला गती आली आहे. उपदेशपर हा श्लोक त्रिभुवन मोलाचा नाही का ? मला तर इतका साधा पण इतका अर्कयुक्त उद्‌गार सापडणे कठीण आहे, असे वाटते. रामदासांच्या लिखाणा-

मागची प्रेरणा आणि प्रसंग ध्यानी घेतल्याशिवाय त्याबद्दल अभिप्राय देणे बरे नव्हे. डॉ. भाभासारख्या महान शास्त्रज्ञास उद्या एखाद्या प्राथमिक शाळेस भेट द्यायचा किंवा बालगोपालांच्या मेळाव्यात बोलण्याचा प्रसंग आला तर ते काय अंतराळ-यानाची बीजगणिते त्या कुसुमकोमल बालबुद्धीवर पाखडत बसतील ? का समोरच्या त्या बाळश्रोत्यांना रुचेल–पचेल असेच बोलतील ? रामदास लहान मुलांना पत्र लिहीत आहेत. तरी पण, लिहितालिहिता, त्यांना समजेल इतक्या साध्या, सरळ भाषेत पण जीविताचे सारसर्वस्व ठरावा असा हा श्लोक ते लिहून जातात. इथे प्रतिभा आहे, इथे जीवितविषयक ध्येयदृष्टी आहे. विचारी वाचकांनी जरा थांबून ह्या श्लोकावर मनन करावे म्हणजे त्यांचे त्यांना ह्या साधेपणांतले अगाध-पण कळून येईल. साध्या शब्दांत महान आशय तुडुंब भरावा, ही किमया कोणाला साधते ? तरी पण ही अ–काव्यरूप असलेली सारी प्रकरणे वाचताना एक गोष्ट निर्विवाद जाणवते ती ही की, हा पुरुष म्हणजे चालताबोलता व्यावहारिक ज्ञानकोशच आहे. याची दृष्टी सूक्ष्म आणि चौफेर आहे; ग्रहणशक्ती प्रखर आहे. अशी काही प्रकरणे वाचताना ( चोखंदळ काव्यमर्मज्ञाला हवा असलेला रस त्यात नसूनही ) रामदासांचा वाक्प्रवाह असा चाललेला दिसतो की, आपण धबधब्याखाली सापडलो आहो असे वाचकाला वाटते. त्यांचे शब्दभांडार व ज्ञानभांडार इतके उदंड आहे, की त्याला तूटच नसावी ! आध्यात्मिक, आधिभौतिक अशा तापांचे ते जेव्हा वर्णन करू लागतात तेव्हा व्यापतापांची लांबलचक यादीच ते देत आहेत असे वाटते खरे, पण ह्या यादीचा भरघोसपणा पाहून वाचक चकित होईल यात शंका नाही. कारण ती यादी काही एक एक वस्तू किंवा व्याधी वा प्रकार आठवत बसून लांबवायची म्हणून लांबवलेली दिसत नाही. कारण कारंज्यांतून ज्याप्रमाणे फवारे उफाळून पसरू लागतात तसा तिथे वाक्प्रवाह चालत आहे असे दिसते. एकामागोमाग एक, अखंडितपणे आठवता येणे हे बुद्धीचे सामान्य लक्षण नव्हे. हाताशी कोश किंवा कॅटलॉग घेऊन रामदास लिहायला बसले नाहीत. तप्त लोखंडाच्या कांबीला इच्छित आकार देण्यासाठी लोहाराच्या हातांतील घणाचे भराभर घाव पडत असताना ज्याप्रमाणे लोखंडातून सटासट लालबुंद ठिणग्या उडत असतात त्याप्रमाणे त्यांच्या उद्गारातील भाषेचे स्वरूप आहे, शब्दांची पखरण आहे.

आणि हे शब्दवैभव रामदासांनी कवींची जी लक्षणे सांगितली आहेत त्यात समाविष्ट केले आहे. नाना शब्दांचे भुवन, शब्दरत्नांचे सागर ही कवींची बिरुदे होत. तसे पाहिले तर रामदासांच्या ग्रंथात कवी व काव्य यासंबंधी बरेच विचार आले आहेत. दुसऱ्या कोणत्याहि संतश्रेष्ठाने कवित्वाविषयी इतका स्वतंत्र विचार केलेला नसावा. ज्ञानेश्वरांच्या एतद्विषयक काही ओव्या काढून दाखवता येतील. पण त्या निरूपणाच्या ओघात आलेल्या असाव्यात; साहित्यविषयक काही स्वतंत्र विचार मांडायचा असा त्यांचा इरादा दिसत नाही. रामदासांनी समासच्या समास ह्या विषयावर खर्ची घातले आहेत.

दासबोधाच्या पहिल्या दशकातला सातवा समास 'कवेश्वर'–गौरवाचा असून तो सर्वविश्रुत आहे. कवित्वकळा–निरूपणासाठी चवदाव्या दशकाचा तिसरा समास खर्ची घातला आहे, तोही पुष्कळांच्या पाहण्यात आहे. अर्थातच ' स्फूर्ति 'विषयी त्यांनी स्वतंत्र स्फुट लिहावे हे त्यांच्या कवि–प्रकृतीशी सुसंगतच नव्हे का ? नरदेहाची महती वर्णन करतांना–

नाना शब्द नाना स्पर्श । नाना रूप नाना रस ।
नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥
अष्ट भोग नवरस । नाना प्रकारींचा विळास ।
वाच्यांश लक्ष्यांश सारांश । मनुष्य जाणे ॥
वाच्यांश जाणोनि सांडावा । लक्ष्यांश विवरोन घ्यावा ।
याकारणें निशब्द मुळाचा गोंवा । आडळेना ॥

हे विचार येणे, याचे कारणही वाङ्मयाबद्दल त्यांच्या मनात काही कल्पना आहेत आणि म्हणूनच त्या कल्पनांना अन्य अनुसंधानातदेखील अशी अधूनमधून वाट मिळते. नवरसांची नोंदही त्यांनी एका अभंगात अशीच केली आहे. इतकेच काय, देवाजवळ त्यांचे एक मागणे आहे त्यात अभेदभक्ती, आत्मनिवेदन, पावन भिक्षा, सज्जनसंगती ह्यांची भक्तांच्या नात्याने अपेक्षा करता करता –

कोमल वाचा दे रे राम
संगीत गायन दे रे राम
अलाप गोडी दे रे राम
अनेक धाटी दे रे राम
रसाळ मुद्रा दे रे राम
शब्द मनोहर दे रे राम

अशी जी मागणी केली आहे ती त्यांच्या अंतर्यामी काव्यकलेसंबंधी जी प्रीती आहे, जी जाणीव आहे, तिच्यातून उगम पावलेली नसेल काय ?

आजकालच्या व्युत्पन्नांनी संस्कृतांतील, त्याचप्रमाणे परदेशीय काव्यशास्त्राच्या परिशीलनाने कवित्वाबद्दल काढलेले सम्यक् निष्कर्ष ध्यानी घेता तीन शतकांपूर्वीच्या ह्या गोसाव्याच्या काव्यविवेचनपर सिद्धान्तात काही उणेपणा आढळेल. शिवाय भक्तिमार्गी पुरुषाने केलेल्या विवरणाचा रोख संदेह–संसारबुद्धी–निरास यांकडे असल्यामुळे, केवळ ' कला ' म्हणून इतरांनी प्रकट केलेल्या काव्य–विचाराशी त्यांच्या सिद्धान्तांचा मेळ बसणार नाही. तरीपण, त्यांनी कांही स्वतंत्र विचार केला होता, हे मान्य करावे लागेल.

हे सारे तारतम्यात्मक विचार झाले. पण इतका पसारा न घालता, रामदासांचा ग्रंथ वाचणाऱ्याला काही काव्य वाचल्याचा आनंद लाभतो का, कवित्वाची साक्ष कोठे येते का, हा सरळ सरळ प्रश्न शिल्लक उरेलच. आणि तसा अनुभव आला असल्यास तो कोठे आला त्या स्थानांकडे (सगळ्या नव्हे, उदाहरणादाखल) निर्देश करणे जरूर आहे.

कवित्वाचे गमक काय ? या प्रश्नाचे उत्तर तत्त्वात्मक देण्यापेक्षा, उदाहरणांच्या आधाराने बोलू जाता उकल होण्यास सोपे जाईल; कल्पना येण्यास सुगम होईल. ही एक पद्यपंक्ती पाहा :–

हिरवे–हिरवेगार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीचे

ह्यात काव्य नाही असे कोणीही आधुनिक काव्यप्रेमी रसिक म्हणू शकणार नाही. ह्या कवितेत पुढे काय आहे, ती जिज्ञासा वजा केली तरी एवढ्याच दोन ओळींत मती गुंगून पडावी अशी माधुरी असल्याचे जाणवेल. सभोवार पसरलेल्या हिरव्यागार कुरणाच्या दर्शनाने उल्हसित झालेल्या चित्तवृत्तीचा हा उद्‌गार आहे. 'हिरवे–हिरवेगार' हे द्विरुक्तिपूर्ण विशेषण उत्कटतेशिवाय उद्‌भवणार नाही.

आता, 'चंद्रकांत' चालीचा हा चरण वाचा :–

नभःशिलेवर कोर चमकते चवथ्या चंद्राची

हा चरण वस्तुस्थितिकथनपर आहे. पण त्यातील शेवटच्या तीन शब्दांत सुखविणारी नादमयता आहे आणि वस्तुस्थितीचे वर्णन असे केले आहे की, मोजक्या शब्दातून प्रसन्न वातावरणनिर्मिती साधली आहे व ती रेखीव आहे. 'तिसरा नमुना म्हणून–

ने मजसी ने परत मातृभूमीला
सागरा प्राण तळमळला

ह्या दोन ओळी घ्या. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कवितेतील ह्या ओळी असून ते काळ्या पाण्याची शिक्षा भोगीत असताना त्यांनी ही कविता लिहिली आहे; ही गोष्ट ज्यांना माहीत नाही त्यांनाही ह्या उद्‌गारातील काव्यगुण जाणवल्याशिवाय राहणार नाही. कैद असेल किंवा आणखी काही आपत्ती ओढवली असेल की जिच्यात अडकून पडल्यामुळे मायभूमीचा दीर्घ काळ वियोग ज्याला घडला आहे त्याचे दुःख, मायभूमीच्या भेटीची ओढ आणि अगतिकता ह्यांमुळे होणारी अंतःकरणाची व्याकुळता ह्या ओळींतून हेंदकळत आहे, हे कोणाही सहृदयाला चटकन जाणवेल आणि त्याचे डोळे टचकन पाणावतील.

–डोळे हे जुलमी गडे
रोखुनि मज पाहुं नका
–पाखरा, येशिल का परतून ?
–वाजिव रे बाळा, वेल्हाळा, रुमझुम घुंगुरवाळा
–गरिब बिचारा माधुकरी
दुःख तयाला जन्मभरी

अशी आणखीही कितीक उदाहरणे देता येतील. तथापि, दिल्या एव्हढ्या ह्या धृपदांनीदेखील कवित्वाची तोंडओळख होईल. केवळ तोंडओळखच नव्हे, तर ह्या मुखड्यांवरून अंतरीचा भावही उमगेल. ह्या उदाहरणांची वैशिष्ट्ये ध्यानात घेता, सामान्यतः इतके म्हणायला हरकत नाही की उल्हसित चित्तवृत्तीचा उत्कट उद्गार, वातावरणाची निर्मिती, शब्दांची सुखविणारी नादमयता आणि जिव्हाळ्यातून व जिव्हाळ्याच्या आर्ततेतून आलेला उद्रेक, अशा गुणधर्मांची साक्ष ज्या वाग्विलासात मिळते तो कवित्वरूप समजावा. नुसती जी धृपदे वर दिली आहेत त्यांत कुठे कृतक कोप आहे तर कुठे आतुरता आहे; कुठे वात्सल्य थबथबले आहे तर कुठे गरिबाविषयीचा कळवळा आहे; आणि ह्या सर्व उद्गारांपोटी प्रीतीची, मैत्रीची, वात्सल्याची आणि दयार्द्रतेची खळबळ आहे. याच्याच जोडीला जीवितविषयक ध्येयदृष्टिकोनाची प्रचीती येऊन, तिची प्रेरणा व्यक्तीच्या, त्याचप्रमाणे समष्टीच्या योगक्षेमाच्या चिंतेत असेल तर कवित्वाचा दर्जाही उंचावला जाईल असेही ओघानेच म्हणावे लागेल. आप्तपणाच्या कक्षा विश्वालाही सामावून घेण्याइतक्या विस्तार पावल्यावर जिव्हाळ्याचे आणि उमाळ्याचे बोल भुवनगोलाचा तोल सावरून धरण्याच्या सामर्थ्याचे असतील हे काय सांगायला हवे?

ह्या उदाहरणांच्या अनुरोधाने रामदासांच्या कवित्वाकडे वळू जाता, वाचकाला त्याच गुणवैशिष्ट्याचा अनुभव येईल. गिरिदरीतून हिंडणारा हा संत स्वभावतःच वनविहारप्रेमी आहे, असे अन्यत्र ('सुखालागि आरण्य सेवीत जावें' ह्या प्रकरणात) प्रतिपादताना जी उदाहरणे दिली आहेत त्यांच्या सुरुवातीच्याच तेवढ्या ओव्या येथे देतो–

(१) गिरीचे मस्तकीं गंगा । तेथुनी चालली बळें
धबाबा लोटल्या धारा । धबाबा तोय आदळे

(२) पसरले सरले गिरि साजिरे
सरवटे धुकटे भरितें भरे
बहुत वात झडांत झडाडतो
वर तरू वरताचि कडाडतो

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथक्रमांक ...... वि. ...... प्रा. दि. ......

समोर वनराई आणि रम्य गिरिकंदर व जल-प्रपात पाहून उचंबळून आल्याशिवाय हे उद्गार येणारे नव्हत. भक्तिभावाचा वडिवार वाढविणे हे जे संतमंडळीचे मुख्य उद्दिष्ट, त्यापेक्षा इथे अन्य प्रकृतीचा आलेख शब्दांकित झाला आहे. श्रीकृष्णाची कुंजवनातली क्रीडा रामदासांनी एका प्रकरणात वर्णिली आहे तिची सुरुवात–

नदीतिरें मनोहरें । जळें सुनीळ सुंदरें
डोहो कितीक मातले । अनंत जीव रातले

ह्या ओवीने झाली आहे. वातावरणनिर्मिती करणाऱ्या या धर्तीच्या पहिल्या पंधरा ओव्यांत त्या उपवनाचे रंगभरित चित्रण आले आहे. त्याच ओघात गौळणींच्या वर्णनाचा भाग आला आहे–

विशेष गौळियां कुळीं । सुढाळ बाळ गोकुळा
सुरंग रंग अंगना । विलासती व्रजांगना
गुणें गुणीं गुणागळ्या । समर्थ योग्य मंडळ्या
वयें वयें परोपरीं । क्रिडाभरें नदीतिरीं
अनेक योषितां जनीं । रसाळ रम्य लोचनीं
तयापरीस गोपिका । सुवर्णरंग तो फिका
बहुत रंग रंगिणी । गुणाथिल्या कुरंगिणी
कळाप्रवीण नाटका । विशेष वेष नेटका
घवघवीतसी कळा । विशेष लंब-कुंतळा
सुवास वास कस्तुरी । विलासती कृशोदरी
बहूत जाणती कळा । विशेष कामकुशळा
आवेश शुद्ध बाणती । सुनैनबाण हाणती
गुणें चतुर नेटक्या । तटतटीत कंचुक्या

असा थाट असलेल्या ह्या प्रकरणाच्या अगदी अखेरीस ' रसाळ गातसे कवि ' असे रामदासांनी शिक्कामोर्तब केले आहे. उठल्या-सुटल्या काही ते स्वतःला कवी म्हणवून घेत नाहीत. इथे कवीची भूमिका त्यांनी जाणीवपूर्वक घेतली आहे. ह्या भूमिकेला साजेसेच हे सारे वर्णन नाही का ? कवित्वाच्या कसाला हे प्रकरण उतरणार नाही असे म्हणणे औद्धत्याचे होईल असे वाटते.

शब्दांची खरात हा रामदासांच्या शैलीचा महत्तम गुणविशेष आहे. त्या शब्दांतून नादनिनादाच्या लहरी झुकारताना दिसतात.

विषें कंठ काळा, दिसे चंद्रमौळी
फणीधारकू, वन्हि वाजे कपाळीं
असंभाव्य भोळा, गळां रुंडमाळा
महा मस्तकीं वोघ जाती खळाळा

हा महादेवाच्या रूपवर्णनाचा श्लोक म्हणजे रामदासांच्या पद्यरचनेचा सर्वगुणसंपन्न नमुना आहे. वर्णनात मंद लाटा हेलावल्याचा भास व्हावा अशी इथे जी स्वरव्यंजनांची योजना केलेली दिसते तिचा प्रत्यय त्यांच्या लिखाणात सर्वत्र येतो. शंकराच्या ललाटी असलेल्या तृतीय नेत्राबद्दल ' वन्हि वाजे कपाळीं ' असे म्हणणे हे रामदासाशिवाय सहसा कुणाला स्फुरणार नाही, सुचणार नाही. असंभाव्य हा शब्द खास रामदासांच्या आवडीचा आहे. ( १ ) असंभाव्य पाल्हाणिला सेतु जेथे ( २ ) असंभाव्य तो वाद्यकल्लोळ झाला ( ३ ) असंभाव्य ती सिद्ध केलीं फुलेलें ( ४ ) पुढे चालली ती असंभाव्य सेना, असा ह्या शब्दाचा ठायी ठायी अनावर वापर करण्यात आलेला दिसेल. ' महा मस्तकीं वोघ जाती खळाळा ' ही सुद्धा खास रामदासी भाषापद्धती होय.

शब्दसमृद्धी पाहायला कोणताही विभाग पाहावा. नमुन्यादाखल दासबोधाच्या पाचव्या दशकातला नववा समास घ्या. " ऐसी अंतरस्थिति बाणली । बाह्य निःस्पृहता अवलंबिली । संसार-उपाधी त्यागिली । ह्या नांव साधक ॥ " असे विधान करून, संसार-उपाधी त्यागिली म्हणजे काय केले, याचा जो विस्तार करण्यात केला आहे तो शब्दसृष्टीच्या ईश्वराशिवाय अन्यास साधणे अशक्य. अविद्या, प्रपंच आणि लोभ यांच्या तावडीतून जो निसटला तो साधक असे सांगताना एका ' निसटला '-अर्थी क्रियापद-वैचित्र्य त्यांनी कसे दाखवले आहे पाहा—

अविद्येपासून फडकला । प्रपंचापासून निष्टला ।
लोभाचे हातींचा गेला । अकस्मात ॥

अशा तऱ्हेचा शब्दविलास ह्या ओवीपासून पुढे सारखाच भरास आलेला दिसतो—

भवभयासि भडकाविलें । काळाचें टांगे मोडिले ।
मस्तक हाणोनी फोडिलें । जन्म-मृत्यूचें ॥
मोहासि मध्येचि तोडिलें । दुःखास दुधडचि केलें ।
शोकास खंडूनि सांडिलें । एकीकडे ॥
द्वेष केला देशधडी । अभावाची घेतली नरडी ।
धाकें उदर तडाडी । कुतर्काचें ॥

तिरस्कार तो चिरडिला । द्वेष खिरडून सांडिला ।
विषाद अविषादें घातला । पायातळीं ॥

संसारभय, जन्ममृत्यूचे रहाटगाडगे, काळाचे भय, मोह, दुःख, शोक, द्वेष, विषाद, कुतर्क इत्यादींचा ज्याने नायनाट केला तो साधक, हे सांगताना नायनाट करणे ह्या अर्थी किती प्रकारची क्रियापदे योजिली आहेत ! अशा प्रकारची शब्दसंपदेची खैरात, समर्थांचे वाङ्मय धुंडाळणाराला ठिकठिकाणी आढळेल. नरदेहाचे भले–बुरेपण वर्णन करताना ( दासबोध, दशक १, समास १० ) मनुष्याने स्वतासाठी बांधलेले घर ज्याप्रमाणे किडा-मुंगी, पशु-पक्षी , सेवक-चोर, अग्नि, इत्यादि 'आपलेच आहे' असे मानतात, त्याप्रमाणे प्रत्यक्ष नरदेहावरही आपुलकीचा हक्क अनेक सांगतात, ह्याचे विवरण करणाऱ्या क्र. ५० ते ६० ह्या ओव्या ह्या दृष्टीने पाहाव्यात. सहज आणखी एक अंगुलिनिर्देश करायचा तर विवेकपंचकातील पाचव्या अभंगाकडे करता येईल. मनुष्याचे सर्वसाधारणपणे जे वीस शत्रू, त्यांना जिंकिले पाहिजे हे सांगताना, एकाच अर्थाची पंधरा-वीस क्रियापदे आलेली आहेत. मनोवेधक ताटवाच प्रफुल्लित झाल्याचा देखावा आपण पाहात आहोत असा तिथे भास होतो. शब्दाचे हे क्रीडित भाषासमृद्धीचे द्योतक नव्हे काय ? हे विलसित कोणास भूल घालणार नाही ? कोणास झपाटणार नाही ? 'You can never be a poet unless you are facinated by words – their sounds and shapes and meanings – and have them whirling about in your head all the time –' *C. Day Lewis*. प्रसिद्ध आधुनिक आंग्ल कवीचे हे उद्‌गार आहेत. रामदासांचे काव्य वाचताना हयाचा पानोपानी प्रत्यय येतो. वरील अवतरणात याची धवधवीत साक्ष मिळेल. साधकासंबंधीचे हे विवेचन म्हणजे नुसते व्याख्यान नाही. वक्तेपणाच्या आवेगात हे शब्द उसळून आले आहेत. इथे शब्द-रत्नाकराला उधाण आलेले आहे.

'पडिलें वळण इंद्रियां सकलां' म्हणून जे बोल निघतात ते ओवी-अभंगाकार घेऊनच; असे प्रतिपादन येऊन गेले आहे. 'भाव तो निराळा' हे रामदास जाणतात, असेही त्या ओघात सांगितले. त्या भावाचे उद्रेक ज्यात आहेत असे कितीक उतारे दाखविता येतील. रामदासांनी आपल्या वडील बंधूंना लिहिलेले पत्र पाहावे. ते कांही मामुली प्रसंगाने किंवा व्यावहारिक कारणाने लिहिलेले दिसत नाही. त्यामुळे, त्यात त्यांच्या औचित्य–चातुर्याची साक्ष मिळते आणि श्रद्धेची व भावसघन अंतःकरणाची कल्पना येते—

सकळ तीर्थांचें माहेर । सकळ गुणांचें भांडार ।
सकळ विद्येचा सागर । स्वरूप तुमचें ॥
तूं धीरपणें मेरू । तूं उदारपणें जळधरू ।
तूं गंभीरपणें सागरू । पीयूषाचा ॥

तूं पवित्रपणें वैश्वानरू । तूं समर्थपणें ईश्वरू ।
तूं प्रतापाचा दिनकरू । धगधगायमान ॥
तूं सकळ तीर्थांचें यश । तूं उंच आकाश ।
तूं मायेचा मूळ पुरुष । सकळ कर्ता ॥

इत्यादी दहा ओव्यांचे हे पत्र उचंबळून आलेल्या आदराची परिसीमा आहे. तुमचे स्वरूप काय वर्णावे, ह्या भावार्थाची—

झंझावायूसि आकळावें । गगन ओलांडून जावे ।
महातेजासि आच्छादावें । कवणे परी ? ॥

ही ओवी म्हणजे आदरभावनेची उत्कटता आहे. आणि ती उत्कटता वाचकांस जाणवावी अशी हिच्यात शब्दयोजना व दृष्टान्तयोजना आहे. हे पत्र वाचताना ( तसा प्रत्यक्ष जिव्हाळ्याचा संबंध नसलेल्या आजच्या वाचकाचे चित्त गहिवरते, मग ) श्रेष्ठांचे अंतःकरण गहिवरून आले असेल यात काय शंका ? आणि हा परिणाम काय उगीच होतो ? खुद्द रामदासांचे अंतःकरण उचंबळून आले आहे. भावनिर्मितीतून आलेले हे शब्द आजही थबथबीत ओलेचिंब आहेत. जिव्हाळा, आदर आणि त्यांना सामावून धरणारे शब्दकलश असा संयोग कविवृत्तीची ग्वाही देणारा नव्हे काय ?

करुणा, जिव्हाळा, आर्तता ह्या भावगुणांचे पाझर ज्यात आहेत, त्याला वाङ्मय-पदवी प्राप्त होते. मोले घातले रडाया, नाही आसू नाही माया. निःसत्त्व निर्जीव वाङ्मयाला हे लागू आहे. वाङ्मयाला टिकाऊपणा कशाने येतो ? रामदास सांगतात—

शिकले शब्द ते थोडे । जिव्हाळा पाहिजे बरा
जिव्हाळ्यावीण ते आटे । जिव्हाळा असतां तगे

जिव्हाळ्यामुळे निरंतर तगून राहील अशी रामदासी वैखरी थोडीथोडकी नाही. ह्या संदर्भात त्यांची करुणास्तोत्रे तर कोणालाही आठवतील. आधुनिक मराठी काव्य-वाहिनीच्या काठाकाठाने विहार करणाराला विविध प्रकारचे, हर्षखेदाचे सूर ऐकू येतात. दुरावलेल्या मायभूमीची जिवाला ओढ लागून कोणी करुणागीत गातो आहे; तर अंतरलेल्या मित्राबद्दल कोणी हळहळतो आहे. रुष्ट सुंदरीची कोणी मनधरणी करतो आहे, तर हरपलेल्या श्रेयाची हुरहूर कोणास बेचैन करीत आहे. जीवनज्योती विझलेल्या तान्हुल्यासाठी कोणी आकान्त मांडिला आहे तर कोणी विमनस्क स्थितीत दूर विजनी पिशाच्चासारखा भटकत राहिला आहे. रामदासासारख्या संसारविमुक्त गोसाव्याच्या कवनात जिवलगांबद्दल अशी ओढ क्वचित मिळणार. जीविताचे सार्थक

ईश्वरभजनात आहे ही त्यांची बळकट श्रद्धा. विषय तो त्यांचा झाला नारायण. ' लोकांच्या चुकती माता । अचुक जननी मला ' अशी आराध्यदेवतेबद्दल नितांत निष्ठा. स्वाभाविकच त्यांच्या कवनांतून ' तुजवीण रामा मज कंठवेना, उदासीन हा काळ कोठे न कंठे, अनुदिनि अनुतापे तापलों रामराया, सर्वोत्तमा कैं मज भेटि देसी, उदास वाटतें जीवीं, ' अशा तऱ्हेची आर्त वाणी सारखीच कानी येते. याशिवाय, ज्या सात–आठ प्रकरणात त्यांनी ' तुळजा माता कुळस्वामिनी ' स्तविली आहे ती प्रकरणेही भक्तिभावपूर्ण आहेतच. पण त्यांचे आणखीन वैशिष्ट्य असे, की त्यांना पारतंत्र्याच्या दैन्यदुःखाचेही अस्तर आहे. त्यामुळे भक्तिभावाच्या जोडीला त्या दुःखाने पिळवटलेल्या हृदयाची आर्द्रताही त्या स्तोत्रात आहे.

सप्तशतीमध्ये महिषासुरमर्दिनीला प्रणामांजली वाहताना, तिचा ज्या ज्या गुण–स्वरूपात साक्षात्कार येतो त्या त्या गुणाचे पृथक्पृथक् स्मरण करून नमस्कृती अर्पिली आहे. त्यात–

या देवी सर्वभूतेषु शक्तिरूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमोनमः ॥

अशी एक नमस्कृती आहे. रामदासांच्या तुळजामातेवरील स्तोत्रात तिच्या शक्तिस्वरूपाचेच आवाहन असून एके ठिकाणी सप्तशतीतील ह्या मंत्राचा जणू काय अनुवादच आढळतो. रामदास म्हणतात—

शक्तिरूपें जगन्माता वर्तते जगदंतरीं

खरे म्हणजे अनुवाद करायचा म्हणून हा उद्गार प्रगटलेला नसावा. कारण शक्तियोग हाच मुळी रामदासांच्या काव्याचा प्राण आहे. रामदासांची कविता म्हणजे शक्तिमाहात्म्य आहे. शक्तीची उपासना वाढविणे हाच त्यांचा जीवित-हेतू आहे. तेव्हा, ध्यानी-मनी-स्वप्नी जो विचार त्याचा अखंड घोष करताना ' शक्तिरूपें जगन्माता वर्तते जगदंतरीं ' असे ते आत्मप्रत्ययानेच बोलून जात आहेत. वाचकाला त्या मंत्राचा अभावितपणे अनुवाद झालासे वाटते, इतकेच ! अशा ह्या स्तोत्रात कारुण्य आहे आणि त्याचबरोबर, ' हे तुळजाभवानी, तू पूर्वी दैत्यसंहार करून धरित्रीवर आनंदीआनंद केलास, तुझ्या वरदानाने रामचंद्राने पराक्रम गाजवला, त्यामुळे पराधीनता गेली आणि सुखसंतोष फावला. मीही रघुनाथाचाच दास आहे, मलाही तूच वरदायिनी हो, ' असा प्रस्ताव करून रामदासांनी प्रार्थना केली आहे–

येकचि मागणें आता । द्यावें तें मजकारणें
तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हांचि देखतां
दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतों
परंतु रोकडे कांही । मूळ सामर्थ्य दाखवी

देवांचीं राहिलीं सत्त्वें । तूं सत्त्व पाहसी किती
भक्तांसी वाढवी वेगीं । इच्छा पूर्ण परोपरी
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी

हे सर्व मागणे किती 'आतुर' आहे!–रामदासांनी स्वतः म्हटले म्हणूनच केवळ नव्हे, तर काव्यविचक्षण रसिकालाही स्वप्रचीतीने आतुर वाटणारे आहे.

पराधीनतेच्या यातनांनी समाजाला आलेली अवकळा रामदासांना दिसत आहे म्हणूनच, त्या अवकळेच्या निवारणासाठी ते शक्तियोगाचा उद्घोष करीत आहेत. प्रपंच करावा नेटका, हे सांगण्यातसुद्धा त्यांचा हाच भाव दिसतो. नेभळ्यांचा संसार हा काय संसार आहे? अशा संसारात आधिभौतिक आणि आधिदैविक तापत्रयांनी जाजावलेला प्राणी कसा देशोधडीला लागतो ह्याचे हृदयद्रावक वर्णन त्यांनी केले आहे. कुटुंबकाबाडी जनांच्या दैन्यावस्थेबाबत—

लेकुरें उदंड जालीं । तों लक्ष्मी निघोन गेली ।
बापुडीं भिकेसी लागलीं । खावया अन्न मिळेना ॥

ही जी हळहळ त्यांनी व्यक्त केली आहे ती त्यांच्या आत्मविस्ताराच्या कक्षा समाजव्यापी आहेत म्हणूनच. "गरिब बिचारा माधुकरी । दुःख तयाला जन्मभरी" ही आधुनिक कवितेतील कणव कवीला सामाजिक विषमता कशी विव्हल करते, हे दाखवते. पण माधुकरी हा रामदासांच्या काळीं सामाजिक करुण कवितेचा विषय होणे शक्य नव्हते. त्यांच्या काळी माधुकरी मागणे हे व्रत समजले जात होते. पण तत्तुल्य कणवेला ते पारखे मात्र नव्हते. 'परदुःखेनापिदुःखिता विरलाः' ह्या कोटीत त्यांची गणना होती.

वेळे पाऊस पडेना । नासक्वणी उघडेना
ऐसे कुळवाडियाचें भंड । दुःख जाहलें उदंड
बहुपडी आलें शेत । रेड्यापाड्याचे आऊत
कांहीं केल्याने पिकेना । धान्य वेळेसि विकेना
फाळा लाविला उदंड । अवघें जहालें थोतांड
वारीं रोगाचीं वाजतीं । नाना आभाळें फिरतीं
टोळ, पक्षी, मूषकादिक । खातीं श्वापदें आणिक
दावेदारांची यातना । चोराचोरा राहवेना
नित्य पोटाचे मजूर । वेठीखाली निघे ऊर
घर खोपट मोडकें । एक फटकूर फाटकें

बहु रोगें गुरें गेलीं । धारणीने मुलें मेलीं
सर्व संसार बुडाला । दास म्हणे जोगी झाला

शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेचा हा अभंग (ध्यानपंचक ह्या प्रकरणात का समाविष्ट व्हावा ? तो आपली जागा चुकला आहे खास. तरी पण तो) रामदासांच्या निरीक्षणाचा निदर्शक आहे. अशा तऱ्हेचे उद्‌गार ठायीठायी आढळतात. त्या उद्‌गारांपोटी त्यांची समाजहितबुद्धी आहे, कळवळा आहे. तीर्थयात्रा करताना त्यांनी सभोवार फार लक्षपूर्वक पाहिले आहे--

(१) पथीं चालता सुखदुःखा शमावे
महीमंडळीं काय कीती पाहावे

(२) फिरे दास उदास लोकांस पाहे
मनामाजि थकीत होऊन राहे

हे त्यांचे कबूली-जबाब स्पष्ट आहेत. त्यांना कोठे असे काही दिसून आले की ते पाहून स्वताच्या सुखदुःखाचा विसर पडावा, तर कोठे असे काही दिसून आले की त्यामुळे मन आश्चर्यचकित व्हावे. आणि हे असे दिसले तरी काय ?

(१) अन्न नाहीं वस्त्र नाहीं । सौख्य नाहीं जनामध्ये
आश्रयो पाहता नाहीं ।...

(२) किती येक ग्रामेंचि तो वोस जाली
पिके सर्व धान्येंचि नाना बुडाली
किती येक धाडीवरी धाडि येती
द्वयां सैनिकाचे नि संहार होती

किती येक अन्नाविसीं भ्रष्ट जाले
किती येक लोकीं जनीं प्राण दिल्हे
किती येक ते तांब्र बंदीच गेले
किती येक मार्‍हाष्ट्र बंदी निमाले
किती येक ते घ्राण कर्णेंचि घेती
किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती
किती मोट बांधून ते बूडवीती
पिछाडेचि बांधोनि हीरोनि नेती

(३) ब्राह्मण बुद्धीपासून चेवले। आचारापासून भ्रष्टले।
गुरुत्व सांडून जाले। शिष्य शिष्याचे ॥
कित्येक दावलमलकास जाती। कित्येक पीरास भजती।
कित्येक तुरुक होती। आपुले इच्छेने ॥
राज्य नेले म्लेंच्छक्षेत्रीं। गुरुत्व नेले कुपात्रीं।
आपण अरत्री ना परत्री। कांहींच नाहीं ॥

(४) देश नासला नासला। उठे तोचि कुटी०—

[ हे प्रकरण ' जन बुडाले बुडाले ' ह्या मथळ्याने पुढे समाविष्ट केले आहे. ते वाचल्याने तत्कालीन सामाजिक दैन्यावस्थेची हृदयद्रावकता कळून येईल. ]

अशा अनेक उद्गारांमागची पोटतिडीक पाहून, रामदासांच्या भावनोत्कट सामाजिक मनाची उत्कृष्ट कल्पना येईल. आधुनिक समाजोन्मुख कवी ह्यापरते अधिक कळवळून काय लिहील ? विदीर्ण अंतःकरणातून निघालेले हे उद्गार म्हणजे शस्त्राघाताने झालेल्या खोल जखमेतून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्या होत. अत्यंत दुःखाने ते कितीदा तरी उदास झालेले दिसतात. सभोवतीचे दारुण दैन्यदुःख पाहण्यापेक्षा जगणेच नको, असे वाटण्यापर्यंत त्यांच्या अंतरी उद्वेग बळावला होता. हे पाहात पाहात, ते हिमालयात गेले असताना तेथे आत्मविसर्जनाला उद्युक्त झाले होते, असे चरित्रकार सांगतात. भव्योदात्त सौंदर्याच्या मोहिनीने, त्यात निमज्जित होऊन जावे असे उत्कट वृत्तीला वाटणे जसे शक्य आहे तसेच, ह्या जनतेला कोणी शास्तापुस्ता वाली नाही, ह्यांच्यात कोणी ऐकून घेऊन सावध होण्यासारखाही नाही असे अनुभवास येऊन, देवानेच पूर्ण पाठ फिरवल्यावर जगण्यात तरी काय अर्थ आहे अशा आत्यंतिक नैराश्याच्या उमाळ्यानेही जीव देण्यास प्रवृत्त होणे स्वाभाविक आहे. आत्मविसर्जनार्थ देह झोकून द्यायला ते उद्युक्त झाले असताना प्रभूरामचंद्राने त्यांना त्यापासून परावृत्त केले आणि धर्मोद्धाराच्या कार्याचा आदेश देऊन परत पाठविले, असे चरित्रकार म्हणतात. ह्याचा मथितार्थ इतकाच दिसतो की, ती नैराश्याची उबळ विवेकाने मारून टाकून, त्यांनी आशावादीपणाने, जनतेला जागृत करण्यासाठी फिरून पायपिटी आरंभिली आणि——

अखंड सावधान रे। प्रयोग प्रेत्न मान रें
प्रसंग हा तुफान रे। नकोचि वेवधान रे
म्हणे उदास दास हा। बरें पाहा बरें पाहा
करील प्रेत्न जीतुका। तयास लाभ तीतुका

असे कंठरवाने लोकांना सांगण्यासाठी ठाण मांडले.

'बुद्धि दे रघुनायका' ही त्यांची कविता प्रसिद्ध आहे; अंतरीच्या उमाळ्यातून आली असावी इतकी ती उत्कट आहे. तथापि, तिच्यातील व्यथा केवळ वैयक्तिक असेल काय ? मी हीन, मी दीन, मी पतित, मी अडाणी अशी स्वतःकडे क्षुद्रता घ्यावी हा भक्ताचा विनय होय आणि न्यायही होय. तथापि, 'नेटके लिहितां येना । वाचतां चुकतों सदा । अर्थ तो सांगतां ये ना ।' हे काय अक्षरशः खरे मानायचे ? मला तर असे म्हणावेसे वाटते, की सभोवती गचाळ, मवाळ, मंद अशा लोकांचा वावर पाहून रामदासांनी सर्वांच्या वतीने हे मागणे मागितले आहे. प्रत्येकाने देवाजवळ हे मागणे मागावे. ह्यातला 'मी' (स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव झाल्यामुळे) जसा वैयक्तिक आहे तसाच सर्वसामान्य जनतेशी एकजीव झालेला प्रातिनिधिक उद्गाताही आहे. समाजाला आलेली कळाहीनता नाहीशी व्हावी ह्यासाठी समाजातल्या प्रत्येक घटकाने असा ध्यास धरला पाहिजे. नाही तरी, स्वतःच्या उमाळ्यातून कवीचे बोल निघतात हे जरी खरे असले तरी, तो ज्या समाजाचा घटक असतो त्या समाजाच्या सुखदुःखाचे व आशानिराशेचे सूरही त्याच्या सुरातून आपाततः उमटत असतात. आणि भूमिकाच मुळी विश्वकल्याणाची असली तर ते सूर स्पष्टपणेच सर्वस्पर्शी होणार. वर म्हटल्याप्रमाणे, रामदासांची भूमिका ती आहे. त्यांची अनेक स्फुट प्रकरणे त्या भूमिकेच्या पोटतिडिकीतून स्फुरली आहेत. त्यात सामान्यापासून कार्यकर्त्यापर्यंत, सेवकापासून सेनापतीपर्यंत आणि छात्रापासून छत्रपतीपर्यंत सर्वांना त्यांना काही सांगायचे आहे, हे स्पष्ट दिसतें.

कला ही जीवनाकरिता आहे की कलेसाठी कला आहे ? हा प्रश्न साहित्यिकांत कधीकधी उद्भवतो. दोन्ही पक्षांची कास धरायला मातबर मंडळी असतातच. डब्ल्यू. एच. ऑडेन ह्या कविवर्यांकडे एक होतकरू कवी काही मार्गदर्शनाच्या अपेक्षेने गेला असता ऑडेन यांनी त्याला विचारले, "Why do you want to write poetry ?" तेव्हा त्या होतकरू कवीने उत्तर केले. "I have important things I want to say." हे उत्तर ऐकून "Then you are not a poet." असा ऑडेन यांनी अभिप्राय व्यक्त केला. ह्यातला मथितार्थ इतकाच की काही सांगायसवरायचे असेल तर त्यासाठी कवितेच्या फंदात कशाला पडायला पाहिजे ? काही नीतिपाठ किंवा संदेश देणे हे मुळी कवितेचे प्रयोजनच नव्हे. कलावादी साहित्यिकाला ऑडेनचे हे उद्गार अर्थातच आप्तवाक्याप्रमाणे वाटतील.

पण असले वाद ज्याचे त्याने आपल्यापुरते निकालात काढायचे असतात. रामदासांना – तीनशे वर्षांपूर्वीच्या संताला– 'कैसी क्षेम राहील जगतीं । कैसीं देवदेवालयें तगतीं । कैसे कुटुंबवछल लोक जगती, कोणाकडे जातील हे ?' ह्या विवंचनेने व्यग्र झालेल्या विश्वकुटुंबियाला ह्या वादाशी कर्तव्य नाही. तो त्यांच्या संप्रदायाला वावडा आहे. जीवन जगण्यासाठी आहे आणि ते मर्दपणाने कसे जगायचे, हे सांगण्यासाठी

रामदासांनी ठाण मांडले आहे. लोकांची पारख करावी, उपाधीला कंटाळू नये, यत्नाचे डोंगर उभारावेत, नासके लोक निपटून बाजूला काढावेत, तुंबलेल्या पाणलोटाप्रमाणे जनशक्ती तुंबून पडू देऊ नये, असे हजारो प्रकारांनी त्यांनी सांगितले आहे. ' जितुकें कांही आपणासि ठावें । तितुकें हळूहळू सिकवावें । शाहाणे करून सोडावे । बहुत जन ॥ ' हा त्यांचा खणखणीत आदेश सर्वविश्रुतच आहे. पण जिथे जिथे ते ' कवि ' ह्या नात्याने बोलतात तिथे तिथेदेखील शिकविण्याची भूमिका ते विसरत नाहीत. ते स्वतःला कवी म्हणवून घेत आहेत हे सिद्ध करणारे चार उल्लेख ' समर्थांची शब्दसृष्टी ' या प्रकरणात येऊन गेले आहेतच. पुढे, अधिक बारकाईने वाचू जाता, आणखी काही उल्लेख आढळले आहेत. त्यांचा इथे केवळ निर्देश करणे जरूर आहे—

(१) रामीरामदास कवि । न्यायनीतीने शिकवी
(२) उदास दास तो कवि । बहुत जनांस शीकवी
(३) करील तो करील रे । तुम्हासि काय बोल रे
उरों नका म्हणे कवि । उदास दास सीकवी.

ह्या ठिकाणी ' कवि ' म्हणून रामदास बोलत आहेत. आणि ते शिकविण्याच्या हेतूने बोलत आहेत हे स्पष्ट होईल.

हाती आलेल्या कोणत्याही कवितेचा अर्थ पाहताना दृष्टीत प्रथम भरते ती अभिव्यक्ती आणि विचार पडतो त्या अभिव्यक्तीमागील अनुभूतीचा. रामदासांची भूमिका शिकविण्याची आहे आणि समाजातले करंटेपण जावे हे त्यांच्या शिकवणीचे उद्दिष्ट आहे. तेव्हा, अभिव्यक्तीला प्रेरक झालेली अनुभूती गूढाद्भुत नाही. ती आहे उदात्त. त्यामुळे तिच्यात भव्यता व उत्कटता मात्र भरपूर आहे. शिवाय करंटेपणाचा विनाश करायचा असल्यामुळे त्या अभिव्यक्तीत रोकडेपणा आहे, आवेश आहे आणि तेज आहे.

मायाविनाश, आत्मरूपज्ञान अशांसारख्या विषयांचे विवेचन करताना, शिष्यांना जागे करतानादेखील त्यांच्या वाणीला धार चढते. जो संकल्पविकल्पापासून सुटला त्याला कळिकाळही भिववू शकणार नाही; भय आहे देहबुद्धीच्या भ्रांतीत गुंतलेल्यास; निसंगाकडे वाकड्या दृष्टीने पाहण्याची काळाची छाती नाही अशी ते ग्वाही देतात आणि म्हणतात——

तूं सिंहाचें पिलूं । काळ काय रें बापुडें भालु ललु ।
मशक मेरूसी पाहे तोलूं । थडका हाणोनी ॥
थिल्लर बालकासि बुडवी खेळतां । आकाशमार्गे उडो जातां ।
तें केंवि बांधु शके रामदूता । तया हनुमंतासी ॥

कां बलाढ्य म्हणे मी तरवार ओढीन।
धावोनि जातांचि आकाश तोडीन ।
झोंबी घेऊनि ओढून । पाडीन पृथ्वीवरी ॥

हे (व ह्यांच्या आगेमागे असलेले) दृष्टान्त एकापेक्षा एक चढ आहेत, सरस आहेत आणि नुसते सरस नव्हेत तर त्यात तेजाचे झळंब आहेत. संतांची महती सांगताना अभिव्यक्तीचा असाच लखलखाट आढळेल--

संत अभावाचे काळ। संत वैराग्याचे वडवानळ ॥
संतांसी हा भवमळ। स्वप्नींहि लागू न शके ॥
अहंकार-गज डुल्लति। जंववरी संतसिंहाचे चपेटे न येती।
थापा मारूनि विदारिती। गंडस्थळें तयांचीं ॥

झालेले अवतार परमेश्वराच्या थोर सामर्थ्याची प्रात्यक्षिके आहेत व सकळ सृष्टीची रचना ही त्याच्या सामर्थ्याची साक्ष आहे हे पटविताना ते म्हणतात--

ईश्वरें केव्हढें सूत्र केलें। सूर्यबिंब धावाया लावलें।
धुकटाकरवी धरविलें। अगाध पाणी ॥
पर्वताऐसे ढग उचलिति। सूर्यबिंबासी आच्छादिती।
तेथे सवेंचि वायोची गति। प्रगट होय ॥
झिडकझिडकुं धावे वारा। जैसा काळाचा म्हणियारा।
ढग मारूनि दिनकरा। मोकळें करी ॥
बैसवी विजाचे तडाखे। प्राणिमात्र अवचिता धाके।
गगन कडकडून तडके। स्थळांवरी ॥

(दा. २०।८।२३-२६)

भव्य आणि ओजस्वी असा हा उद्‌गार आहे. त्यामधूनच काव्यगुणाची प्रचीती येते.

चांगल्या अत्तराच्या सुवासाप्रमाणे, मनात दीर्घ काळ रेंगाळत राहतील असे अभिव्यक्तीचे विलासही रामदासांच्या वाणीतून सहजासहजी कसे फाकतात पाहा--

(१) पाऊस पडेल **शुंडाधारी**

(२) **फुटले गिरीचे गाभे**

(३) कां जैसा अग्नि प्रकाशला।
**आपणासि आपण जाला**

(४) इकडे **मुळ्या धावा घेती ।**
**तिकडे अग्रें हेलावती ।**
मुळें अग्रें द्विधा होती । बीजापासुनी ॥
(५) **धिराचे बहु स्तंभ झोकें उडाले**
(६) त्याचा महिमा कळेल कोणाला ।

**माता वाटून कृपाळू जाला**

ईश्वर कृपाळू आहे; त्याच्या कृपाळूपणाची रोकडी साक्ष कोणची? तर प्रत्येकाच्या वाटणीला माता आली आहे ती! मातेचे वात्सल्य म्हणजे मूर्तिमंत त्याचा कृपाळूपणा. अशा प्रकारच्या विलासाची अगणित उदाहरणे सापडतील. कारणाकारणाने उद्धृत केलेली अवतरणे ह्या दृष्टीने पुन्हा पाहिली तरी ही प्रचीती येईल. शब्दसृष्टी देखील अभिव्यक्तीच्या विलासाचेच अंग होय.

" ळळळळ गरळा तो काळ लाळीत आहे "

ही शब्दरचना कशी भयानक आहे हे रसिकांस सांगावयास हवे का? अक्राळविक्राळ जबडा, त्यातून ळळळळणारी जीभ, त्या जिभेतून जी लाळ पडत आहे ती (गरळ) विषच आहे. हें वर्णन वाचताच वाचकाचे अंग शहारले जावे, इतकी प्रभावशाली आहे ही शब्दयोजना! अर्थानुवर्ती ध्वनिनिर्मितीची अपार शक्ती त्यांच्या भाषेइतकी फारच थोड्या संतांच्या वाणीत आढळेल. सर्वत्र पोटतिडीक तीव्र असल्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीत खडखडीत निःसंकोचपणाही आहे. अंगी गुण नसताना बळेच परस्पर-प्रशंसा करण्याच्या मनुष्यस्वभावाबद्दल बोलताना ते म्हणतातः—

' येरयेरांची स्तुति करावी । आणि बळेंचि ओढून घ्यावी
जैसी विष्टेसि लावावी । उटी चंदनाची ॥ "

दृष्टान्त ओंगळ आहे पण मर्मभेदक आहे. असले परखड दृष्टान्त देण्यास ते कचरत नाहीत. दृष्टान्तही अभिव्यक्तीचा भाग होय. त्याचबरोबर—

' ज्याकारणें गुंडाळिती । तेंचि वाचे उच्चारिती ॥ '

असे जे ते लिहून जातात त्याचे कौतुक वाटते. होळीच्याभोवती लोक अभद्र आणि अश्लील बोलतात त्याची शिसारी, ते शब्द प्रत्यक्ष टाळून, किती मार्मिकपणाने त्यांनी व्यक्त केलेली दिसते. अशा प्रकारचे, शिष्टपणाच्या मर्यादा सांभाळणारे, मार्मिक अभिव्यक्तीचे आणखीही काही नमुने अभ्यासकाला मिळतील.

आणि सूत्रमयता हाही त्यांच्या अभिव्यक्तीचा गुण पाहावयाचा असेल तर अलिप्त पंचकातील—

रामदास म्हणे, गाय–।
व्याली नाही, चाटील काय ? ॥

हा उद्गार पाहावा. ह्या दृष्टान्ताचे स्पष्टीकरण करण्याचीसुद्धा गरज नाही.

आधी येऊन गेलेल्या विवेचनात, साधकाने काय करावे ह्यासंबंधीच्या ओव्या उद्धृत केल्या आहेत. तेथे क्रियापदांचे वैविध्य व शब्दरत्नाकराचा अपरंपारपणा दाखविण्यासाठी ते अवतरण होते. पण त्याचबरोबर त्यातील आवेशही पाहण्यासारखा आहे. शब्दसमृद्धी जवळ असली तरी तिचा आविष्कार करण्यास सामर्थ्य लागते. तो आविष्कार म्हणजे केवळ नटण्या–मुरडण्याची अनिवार हौस असलेल्या ललनेचा हावरटपणा नव्हे. भांड्यांना कल्हई लावावी त्याप्रमाणे आशयावर शब्दवैभव चढविताच येत नाही. ते ज्याच्याजवळ असते त्याच्या आविष्काराचे ते अविभाज्य अंगच असते. ह्याचाच अर्थ ते प्रकृतीतून फाकत असते. रामदासांच्या अभिव्यक्तीत ते आढळते. आविष्कारात जोस येतो तो रक्त सळसळल्याशिवाय कसा येईल ? त्यांची प्रकृती वीरपुरुषाची आहे. सी. डे. ल्युइसच्या अवतरणांत म्हटल्याप्रमाणे शब्दांच्या नाद-रूपाचे त्यांना वेड आहे; पण ते वेड दागिन्यांनी लिडबिडणाऱ्या ललनेचे नसून, शस्त्रास्त्रांनी मंडित असणाऱ्या चंडमुंडमर्दिनीचे आहे.

अभिव्यक्तीच्या पाठीमागे अनुभूतीची गूढाद्भुतता ज्या कारणाने नाही त्याच कारणामुळे संदिग्धताही नाही; गूढगुंजन नाही. अंगाई-गीते गाऊन समाजाला झोपविणे किंवा भुलभुलावणीने गुंगी आणणे, हे त्यांच्या ध्येयात अंतर्भूत नाही. निद्रसुऱ्यांना जागे करायचे आहे, भ्रांतांच्या नेत्रात अंजन घालायचे आहे आणि किंकर्तव्यमूढांना कार्यप्रवण करायचे आहे. म्हणून ते पायपिटी करीत आहेत आणि भिक्षेच्या निमित्ताने दारोदार पुकारा करीत आहेत. अर्थातच—

एक घाय दोन खंड । ऐसें बोलावें रोकड
जेणे उठती संशय । तें बोलणें कामा नये
बहुविध जालें ठावें । सत्य कोणींहि जाणावें
रामीरामदास म्हणे । एक निश्चयें बोलणें.

हा त्यांना पटलेला आणि म्हणूनच त्यांनी शिष्यांना सांगितलेला संदेश आहे. श्रोत्यांचे संदेह तुटतील असे बोलणे असावे; ही त्यांची विचारसरणी आहे. ‘माझ्या अनुभूतीच्या पातळीपर्यंत तू येऊ शकत नाहीस तर राहा काळोखसिंधूत गटांगळ्या खात’ असे म्हणणारा तो वक्ता नव्हे. त्यांच्या हिशोबी वक्ता आणि कवी ह्यांत फरक नसावा.

समाजात दुटप्पीपणा आहे. सामान्य माणसे ती सामान्यच; मतलबासाठी किंवा वेळ मारून नेण्यासाठी आत एक बाहेर एक असे त्यांचे वर्तन असल्यास

नवल नाही. पण पुढारीदेखील तसेच असतात. " ज्यांच्या तोंडाची दारूची घाण अजून गेली नाही त्याने मला ' सुधाकर, दारू सोडा ', म्हणून उपदेश करावा " हा एकच प्याल्यांतल्या सुधाकराच्या अचंब्याचा उद्‌गार जगाच्या रंगभूमीवरील कित्येक पुढाऱ्यांच्या बाबतीत विदारक सत्य आहे! त्याचप्रमाणे टिळे–माळा–भस्मपुंड्रांनी सजलेले कितीक साधु पक्के भोंदू असतात. हे पाहून रामदास म्हणतात–

हें काय ! तें काय !
योग काय ! भोग काय ।
बाहेर जटाभार काय !
अंतरीं संसार काय !
बाहेर काषाय दंड काय !
आंत अवघे भंड काय !
बाहेर सात्विक ध्यान काय !
आंत मद्यपान काय !
रामदास म्हणे पाहे
व्यर्थ भगल करून काय !

ही कविता, शेवटच्या चरणातील कवीचा नामोल्लेख वगळला तर, मुक्त छंदाच्या जमान्यातल्या आधुनिक कवीचीच वाटावी, इतका तिच्यात अद्ययावतपणा आहे.

हे सारे ध्यानी घेतल्यास, रामदासांची कविता शुष्क चोयट्यासारखी अगदीच नीरस नाही, आणि त्यांनी स्वतःला काही ठिकाणी कवी म्हणवून घेतले आहे ते केवळ गैरसमजाने नव्हे, हे मान्य व्हायला हरकत नसावी. कवीश्वरांचा गौरव वर्णिताना–

नसता कवींचा व्यापार । तरि कैचा जगदोद्धार
म्हणून कवी हे आधार । सकळ सृष्टीशीं ॥

हा जो त्यांनी अभिमानोद्‌गार काढला आहे तोही निरर्थक नव्हे. त्यांनी लोकजागृतीचे कार्य अविरतपणे केले. त्यांच्या वाणीमुळे चैतन्याचे वारे समाजात खेळले असले पाहिजे, जनमतीचा कलंक झडला असला पाहिजे. आधुनिक मराठी कवीचे अध्वर्यु केशवसुत " आम्ही कोण म्हणून काय पुसतां ? " असा सवाल करून–

आम्हांला वगळा ' गतप्रभ झणीं होतील तारांगणें '
आम्हांला वगळा विकेल कवडी मोलावरी हें जिणें

हा जो कविप्रतापाचा निर्वाळा देतात त्याच्या उगमस्थानी रामदासांनी केलेल्या ' कवीश्वर '–गौरवाचा पाझर नसेल काय ? साहित्यिकाचा विचार समाजात हळूहळू

मुरत राहतो आणि कधी तरी, अनुकूल भूमी सापडली की, त्याला उपळ फुटत असतो. अर्थात मध्यंतरी गेलेला काळ आणि पडत राहिलेली भर यांनी त्या मूळ विचारांचा परिपोष होतो. शिवाय, नंतर जेथून उपळ फुटतो तिथलाही गुणधर्म त्यात मिसळतो. ह्या न्यायाने, रामदासांचा उद्‌गार केशवसुतांच्या वाणीतून उमटताना कमीअधिक छटा दाखवीत असेल. तथापि दोघांचीही जात एकच. आणि कलेबद्दलच्या कल्पनेंत कालमानाने प्रगती होत असली तरी—

आलेल्या दुरवस्थितींतुनि तुम्ही उत्तीर्ण व्हाया जरी
उद्योगीं रत व्हावया धरितसां औत्सुक्य चित्तीं, तरी
गाण्याने कविच्या प्रभाव तुमचा वर्धिष्णुता घेइल
स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल
हातीं घेउनिया निशाण कवि तो पाचारितो बांधवा–
या हो या झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा
प्रेतेंही उठवील जी निजरवें, ती तो तुतारी करीं
आता नादवितो, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी ?
आशा, प्रेम, तसेंच वीर्य कवनीं तो आपल्या गाइल
गेलें वैभव गाउनी स्फुरण तो युष्मन्मना देइल.

हे कवितेचे प्रयोजन केशवसुतांना ( कधी तरी ) मान्य होतें. रामदासांनी तरी आपल्या रसनेचा दुसरा काय उपयोग केला आहे ? रामायणातील सुंदरकांड आणि युद्धकांड एवढाच कथाभाग निवडून त्यांतही युद्धकांड तेराशे श्लोकांत मोठ्या दिलखुलासपणे फुलविले. त्या आपल्या कवनांत त्यांनी वीर्यच गाइले नाही का ? संभाजीला रामदासांनी लिहिलेले पत्र आणि इतरांची ह्या प्रकारची रसवंती म्हणजे ‘ स्फूर्तीचा तुमच्या पिढ्यांस पुढल्या साक्षी कवी होइल ’ ह्या उद्‌गारांचे स्फूर्तिस्थान म्हणायला काय हरकत आहे ? मराठा तितुका मेळवावा, गनीम निवटून काढावा, अशासारखे उद्‌गार ‘ या हो या झगडावयास ’ अशा प्रकारची प्रेरणा देण्यास कारण झाले नसतील काय ? ‘ कवि सामर्थ्यवंतांची सत्ता ’ हे रामदासांचे प्रमाणपत्र भाष्य करण्याइतके मोलाचे आहे. प्रतिभाशाली निरंकुश कवी जुल्म व अन्याय याविरुद्ध जे ज्वलज्जहाल उद्‌गार काढतो ते सत्तामदांधांच्या वर्मी अंकुशासारखे बसतात हे आजच्या विचक्षण साहित्यवेत्त्याला सहीसही मान्य होईल. केशवसुतांनी प्रतिभेची महती सांगतांना तिला ‘ देवाची जननी ’ असे संबोधले आहे. ते वाचताना ‘ कवी देवांचे रूपकर्ते ’ हा रामदासांचा बोल आठवणार नाही का ?

रामदासांच्या भाषेबद्दल स्वतंत्र लेखात आणि वरती ओघात विवरण येऊन गेलेच आहे. त्यांची भाषा ललितमधुर न होता रांगडी अवतरली आहे, ह्याचाच

अर्थ, भाषा आणि उद्दिष्ट यांचा मेळ बसला आहे. मंचकावर पडलेल्या सुखासीनांना रेशमी गुदगुल्या करून रिझविणे हे त्यांचे उद्दिष्ट नव्हे. सर्वांना स्वत्वाची जाणीव करून देणे, ह्या कामगिरीवर ते अंतरीच्या उमाळ्याने निघाले होते. तेव्हा, भाषा साऱ्यांच्या परिचयाची व आवाक्यातील वापरली जावी हे स्वाभाविकच होते. केशवसुतांच्या गोफण कवितेची इथे आठवण होते. समाजाचे जे जे दोष-रूप शत्रू त्यांना पिटाळून लावायला जो सरसावला तो म्हणतो—

स्वहृदय फाडुनि निज नखरीं चिवट तयाचे दोर।
काढुनि, गोफण वळितो ही सत्त्वाचा मी चोर।
गाठ मारुनी वैराची गोफण केली छान।
कठिण शब्द या धोंड्यांनी करितो हाणाहाण।

नेमकी हीच भूमिका तीन शतकांपूर्वी रामदासांनी घेतली होती. त्यांच्या अंगात त्वेषाचा जो संचार झाला होता त्याला गुळगुळीत, लुसलुशीत भाषा कशी सुचणार? म्हणूनच, त्यांची भाषा खडबडीत दगड—धोंड्यांसारखी आहे. त्यांच्या हातांत वीणा नाही, कुबडी आहे — लखलखीत धारदार पात्याच्या गुप्तीसारखी कुबडी आहे.

* * *

१५.

# दोष-परामर्ष

भक्तिभावाने संत–महंतांच्या चरणी मस्तक ठेवणाऱ्याच्या भाळी त्या चरणांची धूळ लागली तरी ती त्याला चंदनासारखी किंवा केशरकस्तुरीसारखी सेव्य वाटते. तथापि सर्वसामान्य चोखंदळाच्या दृष्टीला धूळ ही धूळच असल्यामुळे, तिचा मलिनपणा जाणवल्याशिवाय राहाणार नाही. आपल्या बालकाचे मलिन अंगही आईला वात्सल्याच्या उमाळ्यात आवडतें. पण शेजारीपाजारी त्या मळकटाला झिडकारल्याशिवाय राहाणार नाहीत. ह्या न्यायाने रामदासांची सारीच कविता त्यांच्याविषयी नितांत श्रद्धा बाळगणाऱ्या भाविकांना शिरोधार्य असली तरी तिच्यांतला डावे–उजवेपणा, सरस–निरसपणा, रसिक नजरेतून निसटणार नाही. सरोवर सुंदर असते. त्यावर वाऱ्याच्या झुळुकांनी लहरी नाचू लागल्या म्हणजे तर अधिकच सुंदर वाटते. पण वाऱ्यामुळे त्या जलाशयाच्या पृष्ठभागावर पालापाचोळाही येऊन पडतो. तसेच डुलणाऱ्या कमळांनी आणि विहरणाऱ्या हंसांनी सरोवराची शोभा वाढत असली तरी त्याचबरोबर इतर जलचरांनी केलेली गर्दीही रसिकदृष्टीला खटकल्याशिवाय राहणार नाही. आकाशातील चांदण्यांचे प्रतिबिंब त्या जलाशयात पडून ज्याप्रमाणे त्याला रमणीयता प्राप्त होते, त्याचप्रमाणे काठावरल्या तरूंच्या घनकृष्ण छायांनी त्याच्या रम्यतेवर उदासीनतेची कळाही पसरते.

रामदासांच्या कवितेतील एकंदर गुणसंपदेचा गौरव गाताना तिच्यातील हिणाकडे काणाडोळा करावा लागतो. तथापि, लक्ष द्यायचे म्हटले तर दोष लक्षात यायला काही अवघड जाणार नाही.

भाषेची शुद्धाशुद्धता आणि वृत्तरचनेतील शैथिल्य यांचा उल्लेख पूर्वी येऊन गेलाच आहे. गिरिकंदरातून, काट्याकुट्यातून, खरटांतून, चालायची ज्याला जन्माचीच सवय आहे त्याला, आपल्या कवितेलाही तशाच प्रकारे खडबडीतून वाटचाल करावी लागत आहे, हे तितकेसे जाणवलेही नसेल.

वाचकाला आणखी एक दोष जाणवतो तो कवितेची सुरुवात आणि तिचा शेवट यांच्यातील कलात्मक विभिन्नता. उदाहरणार्थ, "ऐका नवरस सुंदर" आणि "गिरीचे मस्तकीं गंगा" ह्या चरणांनी ज्यांची सुरुवात आहे त्या स्फुटांचा शेवट भावगीताची कलात्मक प्रकृती लक्षात घेता, तितकासा शोभणारा नाही. 'गिरीचे मस्तकीं गंगा'. ह्या स्फुटाच्या पूर्वार्धात, घळीसमोरून कोसळणारा प्रपात आणि

लगतची गिरिवनश्री यांचे चित्रण आहे. पण उत्तरार्धातले बोल साधकाच्या मनोवृत्तीतून प्रगटले असून—

देव भक्त कसें रूप । अंतरात्मा चहूंकडे
कर्ता तो येकला देव । भक्त आनन्य होतसे

ह्या शब्दांनी शेवट झाला आहे. ह्यात वनश्री किंवा प्रपातसौंदर्य यांचा काहीही संबंध उरलेला नाही. अशीच गत आहे "ऐका नवरस सुंदर" ह्या अभंगाची. पूर्वार्धात रसांची मोजदाद करण्यात आली असून—

लुब्ध होती तरी मृदुची बोलावें । नेमस्त चालावें नीतिन्यायें
नीतिन्यायें बहुतेकांसी मानतो । व्याप करील तो भाग्यवंत
भाग्यवंत नर यत्नासी तत्पर । अखंड विचार चाळणेचा
चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा । अखंड शहाणा तोची एक
प्रवृत्तीं निवृत्तीं चाळणा पाहिजे । दास म्हणे कीजे विचारणा

हा उत्तरार्ध त्या अभंगाला जोडण्यात आला आहे. साहित्याच्या रसात्मकतेचा विचार ह्या अभंगात मांडला असेल अशा अपेक्षेने पुढे पुढे वाचत जाणाराला "प्रवृत्तीं निवृत्तीं चाळणा पाहिजे" अशासारख्या उपदेशांची आचमने मिळतात. 'स्फूर्ति' म्हणून जी कविता आहे तिच्यात मला स्फूर्ति कशा प्रकारची हवी ते निरनिराळ्या दाखल्यांनी सांगता-सांगता—

असावें तरी सर्व कांहीं असावें
नसावें तरी लेश तें ही नसावें
परब्रह्म तें वीवराया वराया
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया

अशा प्रकारचीही रामदासांनी स्फूर्ती मागितली आहे. स्फूर्तीवाचून कवित्व पांगळे असते. तेव्हा, स्फूर्तीबद्दल त्यांच्या ज्या आकांक्षा असतील त्यांत हा श्लोक चपखल बसतोच असे नाही. याचे कारण, 'भावगीत' ह्या दृष्टीने कवितेत जो एकजिनसीपणा आजच्या रसिकाला अपेक्षित असतो तो त्या काळी आणि खुद्द रामदासांना अपेक्षित असावा असे दिसत नाही. ह्याचे कारणही उघड आहे. कविता भावनेतून उफाळून आली असली तरी सारा रोख ईश्वरभक्तीवर असल्यामुळे, शेवटी कविता वळते ती ईश्वरभक्तीकडे. सर्व नद्या कितीही वळणे घेतली तरी ज्याप्रमाणे शेवटी सागराला मिळतात, त्याप्रमाणे संताची कविता शेवटीं ईश्वरचरणीच विलीन व्हायची. हे ध्यानी घेतल्यावर केवळ भावगीतांची कलात्मकताच ज्याला कवळायची असेल त्याला, अर्थातच, मूळ कवितेची काटछाट करणें हाच एक मार्ग पत्करावा लागतो. नैसर्गिक

रीत्या वाढणाऱ्या फुलझाडांना आणि लताकुंजांना डौलदार आकार यावा म्हणून माळी नाही का काटछाट करीत ?

'विस्तार' हा रामदासांच्या विवेचनाचा गुणही विचिकित्सक दृष्टीने कुठे दोषस्वरूप ठरेल. प्रमाणबद्धता ही कवितेची भूषा होय. पण, रामदास स्वतःला 'कवि' म्हणवून घेत असले तरी त्या दृष्टीने कवितेची निगा राखणारे नाहीत. आपणास जितुके ठावे तितुके सांगून टाकावे हा त्यांचा प्रकृतिधर्म आहे. आणि त्यांना ठावे आहे ते इतके उदंड आहे की, वक्तृत्वाच्या भरात किती सांगू न् किती सांगू नको असे त्यांना होऊन जाते. बागेबद्दल सांगायचे असो, भोजनाबद्दल बोलावयाचे असो, किंवा अक्षरलेखनाबद्दल ताकीद द्यायची असो, ते इतुके काही सांगत राहतील की प्रसंगी त्याचा श्रोत्याला कंटाळा येईल. पण कंटाळणाऱ्या श्रोत्यांनी स्वतःच्या मनाला आवर घालून प्रश्न विचारावा की 'आपल्याला इतके एकटाकी सुचेल का ?' मग मात्र, स्वताला असा प्रश्न करणारा तो श्रोता, रामदासांच्या त्या उदंड तपशिलाच्या वक्तृत्वामुळे आश्चर्यचकित होईल.

तपशिलाचे नमुने किती तरी दाखवता येतील. दासबोधाच्या आठराव्या दशकांतील दुसऱ्या समासात 'जाणतेपणे वर्तले । पाहिजे नेमस्त' असे सांगितले आहे. त्याच दशकातील नववा समास "बोलें निद्रेचा विळास" हा आहे. ह्या दोनी ठिकाणचा विस्तार-विलास, रामदासांनी जे बारकाईने निरखिले ते टिपून घेतल्याच्या आणि टिपून घेतलेले घडाघडा सांगून टाकण्याच्या सामर्थ्याचा निदर्शक आहे. अशा प्रकारचा विस्तार 'पाल्हाळ' म्हणून गणिला जाईल ह्याची रामदासांना अगदीच कल्पना नसेल असे नाही. "आतां असो सांगो किती। विस्तार हा" (दा. ८।४।५३) किंवा "आतां असो हे बहुवस" (दा. ८।५।११) असे जे उद्‌गार मधून-मधून येतात ते, त्यांना आपल्या पाल्हाळाची कल्पना आहे, हेच दाखवतात.

पुनः पुन्हा तेच ते निरूपण, तोच तो उपदेश, तेच ते विचार त्यांच्या वाङ्मयात आढळतात. स्फुट अभंगांचे प्रतिध्वनी दासबोधात ऐकू येतील आणि दासबोधातल्या विचारांचा अनुवाद श्लोकबद्ध स्फुट प्रकरणांतून आढळेल.

जैसें बोलणें बोलावें। तैसेंचि चालणें चालावें

हा उपदेश--

—सदा बोलण्यासारिखें चालताहे
—जनीं बोलण्यासारखें चाल बापा
—मुखीं बोलल्यासारखें चालताहे
—जनीं बोलण्यासारिखें आचरावें

अशाप्रकारे किंचित शाब्दिक फरकाने, वारंवार आढळतो. बोलण्यात आणि वागण्यात मेळ पाहिजे हे त्यांना शिष्यांच्या आणि पर्यायाने जनतेच्या चित्तावर ठसवायचे आहे. त्यालाच नम्रतेची जोड द्यायला हवी म्हणून--

स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा

असे ते सांगतात. कष्टेंविण फळ नाहीं, यत्न तो देव जाणावा, जो स्वयेंचि कष्टत गेला तोचि भला, इत्यादि शब्दांनी प्रयत्नवादही त्यांनी ठायी ठायी घोषित केला आहे. 'न्यायनीतीनें चालावें' ही त्यांच्या उपदेशवीणेवरील आणखी एक वारंवार झंकारत राहणारी तार. धारिष्ट चळू देऊ नये आणि 'अभ्यास नित्य नूतन' असावा असे ते पदोपदी सांगतात. आणि--

–विवेकेविण सकळ होय । निरर्थक
–विवेकेविण काय । उमजो जाणे
–सकळ गुणांमध्यें सार । तजविजा विवेक विचार
–विवेकामध्ये सापडेना । ऐसें तों कांहीच असेना ।
येकांतीं विवेक अनुमाना । आणून सोडी ॥
अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहातां काय उणें तेथें
येकांतेंविण प्राणियातें । बुद्धि कैंची ॥

अशी विवेकाची महती ज्यावर आढळणार नाही असे तर पान सापडणेहीं कठीण. प्रस्तुत ग्रंथात विवेचनाच्या अनुरोधाने जी अनेक अवतरणे देण्यात आली आहेत त्यांच्यावरून जरी धावती नजर टाकली तरी ठायी ठायी विवेक-विचारांची पखरण झाली असल्याचा प्रत्यय येईल. तेच ते फिरून सांगण्याचा त्यांना कंटाळा नाही. पुनरुक्तीचा दोष आपल्या पदरात येणार हेही त्यांना कळते. पण श्रोत्यांच्या (म्हणजे शिष्यांच्या) अंतःकरणावर आपली शिकवण वज्रलेप व्हावी ही इच्छा त्या पुनरुक्तीच्या मुळाशी आहे.

सूक्ष्म निरूपण लागलें । तेथें बोलिलेंचि मागुतें बोलिलें
श्रोत्यांस पाहिजे उमजले । म्हणौनिया ॥ दा० १०।८।३०

हें त्यांचे धोरण आणि ही त्यांची तळमळ. जो ध्यास घेतलेला असतो त्याचा एकसारखा गजर करीत राहणे हा मनुष्यस्वभाव आहे. त्यासंबंधी कितीही बोलले तरी त्याला ते अपुरे वाटते. ह्या बाबतीत त्यांची विचारसरणीच अशी आहे की—

सेविलेंचि सेवावें अन्न। घेतलेंचि घ्यावें जीवन।
तैसें श्रवण मनन। केलेंचि करावें॥

हाच आशय त्यांनी एका अभंगातही सविस्तर सांगितला आहे.

एकदां जेवितां नव्हे समाधान।
प्रतिदिनीं अन्न खाणें लागे॥
तैसें निरूपण केलेंचि करावें।
परि न करावें उदासीन॥
प्रत्यहीं संसारीं बोलावें लागतें।
कांहीं केलिया तें सुटेना कीं॥
प्रतिदिनीं देह पाळावा लागतो।
शुद्ध करावा तों रात्रंदिवस॥
प्रत्यहीं देहानें भोगिलें भोगावें।
त्यागिलें त्यागावें दास म्हणे॥

ह्याच अनुसंधानात

इतुका आग्रह याचिकारणें। जें तूं वैराग्यें उणे।
आणि तुज मुक्त करणे। हे प्रतिज्ञा आपली॥

ही रामदासांची प्रतिज्ञा ध्यानात घेण्यासारखी आहे. शिष्य "वैराग्यें उणें" आहेत तसेच सर्वसाधारण जन व्यवहारज्ञाने उणे आहेत. त्यांना अज्ञानातून मुक्त करणे हीदेखील रामदासांची प्रतिज्ञा असल्यामुळे भोजनाच्या पंगतीत आग्रह कर-करून वाढावे त्याप्रमाणे त्यांच्या प्रतिपादनात त्याच त्या विचारांचा इतुका आग्रह आहे.

सारांश, रामदासांच्या कवित्वात आढळणारे दोष हे त्यांच्या प्रकृतिधर्मांतून आणि पर्यायाने त्यांच्या गुणांतूनच उद्‌भवलेले आहेत; आणि "जेथें निरूपणाचे बोल। आणी अनुभवाची वोल (म्ह. ओल)" तिथे ते क्षम्य ठरायला हरकत नाहीत. चंद्रावर जरी कलंक दिसला तरी सुधाकर आणि ओषधीपती ह्या त्याच्या बिरुदांना खोट येण्याचे कारण नाही. भपकेबाज जाहिराती आणि मोहक वेष्टणे ह्यांनी औषधाचा प्रभाव वृद्धिंगत होत नाही. औषधाचे प्रभावसामर्थ्य बहिरंगावर का अवलंबून असते?

* * *

१६.

## ज्या कारणें गुंडाळिती तेंचि वाचे उच्चारिती !

कामविकाराने फसफसणाऱ्या कथा लिहिणारांचे आणि प्रकाशित करणारांचे पीक वाढत आहे असे पाहून संस्कृति-संरक्षक-मंडळाने पुष्कळ बोभाटा केला आणि महाराष्ट्र-साहित्य-परिषदेलाही आपल्या संमेलनांतून त्याची दाद घ्यावी लागली. संमेलनांतून अशा वाङ्मयाचा निषेध वारंवार होत गेला. पण निषेधाला कोण जुमानणार ? शहाण्याला शब्दाचा मार ! जे जाणून-बुजूनच त्या मार्गाला लागण्याइतके धट्ट बनले ते काय पर्वा करणार ? मग शासनाकडे गाऱ्हाणे नेण्याची तोड सुचविण्यात आली. पाहायचे कितीसा परिणाम होतो तो ! भेसळ खाद्यपदार्थांच्या विक्रेत्यांना अधूनमधून दंड झालेला आपण वाचतो. पण व्यापाऱ्यांनी सचोटीचे व्रत घेतल्याचे ऐकिवात नाही. कारण, भेसळीने इतका उदंड फायदा उकळण्यात आलेला असतो आणि फिरून उकळण्यात येण्याची शक्यता असते की, न्यायदेवतेने फर्मावलेल्या दंडामुळे व्यापाऱ्यांच्या खिशांतले कस्पटही कमी होत नाही. " अनंत हस्तें गिऱ्हाइकानें। देता, किती घेशिल दो कराने " असेच ते न्यायदेवतेला मनातल्या मनात म्हणत असतील. तेव्हा, काही विद्वान म्हणतात की, वाचकांची वाङ्मय-अभिरुची वाढविण्या-वरच भर दिला की, घाण वाङ्मयाला आपोआपच ओहोटी लागेल. नुकतेच एका सभेत व्याख्यात्याने असे प्रतिपादन केल्याचे वाचले !

म्हणजे काय ? फिरून तेच की ! अभिरुची वाढविणारे वाङ्मय निर्माण कोणी करावयाचे ? आणि छापायचे कोणी ? कामविकाराने फसफसलेले कथावाङ्मय फैलावू लागल्याची जेव्हापासून ओरड सुरू झाली, त्याच्यापूर्वी अभिरुचिसंपन्न वाङ्मय निघत नव्हते की काय ? आणि निघत होते, तर मग ओंगळ लिहिण्याकडे लेखण्या का वळल्या ? राजहंसांना खिरीत चोच बुचकळण्याचा कंटाळा कां आला ?

जाऊ द्या; उलट-सुलट सवालांतून काय निष्पन्न होईल, हे पाहण्यापेक्षा जनतेला हिताच्या गोष्टीची जाणीव करून देण्यासाठी पुनः पुन्हा, चौकाचौकातून, सालोसाल, प्रहराप्रहराला, ढोल बडवला पाहिजे, एवढे मात्र खरे.

## श्रवण केलिया क्रिया पालटे

श्रवण, वाचन यांचा मनुष्याच्या मनावर परिणाम होतो. याचा अर्थ त्याच्या वृत्तीत तत्काळ तदनुकूल फरक पडतो, असे नव्हे. ' पी हळद, हो गोरी ' असे कुठेच असत नाही. पण हळूहळू संस्कार होत जाऊन मनाचा तदनुसार कल झुकू लागतो.

वाङ्मयातील जी विचारधारा वारंवार मनात पडत राहील, ती परिणामशून्य ठरणार नाही. नदीकाठावर बांधलेल्या घाटाचे चिरे पाण्याच्या संतत घर्षणाने हळूहळू गुळगुळीत होत असतात, कंगोरे बोथट होत जातात. तसाच प्रभाव विचारधारेचा होणार. नळाचे पाणी जिथे फरशीवर पडत असते तिथे फरशी कालान्तराने खोलगट झालेली आपण पाहतोच की नाही ? ' श्रवण केलिया क्रिया पालटे ' हे जे रामदास प्रतिपादतात त्याचा हाच अर्थ आहे; आणि म्हणूनच त्यांनी शिष्याला सांगितले आहे:–

भक्तिज्ञान वैराग्यज्ञान । तोचि ग्रंथ समाधान ।
शृंगारिक ऐकतांचि मन । घालूं नको सर्वथा ॥
शृंगारिक ऐकतांचि कांहीं । समाधान होणार नाहीं ।
हें तूं विचारून पाही । खरें कीं खोटें ॥
शृंगारिक श्रवण करावें ! तेथें साधकें काय घ्यावें ।
सिद्ध समाधानापासून चेवावें । रसवृद्धि लाधलिया ॥

शृंगारकथांपासून दूर राहावे हा रामदासांचा उपदेश अर्थातच साधकासाठी आहे. जन्ममृत्यूची भ्रमणे चुकविणे हे ज्याला सार्थक साधायचे आहे त्याने शृंगारकथांत रस घेणे म्हणजे परिणामी समाधानरूपी ' दिव्यांबरास बोराटीनें वरबडून ' टाकण्यासारखे होईल, असा त्यांचा इषारा आहे. आणखी एका ठिकाणी रामदासांनी हाच विचार निराळ्या शब्दांत मांडला आहे :—

शृंगारिक नवरसिक । यांमधें सांडावें येक ।
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णू नये कीं ॥

लावण्य स्त्रियांचें वर्णिता । विकार बाधिजे तत्त्वता ॥
धारिष्टापासून श्रोता । चळे तत्काळ ॥

लावण्य स्त्रियांचें ध्यान । कामाकार जालें मन ।
कैचें आठवेल ध्यान । ईश्वराचें ॥

स्त्री वर्णिता सुखावला । लावण्याचे भरीं भरला ।
तो स्वयें जाणावा चेवला । ईश्वरापासोनी ॥

(दासबोध, द. १४, स. ५)

प्रहरा–प्रहराला चौघडा वाजवून, निघून जाणाऱ्या काळाचे मोजमाप करायचे आणि निद्रिस्तांना सावध करायचे, त्याप्रमाणे शिष्यांच्या चित्तांवर बोधवाक्य पक्के ठसण्यासाठी सांगितलेलेच पुन्हा पुन्हा सांगायचे, हे रामदासांचे धोरण आहे. कामचेष्टांचे रसिकपणाने वर्णन करण्यात ज्यांची रसना रममाण होते, त्यांचा निषेध

रामदासांनी केला आहे, असे नव्हे. पण ईश्वरोपासना हे ज्यांचे उद्दिष्ट असेल त्यांना त्यांनी स्त्रीसौंदर्याच्या वर्णनात रस घेण्यास मनाई केली आहे – त्यापासून दूर राहण्याला सांगितले आहे. साधकाला मनोविजय आवश्यक आहे. धारिष्टापासून श्रोता चळू नये, याचा अर्थ त्याच्या मनाचा खंबीरपणा चळू नये, ह्यासाठी त्याने जागरूक राहिले पाहिजे. भक्कम तटबंदीला भगदाडे पाडण्यासाठी शत्रूकडून सुरुंग लावले जातात. तद्वतच विकारांचे थैमान ज्या वाङ्मयात आहे, ते वाङ्मय स्फोटक होय. त्याने साधकाच्या मनोदुर्गाची तटबंदी खिळखिळी होण्याची शक्यता आहे. म्हणून रामदास सांगतात, " हुशार, भाई हुशार " !

## नवरसांचा राजा शृंगार

तथापि, सर्वसामान्य वाचकाचे ध्येय परमार्थसाधन नसल्यामुळे त्याने ह्या रामदासप्रणीत अधिक्षेपाकडे लक्ष देण्याचे कारण नाही, असा कोणी पक्ष मांडतील. 'टवाळा आवडे विनोद' असा रामदासांनी निंदागर्भ उद्‌गार काढला म्हणून विनोदाचे दालन वाङ्मयात रिकामे थोडेच राहिले आहे ? साहित्यिकांनी ते मोठ्या प्रेमाने सजविलेच की नाही ? इतकेच नव्हे, तर हसत-हसवत समाजपुरुषाच्या दोषांवर नेमके बोट ठेवून, त्यांचे निर्मूलन करण्याला व्यंगोक्ती, विडंबन, उपहास ही अमोघ शस्त्रे आहेत, असे शिफारसपत्र देऊन विनोद-वाङ्मयनिर्माते गौरवार्ह ठरवले गेले आहेत. तेव्हा, 'टवाळा आवडे विनोद' म्हणून रामदासांनी नाक मुरडले तरी कोणी बुजायचे कारण नाही. त्याचप्रमाणे सर्वसामान्य मनुष्य संसार करीत करीत इहलोकची यात्रा संपविणारा असल्यामुळे, नवरसांची तहान त्याने दाबून का टाकावी ? नवरसांचा राजा शृंगार. त्याच्या चक्रवर्तित्वाला सारेच राजी-खुषीने मान तुकविणार. प्रणयाचे अधिराज्य सर्वांनाच हवे असते. नाटककार खाडिलकर यांनी म्हटले आहे :--

> " विषयात आनंद न मानणारा तरुण ज्याप्रमाणे समाजाला सौभाग्यदायक नसतो, त्याचप्रमाणे खाऊचा हव्यास नसलेला बालक समाज खुरटा करतो. "– [ सत्वपरीक्षा ]

प्रस्तुत विवेचनात ह्या विधानाचा व्युत्क्रम करून घ्यायला हरकत नाही. ह्याचा अर्थ उघड आहे. मुलांना खाऊचा हव्यास असणे हे स्वाभाविक आहे. तरुणांना शृंगारात रुची असणेही स्वाभाविकच आहे. ह्या उपभोग-प्रवृत्तींचा आविष्कार ज्यात झालेला असतो त्या वाङ्मयाबद्दल आकर्षण असणे, ह्यात प्रापंचिकाच्या दृष्टीने काय गैर आहे ? रामदासांनी ज्याचे पथ्य सांगितले आहे ते शृंगाररसात्मक वाङ्मय तरुणांना आवडणारच.

## समाजास अपायकारक

ह्या युक्तिवादात तथ्य आहे; आणि हा युक्तिवाद ध्यानी न येण्याइतके

रामदास साधेभोळे नव्हते. कोणाला कोणता ग्रंथ आवडतो ह्याचा त्यांनाही विचार सुचला आहे. " पंडितांस पाहिजे व्युत्पत्ती। विद्वानांस अध्ययनप्रीती। कळावंतां आवडती। नाना कळा " हे ते जाणतात. " येका पाहिजे रसाळ। येकां पाहिजे पाल्हाळ " आणि लोक " आवडीसारखे ऐकिती " आणि आवडीसारखी " नाना पुस्तकें वाचिती " हे त्यांनी पाहिले आहे. पण युक्तिवादाच्या भरी भरून, आविष्कार, रुची, रस, वाङ्मय, ह्या शब्दांबाबत आज आपण भोंगळ कल्पना उरात बाळगता कामा नये. रामदासांनी साधकाच्या दृष्टीने जरी हितोपदेश केला असला, तरी ' समाधान भंगू नये ' हे धोरण सर्वसामान्य वाचकांच्या बाबतीतही अभिप्रेत समजायला हरकत नाही. त्याचप्रमाणे ' जेणें परमार्थ वाढे। अंगीं अनुताप चढे। त्या नांव ग्रंथ ' असा त्यांनी निर्णय दिला असला तरी ' अंगीं अनुताप चढे ' ही कसोटी प्रापंचिकांनीही करमणुकीसाठी वाचायच्या ग्रंथाला लावायला पाहिजे. कारण, वाङ्मयाची कास धरायची ती घटकाभर मनोरंजनासाठी. पण ज्या वाचनाने विकाराची वखवख वाढेल, ते प्रापंचिकाच्याही दृष्टीने त्याज्यच नव्हे का? मनोरंजनाने काय साधावयाचे? तर, कामकाजाने शिणलेल्या मनाला नवीन हुषारी यावी, हे साधावयाचे. याचा अर्थ, ज्याचा जो उद्योग तो करायला त्याला नवा हुरूप यावा. आणि काही नवीन प्रेरणा मिळण्यासारख्या असतील, उद्योगात अधिक यशोत्कर्ष होण्यासाठी काही नवीन कल्पना सुचतील तर ते ग्रंथवाचन जास्तच विहित होय. वाचनीय ग्रंथ कोणता? ह्या प्रश्नाचे उत्तर Every book is worth reading which sets the reader in a working mood. ज्या ग्रंथाच्या वाचनाने ( प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने ) उद्योगप्रवणता उद्‌भवेल तो वाचनीय, असा **इमर्सनने** निकष सांगितला आहे. तेव्हा, ओघानेच असे म्हणणे भाग आहे की, फावल्या वेळात वाचन झाल्यावर, आपल्या उद्योगाला फिरून प्रवृत्त होण्याऐवजी उनाडक्या करण्याकडे, दुसऱ्याच्या कुचाळक्या करण्याकडे जर प्रवृत्ती झाली, तर त्या वाचनाने समाधान भंगलेच की नाही? काही कथा वाचून मनावर जी धुंदी चढेल, तिने जर वाटेतून जाणाऱ्या-येणाऱ्यांना कोपरखळ्या देण्याची बुद्धी झाली, तर ते वाचन अपायकारकच नव्हे का?-- स्वतःला आणि दुसऱ्याला? साधक म्हणून भगवी कफनी पांघरायची नसली तरी देखील कुटुंबातला आणि समाजातला एक घटक म्हणून तरी वागायचे आहेच की नाही? आणि " जेणें होय उपरति। अवगुण पालटती। जेणें चुके अधोगती। ह्या नांव ग्रंथ " ह्या निकषाचे अंतःसूत्र मनोरंजनप्रधान रसात्मक वाङ्मयात नसावे असे कसे म्हणता येईल?

हां, धक्काबुक्की करावयालाही स्फूर्ती देणारे वाङ्मय हवे. पण धक्काबुक्की कोणाशी? जे चेवल्यागत वागून इतरांना उपद्रवकारक होतात त्यांच्याशी! अन्यायाने व जुलमाने जे वागत आहेत त्यांच्याशी! थोडक्यात, समाजकंटकांशी आणि मानवतेच्या शत्रूंशी! त्यांच्याशी धक्काबुक्की करण्यासाठी चेव येईल, असे वाङ्मय समाधान भंग

करणारे असले तरी चालेल. ज्यात विकारवशतेची वखवख आणि परिणामी पश्चात्ताप, यांचा अंतरभाव असेल तो समाधानभंग नको. महान उद्दिष्टांच्या साध्यापायी धोका पतकरावा लागला तरी हरकत नाही. पण केवळ ढिसाळ मनाचे चोजले पुरविण्यासाठी वाटेल तसा वागेन हा विचार जेणे करून बळावेल ते वाङ्मय नव्हे आणि वाङ्मयातील रसाचे ते साध्य नव्हे. करुणागीतांनी गहिवर दाटतो; पण समाधान भंग पावत नाही. शोकगीतांनी अश्रुधारा वाहू लागतात; तरीही त्या समाधानच देतात. रस्त्यात ऊर बडविणारी एकादी अभागिनी पाहिली, तर अंतःकरणात कालवाकालव होते; पण शोकरस आस्वादल्याचे समाधान होत नाही. घटना आणि घटनांवर आधारलेले वाङ्मय यांत परिणामदृष्ट्या हा फरक असतो.

## वन्ही कोणता चेतवावा ?

"वन्ही तो चेतवावा रे चेतवीतांचि चेततो" हे त्रिकालाबाधित सत्य असल्यामुळे कोणता वन्ही चेतवायचा हा लेखकाने विवेक केला पाहिजे. वाचकाच्या मनात कामवासना उफाळून याव्यात ह्या हेतूने आपल्या लेखणीची फुंकणी फुंकणारे लेखक अपायच करतात. कामवन्ही चेतविण्याचे पाठ देण्याची आणि प्रयोग दाखविण्याची आवश्यकता असते काय ? अंतःकरणातील सुप्त शौर्याचा स्फुलिंग चेतविण्यासाठी शूर मर्दांचे पोवाडे गायला हवेत. दैन्याची दुःखे सुखासीनांना कळत नाहीत. जावे त्यांच्या वंशा, तेव्हा कळे. पण प्रत्यक्ष त्यांच्या वंशाला जाण्याची शक्यता नसते, तेव्हा दुःखितांचे वंशवृक्ष सुखासीनांच्या चित्तचक्षूपुढे चितारून दाखवणे जरूर असते. तरच त्यांच्या अंतःकरणाला पाझर फुटून त्यांचे बाहू औदार्याने स्फुरू लागतात आणि दैन्य निवारण्यासाठी यथामती यथाशक्ती उद्योग करण्याला प्रवृत्त होतात. वन्ही चेतवावा तो ह्या उद्दिष्टाने. नांदत्या संसारावर निखारे ठेवण्याने वन्ही चेतेल; आणि तेव्हढा जालीम उपाय करण्याची आवश्यकता असेल, तर खुशाल करावा. अग्नीच्या अंगीं शुद्धिकरणाची अचाट शक्ती आहे. पण ध्यानात घ्यायचे की, शुद्धीकरणाचे उद्दिष्ट असेल, तरच अशा अघोरी उपायाला प्रवृत्त होणे एक वेळ क्षम्य ठरेल ! तरी पण अग्नी फुलवून दुसऱ्यांची घरे जाळताना त्या ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी आपले घर पडले तर चालेल का ? याचा विचार आधी केलेला बरा ! प्रणयाच्या नावाखाली उघड्यानागड्या आणि नीतिदृष्ट्या गर्ह्य अशा माकडचेष्टा रंगविणारांनी मनात किंचित विचार करावा की, असल्या माकडचेष्टांचे कोलीत आपल्याच आढ्यावर पडून घरादाराचा भडका उडाला तर आपणास गोड वाटेल का ? वन्ही हा वन्हीच आहे. तो चेतविताना त्यात स्वतःचे होमहवन करायला एखादा प्रवृत्त होईल; पण ते होमहवन हौतात्म्याचे असेल तेव्हा; सतीचे असेल तेव्हा !

"वन्ही तो चेतवावा रे । चेतवीताचि चेततो" हा जो रामदासांनी दृष्टान्त दिला आहे, तो कोणत्या संदर्भात दिला आहे, ह्याचा शोध घेण्यासाठी त्यांची

कविता धुंडणाराला लगेच आढळेल की, " विवेक जाणिजे तैसा । वाढवीतांचि वाढतो " हा सिद्धान्त रामदासांना सांगावयाचा आहे. भूक वाढवावी लागत नाही, ती निसर्गतः लागते. ती लागली की प्राणी अन्न शोधायला प्रवृत्त होतो. पेरू पाहून तोंडाला पाणी सुटले की, दगड मारून तो पाडायला मुलाचा हात फुरफुरू लागतो. पण मुलाला जाणीव करून द्यायला हवी ती ही की, ' बाबा रे, झाडावरल्या वानराहून तू वेगळा आहेस, हात आवर. ' झोप लागली की, नीज म्हणून सांगावे लागत नाही. तो स्वभावेची झोपी जातो. पण सांगावे लागते ते हे की, " अरे सशाच्या पिला, कासवापेक्षा तू चपळ आहेस, यात शंका नाही. पण ' आपण चपळ आहो ' ह्या घमेंडीत तू निजून राहशील आणि कासव मात्र तुझ्या आधी मुक्कामाला पोहोचेल. तरी झोप आवर. "

भय आणि काम याचे बाबतीतही तोच न्याय ! सांगावे लागते ते ह्यांना कह्यात कसे ठेवायचे ते ! भूक आणि भय यांना जिंकायला शिकायचे असते. प्राण्यांच्या ह्या चतुर्विध प्राथमिक गरजा खऱ्या. पण कालमान ओळखून त्यांच्यावर विजय कसा मिळवायचा हे मनुष्याला शिकायचे असते.

ह्या चतुर्विध गरजांचा गरजेपुरताच विचार करून, एरव्ही त्यांना लगामी ठेवायला पाहिजे; आपणच त्यांचे भक्ष्य बनायचे नाही. हा धरबंध न राहता, कामविकाराचेच अनिर्बंध थैमान जीवितात जर चालू दिले, तर पशुपक्ष्यांपेक्षाही ' मनुष्य 'कोटी हीन ठरेल.

## साहित्याचे सामर्थ्य

मनुष्याने साहित्य निर्माण केले ते आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी. मनोगतात आशा, आकांक्षा, अपेक्षा यांचा अंतर्भाव आलाच. पण वरचाच न्याय ह्या प्रकारच्या अभिव्यक्तीलाही लागू आहे. ह्या प्रगटीकरणात धोरण सांभाळायला हवेच. ते प्रामाणिकपणाचे असेल. ते इतरांना अपायकारक नसेल आणि तें तू व मी मिळून उभयतांना तृप्ती देईल असे असेल. ह्याचाच सूक्ष्म विचार केला की, त्यात सुखकर, पथ्यकर, अभिमानास्पद, जिव्हाळ्याच्या गतस्मृती असतील; आजचे कडूगोड अनुभव, ऊन–पावसाचे आणि अंधार – उजेडाचे खेळ असतील; आणि उद्याची चिंता असेल – चिंतेच्या निवारणाचा विचार असेल, काही बेत असतील. म्हणजेच, साहित्य कशासाठी निर्माण होते याचे उत्तर असेच येईल की:–

( १ ) गतकाळ फिरून जिवंत उभा करण्यासाठी;
( २ ) वर्तमान सजविण्यासाठी, समृद्ध करण्यासाठी, वर्तमानाला गती देण्यासाठी; आणि
( ३ ) भविष्यावर पालाण घालण्यासाठी.

हे सामर्थ्य असते ते साहित्यातल्या रसात. अभिमन्यूची चक्रव्यूह भेदण्याची उभारी रंगविण्याने गतकाळ सजीव होतो आणि ती रंगत आजच्या कोवळ्या कुमारांना शौर्याची, धाडसाची प्रेरणा देते. अभिमन्यूचा मृत्यू देशकार्यात निधन पावलेल्या आजच्या बालवीरांच्या मातापित्यांना आपत्तीतही मान उंच ठेवण्याची ताकद देतो, कठोर वर्तमानही साजरा करून घेण्याच्या भावनेची समंजसता शिकवितो आणि प्रत्यक्षात हानी झाली असताही आपले जिणे समृद्धच झाले आहे ह्या भावनेची ज्योत त्यांच्या अंतरी पेटवून पोकळी व अंधार यांचा निरास करतो.

रस म्हणजे राड नव्हे. जिवाचा कलिजा कालवश झाल्यामुळे कोणी माता ऊर बडवीत आहे, हे दृश्य हृदयविदारक खरे. पण तो शोक होय, शोकरस नव्हे. रसनिर्मिती वाङ्मयविधात्याच्या लेखणीने होते. तेव्हा, लेखणीबहाद्दरांनी ध्यानी धरावे की, संभोग निराळा आणि शृंगाररस निराळा. मनुष्याला वर्तमान जीवित सजविण्यासाठी, परिपुष्ट करण्यासाठी, वाङ्मयाने रस पुरवावा; संभोगाची प्रयोगशाळा चव्हाट्यावर उघडू नये. अशी प्रयोगशाळा उघडणारांची संभावना रामदासांनी कोणत्या शब्दात केली आहे ती पाहा. ते म्हणतात,

ज्या कारणे गुंडाळिती,
तेंचि वाचे उच्चरिती !

हा उद्‌गार शिमग्यातल्या आचकट-विचकट कवित्वाला उद्देशून असल्यामुळे "वाचे उच्चारिती" असा शब्दप्रयोग करण्यात आलेला दिसतो. लज्जारक्षण हे वस्त्रांचे एक प्रयोजन. पण वस्त्रांनी जे झाकायचे त्याचाच उच्चार बेलगाम जिभेने करायचा ह्या प्रकारच्या त्या कवित्वाबद्दल रामदासांनी शिसारी व्यक्त केली आहे. नुसत्या वाचेने उच्चारण्याबद्दलची जर ही नापसंती, तर लेखणीने वस्त्रहरण करणाराबद्दल किती तरी कडक शब्दांनी रामदासांनी निषेध केला असता. लेखणीची महती ते पूर्ण जाणतात. त्यांच्या सर्वस्पर्शी कवित्वात तिचा गौरवही आलेला आहे. त्यांच्या प्रतिभेच्या नजरेतून तिचे कौतुक कसे सुटेल ? ते म्हणतात—

पीतापासून कृष्ण जाले । भूमंडळीं विस्तारले ।
तेणेविण उमजलें । हें तों घडेना ॥

आहे तरी स्वल्प लक्षण । सर्वत्रांची साठवण ।
अधम आणि उत्तम गुण । तेथेंचि असती ॥

महीसुत सरसावला । सरसावुन द्विधा केला ।
उभयता मिळोनी चालला । कार्यभाग ॥

श्वताश्वतासि गाठी पडता । मध्ये कृष्ण मिश्रित होता ।
इहलोक सार्थकता । होत आहे ॥

चौदा पिढ्यांचे पवाडे । सांगती ते शहाणे कीं वेडे ।
ऐकत्यानें घडे कीं न घडे । ऐसे पाहावें ॥

पीतापासून म्हणजे हिरड्यापासून. शाई करायला हिरडा वापरीत असत. महीसुत म्हणजे बोरू. बोरूची लेखणी करताना टोक तासून, छाटून, ते छेदावे लागते. म्हणूनच लेखणीला द्विजिव्ह म्हणतात. टोक द्विधा केले तरी 'उभयता मिळोनि चालला। कार्यभाग' असे म्हणण्यात मार्मिकता आहे, हे रसिकांना सांगणे नलगे. "श्वताश्वतासि गाठी पडता । मध्ये कृष्ण मिश्रित होता" ह्या शब्दयोजनेचा भावार्थ, पांढरा कागद, पांढरा नसलेला बोरू आणि काळी शाई, यांचा संयोग झाला म्हणजे,–असा आहे. चौदा पिढ्यांचे पोवाडे । सांगती ते शहाणे कीं वेडे, असे संदिग्ध लिहिण्यात ध्वनी असा असावा की, जो वाडवडिलांची कीर्ती सांगे तो एक पढत-मूर्ख, असे एके ठिकाणी समर्थांनीच म्हटले आहे. ते ध्यानी असल्यामुळे, त्यांना इथे असे म्हणायचे दिसते की, ते शहाणे की मूर्ख हा विचार बाजूला ठेवू.

उपरोक्त अवतरणातील शब्द–योजनेचा जरूरीपुरता येणेप्रमाणे खुलासा करता येतो. तो ध्यानी घेतला म्हणजे एकंदर अवतरणात समर्थ असे सांगत आहेत की, शाई, कागद व लेखणी ह्यांचा संयोग होऊन त्यातून जे निष्पन्न होत आहे त्याने भूमंडळ व्यापले आहे. त्याच्याशिवाय उमज पडणे अशक्य आहे. देशोदेशींची जनता जी एकमेकांला जाणू शकते ती लेखनाच्या द्वारा. तसे पाहिले तर ही लेखन-सामुग्री किती क्षुल्लक आहे. पण तिच्या योगानेच सर्व अनुभवांची व ज्ञानाची साठवण करता येते. अधम व उत्तम गुणांचा विलास लेखनात दाखवता येतो. कीचक-धर्म, कृष्ण-कंस, राम-रावण ह्यांचे चारित्र्य चित्रित करणाऱ्या साहित्यिकांनी तो निर्माण करून ठेवलेला आपण पाहू शकतो. जीविताला अर्थ काय आणि ती अर्थसघनता कशी संपादावयाची व इहलोकी जन्मल्याचे सार्थक झाले हे समाधान कसे प्राप्त करून घ्यायचे ते ह्या गुणवंतांच्या चरित्रांच्या वाचनाने कळायचे. साहित्याचा हा उपयोग आहे. पूर्वजांच्या पराक्रमाचे पोवाडे ( गाणारे शहाणे असोत की वेडे असोत ) ऐकणाराने आपल्या हातून तसे काही घडते की नाही ते पाहावे. रामदासांनी ह्याच ओघात––

रेखा तितुकी पुसोनि जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
डोळे–झांकणी करावी ते । काय निमित्त ॥

असा सवाल केला आहे. ह्या प्रयत्नवादी पुरुषाचे मत असे की, ललाटलेखही पुसून

टाकता येतो; मग डोळेझाकणी का करावी ? रामदासांनी लेखणीबद्दल हे जे विचार व्यक्त केले आहेत ते पर्यायाने साहित्याच्या सामर्थ्याबद्दलच आहेत.

यद्वै वाङ्ना भविष्यन् धर्मो ना धर्मो व्यज्ञापयिष्यत्
न सत्यं नानृतं साधु ना साधु न हृदयज्ञो ना हृदयज्ञो
वागेवैतत्सर्व विज्ञापयति वाचमुपास्वेति

छान्दोग्योपनिषदामधील ह्या सूत्राचा अनुवाद इंग्रजी वाङ्मयसेवकांनीही आपल्या स्वतःसाठी करून घेतला आहे. If there had been no speech neither virtue nor vice could be known, neither the true nor the false, neither the good nor the bad, neither the pleasant nor the unpleasant. Speech alone makes known all this. Meditate upon speech.

'सर्वत्रांची साठवण । अधम आणि उत्तम गुण । तेथेंचि वसती' ह्या समर्थांच्या उद्गारांशी वरील सूत्राचा मेळ बसत आहे, हे सहज दिसून येईल Language is the amber in which a thousand precious and subtle thoughts have been safely imbedded and preserved. [*R.C. Trench*] ह्या उद्गारात देखील रामदासांच्या 'साठवणी'चाच निनाद नाही का ? सूक्ष्म-तरल भाववृत्तींचे आलेख वाङ्मयात उमटलेले असतात. लेखनकला अवगत झाल्यापासून साहित्याने हे सारे जतन करून ठेवले आहे, पिढ्यांमागून पिढ्यांना हे पुरविले आहे. परस्परांची अंतरे जाणणे, ज्ञानाच्या सूर्यप्रकाशात स्नान करून निरामय होणे, आणि पूर्वसूरींच्या चरित्रांवरून गुणावगुणांचा परिणाम ध्यानी घेऊन आपल्या जीवितरथाला योग्य दिशा लावणे, हे सारे साहित्याने साधता येणार आहे. अर्थातच, सकृद्दर्शनी क्षुल्लक वाटणारी लेखनसामग्री अशा कामी लाविली पाहिजे, हे उघड आहे. पण केवळ विवस्त्र अंगोपांगांचे उत्तान वर्णन करून कामुक चेष्टा रंगविण्यावरच ज्यांच्या लिखाणाचा भर आहे ते लेखनसामग्रीचा दुरुपयोग करीत आहेत; पांढऱ्यावर काळे करून ते त्या लेखनसामग्रीची भयंकर विटंबना करीत आहेत; आणि त्यांचे ते तसले लिखाण वाचकांच्या अंतरीचा संयम, मनोनिग्रह, धारिष्ट, ह्यांना पोखरून टाकणारे असल्यामुळे ते सामाजिक द्रोह करीत आहेत. त्यांच्याबद्दल ( होळीपंचकात ) रामदास सखेद आश्चर्याने म्हणत आहेत की, "काय हे लोक पाहा,–

ज्याकारणें गुंडाळिती तेंचि वाचे उच्चारिती" ! !

आपल्या वाङ्मयनिर्मितीबद्दल समर्थांकडून असे म्हणवून घ्यायचे काय, हा ज्याचा त्याने विचार करावा.

* * *

# समर्थांची कविता

श्रोतीं व्हावें सावधान
मना आले ते गाईन
रामीरामदास म्हणे
जेणें गुंतती शहाणे

* * *

एका भावार्थसाठी
उघडे शब्दरत्नपेटी
अनर्घ्य-रत्नांची गोमटी
माळा वसे हृदयीं

[ जुना दासबोध३।१०० ]

## १.—ते हे कवी

आतां वंदूं कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर ।
नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥

कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळांचें जीवन ।
नाना शब्दांचें भुवन । येथार्थ होये ॥

कीं हे पुरुषार्थाचें वैभव । कीं हे जगदेश्वराचें महत्त्व ।
नाना लाघवें सत्कीर्तीस्तव । निर्माण कवी ॥

कीं हे शब्दरत्नांचे सागर । कीं हे मुक्तांचें मुक्त सरोवर ।
नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाले ॥

अध्यात्मग्रंथांची खाणी । कीं हे बोलिके चिंतामणी ।
नाना कामधेनूंची दुभणीं । वोळलीं श्रोतयांसी ॥

कीं हे कल्पनेचे कल्पतरु । कीं हे मोक्षाचे मुख्य पडिभरु ।
नाना सायोज्यतेचे विस्तारु । विस्तारले ॥

कीं हा परलोकींचा निजस्वार्थु । कीं हा योगियांचा गुप्त पंथु ।
नाना ज्ञानियांचा परमार्थु । रूपासि आला ॥

कीं हे निरंजनाची खूण । कीं हे निर्गुणाची वोळखण ।
मायाविलक्षणाचें लक्षण । ते हे कवी ॥

कीं हा श्रुतीचा भावगर्भ । कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ
नातरी होये सुल्लभ । निजबोध कविरूपें ॥

कवि स्वधर्माचा आश्रयो । कवि मनाचा मनोजयो ।
कवि धार्मिकाचा विनयो । विनयकर्ते ॥

कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचे भूषण ।
नाना स्वधर्मलक्षण । ते हे कवी ॥

कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिती । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती ।
कवि उपासकांची वाढ कीर्ती । विस्तारली ॥

नाना साधनांचें मूळ। कवि नाना प्रेत्नांचें फळ।
नाना कार्यसिद्धी केवळ। कवीचेनि प्रसादें।

आधीं कवीचा वाग्विलास। तरी मग श्रवणीं तुंबळे रस।
कवीचेनि मतिप्रकाश। कवित्वास होये ॥

कवि वित्पन्नाची योग्यता। कवि सामर्थ्यवंताची सत्ता।
कवि विचक्षणाची कुशलता। नाना प्रकारें ॥

कवि कवित्वाचा प्रबंद। कवि धाटी मुद्रा छंद।
कवि गद्यपद्येंभेदाभेद। पदप्रासकर्ते ॥

कवि सृष्टीचा अळंकार। कवि लक्ष्मीचा शृंघार।
सकळ सिद्धींचा निर्धार। ते हे कवी ॥

कवि सभेचें मंडण। कवि भाग्याचें भूषण।
नाना सुखांचें संरक्षण। ते हे कवि ॥

कवि देवांचे रूपकर्ते। कवि ऋषींचे महत्त्ववर्णिते।
नाना शास्त्रांचे सामर्थ्यते। कवि वाखाणिती ॥

नस्ता कवींचा व्यापार। तरी कैंचा अस्ता जगोद्धार।
ह्मणोनि कवि हे आधार। सकळ सृष्टीसी ॥

नाना विद्या दातृत्व कांहीं। कवेश्वरेंविण तों नाहीं।
कवीपासून सर्वही। सर्वज्ञता ॥

नाना चातुर्याच्या मूर्ती। कीं हे साक्षात् बृहस्पती
वेदश्रुती बोलों म्हणती। ज्यांच्या मुखें ॥

परोपकाराकारणें। नाना निश्चय अनुवादणें।
सेखीं बोलिलें पूर्णपणें। संशयातीत ॥

कीं हे अमृताचे मेघ वोळले। कीं हे नवरसांचे वोघ लोटले।
नाना सुखाचे उचंबळलें। सरोवर हे ॥

कीं हे विवेकनिधीचीं भांडारें। प्रगट जालीं मनुष्याकारें।
नाना वस्तुचेनि विचारें। कोंदाटले हे ॥

कीं हे आदिशक्तीचें ठेवणें । नाना पदार्थास आणी उणें ।
लाधले पूर्वसंचिताच्या गुणें । विश्वजनासी ॥

कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षे आनंदें उतटलीं ।
विश्वजनासी उपेगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ॥

कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विराटाची योगस्थिती ।
नातरी भक्तीची फलश्रुति । फळास आली ॥

कीं हा ईश्वराचा पवाड । पाहाता गगनाहून वाड ।
ब्रह्मांडरचनेहून जाड । कविप्रबंदरचना ॥

आतां असो हा विचार । जगास आधार कवेश्वर ।
तयांसी माझा नमस्कार । साष्टांग भावें ॥

## २. तेंचि भूत गे माय !

होतें वैकुंठींचे कोनीं । शिरलें अयोध्याभुवनीं ।
लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे माय ॥

जातां कौशिकराउळीं । अवलोकिता भयंकाळीं ।
ताटिका ते छळोनि मेली । तेंचि० ॥

मार्गीं जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी ।
पाषाणाची जाली नारी । तेंचि भूत० ॥

जनकाचे अंगणीं गेलें । शिवाचें धनु भंगिलें ।
वैदेहीअंगीं संचरलें । तेंचि भूत० ॥

जेणें सहस्त्रार्जुन वधिला । तोही तात्काळचि भ्याला ।
धनु देऊनि देह रक्षिला । तेंचि भूत० ॥

पितयाचे भाकेसी । कैकयीचे वचनासी ।
मानुनि गेले आरण्यासी । तेंचि भूत० ॥

चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडे वनवासी ।
सांगतें भुजंग पोसी । तेंचि भूत० ॥

सुग्रीवाचें पालन। वालीचें निर्दालन।
तारी पाण्यावरी पाषाण। तेंचि भूत० ॥

रक्षी मरणीं बिभीषण। मारी रावण कुंभकर्ण।
तोडी अमरांचें बंधन। तेंचि भूत० ॥

वामांगीं स्त्रियेला धरिलें। धांवूनि शरयूतीरा आलें।
तेथें भरतासी भेटलें। तेंचि भूत गे० ॥

सर्वां भूतांचें हृदय। नाम त्याचें रामराय।
रामदास नित्य गाय। तेंचि भूत० ॥

३. बुधी दे रघुनायेका .

युक्ती नाहीं बुधी नाहीं। विद्या नाहीं विवंचितां।
नेणता भक्त मी तूझा। बुधी दे रघुनायेका ॥

मन हें आवरेना कीं। वासना वावडे सदा।
कल्पना धावते सैरा। बुधी दे रघुनायेका ॥

अन्न नाहीं वस्त्र नाहीं। सौख्य नाहीं जनांमध्यें।
आश्रयो पाहता नाहीं। बुधी दे रघुनायेका ॥

बोलतां चालतां येना। कार्यभाग कळेचिना।
बहुत पीडिलों लोकीं। बुधी दे रघुनायेका ॥

तुझा मी टोणपा जालों। कष्टलों बहुतांपरी।
सौख्य तों पाहतां नाहीं। बुधी दे रघुनायेका ॥

नेटकें लिहितां येना। वाचितां चुकतों सदा।
अर्थ तो सांगतां येना। बुधी दे रघुनायेका ॥

प्रसंग वेळ तर्केना। सुचेना दीर्घ सूचना।
मैत्रिकी राखितां येना। बुधी दे रघुनायेका ॥

कळेना स्फूर्ति होईना। आपदा लागली बहू।
प्रत्यहीं पोट सोडीना। बुधी दे रघुनायेका ॥

संसार नेटका नाहीं । उदेग वाटतो जीवीं ।
परमार्थ आकळेना कीं । बुधी दे रघुनायेका ।

देईना पूर्वीना कोण्ही । उगेचि जन हांसती
वीसरु पडतो पोटीं । बुधी दे रघुनायेका ॥

पिसुणें वाटती सर्वें । कोणीही मजला नसे ।
समर्था तूं दयासिंधू । बुधी दे रघुनायेका ॥

उदास वाटतें जीवीं । आतां जावें कोणेकडे ।
तू भक्तवछळा देवा । बुधी दे रघुनायेका ॥

कायावाचामनोभावें । तुझा मी ह्मणवीतसें
हे लाज तुजला माझी । बुधी दे रघुनायेका ॥

सोडवील्या देवकोटी । भूभार फोडिला बळें ।
भक्तांसि आश्रयो मोठा । बुधी दे रघुनायेका ॥

भक्त उदंड तुह्माला । आह्माला कोण पूसतें ।
ब्रीद हें राखणें आधी । बुधी दे रघुनायेका ॥

उदंड ऐकिली कीर्ति । पतीतपावना प्रभो ।
मी येक रंक निर्बुधी । बुधी दे रघुनायेका ॥

आशा हे लागली मोठी । दयाळुवा दया करीं ।
आणीक नलगे कांहिं । बुधी दे रघुनायेका ॥

रामदास ह्मणे माझा । संसार तुज लागला ।
संशयो वाटतो पोटीं । बुधी दे रघुनायेका ॥

## ४. स्फूर्ति दे देवराया

हवाया नळें बाण भांडीं अनंतें
बळें सोडितां जाति आकाशपंथें
बती लागतां वेळ नाहीं उठाया
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया

वरी पाहतां दृष्टि हे दूरि धावे
तयाच्या सवें कल्पना हे उठावे
उठे मारुती वेळ नाहीं उडाया
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया

फिरे वावरे वात सर्वांत जैसा
चळे नीवळे ही कळे पष्ट तैसा
धरीता बळें संधि नाहीं धराया
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया

विवेकी विवंचूनिया लागवेगें
पळे सर्वही दृश्य सांडून मागें
उपायेंचि तो जाय लंघून माया
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया

असावे तरी सर्व कांहीं असावें
नसावे तरी लेश तेंही नसावें
परब्रह्म तें वीवराया वराया
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया

५. मार्तंड

मार्तंड मंडळा ऐसे   तेजस्वी पाहतां नसे
चळवळी चळचळाकारें   पाहातां दृष्टि झाकळे

तेज विस्तीर्ण कीर्णांचें   चालिलें पश्चमेकडे
व्यापिल्या आष्टहि दिशा   अधोर्ध नभमंडळीं

उष्णता उष्ण दे लोकां   जीवमात्रांस वाचवी
पाहाती येकमेकांला   परीक्षा करिती बहु

बहुधा चालती कर्में   शुभाशुभ भुमंडळीं
प्रउर्ती निउर्ती उष्णें   आनंदें लोक वर्तती

या सूर्यमंडळाखाल्यें   कितेक होत जातसे
औतार वर्तले गेले   गेले दानव मानवी

दृष्टी हे मुख्य सूर्याची दीवाभीत निशाचरें
अग्न तो अंश सूर्याचा सूर्य तो वन्हिचा नव्हे

वर्तुळ धगधगीताहे ब्रह्मांड शोभले पाहा
सृष्टी हे पष्ट होताहे रूप लावण्य वैभवें

विश्व वर्ते जयाचेनी जाळिता पाळिता रवि
आज्ञा होते समर्थांची तैसा तैसाचि वर्ततो

तो देव अंतरीं वर्ते सर्ते पुर्ते बरें पाहा
त्रैलोकीं पुरवला आहे पाहे तो धन्य मानउ

सूर्य आत्मा वदे वेदु प्रतेक्ष जाणता तुम्ही
धन्य देणें समर्थाचें प्रकाश तितुका रवि

मुळींचे अंश येकाचे जीवमात्र भुमंडळीं
नेणती लोक ते काचे दैवाचे जाणते गुणी

देव भक्त बरें पाहे तोहि लाहे ततक्षणीं
धन्य हे भेटि देवाची देव देव म्हणा म्हणा

ते नी कळा

संगीत गायनी विद्या सर्व सद्या मनोरथा
विदेश पाहातां नाहिं धन्य ते गायनी कळा

आवडी सकळै लो कांप्रीतीनें भजती जनीं
इच्छिलें पुर्विती सर्वै धन्य ते गायनी कळा

वेधिली सर्वही चित्तें बोधिली लोक भाविकें
आद्‌भुत गुण देवाचे धन्य ते गायनी कळा

येकाकी महंती येते उदंड कीर्ति वाढते
विख्यात सकळै लोकीं धन्य ते गायनी कळा

राहती लोक ते राजी आवडी उपजे मनीं
वर्णिता कीर्ति देवाची धन्य ते गायनी कळा

दुसरी भक्ती देवाची जगोद्धार चि होइजे
घमंड गाजतें मोठें धन्य ते गायनी कळा

बारीक उठती कीळा नाना तंत परोपरीं
ऐकतां गुदगुल्या होती धन्य ते गायनी कळा

बाळकें स्वापदें पक्षी लोधती वेधती मनीं
चित्त निश्चीत होताहे धन्य ते गायनी कला

संगीत मृछना ताळें मुर्कुंडी होतसे बळे
वीताळ पाहतां नाहिं धन्य ते गायनी कळा

प्रबंदें कीर्तीं देवाची जाड दृष्टांत नेटके
रसाळ गौल्यता मोठी धन्य ते गायनी कळा

नाना प्रकारीचीं मानें कीर्ती प्रताप होतसे
आतुळ तुळणा नाहिं धन्य ते गायनी कळा

भक्तीची आवडी मोठी करुणाकीर्तनें बरीं
भक्तांची आवडी भक्तां धन्य ते गायनी कळा

७. धबधबा आणि घळ

गीरीचे मस्तकीं गंगा तेथुनि चालिली बळें
धबाबां लोटल्या धारा धबाबां तोये आदळे

गर्जतो मेघ तो सिंधु ध्वनिकल्लोळ उठीला
कड्यासी आदळे धारा वातआवर्त होतसे

तुषार उठती रेणु दुसरें रज मातलें
वातमिश्रीत ते रेणु सीतमिश्रीत धुकटें

दराच तुटला मोठा झाडखंडें परोपरीं
निबीड दाटली छाया त्यामधें वोघ वाहाती

गर्जती स्वापदें पक्षी नाना स्वरें भयंकरें
गडद होतसे रात्रीं ध्वनिकल्लोळ उठती

कर्दमु निवडेना तो मनासीं साकडें पडे
विशाल लोटली धारा तीखालें रम्य विवरें

कपाटें नेटक्या गुंफा तापसी राहाती सदा
नेमस्त बांधली नाना उत्तमें निर्गळें स्थळें

विश्रांती वाटते तेथें जावया पुण्य पाहिजे
कथा निरूपणें चर्चा सार्थकें काळ जातसे

प्रचीत पाहातां मोठी जन्म धन्यचि होतसे
सत्संग सेवणें आधीं प्रचीत पाहाणें बरी

नित्यानित्य विवेकानें विचारें जन्मसुटीका
जड चंचळ जाणावें निश्चळाच्या ऐलीकडे

देव भक्त कसें रूप अंतरात्मा चहुंकडे
कर्ता तो येकला आहे भक्त आनन्य होतसे

## ८. पृथ्वी

महीमुर्वी पृथ्वी वसुमति धरा भार धरितेति
बहु सेतें भातें आगणित पिकें सौख्य करिते
धनें धान्यें धातु न कळत भुमी आड करिती
तुपें तेलें टांकी बहुविध गिरीमाजि भरिती

फळें फुलें वल्ली तरुवर किती भार धरिती
मुळें डाळें कंदें समजत महारोग हरती
हिरे खाणी धातु सकळिक बिजेंमाजि भरली
गिरी पुरें ग्रामें आगणित धरेमाजि धरली

नद्या तीर्थें क्षेत्रें बहुविध किती देशरचना
किती भाषाभेदें अगणित नसे मीत्य वचना
माहा सिंधुमधें जिवनं चि असंख्यात भरलें
भुमीच्या आधारें विलसत जळामाजि तरलें

दीपें खंडें चंडें महिवरि गुणा कोण गणणा।
चतुर्खाणी वाणी उमजत बळें कोण कवणा
कळा विद्या सद्या त्रिभुवन जनामाजि वसती
विवेकी लोकांला विवरत मनामाजि दिसती
गुणी आष्टै भोगें नृपवर सदानंद करिती
पदार्थाचीं नामें न कळत जनीं तेंचि धरिती
निदानीं ते सर्वै मरत चि भुमीमाजि भरती
किती येती जाती सुरवरमुनी हे चि जगती

९. मनाचे श्लोक

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें
जनीं वंद्य तें सर्वभावें करावें
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा
पुढें वैखरी राम आधीं वदावा
सदाचार हा थोर सोडूं नये तो
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो.
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें
मना बोलणें नीच सोशीत जावें
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें
मना सर्व लोकांसि रे नीववावें
देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी
मना चंदनाचेपरी त्वां झिजावें
परी अंतरीं सज्जना नीववावें
जनीं सर्व सूखी असा कोण आहे
विचारें मना तूंचि शोधूनि पाहें
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें

जिवा कर्मयोगें जनीं जन्म झाला
परी शेवटीं काळमुखीं निमाला
महाथोर ते मृत्युपंथेचि गेले
कितीएक ते जन्मले आणि मेले

मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी
जितां बोलती सर्वही जीव मी मी
चिरंजीव हे सर्वही मानिताती
अकस्मात सांडूनिया सर्व जाती

मना सर्वथा सत्य सोडूं नको रे
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे
मना सत्य ते सत्य वाचे वदावें
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

सदा सर्वदा देव सन्नीध आहे
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे
सुखानंद आनंद कैवल्यदानी
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

जयाचेनि संगें समाधान भंगे
अहंता अकस्मात येऊनि लागे
तये संगतीची जनीं कोण गोडी
जिये संगतीनें मती राम सोडी

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा
सदा रामनामें वदे नित्य वाचा
स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

सदा बोलण्यासारिखें चालताहे
अनेकीं सदा एक देवासि पाहे
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

नसे अंतरीं काम नानाविकारी
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी
निवाला मनी लेश नाहीं तमाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

सदा आर्जवी प्रीय जो सर्वलोकीं
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा

अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना
अती काम त्या राम चित्तीं वसेना
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा
अती वीषयी सर्वदा दैन्यवाणा

घनश्याम हा राम लावण्यरूपी
महाधीर गंभीर पूर्णप्रतापी
करी संकटीं सेवकांचा कुडावा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

बळें आगळा राम कोदंडधारी
महाकाळ विक्राळ तोही थरारी
पुढें मानवा किंकरा कोण केवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

सुखानंदकारी निवारी भयातें
जनीं भक्तिभावें भजावें तयातें
विवेकें त्यजावा अनाचार हेवा
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा

अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं
तया पामरा बाधिजे सर्व कांहीं
महाराज तो स्वामि कैवल्यदाता
वृथा वाहणें देहसंसारचिंता

विवेकें क्रिया आपुली पालटावी
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी
जनीं बोलण्यासारखें चाल बापा
मना कल्पना सोडि संसारतापा

फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे
दिसंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे
विचारें मना तूंचि शोधूनि पाहे

विचारूनि बोले विवंचूनि चाले
तयाचेनि संतप्त तेही निवाले
बरें शोधल्यावीण बोलों नको हो
जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो

नसे गर्व आंगीं सदा वीतरागी
क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी
नसे लोभ ना क्षोम ना दैन्यवाणा
इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा

जया मानला देव तो पूजिताहे
परी देव शोधूनि कोणी न पाहे
जगीं पाहता देव कोटयानुकोटी
जया मानली भक्ति जे तेचि मोठी

दिसे लोचनीं ते नसे कल्पकोडी
अकस्मात आकारलें काळ मोडी
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे
मना संत आनंत शोधूनि पाहे

## १०. राघव नीरवीला

तपोवना सानुज राम जातां
समागमें जानकि दिव्य कांता
माता म्हणे राघव वास पाहे
प्रयाण पाईं तुजला न साहे
पृथ्वी तुला राघव नीरवीला
याच्या झणीं रूतसि पाउलाला
जामात तूझा प्रतिपाळि यातें
फळीं तऱ्ही सीव्र हरी क्षुधेतें
आपापती प्रार्थिते तूजलागीं
तपासि जातो रघुराज योगी
नद्या तटाकें करि पूर्ण पंथें
तृषा झणीं पीडिल हो तयातें
श्रीसूर्यराजा कुळदीप तूझा
तपासि जातो रघुराज माझा
स्पर्शों नको तीव्र किर्णें तयातें
ध्यानीं क्षिती वाटेल योगियातें
वाजों नको कर्कश रे समीरा
असेल जेथें नृपरत्न हीरा
तो स्वामि रे हा तुझिया सुताचा
सधूशरें होइल देह त्याचा
रघूत्तमु सादृश्य वेषधारी
सौमित्र तो सुंदर ब्रह्मचारी
वनस्पती हो तुम्ही तोषवा वो
छयाया सुगंधें श्रम हा हरा वो
सपक्षिकूळासह कोकिळा हो
सीते सुशब्दीं तुम्हीं रंजवा हे
हे धाकुटी योगिणी कुंजपासी
तुम्हीच तेथें सखिया तियेसी

सगद्‌गदें बोलतसे सुशब्दें
श्रवताति नीरें नयनारविंदें
पुसोनिया राघव वास पाहे
कै मागुता देखेन यासि माये

जो राम विश्राम योगेश्वरांचा
त्या गौरवी भक्ति माता सुवाचा
क्षमेंचि रामें भवशोकहाला
मग दासस्वामी वनासि गेला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि ............

## ११. " देव आहे जगदांतरें "

ब्रह्म निराकार निश्चळ । आत्म्यास विकार चंचळ ।
तयास म्हणती सकळ । देव ऐसें ॥

देवाचा ठावचि लागेना । एक देव नेमस्त कळेना ।
बहुत देवीं अनुमानेना । येक देव ॥

म्हणोनि विचार असावा । विचारें देव शोधावा ।
बहुत देवांचा गोवा । पडोंचि नये ॥

देव क्षत्रीं पाहिला । त्यासारिखा धातूचा केला ।
पृथ्वीमधें दंडक चालिला । येणें रीती ॥

नाना प्रतिमादेवांचें मूळ । तो हा क्षत्रदेवचि केवळ ।
नाना क्षत्रें भूमंडळ । शोधून पाहावें ॥

क्षत्रदेव पाषाणाचा । विचार पाहातां तयाचा ।
तंत लागला मुळाचा । अवताराकडे ॥

अवतारी देव संपले । देहे धरुनी वर्तोन गेले ।
त्याहून थोर अनुमानले । ब्रह्मा विष्णु महेश ॥

त्या तिही देवांस ज्याची सत्ता। तो अंतरात्माचि पाहातां।
कर्ता भोक्ता तत्वता। प्रतक्ष आहे॥

युगानयुगें तिन्ही लोक। येकचि चालवी अनेक।
हा निश्चयाचा विवेक। वेदशास्त्रीं पाहावा॥

आत्मा वर्तवितो शरीर। तोचि देव उत्तरोत्तर।
जाणीवरूपें कळिवर। विवेकें वर्तवी॥

तो अंतर्देव चुकती। धांवा घेऊन तीर्था जाती।
प्राणी बापुडे कष्टती। देवास नेणतां॥

मग विचारिती अंतःकरणीं। जेथें तेथें धोंडा पाणी।
उगेंचि वणवण हिंडोंनी। काय होतें॥

ऐसा ज्यासी विचार कळला। तेणें सत्संग धरिला।
सत्संगें देव सांपडला। बहुत जनांसी॥

ऐसीं हीं विवेकाचीं कामें। विवेकी जाणतील नेमें।
अविवेकी भुलले भ्रमें। त्यांस हें कळेना॥

अंतरवेधी अंतर जाणे। बाहेरमुद्रा कांहींच नेणे।
म्हणोन विवेकी शाहाणे। अंतर शोधिती॥

विवेकेंविण जो भाव। तो भावचि अभाव।
मूर्खस्य प्रतिमा देव। ऐसें वचन॥

पाहात समजत सेवट गेला। तोचि विवेकी भला।
तत्वें सांडुनी पावला। निरंजनीं॥

आरे जें आकारासी येतें। तें अवघेंच नासोन जातें।
मग गलबल्यावेगळें तें। परब्रह्म जाणावें॥

चंचल देव निश्चळ ब्रह्म। परब्रह्मीं नाहीं भ्रम।
प्रत्ययज्ञानें निर्भ्रम। होईजेतें॥

प्रचीतीवीण जें केलें। तें तें अवघें वेर्थ गेलें।
प्राणी कष्टकष्टोंचि मेले। कर्मकचाटें॥

कर्मविगळें न व्हावें । तरी देवास कासया भजावें ।
विवेकी जाणती स्वभावें । मूर्ख नेणे ॥

कांहीं अनुमानलें विचारें । देव आहे जगदांतरें ।
सगुणाकरितां निर्धारें । निर्गुण पाविजे ॥

सगुण पाहातां मुळास गेला । सहजचि निर्गुण पावला ।
संगत्यागें मोकळा जाला । वस्तुरूप ॥

परमेश्वरीं अनुसंधान । लाविता होईजे पावन ।
मुख्य ज्ञानेंचि विज्ञान । पाविजेतें ॥

ऐसीं हे विवेकाची विवर्णें । पाहावीं सुचित अंतःकर्णें ।
नित्यानित्यविवेकश्रवणें । जगदोधार ॥

## १२. सद्‌गुरुस्तवन

आतां सद्‌गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ? ॥

न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती ।
तेथें मज मूर्खाची मती । पवाडेल कोठें ॥

मज न कळे हा विचारु । दुरूनि माझा नमस्कारु
गुरुदेवा पैलपारु । पाववीं मज ॥

होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा ।
आतां असाल तैसे असा । सद्‌गुरु स्वामी ॥

मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ।
माया जाली लज्यायमान । काय करूं ॥

नातुडे मुख्य परमात्मा । ह्मणोनि करावी लागे प्रतिमा ।
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्‌गुरूचा ॥

आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ।
तैसा सद्‌गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ॥

जयजयाजि सद्‌गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ॥

तुझीयेन अभयंकरें । अनावर माया हे वोसरे ।
जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ॥

आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे ।
निशी जालियां नंतरें । पुन्हा काळोखें ॥

तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव ।
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥

सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
तैसा गुरुदास संदेहीं । पडोंचि नेणे सर्वथा ॥

कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होता गंगा जाली ।
मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥

परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें ।
तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये ॥

परीस आपणा ऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना ।
उपदेश करी बहुत जना । अंकित सद्‌गुरूचा ॥

शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करिता नये ।
ह्मणोनि उपमा न साहे । सद्‌गुरूसी परिसाची ॥

उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतचि क्षार ।
अथवा म्हणों क्षीरसागर । तरीं तो नासेल कल्पांतीं ॥

उपमे द्यावा जरी मेरु । तरी तो जड पाषाण कठोरु ।
तैसा नव्हे कीं सद्‌गुरु । कोमळ दिनाचा ॥

उपमे ह्मणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण ।
या कारणें दृष्टान्त हीण । सद्‌गुरूस गगनाचा ॥

धीरपणें उपमूं जगती । तरी हेहि खचेल कल्पांतीं ।
ह्मणौन धीरत्वास दृष्टान्तीं । हीण वसुंधरा ॥

आतां उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती ।
शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु अमर्याद ॥

ह्मणौनि उपमे उणा दिनकर । सद्गुरुज्ञानप्रकाश थोर ।
आतां उपमावा फणीवर । तरी तोही भारवाही ॥

आतां उपमे द्यावें जळ । तरी ते काळांतरीं आटेल सकळ ।
सद्गुरुस्वरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥

सद्गुरुसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्युपंथ ।
सद्गुरुकृपा यथार्थ । अमर करी ॥

सद्गुरूसी ह्मणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु ।
कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी ? ॥

चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी ।
कानधेनूचीं दुभणीं । निःकामासी न लगती ॥

सद्गुरु ह्मणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत ।
ज्याचें दारीं असे तिष्ठत । मोक्षलक्ष्मी ॥

स्वर्गलोक इंद्र संपती । हे काळांतरीं विटंबती ।
सद्गुरुकृपेची प्राप्ती । हे काळांतरीं चळेना ॥

हरिहरब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।
सर्वदा अविनाश येक । सद्गुरुपद ॥

तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी ।
पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें ॥

ह्मणौनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।
अंतरस्थितीचिया गुणा । अंतर्निष्ठ जाणती ॥

## १३. आपण रामचि व्हावें

रामासि इतुकें मागावें । जें आपण रामचि व्हावें ।
कां रामासि दास करावें । आपण ऐसें ॥

तूं ऐसा कां मीच असोन । त्याहून नलगे आम्हासि आन ।
तुझ्या ठायीं दासपण । आणीन तरी मी होय ॥

तुवां स्वामी होऊन बैसावें । आणि आम्हांसभोंवतें भोंवावें ।
रागेजोनी बाहतां न यावे । हें काय बरें ॥

तूं राज्य सांडूनियां जालिया उदास । तरी आम्हीही तुझेचि दास ।
त्वां काय बोलिजेल बापास । तैसें आम्हीही तुज करूं ॥

तुवां पाषाण तारिले । तरी आम्हीही जडजीव उद्धरिले ।
तुवां देव मुक्त केले । बंधापासूनी ॥

तरी आम्हीही भाविकांसी । सोडवूनिया मोक्षपदासी ।
पावविले तयांसी । मागुता जन्म नाहीं ॥

तुवां जरामरण केलें दुरी । तें मुळींच नाहीं आमुचे घरीं ।
तूं राजा अकरा सहस्रवरी । तरी आम्हांसि संख्या नाहीं ॥

तुवां पुरी नेली वैकुंठा । आम्हीं वैकुंठींच्या बारा वाटा ।
करूनि मांडिला चोहटा । तया वैकुंठाचा ॥

ऐसे बोलती रामदास । निधडे सर्वस्वें उदास ।
वैभव वाटे जयांस । कसपट जैसें ॥

ऐसें बोलणें ऐकिलें । रामें मंदहास्य केलें ।
धांवोनियां हृदयीं धरिलें । आपुलिया निजदासा ॥

ऐसा भक्तांचा वेळाइत । दासाभोंवता भोंवत ।
एक क्षणीं न विसंबत । भावार्थ देखोनि भुलला ॥

राम दासांमध्यें उभा । तेणें दासांसि आली शोभा ।
रामस्वरूपाची प्रभा । कोंदाटली सबाह्य ॥

रामें आपणासारिखें केलें । दास दासपणेंसि मुकले ।
रामासि मिळोनि एकचि जाले । एकपणाहीवेगळे ॥

स्वामीसेवकपणें आनंदले । हर्षेंकरूनि उचंबळले ।
परस्परें गिळोनि ठेले । लोभ आला म्हणोनी ।

ऐसें देवांभक्तांचें साजणें । जीव घेणें जीव देणें ।
पुन्हां मागुतें येणें जाणें । न घडे कदा ॥

नवविधा भक्ति याचि कारणें । जें आपण स्वयें रामचि होणें ।
स्वयेंचि रामपणें ठाकणें । स्वानुभवेंकरूनी ॥

## १४. उत्तम पुरुष

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ।
परंतु वाया दवडणें । हा धर्म नव्हे ॥

तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें ।
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥

उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥

शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।
उणें पडों नेदावें । कोणियेकाचें ॥

आडलें जाकसलें जाणावें । यथानशक्ति कामास यावें ।
मृदवचनें बोलत जावें । कोणीयेकासीं ॥

दुसऱ्याच्या दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणीमात्रांस मेळऊन घ्यावें । बऱ्या शब्दें ॥

बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरीस व्हावें । पारखे जन ॥

दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें ।
लोकांस परीक्षित जावें । नाना प्रकारें ॥

नेमकचि बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें ।
कदापि रागास न यावें । क्षमारूपें ॥

आलस्य अवघाच दवडावा । येत्न उदंडचि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥

उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।
सावधपणें करीत जावा । संसार आपला ॥

मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावें ।
मरोन कीर्तीस उरवावें । येणें प्रकारें ॥

नेमकपणें वर्तो लागला । तो बहुतांस कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काये उणें ॥

ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास ह्मणावें पुरुष ।
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होये ॥

उदंड धिःकारून बोलती । तरी चळो नेदावी शांति ।
दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ॥

उत्तम गुणी श्रृंघारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोचि एक जाणावा भला । भूमंडळीं ॥

स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसीत जावें ।
झिजोन कीर्तीस उरवावें । नानाप्रकारें ॥

कीर्ती पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहता कीर्ती नाहीं ।
विचारेंविण कोठेंचि नाहीं । समाधान ॥

परांतरास न लावावा ढका । कदापि पडों नेदावा चुका ।
क्षमासीळ तयाच्या तुका । हानि नाहीं ॥

आपलें अथवा परावें । कार्य अवघेंच करावें ।
प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥

बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ।
आत्मवत परावें तें । मानीत जावें ॥

कठिण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ।
तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्य ॥

आपणास चिमोटा घेतला । तेणें कासावीस जाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ॥

जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।
आपणास घात करी । कोणियेके प्रसंगीं ॥

पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ।
तरी मग कर्कश बोलावें तें । काय निमित्य ॥

आपल्या पुरुषार्थ-वैभवें । बहुतांस सुखी करावें ।
परंतु कष्टी करावें । हे राक्षेसी क्रिया ॥

जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष महा भला ।
कित्तेक लोक तयाला । शोधीत फिरती ॥

## १५. रामराज्य

कीर्ति या रघुनाथाची  पाहतां तुळणा नसे
येकबाणी येकवचनी  येकपत्नीच धार्मिकु

राज्य या रघुनाथाचें  कळी-काळासी नातुडे
बहु वृष्टी अनावृष्टी  हें कदा न घडे जनीं

उद्वेग पाहातां नाहिं  चिंतामात्र नसे जनीं
व्याधी नाहिं रोग नाहिं  लोक आरोग्य नांदती

युध्य नाहिंच आयोध्या  राग ना मछरू नसे
बंद निर्बंद ही नाहिं  दंड दोष कदा नसे

कुरूपी पाहतां नाहिं  जरा मृत्य असेचिना
आदरु सकळै लोका  सख्यप्रीती परस्परें

बोलणे सत्य न्यायाचें  अन्याय सहसा नसे
अनेक वर्तती काया  येकजीव परस्परें

दरिद्री धुंडिता नाहीं  मूर्ख हा तो असेचिना
परोपकार तो मोठा  सर्वत्र लोकसंग्रहो

अद्भूत पीकती भूमी  वृक्ष देती सदा फळें
अखंड दुभती धेनु  आरोग्यें वाहाती जळें

जळजें स्वापदें पक्षी  नाना जीव भुमंडळीं
आनंदरूप बोभाती  नाना स्वर परस्परें

नद्या सरोवरें बावी  डोलती नूतनें बनें
फळती फुलती झाडें  सुगंध वनवाटिका

उदंड वसती ग्रामें  नगरें पुरें चि पट्टणें
तीर्थें क्षत्रें नाना स्थानें  शिवाल्यें गोपुरें बरीं

मठ मढ्या पर्णशाळा रुसीआश्रम सांजिरे
वेदशास्त्र–धर्मचर्चा स्नान संध्या तपोनिधी

चढता वाढता प्रेमा सुखानंद उचंबळे
संतोष समस्तै लोकां रामराज्य भुमंडळीं

नाना युक्ती नाना बुधी नाना विद्या नाना कळा
नाना संगीतसामर्थ्ये नाना वाद्यें परोपरीं

## १६. राजकारण

ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास ।
तेथें अखंड सावकाश । येकांत सेवावा ॥

जेथें तजवीजा कळती । अखंड चाळणा निघती ।
प्राणीमात्राची स्थिती गती । कळों येते ॥

जरी हा चाळणाचि करीना । तरी कांहींच उमजेना ।
हिसेबझाडाचि पाहीना । दिवाळखोर ॥

येक मिरासी साधिती । येक सीध्या गवाविती ।
व्यापकपणाची स्थिती । ऐसी आहे ॥

जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें ।
कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहजचि येणें ॥

अखंड राहतां सलगी होते । अतिपरिचयैं अवज्ञा घडतें ।
या कारणे विश्रांतीते । घेतां नये ॥

आळसें आळस केला । तरी मग कारबारचि बुडाला ।
अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ॥

उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें ।
अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ॥

चोर भांडारी करावा । घसरतांच सांभाळावा ।
गोवा मूर्खपणाचा काढावा । हळुहळु ॥

या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी ।
राजकारणे मंडळ वेष्टी । चहुंकडे ॥

नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावे ।
आपणावरी विकल्पाचे गोवे । पडोंच नेदी ॥

कांटीने कांटी झाडावी । झाडावी परि ते कळो नेदावी ।
कळकटेपणाची पदवी । असो न द्यावी ॥

न कळतां करी कार्य जें तें । तें काम तत्काळचि होतें ।
गचगचेंत पडतां तें । चमत्कारें नव्हे ॥

ऐकोनी आवडी लागावी । देखोन बळकटचि व्हावी ।
सलगीनें आपली पदवी । सेवकांमध्यें ॥

कोणी एक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें ।
याकारणें ढिलेंपण तें । असोंचि नये ॥

जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥

अवघ्यास अवघें कळलें । तेव्हां तें रितें पडिलें ।
याकारणे ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥

मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें ।
कित्तेक खलक उगवावे । राजकारणामधें ॥

बोलके पहिलवान कळकटे । तयांसीच घ्यावे झटे ।
दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥

ग्रामण्य वर्मीं सांपडावें । रगडून पीठचि करावें ।
करूनि मागुती सावरावें । बुडऊं नये ॥

खळदुर्जनासी भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें ।
तेणे अवघें प्रगट जालें । बरें वाईट ॥

समुदाव पाहिजे मोठा । तरी तनावा असाव्या बळकटा ।
मठ करुनी ताठा । धरूं नये ॥

दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनापरीस आळवावे । महत्व देउनी ॥

जनामधें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ।
याकारणे ते वाट । बुझून टाकावी ॥

गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरिती भुजा ।
ऐसा पाहिजे कीं राजा । कैपक्षी परमार्थीं ॥

तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे ।
बंड पाषांडाचे वाखे । सहजचि होती ॥

हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥

कोठेंच पडेना दृष्टी । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी ।
वाग्विळासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें ॥

हुंब्यास हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥

घटासी आणावा घट । उत्धटासी पाहिजे उत्धट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥

जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मजालसी थाटे ।
इतुकें होतें परी धणी कोठें । दृष्टीस न पडे ॥

## १७. राजधर्म

नमो मंगळमूर्ति विघ्नहरु । सरस्वतीस नमस्कारु ।
सद्‌गुरु संत कुलेश्वरु । दाशरथी ॥

श्रोतीं मानेल तरी घ्यावें । अथवा दाटूनि सांडावें ।
प्रपंचकारणें स्वभावें । बोलिलों मी ॥

सावधपणें प्रपंच केला । तेणें सुखचि पावला ।
दीर्घ प्रयत्नें मांडला । कार्यभाग साधे ॥

आधी मनुष्य ओळखावें । योग्य पाहून काम सांगावें ।
निकामी तरी ठेवावें । एकीकडे ॥

पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि न ये उणे ।
कार्यकर्त्याच्या गुणें । कार्यभाग होतो ॥

कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहीं एक असला हेकाड ।
तरी समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ॥

अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संव्हार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥

मनुष्य राजी राखणे । हींचि भाग्याचीं लक्षणें ।
कठिणपणें दुरी धरणें । कांहीं एक ॥

समयीं मनुष्य कामा येते । तयाकारण सोशिजे तें ।
न्याय सांडितां मग तें । सहजचि खोटे ॥

न्यायसीमा उल्लंघूं नये । उल्लंघिता होतो अपाय ।
न्याय नसतां उपाय । होईल कैचा ॥

उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासून चेवला ।
समयीं धीर सांडिला । तोही खोटा ॥

संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाये ।
तरी मग पाहता काये । उणे आहे ॥

बंध बांधावे नेटके । जेणे करिता चतुर तुके ।
ताव न होतां फिके । कारभार होती ॥

धुरेनें युद्धासी जाणें । अशीं नव्हेत कीं राजकारणें ।
धुराच करोनि सोडणें । कित्येक लोक ॥

उदंड मुंडें असावीं । सर्वही एक न करावीं ।
वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥

मोहरा पेटला अभिमाना । मग तो जिवास पाहेना ।
मोहरे मिळवूनि नाना । वरी चपेटे करी ॥

देखोनि व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती बारा वाटा ।
मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ॥

रायांनीं करावे राजधर्म । क्षत्रीं करावे क्षात्रधर्म ।
ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नाना प्रकारें ॥

तुरंग शस्त्र आणि स्वार । पहिला पाहावा विचार ।
निवटूं जातां थोर थोर । शत्रु पळती ॥

ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलो कांहीं एक ।
एका मनोगतें स्वामी सेवक । असतां बरें ।

## १८. क्षात्रधर्म

अल्पस्वल्प संसारधर्म । मागा बोलिलों राजधर्म ।
आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो ॥

जयास जिवाचें वाटे भये । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ।
कांहीं तरी करूनि उपाये । पोट भरावें ॥

विन्मुख मरणीं नर्क होती । वाचून येतां मोठी फजिती ।
इहलोक परलोक जाती । पहाना कां ॥

मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥

नजर करारी राखणे । कार्य पाहुनि खतल करणे ।
तेणे रणशूरांची अंतःकरणें । चकित होतीं ॥

जैसा भांड्यांचा गलोला । निर्भय भारामध्यें पडिला ।
तैसा क्षत्री रिचवला । परसैन्यामध्यें ॥

निःशंकपणें भार फुटती । परवीरांचे तवके तुटती ।
जैसा बळिया घालुनि घेती । भेरी उठतां ॥

ऐसे अवघेच उठतां । परदळाची कोण चिंता ।
हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा ॥

मर्दे तकवा सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय ।
कार्य प्रसंग समय । ओळखावा ॥

कार्य समजेना अंतरें । तें काय झुंजेल बिचारें ।
युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखतां ॥

दोन्ही दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें ।
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडुनी ॥

देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥

मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥

मरणहाक तो चुकेना । देह वांचवितां वांचेना ।
विवेक होऊनि समजाना । काय करावें ॥

भले कुळवंत म्हणावें । तेंहीं वेगीं हजीर व्हावें ।
हजीर न होतां कष्टावें । लागेल पुढें ॥

एक जाती दोन जाती पावला । तो कैसा म्हणावा भला ।
तुम्हां सकळांस कोप आला । तरी क्षमा केली पाहिजे ॥

देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ॥

देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुखबडवा कां बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥

विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ।
तुळजावराचेनि गुणें । रामें रावण मारिला ॥

अहो हे तुळजाभवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी ।
रामदास ध्यातो मनीं । यन्निमित्त ॥

* * *

## १९. शिव कल्याण राजा

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु ।
अखंड-स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योग ॥

परोपकाराचिया रासी । उदंड घडती जयासी ।
तया गुणा महत्वासी । तुळणा कैची ? ॥

नरपति हयेपति गजपति । गडपति भूपति जळपति ।
पुरंदर आणि आदिशक्ति । पुष्टीभागीं ॥

येशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥

आचारसीळ विचारसीळ । दानसीळ धर्मसीळ ।
सर्वज्ञपणें सुसीळ । सकळां ठाईं ॥

धीर उदार आणि सुंदर । शूर क्रियेसी तत्पर ।
सर्वज्ञपणें नृपवर । तुछ केले ॥

तीर्थें क्षेत्रें तें मोडिलीं । ब्राह्मणें स्थानभ्रष्ट जालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥

देव धर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥

शूर पंडित पुराणिक । कवेश्वर वैदिक याज्ञिक ।
धूर्त तार्किक सभानायेक । तुमच्या ठाईं ॥

या भूमंडळाचे ठाईं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
मऱ्हाष्टधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥

आणीक ही धर्मकृत्यें चालती । आश्रित होउनी कितेक असती ।
धन्य धन्य तुमची कीर्ती । विश्वीं विस्तारली ॥

कितेक दुष्ट संव्हारिला । कितेकांसी धाक सुटला ।
कितेकांसी आश्रयो जाला । शिव कल्याण राजा ॥

तुमचे देसीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
रुणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणों ॥

सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तयांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥

राजकारण उदंड तटलें । तेणें चीत विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केलें पाहिजे ॥

## २०. सावधता

कोणाचा भरंवसा न धरावा । आपुला आपण विचार पहावा ।
तकवा उदंड धरावा । हाही एक विषयीं ॥

देहदुःखें कदरों नये । उदंडचि करावे उपाय ।
मग सर्व सुखासी काय । उणें आहे ॥

एकांती चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।
नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ॥

प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये ।
सुचावे नाना उपाय । अनेक विषयी ॥

धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये ।
उद्योगरहित कामा नये । पशू जैसे ॥

उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस आला ।
म्हणजे जाणावा चेवला । बुद्धीपासूनी ॥

खबरदारी आणी वेगीं । तेणें सामर्थ्य चढे अंगीं ।
नानाप्रसंगीं कार्यभागीं । अंतरचि न पडे ॥

कार्यकर्ते दूरी करावे । प्रसंगें सर्वेचि हातीं धरावे ।
परंतु शोधोनि पाहावे । कपटविषयीं ॥

जेथें बहु विचार । तेथें ईश्वरअवतार ।
मागें जाले थोर थोर । धके चपेट सोसोनी ॥

आपल्या मनासी रोधावें । परांतर शोधावें ।
क्षणक्षणां सांभाळावें । बदलेल म्हणुनी ॥

पाहिलेंचि पाहावें । केलेंचि करावें ।
शोधिलेंचि शोधावें । राज्यकारण ॥

इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ।
लिहावयाचें सांगू नये । जबाबीनें ॥

## २१. संभाजीस पत्र

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें ।
तजवीजा करीत बैसावें । येकांत स्थळीं ॥

कांहीं उग्र स्थिति सांडावी । कांहीं सौम्यता धरावी ।
चिंता लागावी परावी । अंतर्यामीं ॥

मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ।
सुखी करूनि धाडावे । कामावरी ॥

पाटवणी तुंब निघेना । तरी मग पाणीच चालेना ।
तैसें जनाच्या मना । कळलें पाहिजे ॥

जनाचा प्रवाहो चालिला । म्हणिजे कार्यभाग आटोपला ।
जन ठाईं ठाईं तुंबला । म्हणिजे खोटें ॥

श्रेष्ठीं जें जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बसलें ।
तरी मग जाणावें फावले । गनीमासी ।

ऐसें सहसा करूं नये । दोघां भांडण तिसऱ्या जय ।
धीर धरून महत्कार्य । समजोन करावें ॥

आरंभींच पडिली धास्ती । म्हणिजे कार्यभाग होय नास्ती ।
याकारणें समस्ती । बुधी शोधावी ॥

राजी राखितां जग । मग कार्यची लगबग ।
ऐसें जाणोनि सांग । समाधानें करावी ॥

सकळ लोक येक करावे । गनीम लाटून काढावे ।
येणें करितां कीर्ति धांवे । दिगंतरीं ॥

आधीं गाजवावे तडाखे । तरी मग भूमंडळी धाके ।
ऐसें न होता धके । राज्यासी होती ॥

समय प्रसंग ओळखावा । राग निपट न संडावा ।
आला तरी कळों नेदावा । जनामध्यें ॥

राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देउनी करावे शोक ।
लोकांच्या मनामध्यें धाक । उपजों चि नये ॥

बहुत लोक मेळवावे । लोक विचारें भरावे ।
कष्ट करूनि घसरावे । म्लेंचराजे ॥

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणीक मिळवावें ।
मऱ्हाष्टराज्यचि करावें । जिकडे तिकडे ॥

लोकीं हि हीमती धरावी । शर्तीची तरवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥

शिवराजासी आठवावें । जीवित्व तृणसमान मानावें ।
येहलोक परलोकीं तरावें । कीर्तिरूपें ॥

शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप ।
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥

शिवराजाचें कैसें चालणें । शिवराजाचें कैसें बोलणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैसी आहे ॥

सकळ सुखाचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्य साधावया लगबग । तैसी करावी ।

त्याहून करावें विशेष । तरी च म्हणावें पुरुष ।
याउपरी आतां विशेष । काय ल्याहावें ॥

* * *

## २२. शुद्धाशुद्धविवेक

पालेमाळा सुमनमाला । फळमाळा बीजमाळा ।
पाषाणमाळा कवडेमाळा । सूत्रें चालती ॥

स्फटिकमाळा मोहरेमाळा । काष्ठमाळा गंधमाळा ।
धातुमाळा रत्नमाळा । जाळ्या वोलि चांदोवे ॥

परी हें तंतूनें चालतें । तंतु नस्तां विष्कळित होतें ।
तैसें ह्मणों आत्मयातें । तरी साहित्य न पडे ॥

तंतूस मणी वोविला । तंतू मध्येंचि राहिला ।
आत्मा सर्वांगीं व्यापला । पाहाना कां ॥

आत्मा चपळ सहज गुणें । दोरी काये चळों जाणे ।
म्हणौन दृष्टांत देणें । साहित्य न घडे ॥

नाना वल्लींत जळांश । उसांमध्यें दाटला रस ।
परी तो रस आणी बाकस । येक नव्हे ।

देही आत्मा देह अनात्मा । त्याहून पर तो परमात्मा ।
निरंजनास उपमा । असेचिना ॥

रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्यांचिया हारी ।
सगट समान सरी । कैसी करावी ॥

देव दानव मानव । नीच योनी हीन जीव ।
पापी सुकृति अभिप्राव । उदंड आहे ॥

येकांशें जग चाले । परी सामर्थ्य वेगळालें ।
येकासंगें मुक्त केलें । येकासंगें रवरव ॥

साकर माती पृथ्वी होये । परी ते माती खातां नये ।
गरळ आप नव्हे काये । परी तें खोटें ॥

पुण्यात्मा आणी पापात्मा । दोहींकडे अंतरात्मा ।
साधु भोंदु सीमा । सांडूच नये ॥

अंतर येक तों खरें । परी सांगातें घेऊं न येती माहारें ।
पंडित आणि चाटें पोरें । येक कैसीं ॥

मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडें ।
राजे आणि माकडें । येक कैसीं ॥

भागीरथीचें जळ आप । मोरी संवदणी तेंहि आप ।
कुश्चिळ उदक अल्प । सेववेना ॥

याकारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध ।
वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥

शूरांहून मानिलें लंडी । तरी युद्धप्रसंगीं नरकाडी ।
श्रीमंत सांडून बराडी । सेवितां कैसें ॥

येका उदकें सकळ जालें । परी पाहोन पाहिजे सेविलें ।
सगट अवघेंच घेतलें । तरी तें मूर्खपण ॥

जीवनाचेंच जालें अन्न । अन्नाचें जालें वमन ।
परी वमनाचें भोजन । करितां न ये ।

तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदईं धरावें ।
सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥

उत्तमासि उत्तम माने । कनिष्ठांस तें न माने ।
म्हणौन करंटे देवानें । करून ठेविले !

सांडा अवघें करंटपण । धरावें उत्तम लक्षण ।
हरिकथापुराणश्रवण । नीतिन्याये ॥

वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक ।
हळुहळु पुण्यश्लोक । करीत जावे ॥

मुळाचे चालीनें चालावें । मुळाच्या मनोगतें बोलावें ।
तैसें जनासी सिकवावें । हळुहळु ॥

मुख्य मनोगत राखणें । हेंचि चातुर्याचीं लक्षणें ।
चतुर तो चतुरांग जाणे । इतर तीं वेडीं ॥

वेड्यास वेडें ह्मणों नये । वर्म कदापि बोलों नये ।
तरीच घडे दिग्विजये । निस्पृहासी ॥

उदंड स्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें येथासांग ।
प्राणिमात्रांचा अंतरंग । होऊन जावें ॥

मनोगत राखोन जातां । परस्परें होये अवस्ता ।
मनोगत तोडितां वेवस्ता । बरी नाहीं ॥

याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ।
मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ॥

२३. भेदाभेद

जनीं जनार्दन आहे   परंतु सज्जनीं वसे
जना आणी सज्जनाला   येकची करितां नये

जगामधें जगदात्मा   स्वामी सेवक वर्तवी
स्वामी सुखासनामधें   सेवकें वाहाती सदा

आदीक धारणा जेथें   नित्यानित्य विचारणा
तो स्वामी उधरी बधा   बधें बध सुटेचिना

वैद्य तो वाचवी रोग्या   रोग्या रोगी न वांचवी
तारकु बुडत्या तारी   बुडते तारकु नव्हे

ज्ञातया ज्ञान मागावें   अज्ञाना मागतां नये
सभाग्या सेवितां भाग्य   अभाग्या सेवितां नये

मोक्ष देतो प्रचीतीनें   तयासी तुळणा नसे
मुख्य तो सद्गुरु जाणा   यातना चुकवी जनीं

जो वंद्य सर्व ही लोका   तयासी वंदितां बरें
निंद्य तें वंदितां खोटें   समान करिती मुढें

देव दैत्य भले पाहीं   संतासंत भुमंडळीं
अमृत विष हें एक   कदापी मानितां नये

भेदाभेदक्रिया देहीं   लागली हे सुटेचिना
जेथील विषयो तेथें   विपरीत करितां नये

मुखेची सेवितां आन्नें   आपानीं घालितां नये
अन्याय करिती तैसा   समान मानिती जनीं

विंचु सर्प दुखदाता   अंतरात्माच वर्तवी
परंतु हीत तें घ्यावें   समान वर्ततां नये

त्यागात्यागें देहे चाले   समान करितां पडे
अभागी उमजेना तो   पाषांडी राक्षसी क्रिया

समान देखणें आत्मा   समान करणें दया
वंद्य निंद्य विचारावें   हे मुख्य जाणती कळा

यातीभ्रष्ट क्रियाभ्रष्ट   सर्वभ्रष्ट अनर्गळु
पाहतां पातकी दोषी   तो संग नर्क भोगवी

खरें खोटें समानत्वें   मानिती लोक ते कसे
गर्भांध वर्तती जैसे   तैसे ते आत्मघातकी

## २४. राजी राखावें सकळ

( सवाई )

भेटो कोणी येक नर   धेड माहार चांभार
        त्याचें राखावें अंतर   याचें नांव भजन

दुःख नेदावें कोणाला   उंच नीच जरी जाला
        अंतरात्मा वोळखिला   तो चि जाणा सज्जन

मिळाला तो भक्त जाला   दोष मिळेना तयाला
        देव प्रतक्ष कोपला   अहंभाव दुर्जन

राजी राखावे सकळ   बरेंपण सर्व काळ
        नित्य आनंदाची वेळ   काळ करी वंदन

* * *

## २५. जन बुडाले बुडाले !

जन बुडाले बुडाले । पोटेवीण गेले
बहुत कष्टले कष्टले । कितीयेक मेले
त्रिसा लोकांत लोकांत । येकचि राहिले
तेणें उदंड उदंड । दुःखचि साहिले

देश नासला नासला । उठे तोचि कुटी
पिकें होताचि होताचि । होते लुटालुटी
पीळ पेचाचा पेचाचा । प्रसंग पडतो
लोक उद्भवेना उद्भवेना । अवघाचि दडतो

पाऊस पडतो पडतो । उदंड पडतो
नाहींतर उघडतो उघडतो । अवघाचि उघडतो
धान्य महाग महाग । तैसेंहि मिळेना
कैसें होईल होईल । होईल कळेना

कांहीं मिळेना मिळेना । मिळेना खायाला
ठाव नाहीं रे नाहीं रे । नाहीं रे जायाला
हौस कैची रे कैची रे । कैची रे गायाला
कोठे जावें रे जावें रे । जावें मागायाला

काळाकरिता जिवलगां । आली तातातुटी
अवघ्या कुटुंबा कुटुंबा । होते फुटाफुटी
काय होणार होणार । होणार कळेना
पुण्य गेलें रे गेलें रे । कांहींच फळेना

उदंड चाकरी चाकरी । मिळेना भाकरी
लोक निलंड निलंड । काढोनी नेती पोरी
न्याय बुडाला बुडाला । जाहली शिरजोरी
पैक्या कारणें कारणें । होते मारामारीं

एक पळाले पळाले । दूर देशा गेले
बहुत कष्टले कष्टले । तेथें नागवले
फिरोनी आले रे आले रे । घरींचे लोक मेले
कोठे उपाय दिसेना । कासावीस झालें

कोणी वाचला वाचला । मध्येची मारिला
येतो एकाकी एकाकी । अकस्मात घाला

सुडकें पटकर पटकर । मिळेना पांघराया
शक्ती नाही रे नाही रे । खोपट कराया
वाट फुटेना फुटेना । विदेशी भराया
अवघी बैसलों बैसलों । बैसलों मराया

नदी भरता भरता । घालुनीया घेती
विख घेऊनी घेऊनी । उदंड मरती
अग्नी लावोनी लावोनी । जळोनिया जाती
पोटीं फजिती फजिती । सांगावी ती किती

दास म्हणे रे भगवंता । किती पाहसी सत्त्व
काय वाचुनी वाचुनी । नुपरते जीवित्त्व ( विषयासक्त )
किती धरावें धरावें । धरावें ममत्त्व
जाली शरीरें शरीरें । शरीरें निःसत्त्व

## २६. तुळजा कुळदेवता

प्रपंचीं आमचे कुळीं   तुळजा कुळदेवता
नेणतां ऐकिलें होतें   जाणतां स्मरलें मनीं

श्रेष्ठांची कामना होती   पुर्विली मनकामना
नौस जो नौसिला होता   तो त्यापासुनी चुकला

पुत्रची घेतला त्याचा   जोगी करुनि सोडिला
ख्यानति दाविली मोठी   न्यायनीति चुकेचिना

वैराग्य घेतलें पोटीं   सर्व संसार सांडिला
तुझिया दर्शना आलों   कृपादृष्टी नवाजीलों

तुझा नवाजीला आहे   महंत म्हणती जनीं
तुझेचि सर्वही देणें   सर्वही तुजपासुनि

संसारीं मोकळें केलें   आनंदी ठाव दिधला
तोडिली सर्वही चिंता   तूं माया सत्य जाहलें

पुर्विले काय मी सांगों   इच्छा पूर्ण परोपरीं
मागील आठवेनासें   केलें आश्चीर्य वाटलें !

सदानंदी उदो जाला   सुख संतोष फावला
पराधीनता गेली   सत्ता उदंड चालिली

उदंड ऐकिलें होतें   रामासी वरु दीधला
मी दास रघुनाथाचा   मजही वरदायेनी

श्रेष्ठांचा नौस जो होता   तो मी फेडीनसें म्हणें
पुष्प देउनि उतराई   ऐसें हें कल्पिलें मनीं

तुळजापुर ठाकेना   चालिली पश्चिमेकडे
पारघाटीं जगन्माता   सद्य येउनी राहिली

ऐसें हें ऐकिलें होतें   हेत तेथेंचि पावला
पुष्पाची कल्पना होती   तेथें पुष्पचि दिधलें

ऐसी तूं दयाळु माता   हेमपुष्पचि घेतलें
संतुष्ट भक्तिभावानें   त्रैलोक्यजननी पाहा

थोड्यानें श्लाघ्यता केली   थोर संतोष पावलों
उत्तीर्ण काय म्यां व्हावें   तुझे कृपेसी रोकडें

तुझेचि तुजला दिल्हें   म्यां हे कोठूनि आणिलें
संकटें वारिलीं नाना   रक्षिलें बहुतांपरी

जीवीचें जाणते माता   तूं माता मज रोकडी
लोकांच्या चुकती माता   अचुक जननी मला

येकची मागणें आतां   द्यावें तें मजकारणें
तुझा तूं वाढवी राजा   सीघ्र आह्मांचि देखतां !

दुष्ट संव्हारिलें मागें ऐसें उदंड ऐकतों
परंतु रोकडें कांहीं मूळ सामर्थ्य दाखवी !

देवांचीं राहिलीं सत्त्वें तूं सत्व पाहसी किती
भक्तांसी वाढवीं वेगीं इच्छा पूर्ण परोपरीं

रामदास म्हणे माझें सर्व आतुर बोलणें
क्षमावें तुळजे माते इच्छा पूर्णचि ते करी

## २७. माता आणि तुळजामाता

बाळका वाढवी माता जेथें तेथें परोपरीं
स्वभावें जीविचें जाणें अंतरीं विवरे सदा

बाळका बोलतां येना हीत तेंही कळेचिना
हेकांड बावळें वेडें मातेला प्रिय होत असे

अन्याई अवगुणी खोडी कुश्चिळ रडतें सदा
अंतरथें माय लोभाळू लोभें गुणांसी वाढवी

नागिवें उघडें लोळे हागे वोकी आव्हासव्हा
तैशास नेटकें दावी लेववी नेसवी सदा

मातेचा कळवळा मोठा लोभासी तुळणा नसे
आळसेना विसंभेना कंटाळेना कदापीही

त्रैलोक्य बाळका पाळी वाढवी शाहाणें करी
कुळेंची पाळिलीं कीती कुळदेव्या म्हणोनियां

त्रैलोक्यीं पुरली आहे त्रैलोक्यजननी पहा
तेचि हे तुळजामाता भक्तांसी पाळिते सदा

वोळखी सांडिली बाळें तिला तों सांडिता नये
लोभेंचि पाळणें लागे नानादेहीं भरोनियां

मात्रकुळ पित्रकुळ सर्वासी पाळिते सदा
आद्यंत ठाउकें आहे कुळमूळाग्र सर्वेही

उपजली वाढली कोठें  हिंडलीं फिरलीं किती
भाग्याचे करंटे जाले  मूर्ख व्युत्पन्न सर्वही

विश्वाची साक्षणी माता  विश्वमाता म्हणोनियां
श्रीमंत करंटे तीनें  रक्षिले पाळिले किती

तिचा लो लागला आहे  त्रैलोक्य सकळै जना
तीवीण विषयो कैचा  जगजोती चहूंकडे

जीणें ती लागलें आहे  ज्ञाते हो समजा बरें
शक्तीनें चालतो देहो  शक्ती नसतां देहे पडे

शक्ती ते सर्व शक्ती ते  आदिशक्ती पुरातना
दासासी पाळते लीळा  ध्यानमूर्ति ठसावली

## २८. वात्सल्य

बाळक जाणेना मातेसी । तिचें मन तयापासी
तैसा देव हा दयाळ । करी भक्तांचा सांभाळ

धेनु वत्साचेनि लागे । धावे त्याच्या मागें मागें
पक्षी घेतसे गगन । पिल्यांपासी त्याचें मन

मत्स्य आठवीता पाळी । कूर्म दृष्टीनें सांभाळी
रामी रामदास म्हणे । मायाजाळाचीं लक्षणें

## २९. येथें उभा कां श्रीरामा ?

येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा
काय केली सीताबाई । येथें राही रखुमाई

काय केली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी
काय केली शरयू गंगा । येथें आणिली चंद्रभागा

चाप बाण काय केले । कर कटावरी ठेविले
काय केलें वानरदळ । येथें मिळविले गोपाळ

हो कां धरिला अबोला । दिसे वेष पालटिला
रामीरामदास–भाव । तैसा होय पंढरीराव

## ३०. आनंदवनभुवनीं

जन्मदुःखें जरादुःखें   नित्य दुःखे पुन्हपुन्हा
संसार त्यागणें जाणें   आनंदवनभुवना

वेधलें चीत्त जाणावें   रामवेधीं निरंतरीं
रागें हो वीतरागें हो   आनंदवनभुवना

संसार वोढितां दुखें   ज्याचें त्यासीच ठाउकें
परंतु येकदां जावें   आनंदवनभुवना

न सोसे दुःख तें होतें   दुःख शोक परोपरीं
येकाकी येकदा जावें   आनंदवनभुवना

कष्टलों कष्टलों देवा   पुरे संसार जाहाला
देहेत्यागासी येणें हो   आनंदवनभुवना

जन्म ते सोसिले मोठे   आपाय बहुतांपरीं
उपायें धाडिलें देवें   आनंदवनभुवना

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं   तें तें तैसेंची होतसे
हिंडतां फिरतां गेलों   आनंदवनभुवना

हे साक्ष देखिली दृष्टी   किती कल्लोळ उठीले
विघ्नघ्ना प्रार्थिलें गेलों   आनंदवनभुवना

स्वधर्माआड जें विघ्नें   तें तें सर्वत्र उठीलीं
लाटिलीं कुटिलीं देवें   दापिलीं कापिलीं बहु

विघ्नाच्या उठील्या फौजा   भीम त्यावरी लोटला
घर्डिलीं चिर्डिलीं रागें   रडविलीं बडविलीं बळें

हाकिलीं टाकिलीं तेणें   आनंदवनभुवनीं
हांक बोंब बहु जाली   पुढें खतल्ल मांडिलें

खौळले लोक देवाचे   मुख्य देव ची उठीला
कळेना काय रे होतें   आनंदवनभूवनीं

स्वर्गींची लोटली जेथें   रामगंगा माहां नदी
तीर्थासी तुळणा नाहिं   आनंदवनभुवनीं

ग्रंथीं जे वर्णिली मागें   गुप्तगंगा माहां नदी
जळांत रोकडें प्राणी   आनंदवनभुवनीं

सकळ देवांची साक्षी   गुप्त उदंड भूवनें
सौख्य चि पात्रणें जाणें   आनंदवनभुवना

त्रैलोक्य चालिलें तेथें   देव गंधर्व मानवी
ऋषी मुनी माहां योगी   आनंदवनभुवनीं

त्रैलोक्य चालिल्या फौजा   सौख्य बंदविमोचनें
मोहीम मांडली मोठी   आनंदवनभुवनीं

सुरेश उठिला आंगें   सुरसेना परोपरीं
चिकटें कर्कशें यानें   शस्त्रपाणी माहां बळी

देव देव बहु देव   नाना देव परोपरीं
दाटणी जाहाली मोठी   आनंदवनभुवनीं

दिग्पती चालिले सर्वे   नाना सेना परोपरी
वेष्टीत चालिले सकळें   आनंदवनभूवनीं

मंगळें वाजती वाद्यें   माहांगणासमागमें
आरंभीं चालिला पुढें   आनंदवनभुवनीं

राशभें राखिली मागें   तेणें रागेंची चालिला
सर्वत्र पाठीसी फौजा   आनंदवनभुवनीं

आनेक वाजती वाद्यें   ध्वनीकल्लोळ उठीला
छेबीने डोलती ढाला   आनंदवनभूवनीं

विजई दीस जो आहे   ते दीसीं सर्व उठती
आनर्थ मांडला मोठा   आनंदवनभूवनीं

देवची तुष्टला होता   त्याचे भक्तीस भुलला
मागुता क्षोभला दुःखें   आनंदवनभूवनीं

कल्पांत मांडला मोठा  म्लेंचदैत्य बुडावया
कैपक्ष घेतला देवीं  आनंदवनभूवनीं

बुडाले सर्व ही पापी  हिंदुस्थान बळावलें
अभक्तांचा क्षयो जाला  आनंदवनभुवनीं

पूर्वी जे मारिले होते  ते ची आतां बळावलें
कोपला देव देवांचा  आनंदवनभुवनीं

त्रैलोक्य गांजिलें मागें  ठाउकें विवेकीं जना
कैपक्ष घेतला रामें  आनंदवनभुवनीं

भीम ची धाडिला देवें  वैभवें धांव घेतली
लांगूळ चालिलें पुढें  आनंदवनभुवनीं

येथून वाढला धर्मु  रमाधर्म समागमें
संतोष मांडला मोठा  आनंदवनभुवनीं

बुडाला औरंग्या पापी  म्लेंचसंव्हार जाहाला
मोडलीं मांडलीं छेत्रें  आनंदवनभुवनीं

बुडाले भेदवाही ते  नष्ट चांडाळ पातकी
ताडिले पाडिले देवें  आनंदवनभूवनीं

गळाले पळाले मेले  जाले देशधडी पुढें
निर्मळ जाहाली पृथ्वी  आनंदवनभुवनीं

उदंड जाहालें पाणी  स्नानसंध्या करावया
जप तप अनुष्ठानें  आनंदवनभुवनीं

नाना तपें पुन्हश्चर्णे  नाना धर्म परोपरीं
गाजली भक्ती हे मोठी  आनंदवनभुवनीं

लीहीला प्रत्ययो आला  मोठा आनंद जाहाला
चढता वाढता प्रेमा  आनंदवनभुवनीं

बंड पाषांड उडालें  शुध आध्यात्म वाढलें
राम कर्ता राम भोक्ता  आनंदवनभुवनीं

देवालयें दीपमाळा  रंगमाळा बहुविधा
पुजीला देव देवांचा  आनंदवनभुवनीं

रामवरदायनी माता  गर्द घेउनी उठीली
मर्दिले पुर्वीचे पापी  आनंदवनभुवनीं

प्रतेक्ष चालिली राया  मूळमाया समागमें
नष्ट चांडाळ ते खाया  आनंदवनभुवनीं

भक्तांसी रक्षिलें मागें  आतां ही रक्षिते पाहा
भक्तांसी दीधलें सर्वै  आनंदवनभुवनीं

आरोग्य जाहाली काया  वैभवें सांडिली सीमा
सार सर्वस्व देवाचें  आनंदवनभुवनीं

देव सर्वस्व भक्तांचा  देव भक्त दुजें नसे
संदेह तुटला मोठा  आनंदवनभुवनीं

देव भक्त येक जाले  मिळाले जीव सर्वहि
संतोष पावले तेथें  आनंदवनभूवनीं

सामर्थ्यें येशकीर्तीचीं  प्रतापें सांडिली सीमा
ब्रीदेंची दिधलीं सर्वै  आनंदवनभुवनीं

राम कर्ता राम भोक्ता  रामराज्य भुमंडळीं
सर्वस्व मीच देवाचा  माझा देव कसा म्हणों

हेची शोधूनी पाहावे  राहावे निश्चळीं सदा
सार्थक श्रवणें होतें  आनंदवनभुवनीं

वेद शास्त्र धर्मचर्चा  पुराणे माहात्में किती
कवित्वें नूतनें जीर्णें  आनंदवनभुवनीं

गीत संगीत सामर्थ्यें  वाद्यकल्लोळ उठीला
मिळालें सर्व आर्थार्थी  आनंदवनभूवनीं

वेद तो मंद जाणावा  सीद्ध आनंदभूवनीं
आतुळ महिमा तेथें  आनंदवनभुवनीं

मनासी प्रचीत आली   शब्दीं विश्वास वाटला
कामना पुरती सर्वै   आनंदवनभुवनीं

येथुनी वांचती सर्वै   ते ते सर्वत्र देखती
सामर्थ्य काये बोलावें   आनंदवनभुवनीं

उदंड ठेविलीं नामें   आपस्तुतीच मांडिली
ऐसें हें बोलणें नाहिं   आनंदवनभुवनीं

बोलणें वाउगें होतें   चालणें पाहिजे बरें
पुढें घडेल तें खरें   आनंदवनभूवनीं

स्मरलें लिहिलें आहे   बोलता चालता हरी
काये होईल पाहावें   आनंदवनभुवनीं

महिमा तो वर्णवेना   विशेष बहुतांपरीं
विद्यापीठ तें आहे   आनंदवनभुवनीं

सर्वसद्या कळा विद्या   न भूतो न भविष्यति
वैराग्य जाहालें सर्वै   आनंदवनभुवनीं

## ३१. समस्तें पावले धका

श्रीकृष्ण देव नाटकु   जनांत सींतरु ठकु
तयास बैसला धका   मनुष्य नेति गोपिका

भुपाळ ही भलेभले   जनीं उदंड जाहाले
हरास काळ सेवटीं   विसंचिता लुटालुटी

सभाग्य रावणादिकां   बहु कठीण काळ का
महीवरी परोपरीं   उदंड हे भरोवरी

भरे सर्वेचि मागुतें   उगेचि होतसे रितें
कदापि नावरें जना   बरी करा विवंचना

नदी भरोन वोहरे   तळें भरोन तें फुटे
तयापरीच संपदा   जनीं न निश्चळे कदा

बहुत भोगिती जयें   भले न पाहाती तये
ठकी ठकून जातसे   सुरंग भंग होतसे

बहुत चाखती चवी   सुरेंद्र दैत्य मानवी
म्हणे कवी नका नका   समस्त पावले धका

### ३२. घडेल तें सुखें घडो

रुणानुबंद तों घडे   पुढें समस्त वीघडे
पशु मनुष्य संपदा   घडोन वीघडे सदा

भरोंच लागतां भरे   भरे कदापि नावरे
सवेंचि वोसरे सरे   सरेंचि तें कदा नुरे

बरीच वेळ लागतां   घडोन ये न भागतां
उगाच काळ विषमु   पराक्रमुच तो श्रमु

बराचि काळ तो बरा   न मागतांचि ये घरा
बळेंचि लोक बोलती   सुखें सुखी कल्लोळती

उदास राहता गती   भले विवेक सांगती
घडेल तें सुखें घडो   पडेल तें सुखें पडो

### ३३. फुकट कां मरावें

श्रीगुरुचे चरणकंज हृदयीं स्मरावे ।। धृ. ।।

निगम निखिल साधारण
सुलभाहुनि सुलभ बहू
इतर योगयाग विषमपंथिं का शिरावें ।।

नरतनु-दृढ-नावेसी
बुडवुनि अति मुढपणें
दुष्ट नष्ट कुकर सूकर-तनु कां फिरावें ।।

रामदास विनवी तुज
अझुनि तरी समज उमज
विषय-वीष पीउनिया फुकट कां मरावें।।

## ३४. स्फुट श्लोक

असे अर्थ तें सार्थकें धन्य होतें
नसे अर्थ तें बोलणें वेर्थ जाते
कणेंवीण काबाड ते वेर्थ जाणा
बरें शोधितां ही नसे येक दाणा १

निंदूनि सिंधु बुडसी तलाथीं
तजूनि सोनें धरिसील माती
ऐसा प्रपंचीं भुललासि कामा
सांडूनि रामा फिरसीं रिकामा २

खळाळासवें हुंबरी घालवेना
निगुऱ्यासवें बोलतां पुरवेना
खुणा दावितां चक्षुहीना कळेना
बळें लावितां सत्य पंथीं मिळेना ३

मिथ्याभासें अंतरी धाक सुटे
धाकें धाकें सर्वदां प्राण फुटे
स्वप्नाकारें भेदरें वोसणातो
जागा होतां धाक सांडून जातो ४

न चालतां पाउल तीर्थ जोडे
जे जोडतां कैकट सर्व मोडे
ज्या दर्शनें आपण देव व्हावें
संतीं सदा सेउनियां राहावें. ५

लोकामधें लोकलाजेसि भ्यावें
नाना देसीं दंडकें आचरावें
कोण्ही येकें मूळ शोधूं नये हो
मिथ्या वादें लाविला धाक पाहो ६

वसे न्याय तेथें भल्यानें असावें
नसे न्याय तेथे कदा ही नसावें
प्रमाणोत्तरें चीत्त तें ही न घाली
तया पापरूप्यासि कां रांड व्याली ७

भरे वोसरे ते रमा काळयोगें
अकस्मात सामर्थ्यें जाते प्रसंगें
बहु तोलदारी पुढें तो भिकारी
कळेना कसा काळ नाना विकारी ८

सदा मागता दास देवा न साहे
न मागे तयाची रमा दासि होये
असें आस तो दास जीला जगाचा
नसें आस तो ईशु ब्रह्मादिकांचा ९

जया यत्न फावेल तेणें करावा
मोहोछाव या राघवाचा भरावा
माहां येत्न देखोनियां काळ धाके
प्रतापें बळें गाजवावे तडाखे १०

रघूनायेका सारिखा स्वामिदाता
असोनी सिरीं वाहसी वेर्थ चिंता
नको विसरों राघवा भूजकांता
नुपेक्षी नुपेक्षी कदा तुज भ्रांता ११

संपन्न तारुण्य लावण्य नारी
कौशल्यता वैभव चित्तहारी
येकांतकाळीं पडतां समंधु
अभिळाष न करी तो धन्य साधु १२

* * *

## ३५. योग हा सुकृताचा

मनासारिखी सुंदरा ते अनन्या
मनासारिखें पुत्र ज्यामात कन्या
सदा सर्वदा बोलती रम्य वाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

मनासारिखे दीर भर्तार भावे
मनासारिखे सासुर तें असावें
सुखें बोलती लेश नाहीं गमाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

भलीं मायबापें भले मित्र बंधु
भले सोइरे राखती स्नेहवादु
मुलें लेंकुरें येक मेळा सुनाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

भले धाकुटे थोरले सर्व कांहीं
भले गोत्रजु भिन्न भावार्थ नाहीं
अखंडीत हा काळ जातो सुखाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

गुरें वांसुरे शिंगुरें दास दासी
गुराखे सुणीं मर्जरें गुणरासी
समा चालतो लेश नाहीं तमाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

धनें धान्य पात्रें आळंकार चीरें
विसोरे घरें सुंदरें रम्य सारें
देहे चालतो सर्व आरोग्य ज्याचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

यहलोकिचे लोक ते ही गुणाचे
परत्रीक ते ही बहू लक्षणाचे
समुदाव उछाव येका मनाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

मनासारिखे ग्राम ग्रामाधिकारी
मनासारिखे लोक शोकापहारी
मनासारिखा संग साधुजनाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

मनासारिखें चिंतिता देव पावे
मनासारिखे भक्त भावें मिळावे
सदा बोलती बोल सारांश वाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

म्हणे दास सायास केल्या घडेना
विकल्पें जनीं येक ठांईं पडेना
घडे योग होता विवेकीं जनाचा
जनीं जाणिजे योग हा सुकृताचा

## ३६. मुलांना शिकवण

बरें सत्य बोला यथातथ्य चाला
बहु मानिती लोक तेणें तुम्हाला
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो
बरा गुण तो अंतरामाजि राहो

बरें दांत घांसोनियां तोंड धोवें
कळाहीण कां शूद्रमुखी नसावें
सदासर्वदा प्रेत्न सांडू नको रे
बहूसाल हा खेळ कामा नये रे

दिसामाजि कांहीं तरी तें ल्याहावें
प्रसंगें अखंडीत वाचीत जावें
वयें श्रेष्ठ रे दास्य त्याचें करावें
बरें बोलणें सत्य जीवीं धरावें

बहु खेळ खोटा सदालस्य खोटा
समस्तांसि भांडेल जो तो चि खोटा
बहुतां जणालागि जीवें झिजावें
भले सांगती न्याय तेथें मिजावें

हिसेबीं सदा न्याय सांडूं नका रे
कदांचीत अन्याय होतां धका रे
जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें
माहां सुख तें ही अकस्मात जातें

प्रचीतीविणें बोलणें वेर्थ वांयां
विवेकेंविणें सर्वही दंभ जायां
बहु सज्जला नेटका साज केला
विचारें-विणें सर्व ही वेर्थ गेला

वरी चागलें अंतरीं गोड नाहीं
तया मानवाचें जिणें वेर्थ पांहीं
वरी चांगले अंतरीं गोड आहे
तयालागि कोण्ही तरी शोधिताहे

सदा अंतरीं गोड तें सांडवेना
कदा अंतरीं वोखटें तें खपेना
म्हणोनी बरा गुण आधी धरावा
महां घोर संसार हा नीरसावा

भला रे भला बोलती तें करावें
बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें
पुढें सेवटीं सर्व सांडूनि जावें
मरावें परी कीर्तिरूपें उरावें

बरा वोखटा सर्व संसार जाला
अकस्मात येईल रे येमघाला
म्हणोनि भले सांगती नित्य चाला
जनीं दास तो सीकवीतो मुलांला

३७. शिष्यवृंदास

लिहितां जोडितां येना   व्यासंग करितां नये
जड संसार सांडेना   चालिला सर्व सांडुनी

स्वदेश राहिला मागे   विदेश लागला पुढें
आचार राखणें आधीं   स्नानसंध्या पवित्रता

आचुक शुध ल्याहावें   वाचावें नीटनेटकें
साकल्य अर्थ सांगावा   येथातथ्य प्रचीतीनें

बोलावे न्यायनीतीनें   मर्यादा राखणें जनीं
आभ्यास करावा आधीं   ताळबध पाठांतरें

प्रसंग मान जाणावे   बाणावे बहुतांपरीं
भक्तीभाव असों द्यावा   घालावा भार ईश्वरीं

प्रत्यहीं मागणें भीक्षा   मिळाली न मिळे तरी
नित्य नूतन हिंडावें   धुंडावे भक्त प्रेमळ

कथा ते करावी आधी   बाधी ते दुराशा नको
उपाधी आतळावे ना   जावे ना वैभवाकडे

सर्वत्र लोक शोधावे   बोधावे भक्तीच्या गुणे
राहावे दुर्बळाचेथें   देवाल्यें कां नदीतिरीं

पर्वतीं उदकापासीं   संन्निधची एकीकडे
फार येकांत सेवावा   अभ्यास नित्य नूतनु

साहावीं सीतउष्णादि   पाहावी रम्यसी स्छळें
करावे आपण कष्ट   बांधावीं तें हळु हळु

वोळखी कराव्या दाटा   येके ठाईं स्थिरो नये
वादवेवाद तो खोटा   दाटावा मद मछर

उधट बोलणें खोटें   बोलावी मृद उत्तरें
नेटकी पाहिजे दीक्षा   रक्षावी भक्ति आदरें

वर्णावी कीर्तीचीं द्वारें   अद्‌भुत बहुतांपरीं
प्रबंद जाड बोलावे   चालावें योग्य मानसें

परंतु सर्व देवाचें   आपुलें तनहि नसे
मनांत वावरे देवो   देव देव चहुंकडे

अत्यंत साक्षपी व्हावें   न व्हावें आळसी कदा
घ्यावा या देह्याचा लाहो   जांयांचें हें म्हणोनियां

मरोनि कीर्ति उरवावी   नुरवावी आपकीर्ति ते
धन्य धन्य म्हणे लोक   सत्क्रिया करितां बरी

पुण्यमार्ग प्रतिष्ठावा   लावावी धर्मवासना
देवाल्यें करावी मोठीं   वापी कूप सरोवरें

वाटीका वृक्ष लावावे   पष्पें फळें परोपरीं
करावी कपाटें टाकीं   भुंयरीं विवरें गव्या

वृंदावनें दीपमाळा   धर्मशाळा बहुविधा
पाईऱ्या वोवऱ्या वोटे   यात्रा धबके हरीकथा

सावधु सकळा ठाईं   न्यायनीती चळो नये
सकळांसीं सख्य राखावें   वर्तावें तें मनोगतें

वैभवें सर्व देवाचें   वाद्यें छेत्रें परोपरीं
किती म्हणोनि सांगावीं   सांभाळावीं समस्तहि

दास्य तें करावें ऐसें   यामधें घडेल तसें
देव सांग करी सर्वै   भावार्थ पाहिजे बरा

* *. *

## ३८. करावें तेंचि पावावें

येत्नाचा लोक भाग्याचा   येत्नेंवीण दरीद्रता
उमजला लोक तो धाला   उमजेना तो हपापिला

हिंडतां शाहाणें होतें   बोलतां बोल सीकतें
वाचीतां लिहितां येतें   तेणें तें मान्य होतसे

घरींच बैसतां खोटे   ब्राह्मणु हिंडतां बरा
आळसी घातघेणा तो   कष्टला म्हणिजे बरा

भुकाळु म्हणिजे खोटा   धीराचा पाहिजे नरु
तार्किक असावा प्राणी   सावधान चहुंकडे

प्रसंगें वर्तता आलें   यथातथ्य चि सुचीलें
मनुष्य राखिलें राजी   तो प्राणी शाहाणा बरा

समई धीर सांडीना   येत्नीं येत्न बरा करी
हिंडतां पारखी लोकां   कार्य-कर्ता जिवीं धरीं

मैत्रीकीही विटों नेंदी   सवासी सारखा दिसे
विचार जाणतो मोठा   दक्ष तो जाणता जनीं

उदंड वोळखी होतां   उदंड भाग्य होतसे
उदंड कळह होतां   उदंड लथ खातसे

विचारें गोड बोलावें   बहुतां मान्यसें बरें
भांडतां पुरवेना कीं   मैत्रीकी करितां बरें

बोलावें उसीणें घ्यावें   वर्तता उसीणें निघे
कुटितां कुटिती लोक   वोढतां वोढती जनीं

करावें तेंची पावावें   हें आलें आपणाकडे
आपलें आपणापासीं   जनासी काय बोल हा

आपला मीत्र का शत्रु   जैसें करी तैसें घडे
दिसते गोष्टी ते ऐसी   पल्लवीं पडिली पाहा

आपली चुकी जाणावी   सांडावी ते येकीकडे
विवेकें साजिरा जाला   येर उदंड मीळती

वेषानें कार्य साधेना   विवेकें कार्य साधतें
विवेकी मानिती ज्याला   धन्य तो ब्राह्मणु जनीं

पराचें कार्य कर्ता जो   त्याचें कार्य कसें नव्हे
तातडी तातडी धांवे   बरेपणें मनोगतें

येके स्थळीं स्थिरावेना   नित्य नूतन साजिरा
कीर्ति ते दिगांती धावे   नेमस्त राहातां जनीं

श्लाघ्य दुर्लभ तें जाणें   कोड कौतुक होतसे
विख्यात होतसे योगी   धुंडितां सांपडो नये

कृत्याकृत्य जिणें जालें   देव सांपडतां जनीं
धन्य तो कुळ तो जन्म   ज्ञानें सार्थक जाहाला

## ३९. स्वयें जो परीक्षा नेणें

भाग्यासी काय उणें रे येत्ना वाचुनि राहिलें
येत्न तो करावा कैसा हेची आधी कळेचिना

मुख्य यत्न विचाराचा त्यावरी बोलणें बरें
चालणें सत्य नेमाचें नीतीन्याय चुको नये

गलबला बुधी नासीतो नाना निश्चये सांगती
ऐकावें कोणकोणाचें बोलताहे बहुचकी

सांगोची जाणती सर्वै कर्ता कोण्ही दिसेचिना
जाणते नेणते सांगों स्वभाव लागला जनीं

शास्त्र हो लोक हो कोण्ही नीती हो न्याये हो न हो
दाटुनी सांगती वेडे आदरें हो अनादरें

करंटे मिळाले सर्वै जो तो बुधीच सांगतो
सांगावें ते आपणाला आपणु करितां बरें

सांगती लोक ते कैसें आपणु ऐकतो कसा
स्वयें जो परीक्षा नेणे लोकांचें ऐकिलें करी

श्वानासी लावितां लागे तैसा तो जाणिजे नरु
खरें खोटें विचारीना लोकांचें सिकविलें करी

मोठें तें पाप लोकाचें प्रभु तो जाणता नव्हे
वर्ततो सिकविल्या बोलें तो काय म्हैसमंगळु

लाच चोरी बहु जाली घालाघाली परस्परें
धण्याला नेणवे कांहीं बेदादी नगरी पहा

धणी तो राहिला मागें कारबारीच नासिती
पाप हें थोर लोकांचें सांगावें कवणापुढें

प्रपंच नासतो ऐसा भाग्य जाते निघोनियां
यालागी सर्व सांभाळी तो ची साहेब नेटका

खबर्दार बरा राजा विवेकी सर्व साक्षपी
आज्ञेनें सर्व हि चाले तेणें सौख्य बहु जना

पोराला माय जाणेना तें पोरें वांचतीं कशीं
गुराखी राखतो गुरें धणी दोहींस पाळितो

सर्वत्र राखणें राजी सुख दुख जाणोनियां
सर्वांची वाहवी चिंता बुधीवंत करावया

लोक ते शाहाणे केले जन्मापासुनि सोडिले
प्रचीती समस्ता लोकां भक्तीमार्ग प्रतिष्ठिला

* * *

## ४०. क्रोध

कोप आरोपणा खोटी   कोपे कोपची वाढतो
मोडतो मार्ग न्यायाचा   अन्याय प्रबळे बळें

क्रोध हा खेद संपादी   जेथें तेथें चहुंकडे
विवेक पाहातां कैचा   शुधी तेथें असेंचिना

भृकुटी कुटिला गाठी   काळीमा वदनीं चढे
कुर्कुरी बुर्बुरी रागें   हात पायची चोळीतो

कुशब्द वोखटे काढी   त्रासकें वचनें वदे
घेतसें बालटें ढालें   उणें काढी परोपरीं

बोलतां हींसळे थुंका   तांयेंतांयें उकावतो
तांबडे जाहले डोळे   रागें रागेचि फुगला

कंठ ललाटीच्या सीरा   फुगल्या घाम चालिला
थर्थरा कांपतो रागें   रूपें भुतची जाहला

धर्ते लोक ते झींजाडी   सातपांचासी नावरे
लीथाडी पछ्याडी कुस्ती   मारामारी धबाधबी

सुटली फीटली वस्त्रें   नागीवे दिसती जना
लाज ते अंतरीं नाहिं   मातले नीट धावती

अनर्थ मांडला मोठा   लाता बुक्याच तप्रका
कोंपरें मारिती सीरीं   काष्ठ पाषाण आर्गळा

मुसळें मारिती काठ्या   सीळा डांगाच ढेकळें
डसती झोंबती आंगा   नीकुरें लाविती कळा

ताडीले पाडीले पडले   रक्तबंबाळ जाहाले
घरीचीं मारिती हाका   हाका बोंबा परोपरी

दिवाणामाजी ते नेले   मारिले दंड पावले
क्रोधानें करंटे केले   क्रोध चांडाळ जाणिजे

भल्यानि कोप सांडावा   शांतीनें आस्तां बरें
क्षुल्लकें कोप पाळ्ावा   भल्यांचें काम तों नव्हे

## ४१. वार्धक्य

देह्याचा भर्वसा नाहिं   तारुण्य चळतें जनीं
वृधापीं विटंबे काया   रूप विद्रूप होतसे

केस ते रेंसीमा ऐसे   पुढें बुर्कुल होतसे
टकलें पडती माथां   सेंडीचा ठाव जातसे

दुरुनी ऐकिजे कानीं   ते कर्ण बधिरावले
दुरुनी न्याहाळे डोळां   ते डोळे मंद जाहाले

नासिकीं गळतें पाणी   जिव्हेची बोबडी वळे
दात ते सर्वेहि गेले   मान हाले निरंतरीं

हाताच्या जाहाल्या कांबी   कोथळु पंजरु दिसे
वांसाड निघालें मागें   सर्वांगीं मास सुकलें

बर्गाड्या मोकळ्या जाल्या   पोटाची काचरी वळे
काटकें पोटऱ्या मांड्या   पायांची वेगडी वळे

उदंड पाहिली पृथ्वी   उंबरा उंच जाहाला
पाळिलीं पोसिलीं होतीं   हांसती तेचि माणसें

सरतो धरेना वारा   मळमूत्र चहुंकडे
खोकितां वोकितां नाशी   नाना दुखें बळावलीं

मागील आठवे सर्वै   दुख वाटे क्षणक्षणा
आक्रंदे तो कणे कुंथे   आयुष्य न सरे कदा

सर्व येकीकडे जाती   हांसती खेळती सुखें
पाहातां न येती कोण्ही   आपलाल्या कामाकडे

ऐसें हें दुख वृधापीं   कळलें पाहिजे जना
परत्र साधणें आधीं   तारुणींच उठाउठी

* * *

## ४२. देह-संगें

देहे हें असार कृमीचें कोठार
परी येणें सार पाविजेतें

लागवेग करी लागवेग करी
स्वहित विचारी आलया रे

देहेसंगें घडे संसारयातना
परी हा भजन मूळ देहो

देह्याचेनि संगें हिंपुटी होईजे
विचारें पाविजे मोक्षपद

जन्मास कारण मूळ देहेबुधी
परी ज्ञानसिधी देहेसंगें

देहेसंगें वाटे स्त्रयें आभिमान
आणी समाधान देहेसंगें

देहेसंगें उठे स्वयातीमछर
आणी पैलपार देहेसंगें

देहेसंगें जीव होतसे चांडाळ
आणी पुण्यसीळ देहेसंगें

देहेसंगें प्राणी अधोगती जाती
आणी धन्य होती देहेसंगें

देहेसंगें बध देहेसंगें मुक्त
देहेसंगें भक्त होत असे

देहेसंगें देव आणी भावाभाव
पाप पुण्य सर्व देहेसंगें

देहेसंगें वृत्ती होतसे निवृत्ती
गती आवगती देहेसंगें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

देहेसंगें भोग देहेसंगें रोग
देहेसंगें योग साधनाचा

देहेसंगें देही विदेही संसारी
सद्‌भाव अंतरीं देहेसंगें

देहेसंगें तारी देहेसंगें मारी
संतसंग धरी देहेसंगें

देंहेसंगें गती रामदासी जाली
संगती जोडली राघवाची

४३. देवालयांतला देव

देहेदेवाळयामधें पाहाणें   देव तो वरा
देव सांडुनी देवाल्यें   वर्णिती सर्व ही कवी

कवीला सीकवी कोण   देवची वदतां बरें
देवाल्यें चालवी देवो   प्रतेक्ष सचराचरीं

आंतरीं वीवरी नाना   सद्य गद्य नव्हे कदा
देवळें चालवी नाना   तनाना होतसे पुढें

वदाना त्यास कां आधीं   तो देव येकला दिसे
येकला बहुतां ठाईं   उंच नीच विभागला

दिसेना लोचनाला रे   घाला रे मन त्यामधें
येकला सर्व देवालीं   गुप्त नाना परीं वसे

आनंत कोटि देवाल्यें   त्यामधें एकला प्रभु
दीपानें दिसेना नाहिं   त्यानें त्यास पाहाणें

उजेडें दिसेना नाहिं   आंधारें गुप्त होय ना
कदा हातासी लागेना   सर्वथा पुजीतां नये

पुजीतां सर्व देवाल्यें   तेणें तो तृप्त होतसे
प्रतक्ष वर्ततें आतां   पाहा रे विवेकी तुम्ही

देवाल्यें वर्णिती ज्ञाते   ते ज्ञाते न्हती कदा
देव वर्णील तो ज्ञाता   ज्ञानें मोक्षची पावतो

थोर लाहान देवाल्यें   देव तो त्यामधें असे
देवदेवाळयेवीण   कोणीच न दिसे जनीं

देव तो येक देवाल्यें   आनेक दिसती पाहा
भेद देवाळयामधे   आभेद देव पाहातां

कोण कोणासी सांगावें   सर्व ही भ्रांत जाहाले
भ्रांत देवालयासाठीं   देवचा सांडिती जनीं

कळेना आणि ऐकेना   धावती दीसत्याकडे
दीसतें नासतें जातें   दीसेना तें कळेचिना

कळेना वळेना कांहीं   कांहीं बाहीं तऱ्हीं करुं
देवाल्यें पुजीतां देवो   संतुष्ट होतसे सदा

आपदा ते चुकेना कीं   देवासीं चुकतां जनीं
गुप्त लिंग कळेना कीं   संन्नीध असतां सदा

मोडलीं जीर्ण देवाल्यें   तें ची लोकांसी मानती
भांडती देवळासाठीं   देव चुकोनि राहिला

शरीरमात्र देवाल्यें   जीर्ण सांडुनी जातसे
नूतनें रम्य देवाल्यें   त्यामधें देव नाटकु

ठकु रे ठकु रे मोठा   ठकीतो जनमानवी
मानवी दानवी काया   काया माया पाहा बरी

थोर देवाल्य मुळींचें   ईश्वरु जगदेश्वरु
देवदेव्या बहुरूपा   अर्धनारीनटेश्वरु

त्यांपुढें तीन देवाल्यें   ब्रह्मा विष्णु महेश्वरु
तया आभ्यांतरीं देवो   तो देव सत्य जाणिजे

तो ची जो तो हा जाणा   नाना देवाळयामधें
औतरे देवळामधें   त्यासी औतार बोलिजे

आतां म्या काये सांगावें   सांगावें त्या परमेश्वरा
आखंड अंतरीं ध्यावें   जावें रे निश्चळाकडे

जड तें सर्व देवाल्यें   देव तो चंचळ असे
निश्चळु निर्विकारी तो   मुल्य देवो निरंजनु

नांव रूप जया नाहिं   कार्य कारण तो नव्हे
माहांकारण ही खोटें   देवाल्य मुळीचें मुळीं

तयासभोंवता देवो   सबाह्य अंतरीं वसे
वसेना उद्वसेना तो   काय बोलों कसें करुं

वाच्यांश बोलणें नाहिं   लक्षांश करणें नसे
स्वर्ग तो राहिला मागें   धन्य मार्ग विहंगमु

गुप्तार्थ मौन्यगर्भाचा   येथार्थ म्हणिजे तया
रचे खचे घडे मोडे   ते सर्व चंचळाकडे

कल्पनातीत या गोष्टी   संकल्प सहसा नसे
विकल्प राहिला मागें   लागवेगें पुढें पहा

पाहातां पुढें ना मागें   आधोर्ध ची चहुंकडे
उडाला भास जे ठाई   ते ठाई योग तो बरा

आनन्य दास देवाचा   वाचा रे मन घालुनि
पाहातां कोण तो कैचा   भेदाचा ठाव नाडळे

४४. देव-दैत्य-विवेक

वन्ही तो चेतवावा रे   चेतवितांच चेततो
विवेक जाणिजे तैसा   वाढवितांच वाढतो

संग तो साक्षपीयाचा   धरीतां साक्षपु घडे
साक्षपें साक्षपु वाढे   पुरती मनकामना

कष्टतां सौख्य मानावें   कष्टीं फळची पाविजे
आळसें सुख वाटे तें   दुःख ब्रह्मांड भोगवी

केल्यानें होत आहे रे    आधीं केलेंची पाहिजे
येत्न तो देव जाणावा    अंतरीं धरितां बरे

आचुक येत्न तो देवो    चुकणें दैत्य जाणिजे
न्याय तो देव जाणावा    अन्याय राक्षसी क्रिया

सावधु देव जाणावा    उन्मतु दैत्य बोलिजे
होरटया दैत्य जाणावा    देव तो सौख्यदायकु

साक्षपी अंश देवाचे    आळसी वौंश दानवी
राक्षसी दैत्य तो मोठा    अन्यायें दैत्य जाहाला

देव सर्वांस सांभाळी    तदांश जाणिजे तसा
दैत्य ते पीडिती लोकां    तदांश त्याचसारिखे

दंभ दर्प साभिमानें    कर्कशें वचनें मुखीं
कोपी ते दैत्य जाणावे    निष्टुर परघातकी

हीत ते देव कर्ता तो    कृपाळू भक्तवछ्ळू
पाळकु देव जाणावा    चाळकु जगदांतरें

तो देव जाणिजे ज्ञानें    ज्ञानी त्यासीच बोलिजे
विज्ञानी ब्रह्मयोगी तो    वृतीसुन्य पुरातनु

## ४५. जाणतां भय तुटलें

भुतेंची भासतीं झाडें    मुळीच भासला फणी
पाषाण श्वापदा ऐसा    जाणतां भय तुटलें

मार्गस्त तश्करा ऐसे    काजीवे व्याघ्रनेत्रसे
कांबळें रीससें वाटे    जाणतां भय तुटलें

बाजीगरी खरी वाटे    विनोदीराय भूलवी
वोडंबरी धाक सोडी    जाणतां भय तुटलें

ऐकिली वोखटी वार्ता    वायहुली लुटालुटी
वायबोंब उठिली मोठी    जाणतां भय तुटलें

विनोदें भेडसावीती    लाविती नष्ट संशयो
अवचीता घोंश काशाचा    जाणतां भय तुटलें

कीड्यानें चाविलें लोकां   भुजंगभय सुटलें
वन्ही हा लागला वाटे   जाणतां भय तुटले

दुस्वप्न देखिलें मोठें   वोसणातो परोपरी
आक्रंदे मारितो हाका   जाणतां भय तुटलें

आज्ञानें निश्चय केला   मिथ्या सत्यची वाटला
विचारें वोळखों जातां   जाणतां भय तुटलें

पडसादेंची जो भ्याला   मृगजळीं बुडों म्हणे
हेची शोधुनी पाहावें   जाणतां भय तुटलें

बाउ बाउ मुलें भीती   जाणते नेणते कसे
मी कोण हेंची जाणावें   जाणतां भय तुटलें

## ४६. भ्रान्तीची लक्षणें

छाया देखोनि आपुली । जीव झाला दिशाभुली
ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण
मुखे बोलतां उत्तर । तेथें जालें प्रत्युत्तर
डोळा घालितां आंगोळी । एकाचीं तीं दोन जालीं
पोटीं आपण कल्पिलें । तेंच आलेसें वाटलें
दास म्हणे हे उपाधी । शंका धरितां अधिक बाधी

~ ~ ~

वाजे पाऊल आपुलें । म्हणे मागें कोण आलें
कांहीं दिसे अकस्मात । तेथें आलें वाटे भूत
कोण धावतसें आड । पाहों जातां झालें झाड
भावीतसे अभ्यंतरीं । कोण चाले बरोबरी
शब्द पडसाद उठला । म्हणे कोणी रे बोलिला
पुढें रोविलासें झेंडा । भ्रान्त्या म्हणे कोण उभा
रामीरामदास म्हणे । ऐसीं भ्रान्तीचीं लक्षणें

* * *

## ४७. उमजणें समजणें आधीं

काम क्रोध कुटावा तो   लुटावा मदमछरु
तुटावा संशयो धोका   दंभ प्रपंच त्यागणें

कुबुधी लाथलावी ते   सुबुधी धरणें बरी
अपकीर्ती दुरी घालावी   सत्कीर्ती राखणें सदा

अहंता पापिणी मोठी   थोरथोरांसि सिंतरी
बुकालावी धुमालावी   लावावी भजनाकडे

भ्रष्टता नष्ट आहे हो   श्रेष्टता दवडीतसे
नष्टवी कष्टवी प्राणी   भल्यांपासीं कामा नये

वासना वास पाहे रे   राहे रे अंतरीं सदा
वैराग्यें तोंड ठेचावें   चेंपावें मत वाउगे

धारणा धरावी मोठी   विस्मृती हे कामा नये
आलस्य दुरी तो दौडा   साक्षपें येत्न पाहाणें

अभ्यास वाढवावा रे   येहलोकपरत्रीचा
जाणते नेणते राजी   राखावें बहुतांपरीं

कर्कशें भुंकतीं स्वानें   तैसें वाक्य करूं नये
सर्वांसी मृद बोलावें   चालावें सर्वमान्यसें

गुण देखोनी लोधावें   वेधावें उत्तमा गुणा
जयाचें त्या रिती जाणे   धन्य तो जाणता गुणी

प्रत्ययेवीण जो ज्ञानी   तो ज्ञानी आत्मघातकी
तो संग त्यागणें खोटा   निःसंग संग पाहाणें

अर्थपुष्ट बरें गाणें   नाचणें समजोनियां
उगेंची भुंकणें खोटें   गधडे भुंकती जसें

प्रेमा प्रबंद हि नाहिं   ज्ञान ध्यान असेचिना
कळाहि पुरती नाहिं   तें गाणें श्रम वाढवी

लक्ष्मीवंतापुढें तोरा   करंटे दाखवीतसे
रणशूरांपुढें लंडी   उदंड बडबडीतसें

सुचिस्मंतापुढें भ्रष्ट   श्लाघ्यता न पवे कदा
पंडितापुढें तो ढुंबा   काय बोलेल बाष्कळु

प्रत्ययासी अनुमानें   सहसा बोलतां नये
विचक्षणापुढें वेडें   काय बोलेल बापुडें

खऱ्या नाण्यापुढें खोटें   कोठें चि न चले जनीं
मुर्ख ते ठकती घेती   जाणते ते सिवेचिना

जाणतां दरिद्रें जाती   जाणतां रोग भंगती
जाणते जिंकिती युध्यें   नेणते मोडती सदा

मापटें मोजितें दाणें   तैसें सीकोन गातसे
आंतेज वाहाती द्रव्यें   अर्थसमंध नाडळे

ईरसाल वाहाती आंबे   भोक्तव्य न घडे कदा
समजल्याविण तें वोझें   पोटासाठींच वाहाती

उम्जणें समजणें आधीं   प्रउर्तीनिवृतीकडे
भाग्यश्री मोक्षश्री होते   विरताविवरतां पुढें

४८. धन्य संसार होतसे

स्नानसंध्या टिळे माळा   अंतरनिष्ठ उपासना
नित्यानित्यविवेकानें   धन्य संसार होतसे

मर्यादा न्यायनीतीची   अन्याय न घडे कदा
सन्मार्ग योग देवाचा   धन्य संसार होतसे

देवाल्यें सीखरें रम्यें   धर्मशाळा परोपरीं
परत्र साधका लोकां   धन्य संसार होतसे

अन्नोदकवस्त्रदानें   धन्य धन्य ब्राह्मणी भजे
उदास वृतीनें लोकीं   धन्य संसार होतसे

बावी सरोवरें टांकीं मठ वृक्ष परोपरीं
उपकार समस्तै लोकां धन्य संसार होतसे

पराचें जीविचें जाणें अस्ती नास्ती विचारणा
आत्यंत सर्व भूतांसीं धन्य संसार होतसे

कदापी सत्य सोडीना नित्य नेमस्त बोलणें
वोढतो बहुतां लोकीं धन्य संसार होतसे

होम याग पुन्हश्चर्णें निरूपणें हरीकथा
ब्रह्मसंतर्पणें यात्रा धन्य संसार होतसे

वेदपारायणें चर्चा पुराणें माहात्में शुभें
नित्य उछाव देवाचा धन्य संसार होतसे

नवविधा भक्ती देवाची मुख्य कोण विचारणें
आध्यात्म शोधितां सर्वै धन्य संसार होतसे

पंचीकर्ण माहांवाक्यें श्रवणें मननें सदा
सत्संगें निसंग होतां धन्य संसार होतसे

दासाचें बोलणें ऐसें सर्वज्ञ जाणते तुम्ही
आम्ही तुम्ही विचारावें धन्य संसार होतसे

शब्देंची लाभती रत्नें शब्दरत्नें आमोल्य कीं
कोंदणामाजी तें सोनें तैसा अर्थ प्रचीतीचा

## ४९. अभंग-गुंफा

नको ओळखीचे जन । आंगीं वाजे अभीमान
आतां तेथें जाईं मना । जेथें कोणी ओळखेना
लोक म्हणती कोण काय । पुसों जातां सांगों नये
रामदास म्हणे पाहीं । तेथें कांहीं चिंता नाहीं

ऐका नव रस सुंदर सरस । जेणें होय रस सर्व काळ
प्रथम शृंघार दुसरा तो हास्य । तिसरा तो रस करुणेचा
रौद्र तो चतुर्थ वीर तो पाचवा । रस तो साहवा भयानक
मोहो तो सातवा बीभछे आठवा । लज्या तो नववा रस जाण
रसीक बोलणें रसीकची गाणें । रसीक वाचणें प्रसंगीत
ज्याचें त्याचें परी आवडीसारीखें । बोलतां आरिखें लुब्ध होती
लुब्ध होती तरी मृदुची बोलावें । नेमस्त चालावें नीतिन्यायें
नीतिन्यायें बहुतेकासी मानतो । व्याप करील तो भाग्यवंत
भाग्यवंत नर यत्नासी तत्पर । अखंड विचार चाळणेचा
चाळणेचा यत्न यत्नाची चाळणा । अखंड शहाणा तोची येक
प्रउर्ती निवुर्ती चाळणा पाहिजे । दास म्हणे कीजे विचारणा

~ ~ ~

छेत्री सुखासनी अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायेबाप
माझा मायबाप त्रीलोकीं समर्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी
पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा स्वामी माझा
स्वामी माझा राम योगियां विश्राम । सांपडलें वर्म थोर भाग्य
थोर भाग्य ज्याचें राम त्याचें कुळीं । संकटीं सांभाळी भावबळें
भावबळें जेंहीं धरिला अंतरीं । तया क्षणभरी विसंभेना
विसंभेना कदा आपुल्या दासासी । रामी रामदासीं कुळस्वामी

~ ~ ~

रामभक्तीवीण अनु नाहिं सार । साराचेंही सार रामनाम
कल्पनाविस्तारु होतसे संव्हारु । आह्मा कल्पतरु चाड नाहिं
कामनेलागुनी विटलासे मनु । तेथें कामधेनु कोण काज
चिंता नाहीं मनीं राम गातां गुणी । तेथें चिंतामणी कोण पुसे
कदा नाहिं नाश स्वरूप सुंदरे । तेथें काये हिरे नासीवंत
रामदास ह्मणे रामभक्तीविणें । जाणावें हें उणें सर्व कांहिं

~ ~ ~

आपुल्या भोजनीं पोट हें भरेना । लागे उपार्जना दुसऱ्याची
दुसऱ्याची सेवा करितां वेतन । पाविजेतें अन्न लोकांमध्यें
लोकांमध्यें उपासितां देहे-दारा । मागावा मुशारा कोणापासीं
कोणापासीं कोणें काये हो सांगावें । कैसेनि मागावें वेतनासी
वेतनासी जनीं तरिच पाविजे । जरि सेवा कीजे स्वामियांची
स्वामियांची सेवा करितां उत्पन्न । स्वामी सुप्रसंन्न होत असे
होत असे देव संतुष्ट भजतां । मुक्ति सायोज्यता तेणें लाभें
लाभे नवविधा तेणें चतुर्विधा । पुसावें सुबुद्धा सज्जनासी
सज्जनासी पूजा, देहासि भजतां । भार भगवंता कैसा पडे
कैसा भार पडे देह्याच्या भजनें । भक्तीचेनि गुणें देव पावे
देव पावतसे भजतां देवासी । सेवितां देह्यासी देव कैंचा
देव कैंचा देव सेविल्यावांचुनी । तत्वविवंचनीं दास म्हणे

~ ~ ~

दर्पणीं पाहातां दिसतें सर्वांग । परि पृष्ठभाग आढळेना
आपुलीच पाठी पाहाता न दिसे । ऐसे बोलतसे सर्व जन
आपशुधी नेणे त्या काये परावें । ह्मणोनि जाणावें आपणासीं
आपणासी जाणे संताचे संगती । तया अधोगती जन्म नाहिं
नाहीं जन्म मृत्यु नाहीं येणें जाणें । स्वरूपीं राहाणें दास ह्मणे

~ ~ ~

दुर्जनसंगती कदा धरूं नये । घडती आपाय बहुविध
बहुविध जाले आपाय बहुतां । तेचि सांगों आतां सावकास
कुसंग हे माया धरितां संगती । गेले अधोगती नेणों किती
चांडाळा संगती होइजे चांडाळ । होय पुण्यशीळ साधुसंगें
बहुविध रत्न फुटोनियां गेलें । संगतीनें केलें रुधीराचे
कुरुंदासंगती झिजला चंदन । कुसंगें जीवन नासतसे
खाराचे संगती नासे मुक्ताफळ । होतसे तात्काळ कळाहीन
लाखेच्या संगती सोनें होय उणें । दुग्ध हें लवणें नासतसे

दुर्जनसंगती सज्जन ढासळे । क्रोध हा प्रबळे अकस्मात
दास ह्मणे संग त्यागा दुर्जनाचा । धरा सज्जनाचा आदरेंसीं

~ ~ ~

कण सांडुनीयां घेउं नये भुस । गर्भेविण फणस खाउं नये
खाउं नये नारीकेळाचें करोंटें । सालपट खोटें दाळींबाचें
दाळींबाची त्वचा चोवड उसाचा । स्तंभ कर्दळीचा खातां न ये
खातां न ये नाना फळांची आंठोळी । असो हे वाचाळी वाउगीच
वाउगें सांडुनी सार तेंचि घ्यावें । येर तें सांडावें मिथ्याभूत
मिथ्याभूत जें जें तत्व दृष्टी पडे । ह्मणोनियां घडे त्याग त्याचा
त्याग त्याचा कीजे जें मनें कल्पावें । मग अनुभवें जाणिज़ेल
जाणिजेल सार त्यागितां असार । बोलावा विस्तार कासयासी
कासयासी आतां धरावा संदेहो । कल्पनेचा देहो नासीवंत
नासीवंत आहे नांव आणि रूप । पाहें आपेंआप दास ह्मणे

~ ~ ~

दव हे समर्थ आणी देहेधारी । कष्टी परोपरीं ब्रह्मादिक
ब्रह्मादिक तया रावणाचे बंदीं । दैत्य उणी संधी पाहाताती
पाहाताती येकीं केल्या हज्यामती । रासभें राखती येक देव
देवचीं गादले बहु दगदले । कासावीस जाले कारागृहीं
कारागृहीं देहेसंबंधानें होती । विवेकें राहाती देह्यातीत
देह्यातीत दुख सांडुनि संसार । येथें काय सार सांपडलें
सांपडलें नाहिं कष्ट जन्मवरी । दीनाचीये परी दैन्यवाणे
दैन्यवाणे देव जाले संवसारीं । मनुष्याचा करी कोण लेखा
लेखा नाहिं ऐसें कासया करावें । निश्चळची व्हावें दास म्हणे

~ ~ ~

तुह्मी आह्मी करूं देवाचा निश्चयो । जया नाहीं लयो तोची देव
देव हा अमर नित्य निरंतर । व्यापूनी अंतर देव आहे

देव आहे सदा सबाह्य अंतरीं। जीवा क्षणभरी विसंभेना
विसंभेना परी देवासी नेणवे। म्हणोनियां धांवे नाना मती
नाना मती देव पाहतां दिसेना। जंव तें वसेना ज्ञान देहीं
ज्ञान देहिं वसे तया देव दिसे। अंतरीं प्रकाशे ज्ञानदृष्टी
ज्ञानदृष्टी होतां पाविजे अनंता। हा शब्द तत्वता दास ह्मणे

~ ~ ~

अस्तीचा वीटाळ होता स्नान केलें। चुडे दांतवलें कासयाचीं
आचमन करावें शूद्राच्या वीटाळें। हाटाचे चौढाळे कोण जाणें
नदीचे प्रवाहीं अंत पाहों नये। स्नान संध्या होये अग्रोदकें
वोलें चर्मीं शुध होत आहे हींग। स्वयंपाकीं सांग सेविताती
रामदास ह्मणे हें कोण्ही न पाहे। देहे मुळीं आहे वीटाळाचा

~ ~ ~

चित्त आहे कैसें मळिण तें कैसें। शुद्ध होते कैसें विचारावें
वैद्य ओळखीना रोगहि कळेना। औषध मिळेना प्रचीतीचें
अनुमानें देव अनुमानें भक्त। अनुमानें मुक्त अनुमानी
अनुमानें केलें अनुमानें कल्पिलें। निर्फळ जाहलें सर्व कांहीं
सर्व कांहीं बरें प्रचीत आलिया। दास म्हणे वायां अप्रचीती

~ ~ ~

सपनींच्या सुखें सुखावला प्राणी। थोर जाली हाणी जागृतीसी
जागृतीसी नाहिं सपनींचे सुख। तेणें जालें दुख बहुसाल
बहुसाल खेद मानिला अंतरीं। वायां झडकरी जागा जालों
जागा जालों म्हणे वायां अवचीता। निजोनि मागुता सुख पाहे
सुख पाहे पुन्हा स्वप्नीचें न दिसे। भयानक दिसे प्राणियांसी
प्राणियांसी दुख जाहालें मागुतें। जागा जालिया तें सर्व मिथ्या
मिथ्या सुख दुःख स्वप्नाचा वेव्हार। तैसा हा संसार नाथीलाची
नाथीलाचि जाय क्षण आनंदाचा। सर्वेची दुखाचा क्षण जाये
क्षण येक मना राघवीं सावध। तेणें नव्हे खेद दास म्हणे

~ ~ ~

देह आरोग्य चालतें । भाग्य नाहीं त्यापरतें
लाहो घ्यावा हरिभक्तीचा । नाही भरंवसा देहाचा
देह आहे क्षणभंगुर । तुम्ही जाणतां विचार
रामीरामदास म्हणे । अकस्मात लागे जाणें

~ ~ ~

शिरीं आहे रामराज । औषधाचें कोण काज
जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखासी कारण
शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुशीतळ
आम्हां तोचि तो रक्षिता । रामदासी नाहीं चिंता

~ ~ ~

माझे मनीं सर्व सुख व्हावें तुज । ह्मणोनियां गुज सांगतसें
सांगतसें हित तां जीवीं धरावें । भजन करावें राघवाचें
राघवाचें प्रेम तें करी विश्राम । येर सर्व श्रम जाण बापा
जाण बा वचन हें माझे प्रमाण । वाहातसे आण राघवाची
राघवाची भक्ति ते माझी विश्रांती । असो द्यावी चित्तीं दास ह्मणे

* * *

## ५०. अनुदिन अनुतापें तापलों

अनुदिन अनुतापें तापलों देवराया
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया
अचपळ मन माझें नावरे आवरीतां
तुजविण सिण होतो धांव रे धांव आतां

भजनरहित रामा सर्व ही जन्म गेला
स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला
रघुपति मति माझी आपुलीसी करावी
सकळ तजुनि भावें कास तुझी धरावी

विषयजनित सूखें सौख्य होणार नाहीं
तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं
रविकुळटिळका रे हीत माझें करावें
दुरित दुरि हरावें सस्वरूपीं भरावें

तनु मनु धनु माझें राघवा रूप तुझें
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें
प्रचळित न करावी सर्वथा बुधि माझी
अचळभजनलीळा लागली आस तुझी

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना
सकळस्वजनमाया तोडितां तोडवेना
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरींचा
म्हणउनि करुणा हे बोलतों दीनवाचा

जळत हृदय माझें जन्म कोटयानकोटी
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं
तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधु
षडरिपुकुळ माझे तोडि याचा विरोधु

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी
सिणत सिणत पोटीं पाहिली वास तुझी
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे
तुजविण मज नेते जंबुकी वासना रे

सबळ जनक माझा राम लावण्यपेटी
म्हणउनि मज पोटीं लागली आस मोठी
दिवस गणित बोटीं प्राण ठेऊनि कंठीं
अवचट मज भेटी होत घालीन मीठी

जननि-जनक-माया लेकरूं काय जाणे
पय न लगत मूखे हाणतां वछ नेणे
जळधर-कण-आशा लागली चातकासी
हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी

तुजविण मज तैसें जाहलें देवराया
विलग विषमकाळीं तूटली सर्व माया
सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं
वमकवमन जैसें त्यागिलें सर्व कांहीं

स्वजन-जन-धनाचा कोण संतोष आहे
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि देती
विषय सकळ नेती मागुता जन्म देती

सकळ जन भवाचे आखिले वैभवाचे
जिवलग मग कैचें चालतें हें चि साचें
विलग विषमकाळीं सांडिती सर्व माळी
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं

सुख सुख म्हणतां हें दुख ठाकूनि आलें
भजन सकळ गेलें चीत्त दुश्चीत जालें
भ्रमित मन कळेना हीत ते आकळेना
परम कठिण देहीं देहबुधि वळेना

उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं
सकळभ्रमविरामीं राम विश्रामधामीं
घडिघडि मन आतां रामरूपीं भरावें
रविकुळटिळका रे आपुलेंसें करावें

जळचर जळवासी नेणती त्या जळासी
निसिदिन तुजपासीं चूकलों गुणरासी
भुमिधरनिगमासी वर्णवेना जयासी
सकळभुवनवासी भेटि हे रामदासीं

* * *

## ५१. अंत पाहसी किती ?

निदान पाहसि किती । दयाळा । निदान पाहसि किती ॥

धाव धाव गा सीतापती
तुजवेगळीं नाहीं गती
नाना शास्त्रें मौनावती
नाम तारक वेद बोलती ॥ निदान० ॥

जळीं तारिले पाषाण जड
मी काय तुज त्याहुनी जड
आतां पुरवी जीवींचें कोड
मनीं घेतला विषयीं मोड ॥ निदान० ॥

तुझ्या भेटिंचे आरत मोठें
मज न गमे कांहिं केल्या कोठें
तुजवांचोनी सर्वहि खोटें
दीन बालक तुझे धाकुटें ॥ निदान० ॥

वृत्ती जडली पायांपाशीं
जेवि गुळाशीं गुंतलि माशी
देहीं असुनी गुप्त कां होशी
दास उदास देहभावाशीं ॥ निदान० ॥

## ५२. काय उत्तीर्ण व्हावें ?

हिणाहून मी हीण जैसे भिकारी
दिनाहून मी दीन नाना विकारी
पतीतांसि रे आणि हातीं धरावें
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें

जनीं भक्ति नाहीं मनीं भाव नाहीं
मला युक्ति ना बुद्धि कांहीं च नाहीं
कृपाळूपणें राज्य रंकासि द्यावें
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें

बहूसाल अन्याय कोटयानकोटी
रघूनायकें घातलें सर्व पोटीं
किती काय गूणासि म्यां आठवावें
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें

समर्थें दिल्हें सौख्य नानापरीचें
सदासर्वदा जाणसी अंतरीचें
लळे पाळिले तूं कृपाळू स्वभावें
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें

दिनानाथ् हें ब्रीद तां साच केलें
म्हणे दास भक्तांसि रे उद्धरीलें
सुखें सांडणें या देहाचें करावें
समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें

## ५३. श्रीराम आम्हांला देतो

आम्ही काय कुणाचें खातों ?
श्रीराम आम्हांला देतो ॥

बांधिले घुमट किल्लयाचे तट
त्याला फुटती पिंपळ वट
नाहीं विहीर आणि मोट
बुडाला पाणी कोण घालीतो ॥

पहा रे पहा मातेचिये स्तनीं
चिंतिता मांस रक्त मल घाणी
तयांमधे विमल दुग्ध आणोनी
कोण निर्मीतो ॥

खडक फोडितां सजिव रोडकी
पाहिली सर्वांनीं बेडकी
सिंधू नसता तियेचे मुखीं
पाणी कोण पाजीतो ॥

नसतां पाण्याचे बुडबुडे
सदा सर्वदा गगन कोरडे
दास म्हणे जीवन चहूंकडे
घालुनी सडे पीक उगवीतो ॥

## ५४. आमुचे कुळीं हनुमंत

हनुमंत आमुची कुळवली । राममंडपीं वेला गेली ।
श्रीराम-भजनें फळली । रामदास बोले ॥

आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचे दैवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धीतें न पावें कीं ॥

साह्य आम्हासी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ ।
गुरु श्रीराम समर्थ । उणें काय दासासी ॥

दाता एक रघुनंदन । वरकड लंडी देई कोण ।
हे त्यागोन आम्ही जन । कोणाप्रती मागावें ॥

म्हणोनि आम्ही रामदास । रामचरणीं विश्वास ।
कोसळोनि पडो हें आकाश । आणीकाची वास न पाहूं ॥

स्वरूपसंप्रदाय अयोध्या मठ । जानकी देवी रघुनाथ दैवत ।
मारुती-उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥

* * *

## ५५. प्रार्थना

कल्याण करी । देवराया । जनहित विवरी ॥

तळमळ तळमळ होतचि आहे
हे जन हातिं धरी

अपराधी जन चुकतचि गेले
तुझा तूंचि सावरी

कठीण त्यावरि कठीण जालें
आतां न दिसें उरी

कोठें जावें काय करावें
आरंभिलि बोहरी

दास म्हणे आम्हि केलें पावलों
दयेसि नाहीं सरी

कल्याण करी । देवराया । जनहित विवरी ॥

## टीपा

**१. ते हे कवी :** दासबोध हा ग्रंथ ओवीबद्ध आहे. याची रचना वीस दशकांची आहे. 'दशक' ह्या संज्ञेवरूनच त्यातील प्रकरणांची संख्या स्पष्ट होत आहे. प्रकरणाला 'समास' असे संबोधण्यात आले आहे.

दासबोधाचा पहिला दशक नमनपर आहे. ह्यातील सातवा समास 'कवेश्वर स्तवन' पर आहे. त्यालाच येथे 'ते हे कवी' हा मथळा दिला आहे. दासबोधातील आणखीही काही उतारे ह्यानंतर आले आहेत. ह्या ग्रंथासंबंधी **डॉ. श्री. व्यं. केतकर यांचे उद्गार** ध्यानात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात :– "काही ग्रंथांचें रहस्य मनुष्याचा स्वतःचा अनुभव जसजसा वाढत जातो तसतसे समजू लागते. दासबोधासारखा ग्रंथ घ्या.........मी त्यास आयुष्यविषयक तत्त्वज्ञानाचा बोधग्रंथच मानतों, व हा ग्रंथ केवळ मराठीमध्यें अपूर्व झाला असें न समजता हिंदुस्थानच्या प्राकृत वाङ्मयात हा एक अपूर्व ग्रंथ झाला असें समजतों......या ग्रंथात (साहित्यशास्त्राशिवाय) मानसशास्त्र आणि समाजशास्त्र आहें तें खरोखरच चित्तवेधक आहे."

**२. तेंचि भूत गे माय :** रामदासस्वामी घर सोडून गेले ते शके १५६६ त जांबेस आईला भेटावयास आले, तेव्हा त्यांचा तो गोसावी-अवतार पाहून 'बाळा, तुला असलं कोणतं रे हे भूत लागलं ?' असे आईने विचारले. त्यावर त्यांनी हे उत्तर दिले. रामभक्तीचे पिसे आपल्याला जडले, हे सांगायचे आहे. पण ते सांगताना त्यांनी थोडक्यात रामचरित्रच मोठ्या हृद्य रीतीने सांगितले आहे. 'लागे कौसल्येचे स्तनीं' ह्या उद्गारातली कोवळीक कविप्रकृतीची निदर्शक आहे.

प्रस्तुत पदाची चाल अंजनीगीतीसारखी आहे.

**कौशिक राउळीं :** विश्वामित्राच्या आश्रमात.

**छळोनी :** रामाला छळल्यामुळे.

**जेणें...तो ही :** तो म्हणजे परशुराम

**भुजंग :** लक्ष्मण (हा शेषाचा अवतार)

**३. बुधी दे रघुनायका :** [ अनुष्टुभ ] ही आर्तवाणी सर्वस्वी व्यक्तिवाचक असेल असे वाटत नाही. 'संसार नेटका नाहीं' असे त्यांनी का म्हणावे ? त्यांनी तर लग्नमंडपातूनच पाय काढता घेऊन संसाराकडे पाठ फिरवलेली ! "अन्न नाहीं०..." "सोडविल्या देवकोटी०...", "ब्रीद हे राखणें आधीं०..." हे उद्गार ध्यानी घेतले म्हणजे वैयक्तिक आर्ततेला समष्टीचे रूप येथे लाभले असावे असे वाटते. समाजाचा आणि राष्ट्राचा संसार हाच त्यांनी आपला मानला असावा. पारतंत्र्यामुळे

त्याची धुळधाण उडालेली; तो संसार सावरण्याच्या उद्योगात या प्रखर प्रयत्नवादी पुरुषाच्याही चित्ताला कधीकधी नैराश्याने ग्रासले असावे. त्या उदासीनतेच्या झटक्यातून, ह्या व्यथा आणि वेदना एकान्तात हृदयाचा बांध फोडून मोकळ्या झाल्या असाव्यात. बहुतेक दैन्यदुःखांचा उगम निर्बुद्धपणात असून माणसाजवळ एक बुद्धी असली तर त्यांचा परिहार होणे शक्य आहे; तेव्हा, देवाजवळ काही मागायचे असेल तर 'बुद्धी दे' हेच मागावे. रामदासांच्या ह्या मागण्यात भोळीभाबडी भाविकता नाही हे विशेष ध्यानात घेण्यासारखे आहे. समाज किंवा राष्ट्र बलवान होते ते बुद्धिसामर्थ्याने.

**पिसुणें** ( पिशुन ) : दुष्ट, चहाडखोर.

**४. स्फूर्ति दे देवराया** : वृत्त : भुजंगप्रयात

**५. मार्तंड** : [ अनुष्टुभ ] बुद्धीची झेप, भव्यता, उत्कटता, वगैरे, रामदासप्रणीत गुणविशेषांचा प्रत्यय येथे येईल. असाच सूर्यमहिमा दासबोध द. १६, स. २ मध्येही आहे.

**६. धन्य ते गायनी कळा** : [ अनुष्टुभ ] रामदासांना संगीताबद्दल प्रेम होते आणि त्यांना ती विद्या चांगलीच अवगत असावी. त्यांच्या वाङ्मयात संगीता-बद्दल वारंवार उल्लेख आढळतात ते त्यांच्या पोटी संगीताबद्दल प्रेम आणि ज्ञान आहे म्हणून.

**विदेश पाहता नाहीं** : संगीत ही स्वरभाषा आहे. म्हणजे ती जागतिक भाषा आहे. म्हणून तिला स्वदेश आणि परकीय देश हा भेद नाही. इतकेच नव्हे तर, पशू-पक्षी, सान-थोर हाही भेद नाही.

**७. धबधबा आणि घळ** : [अनुष्टुभ] निर्गळें : स्वच्छ, न गळणारी.

मार्तंड, धन्य ते गायनी कळा, व प्रस्तुतचे प्रकरण या तिघांचाही शेवट देव आणि भक्त यांच्या संबंधात झाला आहे. संतांची कविता भक्तीच्या वळणावर जावी, हे स्वाभाविकच होय.

**८. पृथ्वी** : [ वृत्त : शिखरिणी ] कवितेत कल्पनेची विशालता दिसून येते. तुलनेसाठी दासबोध, दशक १६, स. ३ पाहावा.

**थरा** = 'धरा' म्हणायचे असावे ! नाही तर, अनेक थरांनी जमीन बनलेली असते, असा काही अर्थ काढावा लागतो.

**९. मनाचे श्लोक** : [ वृत्त : भुजंगप्रयात ] एकंदर श्लोकसंख्या २०५. स्वामींनी स्वताच ह्या प्रकरणाची फलश्रुती सांगितली आहे ती ही—

मनाचीं शतें ऐकतां दोष जाती । मतीमंद ते साधनायोग्य होती
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं । म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी

भक्ती, साधना, यांबद्दल सांगताना व्यवहारज्ञान आणि आचरण याबद्दलही ओघात

पुष्कळ सांगितले आहे. मनाबरोबर जनालाही बोध हा रामदासी वाङ्मयाचा गाभा आहे.

आपल्या मानसिक उन्नतीकरिता जो प्रयत्न करावयाचा त्याचा भाग म्हणजे या प्रकारची काव्ये होत. रामदासांच्या पूर्वी मनास उपदेश करण्याची प्रवृत्ती नामदेव आणि एकनाथ यांच्यात आढळते. रामदासांच्या काळी वामनानेही असेच श्लोक लिहिले असून त्याने प्रत्येक श्लोकान्ती आपले नावही गोवून ठेवले आहे. रामदासांच्या मनोबोधात आत्मसामर्थ्याची जाणीव विशेष दिसते.

कृपाळूपणें० ........पाहे :–बालक नुकतेच उठू, बसू, चालू लागले असता त्याची आई जवळच राहून त्याच्या हालचाली कौतुकाने, वात्सल्याने पाहत असते आणि ते अगदीच पडू लागले तर पुढे होऊन त्याला सावरते. त्याप्रमाणे देवहीं भक्ताचे धैर्य, कसोटी, पाहात असतो. 'कृपाळूपणें' ह्या शब्दात हा आशय आहे.

तमाचा : अज्ञानाचा, शबल विकाराचा.

विषयी : विषयासक्त.

संतप्त : संत्रस्त.

**१०. राघव नीरवीला :** [ वृत्त : उपजाती ( इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा मिळून )]

राम, लक्ष्मण, सीता, वनवासाला निघाली आहेत. वनवासात त्यांचे हाल होतील हे ध्यानी येऊन कौसल्येचे अंतःकरण कळवळले आहे. अशा वेळी त्यांना त्रास न होईल याकडे लक्ष ठेवा असे ती पृथ्वी, आप, तेज, वायू, आदि महाभूतांना आणि वनचर–खेचरांना कळवळून बजावीत आहे. रामदासांची कविप्रकृती आणि कल्पकता यांची साक्ष देणारे हे स्फुट आहे.

तो स्वामी०...सुताचा : हे वायो, माझा राम तुझ्या पुत्राचा म्हणजे मारुतीचा स्वामी आहे बरं, ध्यानात ठेव, असे कौसल्येने बजावण्यात कालविपर्यास घडला आहे. रामाला मारुतीची जोड पुढे कालान्तराने वनवासात झाली; सुरुवातीला नव्हती. तरी पण आईच्या हृदयाचा आविष्कार म्हणून ही कविकल्पना सरस आणि सेव्य आहे.

**११. देव आहे जगदांतरें :** [ दासबोध, द. १८, स. ८ ] असेच काहीसे विचार दासबोध द. १७, स. १ मध्येही आढळतील.

**१२. सद्गुरुस्तवन :** [ दासबोध द. १, स. ४ ] दृष्टान्तांची लयलूट हा रामदासांच्या वाङ्मयाचा एक गुणविशेष ह्या स्तवनांत व्यक्त झाला आहे. त्याचबरोबर दृष्टान्तातील तोकडेपणाही दाखविण्याची चातुरी इथे प्रगट झाली आहे. दृष्टान्त हा वर्ण्य विषयाची संपूर्णतया बरोबरी करू शकत नाही.

**१३. आपण रामचि व्हावें :** ( जुना दासबोध, समास १६ ) ही अनुभूती, हा आत्मविश्वास, ही प्रचीती, सारे काही अनन्यसाधारण आहे.

वेळाइत : कैवारी, संकटप्रसंगी मदतीस धावणारा ( वेळा : समुद्राचा किनारा, मर्यादा. वेळाइत : मर्यादा–अंकित ).

**१४. उत्तम पुरुष** : [ दासबोध द. १२, स. १० ]

**पारखे** : ( पाठभेद ' परावे ' ) : परके.

**जाकसले** : गांजले.

**नेरूकचि** : थोडकेच, मुद्याचे.

**कित्तेक लोक०...फिरती** : ज्यांच्याजवळ काही गुणविशेष असेल त्याला लोक शोधत येतील. अमेरिकेतील विश्वविख्यत डॉक्टर मेयो ( बंधुद्वय ) यांच्य मेजावर

Have something the world wants and though you dwell in the midst of a forest, it will wear a beaten pathway to your door. हे सुभाषित आहे. रामदासांनी हे फार पूर्वीच हेरले होते.

**१५. रामराज्य** : राज्यव्यवस्थेचा आदर्श म्हणून ' रामराज्य ' हा शब्द आपण पुष्कळ वापरत असतो. पण तपशील नेमका काय ? रामदासांनी आपली कल्पना रंगविली असून संगीतादी कलांचाही यात अंतर्भाव केला आहे हे विशेष होय–त्यांच्या रसिक वृत्तीचे निदर्शक होय.

**१६. राजकारण** : [ दासबोध द. १९, स. ९ ] असेच राजकारणपर विचार दासबोध द. ११, स. ९ मध्ये आले आहेत.

**गवाविती** = गमाविती. **नव्हता** = न होता.

" **जेथे तजवीजा कळती०** " – एकान्तात नाना उपाय व युक्त्या सुचतात; अनेक प्रश्नांचे मनन चालू राहते व प्राणिमात्रांच्या स्थिती व गती ( चालू परिस्थिती व प्राप्त होणारी गती ) कळून येतात.

" **जरी हा चाळणाची करीना०** " – बाकी शून्य न करणाऱ्या दिवाळखोराप्रमाणे त्याची स्थिती होईल. दिवाळखोर बाकी शून्य न करता कर्ज व व्याज वाढू देऊन गोत्यात येतो तसा, हा अनेक प्रश्नांचे उलगडे न करता बसेल तर अनेक संशय–कुतर्कांचा कल्होळ याच्या चित्तात माजून याचे समाधान राहणार नाही.

**पहिल्याच** = नवीन नव्हेत. **देखोन** = आपल्या दर्शनानें. **ग्रामण्य वर्मी०**– गांवातले कुटाळांचे अग्रणी पेचात पकडून जमीनदोस्त करावे; पण पुन्हा मिळवून घ्यावे.

**१७. राजधर्म** : ' प्रपंचा कारणें स्वभावें बोलिलो ' ' ऐसा प्रपंचाचा विवेक ' अशा रीतीने प्रपंचाचा उच्चार जरी झाला असला तरी तपशील ध्यानी घेणारास कळून येईल की केवळ सामान्य प्रापंचिकासाठी रामदास हे सांगत नाहीत. धुरीण, कारभारी, राजकारणी अशा नात्याने जे सार्वजनिक प्रपंचकर्ते आहेत त्यांच्या-

साठी हे सावधगिरीचे बोलणे ते ‘ स्वभावें ’ ( अंतर्यामीच्या तळमळीने ) बोलून गेले आहेत.

१८. **क्षात्रधर्म :** रामदासांकडे भक्तिभावाने येणारे लोक अनेक वृत्तीचे होते. ज्याने त्याने आपल्यापरीने ‘ खबर्दार ’ असावे हे रामदासांचे धोरण. त्यास अनुसरून ते हितोपदेश करीत.

**“ मारितां मारितां० ...महद्भाग्य :–** “ हतो वा प्राप्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ” ह्या उक्तीचा प्रतिध्वनी.

**‘ भले कुळवंत म्हणावें० ’...** येथून पुढचा भाग त्या काळच्या क्षत्रियांना प्रत्यक्ष आवाहन आहे, असे दिसते.

**देवमात्र उच्छेदिला०**–सगळीकडे देवळांतल्या मूर्तींचा भंग होत आहे आणि धर्मावर घाला पडत आहे.

**एक जाती दोन जाती पावला०**–मूळचा क्षत्रिय असताना धर्मांतर करून जो दुसऱ्या जातीत जातो ( म्हणजे मुसलमान होतो ) त्याला काय म्हणावे ?

**“ तुळजावराचेनि गुणे रामें रावण मारिला ”** म्हणून तिला **‘ रामदास ध्यातो मनीं ’** ह्या उद्गारांतली अर्थगर्भता, ध्वन्यर्थ, त्या काळच्या स्वराज्यसंस्थापनेच्या उद्योगाला अनुलक्षून असावा. त्या उद्योगाला सर्वांच्याकडून जोर चढावा म्हणून हे आवाहन आहे.

१९. **शिवकल्याण राजा :** शके १५७१ त शिवाजीमहाराजास वाई येथे समर्थांकडून पत्र गेले ते.

**तुमचे देशी०...** ह्या ओवीवरून हे स्पष्ट होते की ह्या दोघा महापुरुषांची गाठभेट होण्यापूर्वीचे हे पत्र आहे. शिवाजीमहाराजांचे गुणप्रताप समर्थांनी चांगलेच जाणलेले असून, त्यांची भेट आपण घेतली नाही याची रुखरुख त्यांना लागलेली असावी आणि म्हणूनच हे पत्र लिहून त्यांनी दिलगिरी व्यक्त केलेली दिसते. पण पत्र लिहून त्या प्रचंड उद्योगरत पुरुषाचा आपण उगाच वेळ घेत आहो, हीही पुन्हा जाणीव आहे त्यांना. स्वताकडे लघुत्व घेण्यात समर्थांच्या मनाचा मोठेपणा आणि परगुणग्राहकता यांची साक्ष ह्या पत्रावरून मिळते.

२०. **सावधता :** शिवाजी राजांनी राज्याच्या सनदा समर्थांच्या झोळीत टाकल्या त्या प्रसंगी केलेला उपदेश.

**“ खबरदारी आणि वेगीं० ”**–दक्षता आणि कामाचा उरक. ( घोळ न घालता चलाखपणे निर्णय करणे Quick disposal, quick decision अशा गुणांचा निदर्शक हा शब्दप्रयोग आहे. )

**“ पाहिलेचि पाहावें०...... ”** दासबोध द. २०, स. ३ मधील ३० व्या ओवीशी बहुतांशी साधर्म्य.

**२१. संभाजीस पत्र :** शके १६०३ मध्ये पौष मासीं पाठविलेले. प्रातः-स्मरणीय पुण्यश्लोकांमध्ये शिवाजी महाराजांची गणना करावी, इतकी त्यांची योग्यता रामदासांनी इथे गायिली आहे.

"**इशारतीचे बोलतां नये**" ०...... आपल्या मसलतीचा, संकल्पाचा, सुगावा लोकांना लागता कामा नये, अशा आशयाचा धूर्तपणाचा उपदेश वारंवार आढळतो. Be wiser than other people if you can; but do not tell them so असें Lord Chesterfield सारखे आजकालचेही मुत्सद्दी म्हणतात. तेव्हा रामदासांच्या शब्दांना खोट नाही.

**२२. शुद्धाशुद्ध-विवेक :** [ दासबोध द. १३, स. १० ] सर्वांभूती एक आत्मा आहे, म्हणून सर्वांना एकाच मापाने मोजावयाचे नाही. शूरासारखाच भ्याडाचाही मान राखण्याने भ्याडाकरवी फजीतवाडा ठरलेलाच !

मुलाच्या चालीने चालावे, वेड्याच्याही वर्मी लागेल असे बोलू नये आणि सर्वांचे मनोगत जाणून सर्वांना सांभाळून महंताने असावे हे खरे. पण विवेक हवाच. उत्तम आणि कनिष्ठ, श्रीमंत आणि आशाळभूत, अन्न आणि वमन, राजे आणि माकडे, पंडित आणि चावट पोरे, साखर आणि माती, ह्यांतले तारतम्य ठेवायलाच पाहिजे. साऱ्यांना एकाच पंगतीला बसवून चालणार नाही.

**२३. भेदाभेद :** मागच्या प्रकरणातल्या विचारसरणीशी ह्या प्रकरणाचे साम्य आहे.

**उधरी बधा** = बद्धाचा उद्धार करतो.

**बधें बधसुटेचिना** = जो स्वताच बद्ध आहे तो ( इतर ) बद्धांची मुक्तता काय करणार ?

**२४. राजी राखावे सकळ :** मागील दोनीही प्रकरणांची ही काहीशी पुरवणीच म्हणायची.

**२५. जन बुडाले बुडाले :** समर्थ हे परमार्थवादी संत. पण त्यांच्या सामाजिक मनाचा हा उद्रेक जिवंत काव्यवाणीचा नमुना आहे. त्या काळची घोर परिस्थिती पाहून त्यांचे हृदय पिळवटून गेले. त्यातून हे शब्द उफाळलेले आहेत–धगधगलेल्या भावनेचे हे लोळ उसळले आहेत.

**२६. तुळजा कुळदेवता :** पारघाटीं जगन्माता० ... ...राहिली :–प्रताप-गडावर तुळजाभवानीची स्थापना करण्यात आली ह्या घटनेचा हा उल्लेख आहे.

सबंध स्तोत्रात कृतकृत्यतेचा भाव आहे. जे काही घडले, जे काही श्रेय पदरी पडले, ते सारे देवी तुझ्या कृपेने अशी कृतज्ञता व्यक्त होत आहे. शेवटच्या परिच्छेदातले मागणे तर विशेषच महत्वाचे आहे. 'तुझा तू वाढवी राजा' म्हणजे शिवाजी महाराजांचा ( यश, कीर्ति, प्रताप असा अनेक प्रकारांनी ) अधिकाधिक

उत्कर्ष होवो, ही उत्कट इच्छा येथे व्यक्त झाली आहे. त्या काळच्या कोणाही नामवंत संताने राजकीय आंदोलनाकडे इतक्या जिवाभावाने पाहिलेले दिसत नाही.

**२७. माता आणि तुळजामाता :** लो लागला–ळळा लागला. ती लागले–तिजकडे लागले.

**२८. वात्सल्य : मत्स्य आठवीता पाळी :** मासळी आपल्या पिलांचा सांभाळ स्मरणमात्रे करते आणि कासवी दृष्टिक्षेपाने सांभाळ करते.

**३०. आनंदवनभूवनीं :** हनुमंतस्वामीकृत समर्थ चरित्रात ह्या प्रकरणाबद्दल जो प्रस्ताव आहे त्यावरून आनंदवनभूवन म्हणजे नाशिकापासून करवीरपर्यंतचा भाग अभिप्रेत असावा. हे समग्र प्रकरण अत्यंत हृद्य आहे. महाराष्ट्रांतील जनतेच्या हलाखीने कळवळून गेलेल्या समर्थांनी "जन बुडाले बुडाले" असा एकदा टाहो फोडला होता. त्यानंतर स्वराज्य-स्थापनेचा उद्योग रंगारूपास येऊ लागलेला पाहून त्यांना जो धीर वाटला त्याचा उद्‌गार "तुळजा कुळदेवता" ह्या स्तोत्रात सापडतो. 'तुझा तूं वाढवी राजा। शीघ्र आम्हाचि देखता' ही त्यांतली भाषा पाहाता, शिवाजी महाराज छत्रसिंहासनी विराजमान होण्यापूर्वीची ती भावना असून, प्रौढ वयस्क समर्थांना, आपल्या डोळ्यांदेखत शिवाजी महाराज पूर्ण–प्रतापी झालेले पाहायला मिळावेत ही अधीरता होती, असे जाणवते. प्रस्तुत प्रकरणात सर्व आशा–आकांक्षा सफळ झालेल्याचा हर्षोत्फुल्ल उद्‌गार आहे.

जनतेत स्थिरस्थावरपणा आला, देवाधर्मांवर जो घाला पडला होता तो परतवून लावला असून भग्न देवालये, दीपमाळा यांचा उत्साहाने उद्धार होत आहे, देवीने पूर्वी दैत्यसंहार केला होता त्याचाच प्रत्यय फिरून येत आहे– 'बुडाला औरंग्या पापी म्लेंच्छ संहार जाहला' असे म्हणण्याइतके म्लेंच्छाचे वर्चस्व नामशेष झाले आहे, सारांश, पूर्वी जे जे रात्री स्वप्नात पाहिले होते (किंवा पारतंत्र्यांधकारात खितपत असताना जे 'स्वप्न' चिंतिले होते) ते सर्व काही प्रत्यक्षात घडलेले पाहून रामदास हर्षभरित होत्साते मुक्त मनाने इथे गात आहेत.

प्रस्तुत प्रकरणाबद्दल प्रा. श्री. म. माटे म्हणतात– "आनंदवनभुवन हे स्वामींचे काव्य फार उद्दीपक आहे. ते वाचत असताना एक विलक्षण प्रोत्साहन आपल्या मनात भरत जाते...वाचकाच्या मनाला एक तऱ्हेचा उन्माद चढावा अशीच या काव्याची रचना आहे. त्यातील नुसत्या ध्वनीनेसुद्धां वाचकाला आवेश चढतो आणि आपण एखाद्या मोठ्या आक्रमक कार्यप्रसंगात गुंतलो आहोत किंवा तसा प्रसंग आपण प्रत्यक्ष पाहात आहोत असेच वाचकाला वाटू लागते."

**३१. समस्ते पावले धका आणि घडेल तें सुखें घडो** (वृत्त : कलिंद-नंदिनी) रामदास मुख्यत्वे यत्नवादी आहेत. तथापी, काळ आणि संपत्ती यांची अशाश्वतता व क्षणभंगुरता सांगत असताना, चांगली वेळ लागली म्हणजे श्रमसायास न करता चांगले घडत जाते आणि विषम काळी पराक्रमही निष्फळ ठरतात, असेही

ते मान्य करतात. पण अशा वेळी विवेक करून उदास राहावे (लाभालाभौ जया जयौ) हे त्यांना सांगायचे आहे.

**३४. स्फुट श्लोक :** दुसरा आणि पाचवा श्लोक उपजाति (इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा मिश्र) वृत्तात आहे. चवथा आणि सहावा शालिनी वृत्तात आहे. शेवटच्या श्लोकातील पहिला चरण लयग्राही वृत्ताचा, दुसरा व तिसरा चरण इंद्रवज्रेचा आणि चौथा चरण स्वानंद सम्राट आणि केकिरव यांच्या मिश्रणाचा आहे. [ 'रामदासांचा वृत्तविलास' या प्रकरणात निर्देश नसलेले लयग्राही हे वृत्त होय ] बाकीचे श्लोक भुजंगप्रयातचे आहेत.

**तळाथीं :** तळहातीं (आचमनाएवढ्या किंवा कुडचाभर पाण्यात).

**भूजकांता :** रामाला ( भू–पृथ्वी. भूज–पृथ्वीची कन्या सीता. कांता–पतीला ).

**३५. योग हा सुकृताचा आणि मुलांना शिकवण :** ( वृत्त : भुजंगप्रयात ) वडील बंधू श्रेष्ठ गंगाधरस्वामी यांच्या निधनाचे वृत्त कळल्यावर त्यांच्या मुलांना लिहिलेले पत्र म्हणजे 'मुलांना शिकवण'.

**३७. शिष्यवृंदास :** ( हे व पुढील चार प्रकरणे अनुष्टुभ आहेत. )

**ताळबध :** तालबद्ध.

**आपुले तनही नसे :** तनसडी देखील आपुली नाही.

**वर्तावें तें मनोगतें :** ( ऐकावे जनाचे ) करावे मनाचे, हा भावार्थ.

**देव सांग करी०......बरा :**–देव सारे काही यथासांग करील ही दृढ श्रद्धा असो द्यावी.

**४४. देव–दैत्य–विवेक :** "जाणता देवाचा अंश । नेणता म्हणजे तो राक्षस" असे विधान दासबोध १७–७–१४ मध्ये आले आहे तें ह्या संदर्भात पाहावे.

**४७. उमजणें समजणें आधीं :** मापटे मोजिले दाणे०—हाच दृष्टान्त विवरणासंबंधी दासबोधात ( १८–५–१ ) आला आहे :—धान्य उदंड मोजिलें । परि त्या मापें नाहिं भक्षिलें । विवरल्याविण तैसे जाले । प्राणिमात्रांसी ॥

**४८. धन्य संसार होतसे :** 'योग हा सुकृताचा' यामधील संसाराचे शब्दचित्र प्रस्तुत कवितेशी ताडून पाहावे.

**४९. अभंग गुंफा :** काही अभंग देवद्वार छंदात आहेत, तर काही देवीवर छंदात आहेत.

**पंचकीर्ण :** 'पंचकीरण योग' म्हणून खुद्द समर्थांचेच एक लघुअध्यात्म प्रकरण आहे.

**५४. आमुचे कुळीं हनुमंत :** ह्या उद्गारात अनन्य निष्ठा खणखणत आहे.

५५. **प्रार्थना :** समर्थ स्वतासाठी देवाजवळ काही मागत नाहीत. मागतकरी दास देवाला आवडत नाही असे त्यांनीच दुसऱ्या एका ठिकाणी सांगितले आहे. मागणे आहे ते लोकांकरिता, लोकांच्या कल्याणाचे. त्यांनी आमरण जो प्रचंड उद्योग केला तो लोकांचे भले व्हावे म्हणून. तेव्हा प्रार्थनेचे अंतःसूत्रही ‘ जनहित विवरी ’ ह्याशिवाय दुसरे कसे असेल ?

समर्थांचे रामाजवळ आणखी एक असेच मागणे असून त्याचा उल्लेख पृ. १४३ वर आला आहे. देवाजवळ काय मागावे हे सुद्धा कळले पाहिजे. त्या मागण्यांवरून याचकाच्या अंतःकरणाची जात कळून येते.

प्रसंग–वोळखी दे रे राम
अंतर–पारख दे रे राम
दीन–दया मज दे रे राम
मागों नेणे तें दे रे राम
मज न कळे तें दे रे राम

असेही त्यांनी मागितले आहे. विश्वसंसारी संताच्या ह्या मागण्या आहेत. त्यांच्या हृदयाच्या विशालतेची यावरून उत्कृष्ट कल्पना येईल.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
वि: ..................
नों. दि: ..................
अनुक्रम ..................

# यशवन्त यांचे वाङ्मय

**पद्य :**

मित्रप्रेम रहस्य
तुटलेला तारा
यशवन्ती
यशोधन
भावमंथन
यशोगंध
यशोगिरी
ओजस्विनी
वाकळ
कमण्डलू
पाणपोई

**–दीर्घकाव्यें–**

बंदीशाळा
जयमंगला
काव्यकिरीट
मुठे लोकमातें

**–संगीतिका–**

पर्वकाल ये नवा

**गद्य :**

प्रापंचिक पत्रें
कांतणीचें घर

**–अनुवादित कादंबऱ्या–**

घायाळ
वनवास

**–विवेचन : प्रबंध–**

समर्थ रामदास : एक अभ्यास

**–बालवाङ्मय : कथा–**

दरोडेखोर ? छे देवदूत
भगवी गीता
चाणाक्ष न्यायाधीश
रंजना
अमलांगी
अनंग–वासंती

**बालवाङ्मय : कविता**

मोतीबाग

१३६६८
REFBK-0013768

किंमत रुपये १२-५०


**आमची आगामी प्रकाशने**

**नाटककार खाडिलकर**

डॉ. वि. म. कुलकर्णी

**मराठी नाटकातील विनोद**